


जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, रविवार ९ ऑगस्ट २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०+४




# फक्त प्रश्न विचारू नका, उत्तरही शोधा

## पुढील 35 वर्षे तुम्ही जे काही कराल, तोच विकसित भारताचा पाया असेल





**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** आयआयटी दिल्लीच्या ५७ व्या दीक्षांत समारंभात बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी नमूद केले की, विद्यार्थी केवळ पदव्या घेउनच नव्हे, तर स्वप्ने घेउन या संस्थेतून बाहेर पडत आहेत. इथे सर्व विद्यार्थी उपस्थित आहेत. प्रत्येकाच्या मनात कुठेतरी वेगळे विचार घोळत आहेत. ते म्हणाले, मी अनेक आयआयटी (IIT) माजी विद्यार्थ्यांचे यश पाहिले आहे. त्यांनी अशा समस्या ओळखल्या ज्या इतरांच्या नजरेतून सुटल्या होत्या. म्हणूनच, शिकत राहा; केवळ प्रश्न विचारू नका, तर त्यावर उपायही शोधा.

त्यांनी पुढे म्हटले: प्रत्येक पिढीची स्वतःची आव्हाने आणि जबाबदा-या असतात. विकसित भारत घडवणे ही तुमची जबाबदारी आहे. पुढील ३५ वर्षांत तुम्ही जे कार्य कराल, त्यावरच विकसित भारताचा पाया रचला जाईल. पंतप्रधानांनी यावेळी विद्यार्थ्यांना पदव्या आणि पदके प्रदान केली. या दीक्षांत समारंभात ५८७ पीएचडी संशोधकांसह ३,००० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. मोदींनी आयआयटी दिल्लीच्या सोनीपत कॅम्पसमध्ये बसवण्यात आलेल्या 'परम प्रज्ञा' (Param Pragya) या एआय-आधारित (AI-based) उच्च-क्षमता असलेल्या सुपरकाम्प्युटरचे दूरस्थ पद्धतीने (re-motely) उद्घाटन केले.

**पीएम म्हणाले- मी बागेश्वर बाबा नाही;** मी काही 'बाबा बागेश्वर' नाही: आज इथे सर्व विद्यार्थी उपस्थित आहात, पण तुमच्या मनात कदाचित काहीतरी वेगळेच विचार चालले असतील. मी काही बाबा बागेश्वर नाही, पण तुमच्या डोक्यात नक्कीच काहीतरी विचार घोळत आहेत. प्रत्येक विद्यार्थ्याची स्वप्ने असतात: प्रत्येक विद्यार्थी भविष्यासाठी काहीतरी स्वप्ने बाळगत असतो. कोणीतरी आपल्या पहिल्या पगाराची वाट पाहत असेल; कोणी स्टार्टअपचे स्वप्न पाहत असेल; तर कोणी एखाद्या नवीन स्पर्धात्मक आव्हानाची तयारी करत असेल. प्रत्येकाची स्वतःची अशी स्वप्ने असतात.

**३० वर्षांनंतर जग कसे असेल माहिती नाही:** 'तुम्ही अशा काळात या संस्थेतून पदवीधर होत आहात जेव्हा जग वेगाने बदलत आहे. शिक्षण आणि जागतिक सत्तेचे समीकरण बदलत आहे. तंत्रज्ञान इतक्या वेगाने विकसित होत आहे की, पुढील २० ते ३० वर्षांत जग कसे असेल, याचा अंदाजही आपण लावू शकत नाही.'

**आव्हाने संधी घेउन येतात:** बदलामुळे आव्हाने आणि संधी दोन्ही येतात. उद्योग आणि व्यवसाय बदलत असतात, पण हे लक्षात ठेवा: जे सतत शिकत राहतात, तेच यशस्वी होतात. जे नवीन आव्हानांवर उपाय शोधतात, तेच विजयी होतात. आयआयटीमध्ये (IIT) तुम्ही नेमके हेच शिकला आहात; तुमची पदवी त्या शिक्षणाचा पुरावा आहे.

**कॅम्पस लाइफ आणि प्रत्यक्ष जीवन यात खूप मोठा फरक:** आयआयटीमध्ये एक निश्चित अभ्यासक्रम असतो, पण बाहेर मात्र सर्व काही 'अभ्यासक्रमाबाहेरचे'असते. ख-या आयुष्यात परीक्षा कशाची असेल किंवा अभ्यासक्रम काय असेल, हे तुम्हाला माहीत (पान २ वर)

# रील 21 व्या शतकातील व्यसन

## राहुल गांधी म्हणाले- मजुरी करा, पण नोकरी मिळू शकत नाही; हजारांतून फक्त 12 तरूणांना कायमस्वरूपी नोकरी

**प्रयागराज/नवी दिल्ली/ वृत्तसंस्था :**विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी शनिवारी प्रयागराज येथे 'छात्रों की गूंज' कार्यक्रमात ४७ मिनिटे संवाद साधला. ते म्हणाले, 'प्रणालीने तरुणांना चक्रव्यूहात अडकवले आहे. त्यांना सांगितले जाते की, तुम्हाला जेवढ्या रील्स बनवायच्या आहेत, तेवढ्या बनवा. मजुरी करा. २१ व्या शतकातील नशा करा, पण नोकरी मिळू शकत नाही.' ते म्हणाले, 'कुटुंबांकडून लाखो कोटी रुपये घेतले जातात आणि त्या बदल्यात बीए-एमएची पदवी मिळते, पण हे प्रमाणपत्र रोजगाराची हमी देत नाही. आज हजारपैकी फक्त१२ तरुणांना कायमस्वरूपी नोकरी मिळत आहे.'

यावेळी राहुल गांधींनी मंचावर ७ हून अधिक विद्यार्थी-विद्यार्थिनींशी संवाद साधला. त्यांना शिक्षण, रोजगाराशी संबंधित प्रश्न विचारले. त्यांच्यासोबत प्रियंका गांधींची मुलगी मिरायाही उपस्थित होती. या कार्यक्रमात उत्तर प्रदेशातील २३ जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांना बोलावण्यात आले होते. राहुल म्हणाले की, सिस्टीमने तरु णांना चक्रव्यूहात अडकवले आहे. लाखो-करोडो रुपयांच्या फीनंतर एक प्रमाणपत्र मिळते, ज्याला आज काहीच किंमत नाही. कारण हे प्रमाणपत्र रोजगार देत नाही. तरु णांना सांगितले जाते की, तुम्हाला जेवढ्या रील्स बनवायच्या आहेत, तेवढ्या बनवा. जेवढ्या रील्स बघायच्या आहेत, तेवढ्या बघा. ब्लिंकइट, उबरमध्ये काम करा. मजुरी करा. २१ व्या शतकातील नशा घ्या, पण नोकरी मिळू शकत नाही.

**तरु णांसाठी ५ दरवाजे होते, सगळे बंद-**राहुल म्हणाले की, युवकांसाठी पाच दरवाजे होते, ते सर्व बंद करण्यात आले आहेत. जगात आज मेड इन चायना, मेड इन व्हिएतनाम, मेड इन बांगलादेश मिळेल, पण मेड इन इंडिया मिळणार नाही. कारण नोटाबंदी आणि चुकीच्या जीएसटीने उत्पादन प्रणाली (मॅन्युफॅक्चरिंग सिस्टिम) नष्ट केली आहे. स्टार्टअप इंडिया कुठे गेले? हिंदुस्तानचे बँक तुम्हाला एक रुपया देणार नाहीत, अंबानी-अडाणींना लाखो




कोटी रुपये देतील. छोट्या व्यापा-यांना बँक कर्ज मिळत नाही. सरकारी नोकरीची तयारी करणा-या १५० उमेदवारांपैकी फक्त १ युवकाला सरकारी नोकरी मिळते. सार्वजनिक क्षेत्राचे खासगीकरण केल्यामुळे नोक-या संपुष्टात आल्या. २०१४ पूर्वी ज्या सार्वजनिक क्षेत्रात १४ लाख नोक-या होत्या, २०२६ मध्ये फक्त ७ लाख उरल्या. कार्पोरेट नोक-यांमध्ये AI मुळे नोक-या संपुष्टात आल्या आहेत.

**भांडवलदारांची संपत्ती ३० पटीने वाढली-** गौतम अदानींची संपत्ती १० वर्षांत ३० पटीने वाढली आहे. भाजपची संपत्ती १५० कोटींवरून १०,००० कोटी रुपये झाली आहे. याशिवाय, प्रत्येक संस्थेत उच्च चे प्रचारक ठेवले जात आहेत, जेणेकरून विचारसरणी नियंत्रित करता येईल. उदा. विद्यापीठे, माध्यमे, न्यायव्यवस्था आणि सुरक्षा दलांमध्ये.

**रस्त्यावर तरु णांची गर्दी जमली-** राहुल यांचा कार्यक्रम संपल्यानंतर रस्त्यावर तरु णांची गर्दी जमली. काहीजण तर हातात तिरंगा घेउन चालत होते. राहुल गांधींना ऐकायला आलेले विद्यार्थी ट्रक आणि कंटेनरवर चढले. त्यांनी तिथूनच त्यांचे भाषण ऐकले. मंचावर आलेल्या एका विद्यार्थ्यासोबत राहुल गांधींनी सेल्फीसुद्धा काढला. राहुल म्हणाले- तर हा होता बिहार आणि उत्तर प्रदेशचा आवाज. आता मी तुम्हाला सांगितले होते की, तुम्ही अंधारात एक मशाल (पान २ वर)

# राज्यात 13 ऑगस्टपासून पावसाचा जोर पुन्हा वाढणार



**मुंबई/प्रतिनिधी :** गेल्या काही दिवसांपासून पावसाने विश्रांती घेतली होती. मात्र, आता हवामानात पुन्हा बदल होण्याचे संकेत आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात पावसाचा जोर वाढू शकतो. १३ ते २० ऑगस्ट या काळात विदर्भ, मध्य महाराष्ट्र आणि कोकणात सरासरीपेक्षा जास्त पाउस होण्याची शक्यता आहे. तसेच २० ते २७ ऑगस्ट दरम्यान राज्यातील विविध भागांमध्ये पाउस सुरूच राहण्याची शक्यता आहे, असे ज्येष्ठ हवामानशास्त्रज्ञ कृष्णानंद होसाळीकर यांनी सांगितले आहे.

हवामान विभागाने हवामानासंबंधित एक महत्त्वपूर्ण अंदाज जाहीर केला आहे. येत्या २४ तासांत बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होण्याचा इशारा दिला आहे. तसेच चालू महिन्यात महाराष्ट्रात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दक्षिण पश्चिम बंगाल आणि त्याला लागून असलेल्या बांगलादेशच्या आकाशात चक्राकार वारे वाहत आहेत. या कारणामुळे पुढील २४ तासांत पश्चिम बंगालची किनारपट्टी आणि वायव्य बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र तयार होणार आहे. दरम्यान, पर्यटन स्थळ म्हणून प्रसिद्ध असलेल्या महाबळेश्वरमध्ये मागील २४ तासांत ८२.५ मि.मी. पाउस पडला आहे. तर या हंगामात एकूण ५ हजार १६ मि.मी. पाउस नोंदविण्यात आला आहे.ओडिशाच्या काही भागांत अतिशय मुसळधार पाउस पडू शकतो. केरळ, कर्नाटक (किनारपट्टी व दक्षिण भाग), पूर्व मध्य प्रदेश, पूर्व राजस्थान या राज्यांमध्ये मुसळधार पाउस पडू शकतो. मध्य महाराष्ट्र, बिहार, छत्तीसगड, उत्तराखंड, दिल्ली, हरियाणा, आसाम आणि ईशान्येकडील राज्यांमध्ये चांगल्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

# *हिमाचल प्रदेशमध्ये भीषण अपघात; 8 ठार*

**चंबा/वृत्तसंस्था-**हिमाचल प्रदेशमधील चंबा जिल्ह्यात बैरागढ-चंबा मार्गावर आज सकाळी ८ ऑगस्ट रोजी भीषण अपघात झाला. एक खासगी बस बैरागढहून चंबाकडे जात असताना, असल्याचे समजते. शर्मा ट्रॅव्हल्सची बस सकाळी साडेसहाच्या सुमारास बैरागढहून चंबाकडे निघाली होती.अवघे तीन किलोमीटरचे अंतर कापल्यानंतर, चालुज वळणाजवळ चालकाचे नियंत्रण सुटल्याने



देविकोठीजवळील चालुज वळणावर चालकाचे नियंत्रण सुटल्याने रस्त्यावरून खाली कोसळली आणि थेट १०० फूट खाली असलेल्या दुस-या रस्त्यावर जाउन पडली.प्राथमिक माहितीनुसार, या भीषण अपघातात बसचालक आणि वाहकासह एकूण आठ जणांचा मृत्यू झाला आहे. तसेच, जखमींपैकी सुमारे सात प्रवाशांची प्रकृती चिंताजनक बस खाली कोसळली. अपघाताच्या वेळी बसमध्ये सुमारे २० ते २५ प्रवासी होते. घटनेची माहिती मिळताच स्थानिक ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली आणि मदत व बचावकार्य सुरू केले. ग्रामस्थांनी अथक प्रयत्नांनंतर अपघातग्रस्त बसमधून जखमींना बाहेर काढले आणि उपचारासाठी तिस्सा येथील रूग्णालयात दाखल केले.

# सुप्रीम कोर्टावर दबाव आणण्याचा प्रयत्न?

## उद्धव ठाकरेंचा पंतप्रधान मोदींना सवाल

**मुंबई/प्रतिनिधी :** देशातील तरुणांना आणि विद्यार्थ्यांना भेटायला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे वेळ नाही, मात्र फुटून गेलेल्या गद्दार खासदारांना भेटायला त्यांच्याकडे वेळ आहे. गद्दारांना मी पाठीशी आहे. असे सांगून मोदींनी एक प्रकारे सर्वोच्च न्यायालयालाच धमकीवजा संदेश दिल्याची टीका केली आहे.

गेल्या दोन महिन्यांपासून जगभरात आणि देशात झेनझी पिढीने सरकारला कसे गुडघ्यावर आणले आहे, याचा संदर्भ देत ठाकरे म्हणाले, विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर लाठीचार्ज झाला, अत्याचार झाले, ज्यामुळे जालियानवाला बाग हत्याकांडाची आठवण आली. तरीही या विद्यार्थ्यांशी कुणीही संवाद साधत नाही. पंतप्रधान मोदी त्यांना भेटत नाहीत, मात्र रात्री इन्स्टाग्रामवर व्हिडिओ टाकतात. आता यांची इन्स्टाग्रामवरून सरकार चालवण्याची वेळ आली आहे. कोरोनाकाळात जेव्हा मी फेसबुक लाईव्ह करत होतो, तेव्हा हेच लोक मला ट्रोल करत होते.काल पंतप्रधान मोदी आणि शिंदे गटाच्या खासदारांमध्ये झालेल्या भेटीवर उद्धव ठाकरे यांनी



टीका केली. ते म्हणाले, देशातल्या तरु णांना भेटायला यांना वेळ नाही, मात्र गद्दारांना भेटायला वेळ आहे. बंद दाराआड मोदींनी या खासदारांना सांगितले की, भिउ नका, मी तुमच्या पाठीशी आहे. मग हे वाक्य बंद दारातून बाहेर कसे आले? हा थेट सर्वोच्च न्यायालयाला किंवा सरकारला दिलेला धमकीवजा संदेश आहे का? याचा खुलासा झाला पाहिजे.

**गद्दारीचा व्हायरस लोकशाहीचा जीव घेतोय-**ही लढाई आता केवळ शिवसेनेपुरती मर्यादित राहिलेली नाही, असे नमूद करत ठाकरे म्हणाले, पंतप्रधानांनी अशा प्रकारे पाठिंबा देउन भविष्यातील गद्दारांनाही एक चुकीचा संदेश दिला आहे. सध्या राजकारणात मतलबी वारे वाहत असून, हा गद्दारीचा व्हायरस आता लोकशाहीचा जीव घेत आहे. गद्दारांना आता कसले भय? माझ्या मनातील शंका आणि भीती मांडण्यासाठी मी आज समोर आलो आहे.

**शिवसेना अपात्रता प्रकरणावर सूचक भाष्य-** गेल्या चार वर्षांपासून सुरू असलेल्या शिवसेनेच्या अपात्रता प्रकरणावर बोलणे मात्र ठाकरेंनी टाळले. हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने मी त्यावर आता बोलणार नाही. मात्र, संविधानाप्रमाणेच याचा निकाल लागावा, अशी आमची अपेक्षा आहे असा विश्वास त्यांनी शेवटी व्यक्तकेला.

## राज्यातील चायनीज फूड स्टॉल FDA च्या रडारवर? तुकाराम मुंढेंचा मोठा इशारा

# आता चायनीज फूडकडेही थोडे लक्ष द्यायचे आहे




**पुणे/प्रतिनिधी :** अन्न व औषध प्रशासन विभागाकडून गेल्या जवळपास दोन महिन्यांपासून राज्यात मोठ्या कारवाया सुरू आहेत. तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासन विभागाच्या आयुक्तपदाची जबाबदारी स्वीकारल्यापासून भेसळयुक्त खाद्यपदार्थांविरोधात मोठी कारवाई करण्यात येत आहे. आतापर्यंत भेसळयुक्त पनीर, भेसळयुक्त दूध, भेसळयुक्त मिठाई, रेस्टारंट्स, हाटेलवरील निकृष्ट जेवण, गुटखा विक्रीवर छापे अशा अनेक मोठ्या कारवाया एफडीएकडून करण्यात आलेल्या आहेत. तुकाराम मुंढे यांच्या या धडाकेबाज कारवायांमुळे आणि कामांमुळे ते चांगलेच चर्चेत आहेत. आता तुकाराम मुंढे यांनी भेसळखोरांना आणखी एक मोठा इशारा दिला. राज्यातील चायनीज फूड स्टाल आता एफडीएच्या रडारवर असणार आहेत. या संदर्भात बोलताना खुद्द तुकाराम मुंढे यांनीच इशारा दिला आहे. आता चायनीज फूडकडेही थोडं लक्ष द्यायचं आहे. असं सूचक भाष्य तुकाराम मुंढे यांनी पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिर येथे आयोजित मुलाखतीत बोलताना केलं. त्यामुळे आता चायनीज फूड स्टॉलवर अन्नपदार्थ सुरक्षेच्या नियमांचं पालन होत आहे की नाही? याची तपासणी एफडीएकडून केली जाण्याची शक्यता आहे.(पान २ वर)







# दिल्लीतील जेन-झी आंदोलनाची धग आता नागपूरात

**नागपूर/प्रतिनिधी :** परीक्षा पेपरफुटी, बेरोजगारी आणि शिक्षण व्यवस्थेतील प्रश्नांवरून चर्चेत आलेल्या कॉक्रोच जनता पार्टीच्या (सीजेपी) जेन-झी रायझिंग टूरची सुरुवात नागपुरातून होणार आहे. येत्या २७ ऑगस्टला नागपुरात या दौ-याचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती सीजेपीच्या नेहा बोरा यांच्याकडून देण्यात आली. दिल्लीतील आंदोलनानंतर देशभरातील तरु णांपर्यंत पोहोचण्याच्या उद्देशाने हा दौरा काढण्यात येत आहे.



**सीजेपीचे दिल्लीतील आंदोलन-** परीक्षांमधील कथित गैरप्रकार, पेपरफुटी, रोजगार आणि शिक्षण व्यवस्थेशी संबंधित प्रश्नांवरून सीजेपीच्या नेतृत्वाखाली दिल्लीमध्ये आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनामुळे तरु णांच्या प्रश्नांबरोबरच शिक्षण व्यवस्थेतील गैरप्रकार आणि सरकारी यंत्रणांच्या कार्यपद्धतीवरही चर्चा झाली. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणीही करण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर सीजेपीने आता देशभरातील तरु णांशी संपर्क साधण्यासाठी जेन-झी रायझिंग टूरची घोषणा केली आहे. या दौ-याचा पहिला टप्पा नागपुरातून सुरू होत असल्याने विदर्भातील तरु णांचा प्रतिसाद महत्त्वाचा ठरणार आहे.

**नागपूरची निवड महत्त्वाची-** विदर्भातील विद्यार्थी आणि स्पर्धा परीक्षांची तयारी करणा-या युवकांसाठी नागपूर हे महत्त्वाचे केंद्र आहे. शहरात विविध शैक्षणिक संस्था, कोचिंग क्लासेस आणि स्पर्धा परीक्षांची तयारी करणा-या विद्यार्थ्यांची मोठी संख्या आहे. त्यामुळे शिक्षण, परीक्षा आणि रोजगाराच्या प्रश्नांवर आधारित या दौ-यासाठी नागपूरची निवड करण्यात आल्याने स्थानिक पातळीवर या उपक्रमाला किती प्रतिसाद मिळतो, याकडे लक्ष लागले आहे. सीजेपीकडून या दौ-याच्या माध्यमातून (पान २ वर)

# लग्नास नकार देत तरुणीला आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा आरोप

**मृत तरुणीच्या भावाची तक्रार**

## जयपूरच्या तरुणाविरुद्ध राजापेठमध्ये गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** लग्नाचे आश्वासन देऊन नंतर लग्नास नकार देत तरुणीला मानसिक त्रास देऊन आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा आरोप मृत तरुणीच्या भावाने केला आहे. याप्रकरणी त्याने दिलेल्या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी शनिवारी (८ ऑगस्ट) जयपूर, राजस्थान येथील एका तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, २४ वर्षीय तरुणी मागील तीन वर्षांपासून अमरावतीतील स्टेट बँक कॉलनी, साईनगर परिसरात भाड्याच्या घरात राहत होती. ती दस्तूरनगर परिसरातील एका खासगी कंपनीत नोकरी करीत होती. दरम्यान, सोशल मीडियाच्या माध्यमातून तिची जयपूर येथील ३० वर्षीय तरुणाशी ओळख झाली. पुढे दोघांमध्ये फोनवरून नियमित संपर्क सुरू झाला. संबंधित तरुणाने तिला लग्नाची मागणी घातल्याचेही तिने आपल्या भावाला सांगितले होते. तक्रारीनुसार, काही दिवसांपासून दोघांमध्ये किरकोळ कारणांवरून वाद सुरू होते. त्यामुळे तरुणीने संबंधित तरुणाला मोबाईलवर ब्लॉक केले होते. त्यानंतर तिने त्याला पुन्हा अनब्लॉक केले. मात्र, त्यानंतर दोघांमध्ये पुन्हा जोरदार वाद झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, ४ ऑगस्ट रोजी पहाटेच्या सुमारास संबंधित तरुणाने तरुणीच्या कुटुंबीयांशी फोनवर संपर्क साधून तिच्याबाबत माहिती दिली. त्यानंतर कुटुंबीयांनी नातेवाईक व परिचितांच्या माध्यमातून तिच्या निवासस्थानी जाऊन पाहणी केली असता ती मृतावस्थेत आढळून आली. या घटनेनंतर तरुणीच्या भावाने संबंधित तरुणाशी फोनवर संपर्क साधून दोघांमध्ये नेमके काय झाले, अशी विचारणा केली. त्यावेळी गेल्या दोन-तीन दिवसांपासून दोघांमध्ये वाद सुरू असल्याचे त्याने सांगितल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे. यापूर्वी ३० जुलै रोजी तरुणीशी व्हिडीओ कॉलवर संवाद झाला असता ती रडत असल्याचे तिच्या भावाने पोलिसांना सांगितले. संबंधित तरुणासोबत तिचा लग्नाचा विचार होता. मात्र, तो मुंबईहून गोव्याला गेल्यानंतर तिच्याशी व्यवस्थित बोलत नसून विनाकारण वाद घालत होता आणि लग्नास नकार देत असल्याचे तिने भावाला सांगितल्याचे तक्रारीत नमूद आहे. या सर्व घटनाक्रमाच्या आधारे संबंधित तरुणाने लग्नाचे आश्वासन देऊन नंतर लग्नास नकार देत तरुणीची फसवणूक केली आणि तिला आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा आरोप तिच्या भावाने केला आहे. त्याच्या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल केला असून, या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

# गुन्हे शाखेची अवैध दारू-जुगार अड्ड्यांवर धडक

## दारूसह एक ताब्यात; शिराळ्यात जुगार खेळणाऱ्या चौघांवर कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील अवैध दारूविक्री आणि जुगाराच्या अड्ड्यांविरोधात अमरावती शहर गुन्हे शाखेने शनिवारी (८ ऑगस्ट) धडक कारवाई केली. पोलिसांनी एका ठिकाणी अवैध देशी दारूची विक्री करणाऱ्या तरुणाला ताब्यात घेतले, तर शिराळा येथे जुगार खेळणाऱ्या चौघांविरुद्ध कारवाई केली. या कारवाईत दारूसह जुगारातील रोख रक्कम असा एकूण १० हजार ५८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

गुन्हे शाखेचे अधिकारी व कर्मचारी शहरात पेट्रोलिंग करीत असताना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे अवैध दारूविक्री तसेच जुगार खेळविणाऱ्या ठिकाणांची माहिती घेण्यात आली. त्यानंतर पोलिसांनी संबंधित ठिकाणी छापे टाकून ही कारवाई केली.

गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत शुभम नितीन फरकाडे (वय १९, रा. महात्मा फुलेनगर, नवसारी, अमरावती) याच्यावर अवैध दारूविक्रीप्रकरणी कारवाई करण्यात आली. त्याच्याकडून टॅन्गो पंच देशी दारूच्या ९० मिलीच्या ६० बाटल्या, असा ३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दरम्यान, शिराळा येथे ५२ ताशांच्या पत्त्यांवर जुगार सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकला. या कारवाईत प्रभाकर चंपतराव तायडे (वय ६०), मोहन पंजाबराव तायडे (वय ५४), अभिजीत ईश्वरदास मून (वय ३८) आणि अब्दुल अमीन अब्दुल हमीद (वय ५०), सर्व रा. शिराळा, अमरावती यांच्यावर जुगार कायद्यान्वये कारवाई करण्यात आली. जुगाराच्या ठिकाणाहून ५२ ताशांची पाने आणि ७ हजार ५८० रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आली.

# हॉटेल वृंदावनमध्ये वृद्धावर चाकूने हल्ला

**अमरावती/प्रतिनिधीः-** नांदगाव पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रहाटगावजवळील हॉटेल वृंदावनमध्ये किरकोळ वादातून ६५ वर्षीय वृद्धावर धारदार शस्त्राने जीवघेणा हल्ला करण्यात आल्याची धक्कादायक घटना ६ ऑगस्टच्या मध्यरात्री साडेअकराते बारा वाजण्याच्या सुमारास घडली. या प्रकरणी नांदगाव पेठ पोलिसांनी हल्लेखोराविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे. जखमीचे नाव अशोक वाघकुमार वानखडे (वय ६५, रा. रहाटगाव) असे असून ते हॉटेल वृंदावनमध्ये काम करतात. प्राथमिक माहितीनुसार, हॉटेलमध्ये किरकोळ कारणावरून झालेल्या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. त्यावेळी एका युवकाने धारदार शस्त्राने अशोक वानखडे यांच्यावर प्राणघातक हल्ला केला. हल्ल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून फरार झाला. घटनेची माहिती मिळताच हॉटेलच्या संचालकांनी जखमी अशोक वानखडे यांना तत्काळ उपचारासाठी रात्री सुमारे २.३० वाजता जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर जिल्हा सामान्य रुग्णालयातील पोलीस चौकीमार्फत कंट्रोल रूमला घटनेची माहिती देण्यात आली. कंट्रोल रूमने ही माहिती नांदगाव पेठ पोलिसांना कळविल्यानंतर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. यानंतर जखमी अशोक वानखडे यांच्या जबाबावरून हल्लेखोराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीचा शोध सुरू आहे. दरम्यान, त्या रात्रीचे ड्युटी ऑफिसर (वाहतूक) पोलीस अधिकारी निलेश गावंडे यांनीही जिल्हा सामान्य रुग्णालयात भेट देऊन जखमीच्या प्रकृतीची माहिती घेतली.

# चायना मांज्यात अडकल्याने घार जखमी

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील चपरासीपुरा भागात बुधवारी सकाळी सुमारे ९ वाजता चायना मांज्याच्या तडाख्यात सापडून एक घार जखमी होऊन पिंपळाच्या झाडात अडकली. स्थानिकांच्या माहितीनंतर समाजसेवक राजा चौधरी यांनी धाव घेत घारीला सुखरूप खाली उतरवून तिच्यावर प्राथमिक उपचार केले.एक घार चायना मांज्यात अडकली. मांज्यामुळे जखमी झालेली घार पिंपळाच्या झाडावर तडफडत लोंबकळत होती.

## १ व १० वरिल उर्वरित

### फक्त प्रश्न विचारू नका,

नसते; उलट, खरी आव्हाने किंवा प्रश्न कोणते आहेत, हे तुम्हाला स्वतःच शोधावे लागते.

**पुढील ३५ वर्षांतील तुमचे काम देशाची दिशा निश्चित करेल:** प्रत्येक पिढीला स्वतःची आव्हाने आणि जबाबदा-यांचा सामना करावा लागतो. आपल्या देशाने वसाहतवादी राजवटीचा काळ पाहिला आहे. त्या पिढीचे एकच ध्येय होते देशाचे स्वातंत्र्य आणि त्यांनी त्यासाठी मोठा लढा दिला. त्यांच्या त्यागामुळे आणि निष्ठेमुळेच पुढचा मार्ग मोकळा झाला. आपली आव्हाने आणि जबाबदा-या मात्र वेगळ्या आहेत. पुढील ३५ वर्षांत तुम्ही काय करता, यावरूनच ठरेल की तुम्ही देशाच्या कोणत्या गरजा पूर्ण करता.

स्वतःची इतरांशी तुलना करू नकाः मोठी उद्दिष्टे गाठण्याच्या प्रवासात अनेकदा लक्ष विचलित करणा-या गोष्टी समोर येतात. इतरांना मिळालेले पगाराचे पॅकेजेस, त्यांनी स्थलांतर केलेली शहरे किंवा देश, किंवा कोणी सुरू केलेला नवीन व्यवसाय (स्टार्टअप) यांबद्दलच्या चर्चा अपरिहार्यपणे कानावर पडतात. तुमची शर्यत ही इतर कोणाशीही नसून स्वतःशीच आहे. दररोज स्वतःच्या कामगिरीत सुधारणा करण्याचा प्रयत्न करा. आपल्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याची काळजी घ्या.

### रील २१ व्या शतकातील

पेटवली. तुम्हाला सर्व काही समजले. विद्यार्थ्यांच्या हृदयात द्वेष नव्हे, तर प्रेम असायला हवे.' मागील स्लाईडमध्ये मी मोदी, भागवत आणि अदानी यांचे फोटो दाखवले, पण तुम्हाला ही व्यवस्था मोडीत काढावी लागेल आणि निरोप घ्यावा लागेल. हे सर्व तुम्हाला प्रेमाने करावे लागेल. मी तुमच्या पाठीशी उभा आहे आणि यापुढेही राहीन.

**विद्यार्थिनीने राहुल यांना सांगितले- पोलिसांनी एके-४७ ने गोळीबार केला.**

राहुल यांनी बिहारमधील एका विद्यार्थिनीशी संवाद साधला. ती म्हणाली, 'बिहार पोलिसांनी पाटणामध्ये आंदोलकांना मारहाण केली. २३ जुलै रोजी आम्ही पुन्हा एकदा आंदोलन केले. पण त्याआधीच पोलीस आणि आरएएफ (RAF) तिथे उपस्थित होते. त्यानंतर दुस-या दिवशी, सिवानमध्ये पोलिसांनी एके-४७ ने गोळीबार केला. त्यात एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाला. २५ जुलै रोजी, जेव्हा तुम्ही धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याचा आनंद साजरा करत होता, तेव्हा आम्ही बिहारमध्ये भीतीच्या छायेत बसलो होतो; पोलीस आम्हाला केव्हा आणि कुठे पकडतील याची चिंता करत होतो. त्यांनी विद्यार्थ्यांना ग्रंथालयातून नेले.' एका विद्यार्थ्याने राहुल गांधींना सांगितले, 'माझ्याकडे दोन पर्याय आहेतः एकतर चहाचे दुकान उघडणे किंवा आत्महत्या करणे.'

**राहुल यांनी पाटण्यातील एका विद्यार्थ्याकडून आंदोलनाची कहाणी ऐकली.**

एक विद्यार्थी मंचावर आला आणि म्हणाला की, २२ जुलै रोजी पाटण्यातील आंदोलनादरम्यान पोलिसांनी आमच्यावर लाठीचार्ज केला. आमच्या डोक्यावर किंवा पायांवर मारणे हे त्यांचे लक्ष्य होते. त्यांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फेकल्या. त्यांच्या गणवेशावर बिल्लेसुद्धा नव्हते. त्यांनी रुग्णवाहिकांना आत येउ दिले नाही. 'थ्री इडियट्स' चित्रपटाप्रमाणे, ते मला स्कूटरवरून रुग्णालयात घेउन गेले. नंतर, मला पोलीस ठाण्यात १५ तास डांबून ठेवण्यात आले. आपण आधी नोक-यांसाठी, मग पेपर्ससाठी, आणि मग निकालांसाठी आंदोलन केले पाहिजे. आपण विद्यार्थी आहोत की आंदोलक? आपण बिहारी आहोत, आपण सरकारसुद्धा पाडू शकतो.

### आता चायनीज फूडकडेही

जुन्या आठवणी सांगताना तुकाराम मुंढे यांनी म्हटलं की, आधी पुण्यातील बापट रोड किंवा पाषाण रोडवर चायनीजच्या गाड्या असायच्या. मी असा विचार करतोय की आता तिथे जाउन जरा बघावं का? तुम्हाला कदाचित आश्चर्य वाटेल, मी आयुष्यात पहिल्यांदा चायनीज फूड तिथेच खाल्लेलं आहे. अन्यथा तोपर्यंत चायनीज फूड काय आहे हे मला देखील माहिती नव्हतं. भारत-चीन युद्ध वैगेरे असा अभ्यास मी केला होता. मात्र, चायनीज फूडचा असा कोणता अभ्यास केला नव्हता. पण आता चायनीज फूडचीही खूप डिमांड आहे. गेल्या दोन महिन्यांत एफडीएकडून खूप कारवाया झालेल्या आहेत. त्यामुळे लोक मला सांगत आहेत की चायनीज फूडकडेही थोडं लक्ष द्या. त्यामुळे आता चायनीज फूडकडेही थोडं लक्ष द्यायचं आहे, असा सूचक इशारा तुकाराम मुंढे यांनी दिला.

**फक्त खाद्यपदार्थांवरच कारवाया का?-** सेवन करण्यामध्ये दारू देखील येते. मग तुम्ही फक्तखाद्य पदार्थांवरच कारवाया का करता? या प्रश्नावर बोलताना तुकाराम मुंढे यांनी आणखी एक इशारा दिला. ते म्हणाले की, दोन्ही ड्रिंक्स म्हणजे अल्कोहोल ड्रिंक्स आणि साफ्ट ड्रिंक्स या दोन्हीही माझ्या अधिकारात येतात. त्याची कालिटी, त्यांचं मॅन्युफॅक्चरिंग, त्याचं लेबलिंग किंवा मॅन्युफॅक्चरिंगसाठी ज्या काही प्रतिक्रिया आहेत ते देखील एफडीएच्या अधिकारात येतात. आता ते देखील लाईनमध्ये आहे. सध्या जरा जास्त काम आहे. मात्र, याबाबत देखील काही प्लॅन केलेले आहेत, असा सूचक इशारा तुकाराम मुंढे यांनी दिला.

### दिल्लीतील जेन-झी आंदोलनाची

तरुणांशी संवाद साधण्याबरोबरच संघटनेचा विस्तार करण्यावर भर दिला जात आहे. नुकतीच देशव्यापी सदस्य नोंदणी मोहीमही सुरू करण्यात आल्याचे संघटनेकडून सांगण्यात आले आहे. कॉक्रोच जनता पार्टी (सीजेपी) ही तरुणांच्या प्रश्नांवर आंदोलन आणि सामाजिक दबावगटाच्या माध्यमातून काम करण्याचा प्रयत्न करणारी संघटना म्हणून पुढे आली आहे. परीक्षा व्यवस्थेतील कथित गैरप्रकार, पेपरफुटी, बेरोजगारी आणि शिक्षणाशी संबंधित प्रश्न हे संघटनेच्या प्रमुख मुद्द्यांमध्ये आहेत. सीजेपीचे प्रमुख चेहरे असलेल्या अभिजीत दीपके यांनी संघटना तातडीने निवडणुकीच्या राजकारणात उतरणार नसून सध्या तरुणांच्या प्रश्नांवर सामाजिक दबाव निर्माण करण्यावर भर असल्याचे स्पष्ट केले आहे. सीजेपीने सात ऑगस्टलाच पंतप्रधान नरेंद्र मोदींना युवकांच्या शिक्षण, बेरोजगारी आणि महागाईच्या प्रश्नांवर स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात स्पष्ट भूमिका मांडण्याची मागणी करणारी ऑनलाइन याचिका सुरू केली आहे. त्यामुळे नागपूर दौ-याला विशेष महत्त्व आहे.

### राजकीय पदाधिकारी व पत्रकारांच्या

अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.

२० जुलै २०२६ रोजी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सचिवांच्या कारभारासंदर्भात विभागीय सहनिबंधक तसेच इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार अर्ज सादर करण्यात आला होता. तक्रार अर्जावर तक्रारदार म्हणून पत्रकार विक्की होले, अमोल कंटाळे, महेश बुंदे, शंतनु बोरेकर, रोहन डिक्कर, युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश कावटकर, गोपाल अरबट, सुरज देशमुख या आठ जणांची नावे आणि सह्या असल्याचे नमूद करण्यात आले होते.

मात्र आठही जण या तक्रारीपासून पूर्णपणे अनभिज्ञ आहेत.तक्रार अर्जातील मजकुराशी आपला कोणताही संबंध नसून, आपल्या नावासमोर करण्यात आलेल्या सह्या आपल्याच नसल्याचा दावा त्यांनी केला आहे.तसेच आमचे नाव व सह्यांचा गैरवापर झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर संबंधित आठ जणांनी दर्यापूरच्या उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार सादर केली. तक्रार अर्जाची सखोल व निष्पक्ष चौकशी करून बनावट सह्या करणाऱ्या व्यक्तीचा शोध घ्यावा, तसेच प्रशासनाची दिशाभूल करण्याच्या प्रकाराची चौकशी करून दोषींवर कायद्यानुसार कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, या प्रकरणामुळे दर्यापूरच्या राजकीय, सामाजिक व पत्रकारिता क्षेत्रात चर्चेला उधाण आले असून, पोलिसांच्या चौकशीत या कथित बनावट सह्यांचे सत्य काय समोर येते आणि या प्रकरणात कोणावर कारवाई होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### स्कूल बसच्या धडकेत चिमुकलीचा

सकाळी शाळा सुटल्यानंतर ती नेहमीप्रमाणे स्कूल बसने (क्रमांक एमएच २७ ए ९७६३) रिद्धपूर येथील बाजार चौकात उतरली. घरी जाण्यासाठी ती बसच्या समोरून जात असताना, चालक अक्षय रामदास कुरसुंगे (वय २२, रा. विष्णोरा पोरगव्हाण) याने निष्काळजीपणे व घाईगडबडीत बस पुढे नेली. त्यामुळे ईश्वरीचा तोल जाऊन ती बसच्या समोरच्या चाकाखाली आली.

हा भीषण अपघात तिच्या आजोबांच्या डोळ्यांदेखत घडला. मुलीच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन मोठ्या प्रमाणावर रक्तस्त्राव झाला. नागरिकांनी तात्काळ चालकाला बस थांबवायला लावून चिमुकलीला त्याच स्कूल बसमधून चांदूर बाजार येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले; मात्र तेथील डॉक्टरांनी तपासून तिला मृत घोषित केले.

**गावात तणाव आणि पोलीस बंदोबस्त:** घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. चिमुकलीच्या मृत्यूनंतर रिद्धपूरात तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली होती. प्रशासनाने घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन परिसरात आरसीपी पथक आणि पोलिसांचा तगडा बंदोबस्त तैनात केला.

**चालकावर गुन्हा दाखल:** नागरिकांचा आक्रोश पाहून पोलिसांनी तात्काळ कारवाई करत निष्काळजीपणे बस चालवणाऱ्या अक्षय कुरसुंगे याला ताब्यात घेतले आहे. पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली शिरखेड व चांदूर बाजार पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. पोस्टमार्टमनंतर मृतदेह कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यात आला.

### दर्यापूर आगारात पाच नव्या

दर्यापूरसह ग्रामिण भागातील प्रवाशांची वाढती मागणी लक्षात घेता आणखी १० नविन बसेस उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची घोषणा खासदार वानखडे यांनी यावेळी केली. त्यामुळे आगामी काळात दर्यापूर आगाराच्या बससेवेत मोठी वाढ होण्याची अपेक्षा आहे. नविन बसेसमुळे विद्यार्थी, नोकरदार, शेतकरी, व्यापारी तसेच दररोज प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. ग्रामिण भागातील बससेवा अधिक सुरळीत करण्यासाठी या बसेस महत्त्वपूर्ण ठरणार आहेत.

यावेळी दर्यापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार गजानन लवटे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनिल गावंडे, दर्यापूर आगार व्यवस्थापक जिवन वानखडे युवासेना जिल्हाध्यक्ष अंकुश कावडकर,बबन विल्हेकर यांच्यासह आगारातील अधिकारी-कर्मचारी, प्रवासी, काँग्रेस -शिवसेना कमिटीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### वेदिका कांबळे शिष्यवृत्ती परीक्षेत

साठी पात्र ठरली आहे. या दोन्ही विद्यार्थिनींना मार्गदर्शन करणारे वर्गशिक्षक दिलिप चव्हाण सर यांचे विशेष कौतुक होत आहे.

विद्यार्थिनींच्या यशासाठी मार्गदर्शक शिक्षिका स्वाती सोनार मॅडम, मुख्याध्यापिका वंदना दुधे मॅडम तसेच दिलिप चव्हाण सर यांनी कठोर परिश्रम घेतले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश संपादन केल्याने परिसरात त्यांचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक करण्यात येत आहे.

### महापालिकेकडे तक्रार केल्याने

अर्जामुळे मंगेश अरुणराव ठाकरे (वय ४१) आणि एका महिलेने गावंडे यांच्याशी संपर्क साधल्याचा आरोप आहे. तक्रारीनुसार, दोघांनी गावंडे यांना फोनवर तसेच सार्वजनिक ठिकाणी अश्लील भाषेत शिवीगाळ केली. त्यानंतर त्यांना जीवे मारण्याची धमकीही देण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकारामुळे गावंडे यांनी बडनेरा पोलिसांत धाव घेत तक्रार दाखल केली. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम २९६, ३५२ आणि ३५१(३) अन्वये दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. महापालिकेकडे करण्यात आलेल्या तक्रारीचा व त्यानंतर झालेल्या कथित धमकीचा परस्पर संबंध काय आहे, तसेच धमकी देण्यामागील नेमके कारण काय होते, याचा तपास बडनेरा पोलिसांकडून सुरू आहे.

### तारखेड्यात पोलिसांची अवैध

ची गुप्त माहिती तिवसा पोलिसांना प्राप्त झाली होती. त्या अनुषंगाने आज सकाळच्या दरम्यान पोलीस अधीक्षक निकेदन कदम, अप्पर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड,प्रभारी उपविभागीय पोलीस अधिकारी उमेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तिवसा पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक गोपाल उपाध्याय यांनी पोलीस कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन ही कारवाई केली. यामध्ये पोलीस कर्मचारी अमोल बुरकुल,अक्षय भागानगरे,विद्या कळसे, नितीन बौरसिया,रमेश चव्हाण,दीपा ढोले,प्रदीप मस्के,विजय चव्हाण,नंदू जोगदंडे,सागर क्षीरसागर,सचिन सातपुते,योगेश धनेधर यांनी अतिशय शिताफीने दारू विक्रेत्यांचे एक-एक घर गाठत चार ठिकाणी धाड टाकून ही कारवाई केली.ज्यामुळे अवैध दारू विक्रेत्यांचे चांगलेच धाबे दणाणले आहे.

### हरवलेले ५९ मोबाईल मुळ

सीईआयआर पोर्टलच्या सहाय्याने तांत्रिक तपास सुरू केला. अथक प्रयत्नांनंतर सर्व ५९ मोबाईलचा शोध घेण्यात यश आले. शुक्रवारी (७ ऑगस्ट) गाडगेनगर पोलीस ठाण्यात आयोजित कार्यक्रमात पोलीस उपायुक्त (परिमंडळ क्र. १) यशवंत सोळंके, सहाय्यक पोलीस आयुक्त निलेश ब्राम्हणे आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव यांच्या हस्ते तक्रारदारांना त्यांचे मोबाईल परत करण्यात आले. हरवलेले मोबाईल सुरक्षित परत मिळाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त करत गाडगेनगर पोलिसांचे आभार मानले. या मोहिमेत डी.बी. पथकाचे पोलीस उपनिरीक्षक सागर ठाकरे तसेच अशोक वाटाणे, मनीष सावरकर, निलेश जुनघरे, अमोल यादव, विनोद मालवे, आशिष ठाकरे, सिद्धार्थ श्रृंगारे आणि सचिन गौरखेडे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

### बेपत्ता तीन अल्पवयीन मुली

घेतले. त्यांची प्राथमिक चौकशी करण्यात आली असून, आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून त्यांना पालकांच्या ताब्यात देण्याची कार्यवाही सुरू आहे. दरम्यान, मुली सुरक्षित असल्याचे प्राथमिक चौकशीत स्पष्ट झाले आहे. त्या घरातून नेमक्या कोणत्या कारणामुळे बाहेर पडल्या, त्यांच्यासोबत अन्य कोणी होते का आणि या प्रकरणामागे कोणाचा सहभाग आहे का, यासह सर्व बाबींचा पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे. आवश्यकतेनुसार मुलींचे जबाब नोंदवून पुढील कायदेशीर कार्यवाही केली जाणार आहे.

अल्पवयीन मुलगा किंवा मुलगी बेपत्ता झाल्यास कुटुंबीयांनी वेळ न दवडता तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात माहिती द्यावी. सुरुवातीच्या काही तासांत मिळणारी माहिती शोधमोहीम प्रभावीपणे राबविण्यासाठी महत्त्वाची ठरते.

ही कारवाई पोलीस आयुक्त, अमरावती शहर, पोलीस उपायुक्त (परिमंडळ-२) तसेच सहायक पोलीस आयुक्त, राजापेठ विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात करण्यात आली. तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक मीनाक्षी बोचे, पोलीस उपनिरीक्षक शशिकांत चिपडे, पोलीस उपनिरीक्षक रोशन चटे तसेच महिला पोलीस हवालदार ज्योती ढवळे आणि राजापेठ पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या शोधमोहीमेत सहभाग घेतला.

### धामोरी फाट्यावरील तरुणाच्या

राजू रावकेकर (वय ३५, रा. वाठोडा शुक्लेश्वर, ता. भातकुली) हे गावाकडून अमरावतीकडे जात असताना धामोरी बसस्थानकाच्या अलीकडे धामोरी-कुमागार यांच्या वाड्याजवळ अज्ञात आरोपीने त्यांच्यावर चाकूने वार केले. या हल्ल्यात राहुल यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी खोलापूर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३(१) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. खुनाच्या घटनेनंतर आरोपींचा शोध घेणे पोलिसांसमोर मोठे आव्हान होते. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी पारंपरिक तपासासोबतच तांत्रिक तपासाची कास धरली. इंटरनेट आणि टेलिकॉम सर्व्हिस प्रोव्हायडरकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे परिसरातील सुमारे ५५० मोबाईल क्रमांकांचे विश्लेषण करण्यात आले. त्याचवेळी घटनास्थळासह परिसरातील तब्बल ६१ ठिकाणांवरील सीसीटीव्ही फुटेज पोलिसांनी तपासले. मोबाईल लोकेशन, सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहिती यांचा परस्पर संबंध जोडत पोलिसांनी संशयितांच्या हालचालींचा माग काढला. तांत्रिक तपासातून संशयितांची ओळख पटवल्यानंतर पोलिसांनी साहिल राहुल भगत आणि पियुष रंजित गायकवाड यांना अटक केली. दोन्ही आरोपींना न्यायालयासमोर हजर करण्यात आले आहे. या गुन्ह्यात आणखी काही आरोपींचा सहभाग असल्याचा संशय असून, फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांची तपास पथके कार्यरत आहेत.

घटनास्थळावरील उपलब्ध सीसीटीव्ही फुटेज, मोबाईल तांत्रिक माहिती आणि गोपनीय सूत्रांकडून मिळालेल्या माहितीचे बारकाईने विश्लेषण करण्यात आले. विविध स्त्रोतांमधून मिळालेल्या माहितीची सांगड घालत पोलिसांनी आरोपींपर्यंत पोहोचण्यात यश मिळविले. त्यामुळे अवघड मानल्या जाणाऱ्या या खुनाच्या गुन्ह्याचा अल्पावधीत छडा लावणे शक्य झाले. ही कारवाई अमरावती ग्रामीणचे पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड आणि दर्यापूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी सतीश कुळकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सहाय्यक पोलीस निरीक्षक अनुप वाकडे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस कर्मचारी पुरुषोत्तम बावणे, शैलेश घुरडे, दीपक उडके, निबिल आमझरे, वृंदावन गुडधे आणि चालक राजेश सरकटे यांनी तपासात महत्त्वाची भूमिका बजावली.

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१५६६/२०२६
**सुधिर व इतर विरुध्द निरंक**
पुढील ता.०८.०९.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1. Sudhir Rambhau Mahulkar, Age 43 Yrs. Occu.: Private work R/o. Sutgirni Road, Near Chaure Nagar, Sai Nagar, Amravati
2. Mangala Dipakrao Shamatkar, Age 39 Yrs. Occu.: Household R/o. Near Hanuman Temple, Ambada, Tq. Morshi, Dist. Amravati
3. Sunita Sunil Mokalkar, Age 43 Yrs. Occu.: Household R/o. Fatepur Wadala, Dhanora Gurav, Tq. & Dist. Amravati
4. Vanmala Gajanan Mokale, Age 46 Yrs. Occu.: Household R/o. Khandala khurd, Tq. & Dist. Washim

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :-** निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत रामभाऊ जयरामजी माहुलकर आणि बेबीताई रामभाऊ माहुलकर हे** अनुक्रमे दिनांक ०२.०३.२०२५ आणि दि.१४.०७.२०१९रोजी अमरावती, येथे मयत झाले. अर्जदार सुधिर व इतर विरुध्द निरंक यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सुधिर व इतर विरुध्द निरंक वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०७.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती**
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

**चौकशीची जाहीर नोटीस**

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 483/22/2026
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **भारतीय पवार क्षेत्रीय समाज संघ, अमरावती** **एफ - १५५५२**
बाबत अर्जदार - **श्री अशोक बाबुलालजी बिसने**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३ अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत -** निरंक
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) - प्लॉटचे वर्णन** - नोंदणी पोट तुकडी अमरावती ग्रामीण कचेरीचे कक्षेतील व जिल्हापरिषद अमरावती चे हददीतील ग्रामपंचायत असलेले मौजे-वडद,प्रगणे-बडनेरा, ता.जि.अमरावती येथील शेत सर्वे नं.८४/१/अ मधील १ हे ८९ आर. भोगवट वर्ग-१ मधील दुर्गा पार्क-२ या नावाने ओळखल्या जाणा-या जागेतील असिस्टंट डायरेक्टर ऑफ टाउन प्लॅनिंग अमरावती यांचे पत्र क्र.१२५२ दिनांक ११/०५/२०२३ नुसार मा.तहसिलदार साहेब यांनी त्यांचे फाईलावरील रा.मा.क्र.एन.ए.पी. ३४/ वडद-११२/२०२३-२०२४, नि.ता.०१/०२/२०२४ नुसार लेआउट कन्व्हर्शन मंजूर झालेल्या जागेतील ॲमिनिटी प्लॉट क्र. १०१ (एकशे एक) याची साईज लांबी रुंदी,पूर्व बाजू ३३.७९ मि., पश्चिम बाजू ३५.९८ मि., उत्तर बाजू ६८.३६ मि. व दक्षिण बाजु ४८.७८ मिं.असुन याचे एकूण क्षेत्रफळ १८९१ चौ.मी. (२०३५४ चौ.फुट) आहे या सदहू ॲमिनिटी प्लॉटची चर्तुसिमा :-

पुर्वेस :- ३० फुटाचा रस्ता,
पश्चिमेस :- मौजे बडनेरा शिवरस्ता,
उत्तरेस :- लगतचे सर्वे नं. ८४ चा भाग
दक्षिणेस :- लेआउट मधील प्लॉट ९८ व लेआउट मधील ओपन स्पेस

त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०९.०८.२०२६ रोजी दिली.

शिक्का

(वाय.एस.शेख)
अधीक्षक, न्याय शाखा
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ रविवार, ९ ऑगस्ट २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## गृहनिर्माण संस्थेत व्यावसायिक संकुलाचे बांधकाम नगरपालिकेची डोळेझाक की अर्थपूर्ण दुर्लक्ष?

■ प्रतिनिधी | वाशिम ■

नियम धाब्यावर बसवून वाशीम शहरातील बाकलीवाल कॉलनीतील गृहनिर्माण संस्थेमध्येच व्यावसायिक संकुलाचे बांधकाम सुरू आहे. यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये प्रचंड संताप असून 'नगरपालिका प्रशासन याकडे जाणूनबुजून डोळेझाक करत आहे की अर्थपूर्ण दुर्लक्ष?' असा थेट सवाल आता नागरिक विचारत आहेत.

### नागरिकांचा आरोप - 'कोणाचा आशीर्वाद?'

'नियम सगळ्यांसाठी सारखे मग यांना सूट का?' असा सवाल करत नागरिक म्हणतात की, एवढे मोठे बांधकाम, रस्ता बंद करणे हे नगरपालिकेच्या परवानगीशिवाय शक्यच नाही. मग हे अवैध बांधकाम कोणाच्या आशीर्वादाने झाले? याबाबत कॉलनीत जोरदार कुजबुज सुरू आहे.

निवासी भागाचे व्यावसायिकात रूपांतर झाल्याने पाणी, वीज, पार्किंग आणि रहदारीचे प्रश्नही गंभीर झाले आहेत.

### प्रशासन काय म्हणते?

या प्रकरणी नगरपालिकेकडून अद्याप कोणतीही अधिकृत कारवाई झालेली नाही. तक्रारी देऊनही फक्त आश्वासनेच मिळत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत.

### नेमके काय घडतंय? रस्ता ३ वर्षांपासून बंद

एका व्यावसायिकाने व्यापारी संकुलाचे बांधकाम करण्यासाठी बाकलीवाल कॉलनीतील मुख्य रस्ताच टिनशेड टाकून बंद केला आहे. गेल्या ३ वर्षांपासून रहिवाशांना याच रस्त्याने ये-जा करता येत नाही.

### रस्त्याचा दुरुपयोग

हाच बंद रस्ता दुसऱ्या एका व्यावसायिकाने ड्रायव्हिंग स्कूलच्या गाड्या पार्किंग करण्यासाठी वापरात आणला आहे. शाळेतील लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना आता पर्यायी लांबचा रस्ता वापरावा लागत आहे.

### गृहनिर्माण संस्थेत अवैध बांधकाम

निवासी संकुलाच्या जागेत व्यावसायिक संकुल उभे राहत असतानाही नगरपालिकेचे अधिकारी आणि पदाधिकारी पूर्णपणे गप्प आहेत.

### सवाल एकच

नियम मोडणाऱ्यांवर कारवाई होणार की, बाकलीवाल कॉलनीतील हा 'बंद रस्ता' आणि 'अवैध संकुल' असेच कायम राहणार?



बाकलीवाल कॉलनीत नियम धाब्यावर

घराच्या परवानगीवर उभे राहते हॉस्पिटल-शोरूम : ३ वर्षांपासून रस्ता बंद

पालिकेचे दुर्लक्ष

रहिवाशांचा संताप, नगरपालिकेच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

बाकलीवाल कॉलनीत बेकायदेशीर व्यापारी संकुल?

बाकलीवाल कॉलनीत नियम धाब्यावर

निवासी कॉलनीत धोकादायक व्यवसाय

बाकलीवाल कॉलनीतील गृह निर्माण संस्थेत डॉक्टरांचा दवाखाना आणि ई-व्हेईकल शोरूम सुरू

बाकलीवाल कॉलनीत नियम धाब्यावर

## मूग व उडीद पीकस्पर्धेसाठी अर्जास उद्यापर्यंत मुदतवाढ

### शेतकऱ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याचे कृषी विभागाचे आवाहन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

राज्यातील अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकांची उत्पादकता वाढविणे, प्रयोगशील शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा प्रसार करण्याच्या उद्देशाने खरीप हंगाम २०२६-२७ मध्ये राज्यांतर्गत पीकस्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेसाठी शेतकऱ्यांनी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावेत, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे.

यंदापासून पीकस्पर्धेची अर्ज प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन करण्यात आली असून, पारदर्शक व गतिमान प्रशासनाच्या दृष्टीने स्वतंत्र संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आली आहे.

मूग व उडीद या पिकांसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ जुलै २०२६ होती. मात्र, यंदा प्रथमच ऑनलाईन अर्ज प्रणाली सुरू करण्यात आल्यामुळे विशेष बाब म्हणून शासनाने मूग व उडीद पीकस्पर्धेसाठी अर्ज करण्यास १० ऑगस्ट २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे.

या स्पर्धेत भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी (रागी), तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमूग व सूर्यफूल या एकूण ११ पिकांचा समावेश असून, तालुका, जिल्हा आणि राज्यस्तरावर विजेत्यांची निवड करण्यात येणार आहे. सर्वसाधारण व आदिवासी या दोन्ही गटांतील शेतकरी स्पर्धेत सहभागी होऊ शकतात.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी अर्जदाराच्या स्वतःच्या नावावर जमीन असणे, ती स्वतः कसत असणे तसेच संबंधित पिकाखाली किमान ४० आर क्षेत्रावर सलग लागवड असणे आवश्यक आहे. एकाच शेतकऱ्याला एकापेक्षा अधिक पिकांसाठीही स्पर्धेत सहभागी होता येणार आहे. अर्जासाठी फार्मर आयडी, प्रवेश शुल्क भरल्याची पावती, आदिवासी गटासाठी जात प्रमाणपत्र (लागू असल्यास) तसेच बँक खाते किंवा पासबुकची माहिती आवश्यक आहे. अर्ज करण्याची अंतिम मुदत पुढीलप्रमाणे आहे. विजेत्या शेतकऱ्यांना तालुकास्तरावर ५ हजार, ३ हजार व २ हजार रुपये, जिल्हास्तरावर १० हजार, ७ हजार व ५ हजार रुपये, तर राज्यस्तरावर अनुक्रमे ५० हजार, ४० हजार व ३० हजार रुपये बक्षीस देण्यात येणार आहे.

## 'पॉश' कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करा; अन्यथा कारवाई; राज्यात ६७२ कार्यालयांना कारणे दाखवा नोटिसा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

कार्यस्थळी महिलांवरील लैंगिक छळ प्रतिबंध, मनाई व निवारण अधिनियम, २०१३ (पॉश कायदा) मधील तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी राज्यभर शासकीय कार्यालये, खाजगी संस्था, कंपन्या आणि त्यांच्या शाखांची तपासणी सुरू असून नियमांचे पालन न करणाऱ्या ६७२ कार्यालयांना कारणे दाखवा नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.

महिला व बाल विकास विभागामार्फत जून २०२६ पासून राज्यातील चार हजारांहून अधिक तपासणी अधिकाऱ्यांद्वारे तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेत आतापर्यंत ६,८७५ कार्यालयांची तपासणी करण्यात आली आहे. यामध्ये ३,५७९ शासकीय आणि ३,२९६ खाजगी कार्यालयांचा समावेश आहे. नियमांची पूर्तता न केल्यामुळे २९४ शासकीय आणि ३७८ खाजगी अशा एकूण ६७२ कार्यालयांना कारणे दाखवा नोटिसा देण्यात आल्या आहेत. नोटीस प्राप्त झालेल्या कार्यालयांनी विहित मुदतीत आवश्यक पूर्तता न केल्यास पॉश कायद्यातील तरतुदीनुसार ५० हजार रुपयांपर्यंत दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. ही कारवाई संबंधित जिल्हा अधिकारी (पॉश अधिनियम-२०१३) तसेच जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्या स्तरावर करण्यात येणार असल्याचे महिला व बाल विकास विभागाने स्पष्ट केले आहे. वाशिम जिल्ह्यातही तपासणी मोहीम सुरू असून शासकीय व खाजगी कार्यालयांची तपासणी करण्यात आली आहे. आतापर्यंत १४३ शासकीय आणि १५८ खाजगी आस्थापनांमध्ये अंतर्गत तक्रार समितीची स्थापना करण्यात आली आहे. सर्व शासकीय कार्यालये, खाजगी संस्था, कंपन्या आणि त्यांच्या शाखांनी पॉश कायद्यातील तरतुदींचे तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करणे बंधनकारक आहे. त्यानुसार केंद्र शासनाच्या एसएचई-बॉक्स संकेतस्थळावर कार्यालयाची नोंदणी करणे, अंतर्गत तक्रार समितीची स्थापना व नोंद, समिती सदस्यांचे प्रशिक्षण, कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, वार्षिक अहवाल सादर करणे आणि संबंधित माहिती नियमितपणे अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे.

## संगीतमय कार्यक्रम उत्साहात संपन्न

**मंगरुळपीर:** मंगरुळपीर तालुक्यातील वनोजा येथील ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक संस्थेद्वारा संचालित श्रीमती साळुंकाबाई राऊत कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने भारतरत्न स्वरसम्राट मोहम्मद रफी यांच्या जयंतीनिमित्त ७ ऑगस्ट रोजी 'रफी की यादे' या संगीतमय गीतगायन कार्यक्रमाचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देवेंद्र गावंडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात मोहम्मद रफी यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यानंतर झालेल्या गीतगायन स्पर्धेत विद्यार्थ्यांनी रफी यांच्या अजरामर गीतांचे सादरीकरण करून उपस्थितांची दाद मिळवली.

## वाशीम अर्बन बँकेत सुभाषभाऊ राठी यांना अभिवादन



■ प्रतिनिधी | वाशिम ■

सहकार क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या वाशिम अर्बन बँकेला आपल्या नेतृत्वामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत विकासाकडे नेणाऱ्या सोबतच व्यवसायासोबत सामाजिक बांधिलकीची भावना वृद्धिंगत करणारे बँकेचे मानद अध्यक्ष विकास महर्षी स्वर्गीय सुभाष भाऊ राठी यांच्या पाचव्या पुण्यस्मरण निमित्त वाशिम येथील मुख्य कार्यालय येथे भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. श्रद्धांजली सभेला बँकेचे अध्यक्ष श्रीमती शीलाताई राठी, उपाध्यक्ष पुरुषोत्तम चरखा, माजी अध्यक्ष सुरेश लोध, संचालक सर्वश्री विष्णू सोनी, सुधीर राठी, राजकुमार हेडा, रमन अग्रवाल, कायद जोहर हुसेन, विपिन बाकलीवाल, राजेश सिसोदिया, सतीश मुंदडा महेश लड्डा, कर्मचारी प्रतिनिधी तेजराव वानखेडे, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी महेंद्र देशमुख, मधुमालाताई राठी, हरीश राठी ,आनंद राठी, श्रुती राठी,व्यवस्थापन मंडळ अध्यक्ष रामचंद्र देशपांडे, सदस्य सज्जनसिंह चंदेल, पवनकुमार भन्साळी, वाशिम शाखा सभापती नितीन करवा, संचालक निलेश सोमानी, तरणसिंग सेठी, आसाराम जायभाये, विशाल भांदुर्गे, ज्येष्ठ पत्रकार नंदकिशोर वैद्य, माधवराव अंभोरे, बालदी, सरव्यवस्थापक राजेंद्र काळे, लक्ष्मणराव घोडके समवेत कर्मचारी वृंद उपस्थित होते. सर्वप्रथम स्वर्गीय सुभाष राठी यांच्या प्रतिमेचे पूजन व हार अर्पण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर दीप प्रज्वलन करण्यात आले.

सर्वांनी भाऊंच्या सहकार व शिक्षण व सामाजिक क्षेत्रातील योगदानावर विचार मांडले. सर्वांनी दोन मिनिटे मौन पाडून भाऊंना श्रद्धांजली अर्पण केली.

## अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती अर्ज सुरू

■ प्रतिनिधी | वाशिम ■

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये अनुसूचित जाती (एससी) प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी विविध मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजनांचे ऑनलाईन अर्ज महाडीबीटी २.० या नव्या प्रणालीवर सुरू करण्यात आले आहेत. अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थी, पालक तसेच शाळा व महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज विहित मुदतीत भरून घ्यावेत. महाडीबीटी २.० पोर्टलद्वारे मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजना (इयत्ता ९ वी व १० वी), सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना, माध्यमिक शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, जातीच्या विद्यार्थ्यांसाठी योजनांसाठी अर्ज करता येणार आहेत.

## विधी स्वयंसेवकांना पीसीपीएनडीटी कायद्याचे सखोल प्रशिक्षण



■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, वाशिम यांच्या वतीने विधी स्वयंसेवकांसाठी गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्रज्ञान (पीसीपीएनडीटी) (लिंग निवडीस प्रतिबंध) अधिनियम, १९९४ या विषयावरील प्रशिक्षण शिबिराचे आयोजन दि. ३ ऑगस्ट रोजी विधी सेवा सदन, वाशिम येथे करण्यात आले.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव व्ही. जी. चौखंडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या प्रशिक्षण शिबिरात विधी स्वयंसेवकांना पीसीपीएनडीटी कायद्याच्या तरतुदी, त्याची प्रभावी अंमलबजावणी आणि समाजामध्ये जनजागृती निर्माण करण्यातील त्यांची भूमिका याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.प्रास्ताविकात सचिव व्ही. जी. चौखंडे यांनी मुलगा-मुलगी समानतेचा विचार समाजात अधिक दृढ करण्यासाठी तसेच स्त्रीभ्रूणहत्या रोखण्यासाठी पीसीपीएनडीटी कायद्याचे काटेकोर पालन होणे आवश्यक असल्याचे सांगितले.

## गोठ्यातील गोचीड नियंत्रणासाठी जैविक बुरशीचा प्रभावी वापर : कृषी विज्ञान केंद्र येथे शेतकरी प्रशिक्षण व प्रात्यक्षिक

■ प्रतिनिधी | वाशिम ■

कृषी विज्ञान केंद्र, वाशीम अंतर्गत पशुविज्ञान विभागामार्फत 'गोठ्यातील गोचीड नियंत्रणासाठी शीर्पैर्गर्ल्हेगेदर्ज्गी या जैविक बुरशीचा वापर' या विषयावर चाचणी प्रयोग अंतर्गत शेतकरी प्रशिक्षण व प्रात्यक्षिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पशुधनामधील गोचीड नियंत्रणासाठी पर्यावरणपूरक, सुरक्षित व शाश्वत जैविक तंत्रज्ञानाचा प्रसार करणे हा कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. आर. एल. काळे उपस्थित होते. त्यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, गोचीड हा पशुधनाच्या आरोग्यावर प्रतिकूल परिणाम करणारा महत्त्वाचा बाह्य परजीवी असून त्यामुळे रक्तक्षय, ताण, त्वचारोग तसेच विविध रक्तजन्य रोगांचा प्रसार होतो. परिणामी दूध उत्पादन, वजनवाढ, प्रजनन कार्यक्षमता आणि एकूण उत्पादनक्षमतेवर विपरीत परिणाम होतो. गोचीड नियंत्रणासाठी रासायनिक ॲकारिसाईड्सचा सातत्याने व अतिरेकी वापर केल्यास औषध-प्रतिरोधकता, रासायनिक अवशेष तसेच पर्यावरणीय प्रदूषण यांसारख्या गंभीर समस्या निर्माण होतात. त्यामुळे एकात्मिक परजीवी व्यवस्थापन अंतर्गत जैविक उपाययोजनांचा अवलंब करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच गोठ्याची नियमित स्वच्छता, जैवसुरक्षा, योग्य पशू आरोग्य व्यवस्थापन व स्वच्छ गोठा व्यवस्थापन यांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. यावेळी पशुसंवर्धन विषय विशेषज्ञ मयूर देशमुख यांनी Metarhizium anisopliae या कीटकनाशक जैविक बुरशीची कार्यपद्धती सविस्तर स्पष्ट केली. ही बुरशी गोचीडांच्या शरीरावर वाढून त्यांचा जैविक पद्धतीने नाश करते. त्यांनी या बुरशीचा शिफारशीनुसार वापर, द्रावण तयार करण्याची पद्धत, योग्य मात्रा, फवारणीचे तंत्र, आवश्यक खबरदारी तसेच गोठ्यातील गोचीड नियंत्रणासाठी तिचा सुरक्षित, प्रभावी व पर्यावरणपूरक वापर याबाबत सखोल माहिती दिली. या जैविक तंत्रज्ञानामुळे रासायनिक औषधांवरील अवलंबित्व कमी होण्यास, पशूंचे आरोग्य सुधारण्यास तसेच पशुधनाची उत्पादनक्षमता वाढविण्यास मदत होणार असल्याचे त्यांनी सांगितले.



कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी चाचणी प्रयोगामध्ये सहभागी प्रत्येक शेतकऱ्यास प्रात्यक्षिकासाठी शीर्पैर्गर्ल्हेगेदर्ज्गी चे १ लिटर जैविक बुरशीचे द्रावण वितरित करण्यात आले. उपस्थित शेतकऱ्यांनी या नाविन्यपूर्ण जैविक तंत्रज्ञानाबद्दल समाधान व्यक्त करून आपल्या गोठ्यांमध्ये त्याचा अवलंब करण्याची तयारी दर्शविली.

## १५ ऑगस्टपासून नगर परिषदेसमोर कुटुंबासह आमरण उपोषणाचा इशारा

■ प्रतिनिधी | कारंजा ■

सार्वजनिक रस्त्यावर अतिक्रमण करून उभारण्यात आलेल्या लोखंडी जिन्याविरोधात वारंवार तक्रारी करूनही नगर परिषद प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप करत डहाके कुटुंबाने आता नगर परिषद प्रशासनाविरोधात थेट आमरण उपोषणाचे अस्त्र उगारले आहे. येत्या १५ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ७ वाजल्यापासून नगर परिषद कार्यालयासमोर कुटुंबासह आमरण उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे. यासंदर्भात संबंधित विभागांना पूर्वसूचनाही देण्यात आली आहे.

कारंजा शहरातील भारतीपुरा, बारालिंग मंदिर परिसरातील सार्वजनिक रस्त्यावर कथित अतिक्रमण करून लोखंडी जिना उभारण्यात आला असून, त्यामुळे ये-जा करण्यास अडथळा निर्माण होत असल्याचा गंभीर आरोप अर्जदारांनी केला आहे. सार्वजनिक वापराच्या रस्त्यावर अतिक्रमण होत असताना प्रशासन नेमकी कोणती भूमिका घेत आहे, असा सवालही उपस्थित करण्यात आला आहे.

अर्जदार काशीनाथ किसनराव डहाके, प्रदीप काशीनाथ डहाके आणि शीतल प्रदीप डहाके यांनी दिलेल्या निवेदनानुसार, या प्रकरणी ९ डिसेंबर २०२५ रोजी नगर परिषदेकडे लेखी तक्रार दाखल करण्यात आली होती. त्यानंतर संबंधितांना अनेकदा नोटिसा बजावण्यात आल्याचे सांगण्यात आले. मात्र, नोटिसा बजावूनही प्रत्यक्ष अतिक्रमण हटविण्याची कारवाई अद्याप झालेली नसल्याचा आरोप अर्जदारांनी केला आहे.

## एस एम सी इंग्लिश स्कूल वाशीमच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश



■ प्रतिनिधी | वाशिम ■

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद ,पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ मध्ये स्थानिक एस एम सी इंग्लिश स्कूल, वाशीमच्या च्या इयत्ता चौथी व इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या परीक्षेत इयत्ता चौथीमधील ४ व इयत्ता सातवीमधील १०असे एकूण १४ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरले आहेत.

इयत्ता चौथी मधून यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये अवंतीका वैरागडे, शिवन्या वाघ, समर्थ काठोळे, पार्थ डाहाळके यांचा समावेश आहे. तसेच इयत्ता सातवी मधील भक्ती कोंघे, माहि पट्टेबहादूर, संस्कृती काठोळे, श्रावणी वाघ, श्रृती जाधव, श्रावणी आरू, शेख अफनान, सोहम शिंदे, विनय तडस, सोहम काळे हे विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या प्राचार्या मीना उबगडे, अभिजीत मुकुंदराव जोशी यांचे प्रा. हरिभाऊ क्षीरसागर यांनी कौतुक केले.

## वाशीम अर्बन बँकेच्या आमसभेत सर्व ठराव एकमताने मंजूर

### सर्वांच्या सहकार्यामुळे बँकेचे वटवृक्षात रूपांतर – श्रीमती शीला राठी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

सहकार क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या दी. वाशिम अर्बन को-ऑपरेटिव बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात पार पडली. सदर आमसभेत सर्व ठराव एक मताने मंजूर करण्यात आले. स्थानिक स्वागत लॉन येथील सभागृहात गुरुवार ६ ऑगस्ट रोजी पार पडलेल्या आमसभेचे अध्यक्षस्थानी बँकेचे अध्यक्ष श्रीमती शीलाताई सुभाष राठी होत्या. मंचावर बँकेचे उपाध्यक्ष पुरुषोत्तम चरखा, संचालक माजी अध्यक्ष सुरेश लोध, रमेश बजाज, विष्णू सोनी ,डॉ. राजकुमार हेडा सुधीर राठी, राधेश्याम हेडा श्रीमती लीला बाई खंडेलवाल, अशोक इंनानी, रमन अग्रवाल कायद जोहर हुसेन, विपिन बाकलीवाल, विजय दगडिया, विपिन राठोड, राजेश सिसोदिया, तज्ञ संचालक सतीश मुंदडा, महेश लड्डा, व्यवस्थापन मंडळ अध्यक्ष रामचंद्र देशपांडे,कर्मचारी प्रतिनिधी तेजराव



वानखेडे, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी महेंद्र देशमुख, शाखा सभापती नितीन करवा गोपाल काबरा मधुसूदन करवा नारायणदास भट्टड महेंद्र भक्कड ,डॉ.ताराचंद धूत, व्यवस्थापन मंडळाचे सदस्य सज्जनसिंह चंदेल ,पवनकुमार भन्साळी, सरव्यवस्थापक राजेंद्र काळे उपस्थित होते सर्वप्रथम वाशिमचे आराध्य श्री बालासाहेब बँकेचे संस्थापक स्वर्गीय रामकृष्ण जी राठी, बँकेचे माजी अध्यक्ष तथा प्रेरणास्थान सुभाषभाऊ राठी, यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. तदनंतर बँकेचे मानद अध्यक्ष स्वर्गीय सुभाष भाऊ राठी यांच्या पाचव्या पुण्यस्मरण निमित्त सोबतच देशासाठी शहीद झालेले जवान आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय क्षेत्रातील साहित्यिक नेते शास्त्रज्ञ संशोधक कलावंत खेळाडू सामाजिक कार्यकर्ते बँकेचे भागधारक संचालक ग्राहक कुटुंबातील सदस्य ठेवीदार हितचिंतक पत्रकार ज्ञात अज्ञात अहवाल वर्षात दिवंगत झालेल्या सर्व मान्यवरांना दोन मिनिटे मौन पाडून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी अहवाल वाचन बँकेचे अध्यक्ष श्रीमती शीला राठी यांनी केले. सर्वांचे सहकार्य विश्वास संचालक मंडळाची समर्थ साथ कर्मचारी बांधवाचे परिश्रम यामुळेच आज सहकार क्षेत्रात बाबाजींनी लावलेल्या वाशीम अर्बन बँकेचे वटवृक्षात रूपांतर झाले चे सांगितले. स्वर्गीय सुभाष भाऊंनी बाबाजी चा सहकार क्षेत्रातील वारसा पुढे नेत अत्याधुनिक तंत्रज्ञानाची सांगड घालून बँकेला प्रगतीपथावर नेले. भविष्यामध्ये संस्था उभ्या करणे सोपे आहे मात्र त्याचे जतन करणे कठीण आहे आज वाशीम अर्बन बँकेने सहकार क्षेत्रात मोठी क्रांती केली असून ही संस्था आपल्या सर्वांच्या सहकार्याने चांगले हाती राहावी याकरिता सर्वांची साथ आवश्यक असल्याचे नमूद केले. यावेळी त्यांनी भागधारकांना साडेआठ टक्के लाभांश देण्याचे जाहीर केले त्यावेळी भागधारकांनी टाळ्यांचा कडकडाट केला.सदर कार्यक्रमात मुख्य कार्यकारी अधिकारी महेंद्र देशमुख व सरव्यवस्थापक राजेंद्र काळे यांनी विविध ठराव भागधारकांसमोर ठेवले त्याला एक मताने सर्वांनी मंजुरी दिली. सोबतच भागधारकांचा लाभांश तत्काळ जमा करण्यात येत असल्याची माहिती दिली.वाशीम अर्बन बँकेत सर्वोत्कृष्ट कार्य करणाऱ्या बँकांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले त्यामध्ये प्रथम पुरस्कार मानोरा शाखा, द्वितीय पुरस्कार रिसोड शाखा, तृतीय पुरस्कार जालना शाखा तर सर्वाधिक नफा देणारे वाशिम अर्बन बँकेला संस्थापक स्वर्गीय रामकृष्ण राठी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले सदर पुरस्कार शाखा सभापती सल्लागार समिती सदस्य व शाखेचे कर्मचारी यांनी स्वीकार केला. रोख रक्कम सन्मानचिन्ह सन्मानपत्र बुके शाल श्रीफळ देऊन बँकेचा सन्मान करण्यात आला, कार्यक्रमाचे संचालन महेंद्र देशमुख, पुरस्कार सोहळा संचालन रामचंद्र देशपांडे, निलेश सोमानी तर आभार कर्मचारी प्रतिनिधी तेजराव वानखेडे यांनी मानले राष्ट्रगीताने आमसभेची सांगता करण्यात आली आमसभेला भागधारक हितचिंतक उपस्थित होते.

जनमाध्यम
paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २५३ ■ रविवार, ९ ऑगस्ट २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# परिसरातील नागरिकांना स्थानिक स्तरावरच उत्तम आरोग्य सुविधा मिळणार-महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

## ३०० खाटांचे रुग्णालय व आष्टी उपसा सिंचन प्रकल्पाचे भूमीपूजन

**वर्धा जनमाध्यम :** तळेगाव येथे होत असलेल्या अत्याधुनिक ३०० खाटांच्या रुग्णालयामुळे आर्वी, आष्टी, कारंजा तालुक्यासह परिसरातील नागरिकांना आता स्थानिक स्तरावरच चांगल्या आरोग्य सुविधा मिळतील. सुमित वानखेडे यांच्या प्रयत्नाने रुग्णालय मंजूर झाले. रुग्णालयासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याचे काम शासन करणार असल्याचे प्रतिपादन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

तळेगाव (शामजीपंत) येथे नव्याने बांधण्यात येत असलेले ३०० खाटांचे रुग्णालय तसेच उर्ध्व वर्धा प्रकल्पांतर्गत आष्टी उपसा सिंचन योजनेच्या भूमीपूजन प्रसंगी श्री.बावनकुळे बोलत होते. यावेळी आ.सुमित वानखेडे, जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, माजी खासदार रामदास तडस, सुरेश वाघमारे, अतिरिक्त जिल्हाधिकारी संजय तेली, माजी जिप अध्यक्ष सरिता गाखरे, महाऑरेंजचे श्रीधर ठाकरे, संजय गाते, सुधीर दिवे आदी उपस्थित होते.

श्री.बावनकुळे यांच्याहस्ते प्रस्तावित रुग्णालयाच्या जागेवर कुदळ मारून तर आष्टी उपसा सिंचन योजनेचे ई-भूमिपूजन करण्यात आले. आर्वी, आष्टी, कारंजा तालुक्यातील नागरिकांना वर्धा किंवा नागपूर येथे जाऊन उपचार करावे लागत होते. तळेगाव येथे रुग्णालय उभे राहिल्यानंतर येथेच चांगल्या दर्जाच्या सुविधा नागरिकांना उपलब्ध होईल. आष्टी तालुक्यातील काही गावातील नागरिकांना सिंचनासाठी पाण्याची अडचण होती. आष्टी उपसा सिंचन प्रकल्पामुळे या गावांना बारमाही पाणी मिळणार असल्याचे आ.सुमित वानखेडे म्हणाले.



**३०० खाटांच्या रुग्णालयातील सुविधा-** आष्टी तालुक्यातील तळेगाव येथे आमदार सुमित वानखेडे यांच्या प्रयत्नाने येथे ३०० खाटांचे रुग्णालय मंजूर झाले आहे. हे रुग्णालय जवळपास ३०,०९९ चौरस मीटर क्षेत्रफळात १५५ कोटी ८४ लक्ष रुपये खर्च करुन बांधण्यात येणार आहे. यामध्ये रुग्णालय व प्रशासकीय इमारत, वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी निवासस्थान असणार आहे. रुग्णालयामध्ये पाणी पुरवठा, पावसाचे पाणी संकलन व्यवस्था, वातानुकुलीत लिफ्ट, सीसीटीव्ही, शवागार, सुरक्षा कक्ष, पंपगृह, विद्युत उपकेंद्र, ऑक्सिजन शेड, वैद्यकीय गॅस पाईपलाईन, चार अत्याधुनिक शस्त्रक्रिया कक्ष, लिक्विड ऑक्सिजन टँक, पार्किंग सुविधा, अंतर्गत रस्ते इत्यादी राहणार आहे. या तीन मजली रुग्णालयामध्ये नोंदणी विभाग, बाह्यरुग्ण विभाग, माता व बाल आरोग्य विभाग, आपत्कालीन विभाग, रेडिओलॉजी, सीटीस्कॅन, सोनोग्राफी, औषध वितरण विभाग, महिला व पुरुष स्वतंत्र वार्ड, बर्न वार्ड, अतिदक्षता वार्ड, महिला संसर्गजन्यरोग वार्ड, रक्तपेढी, निर्जंतुकीकरण विभाग आदी सुविधा राहणार आहे. रुग्णांना अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा स्थानिक स्तरावरच उपलब्ध होईल.

**आष्टी उपसा सिंचन योजना, १४ गावांना लाभ-** मोर्शी येथील उर्ध्व वर्धा प्रकल्पांतर्गत आष्टी उपसा सिंचन योजना कार्यान्वित करण्यात येणार आहे. ही योजना उर्ध्व वर्धा प्रकल्पाच्या डाव्या कालव्यावर साखळी क्रमांक १८३०० मीटरवर स्थित आहे. या योजनेमध्ये २ पंपगृह उभारण्यात येणार आहे.

पंपगृह दोनच्या वितरण कुंडावरून आष्टी येथील १५५ हेक्टर क्षेत्र व थार, किन्ही, करोला, चामला, बोरखेडी, नागझिरी, बांबर्डा, बोटोणा, वाघोडा, वाडी, पळसोना, सारवाडी, तरोडा या गावातील १ हजार ९०३ हेक?टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. यामुळे या गावातील शेतीचा सिंचनाचा प्रश्न मिटणार आहे. शेतकऱ्यांना बारामाही सिंचन उपलब्ध होणार असल्याने जनावरांच्या व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निकाली निघणार आहे.

# वाघ पाहिल्याशिवाय जाणार नाही; वैभव सूर्यवंशीचा बोर जंगलात हट्ट

## वन अधिकाऱ्यांची समजूत; नियम-सुरक्षेपुढे स्टार क्रिकेटरने अखेर टेकले गुडघे

**सेलू जनमाध्यम :** भारतीय क्रिकेटमधील युवा आक्रमक फलंदाज वैभव सूर्यवंशी याने शुक्रवारी वर्धा जिल्ह्यातील बोर व्याघ्र प्रकल्पाच्या राहाटी गेट परिसरात जंगल सफारीचा थरार अनुभवला. बिबट्या, अस्वल, सांबर, चितळ आणि मोरांचे दर्शन झाल्यानंतरही वैभवची नजर मात्र जंगलाच्या राजाच्या शोधात होती. वाघ पाहिल्याशिवाय परतायचे नाही, असा हट्ट त्याने धरल्याने वन अधिकाऱ्यांची काही काळ धावपळ उडाली.



वर्धा जिल्ह्यातील तळेगाव (शा.पं.) येथे राजस्थान रॉयल्सचे प्रशिक्षण केंद्र असल्याने खेळाडूंची या परिसरात ये-जा सुरू असते. बोर व्याघ्र प्रकल्पाची माहिती मिळाल्यानंतर वनपरिक्षेत्र अधिकारी रुपेश खेडकर यांनी संघाला सफारीचे निमंत्रण दिले होते.

त्यानुसार वैभवसोबत शुभम दुबे, रवी सिंग, सुशांत मिश्रा आणि टीम मॅनेजर रोमी यांनी सफारी केली.

पावसाळ्यातील हिरवाई, तुडुंब भरलेले जलाशय आणि मुक्त संचार करणारे वन्यजीव पाहून खेळाडू भारावून गेले. मात्र, वाघाचे दर्शन न झाल्याने वैभवची उत्सुकता वाढत गेली. संध्याकाळ जवळ येत असतानाही त्याने सफारी सुरू ठेवण्याची इच्छा व्यक्त केली.

मात्र, स्टार असाल तरी जंगलाचे नियम सर्वांसाठी समान, अशी भूमिका वन अधिकाऱ्यांनी घेतली. अंधारानंतर जंगलात थांबणे धोकादायक असल्याने अधिकाऱ्यांनी वैभवची समजूत काढली. तुम्ही देशाचे स्टार आहात तुमच्या सुरक्षेची जबाबदारी आमची आहे. पुढच्या वेळी सकाळी लवकर या, असे सांगितल्यानंतर वैभवने नियमांचा मान राखत माघार घेतली.

वाघ दिसला नसला तरी बोरच्या निसर्गसौंदर्याने युवा क्रिकेटपटूंचे मन जिंकले. पुन्हा येईन आणि वाघाचे दर्शन घेईन, अशी इच्छा वैभवने व्यक्त केली.

सफारीदरम्यान छायाचित्रकार आकाश मुंगले, क्षेत्र सहायक वसंत खेडकर, बीटगार्ड शारिक सिद्दीकी, विष्णू कदम तसेच जिप्सी चालक राजू घोडे व मनोज लाखे यांनी परिश्रम घेतले.

# जीर्ण इमारतीत जीव मुठीत धरून उपचार

## सेलडोह आरोग्य उपकेंद्रासाठी नवीन इमारतीची पालकमंत्र्यांकडे हाक

**सेलू जनमाध्यम :** वर्धा-नागपूर राज्यमार्गालगत जिल्ह्याच्या सीमेवर असलेल्या सेलडोह येथील 'आयुष्मान आरोग्य मंदिर' अर्थात आरोग्य उपकेंद्राची इमारत जीर्ण झाली असून, पावसाळ्यात छत गळत असल्याने रुग्णांसह कर्मचाऱ्यांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे या उपकेंद्रासाठी तातडीने नवीन इमारत उभारण्याची मागणी ग्रामस्थांनी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्याकडे केली आहे.

वर्षानुवर्षे जुन्या असलेल्या या इमारतीच्या भिंती जीर्ण झाल्या आहेत. पावसाळ्यात छतावरून पाणी थेट उपचार कक्षात गळत असल्याने औषधसाठा, वैद्यकीय साहित्य तसेच महत्त्वाची कागदपत्रे सुरक्षित ठेवण्याचे आव्हान कर्मचाऱ्यांसमोर निर्माण होते. अनेकदा रुग्णांवर उपचार सुरू असतानाच कक्षात पाणी साचण्याची परिस्थिती निर्माण होते.

उपकेंद्रातील वॉशरूमही



नादुरुस्त असल्याने महिला रुग्ण, नागरिक आणि कर्मचाऱ्यांची मोठी गैरसोय होत आहे. परिसरातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता सध्याची छोटी व अपुरी इमारत प्राथमिक आरोग्य सेवा देण्यासाठी अपुरी पडत आहे.

दरम्यान, पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या प्रयत्नांतून सेलडोह येथे पशुवैद्यकीय दवाखान्यासाठी आधुनिक इमारत उभारण्यात आली आहे. त्याच धर्तीवर आरोग्य उपकेंद्रासाठीही सुसज्ज इमारत उभारावी, अशी ग्रामस्थांची मागणी आहे. नवीन इमारतीचा आराखडा तयार करून शासनाकडून आवश्यक निधी मंजूर करावा आणि रुग्णांना सुरक्षित व दर्जेदार आरोग्य सेवा मिळण्यासाठी कामाला तातडीने सुरुवात करावी, अशी मागणी होत आहे.

# गॅस पाईप निसटला अन् घरात आगीचा भडका

## सोनू भार्गव यांनी जीव धोक्यात घालून विझवली आग

**आष्टी शहीद जनमाध्यम :** आष्टी येथील व्यापारी संघाचे अध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सोनू भार्गव यांच्या राहत्या घरी शुक्रवारी, दि. ८ ऑगस्ट रोजी सकाळी गॅस पाईप शेगडीतून निसटल्याने अचानक आगीचा भडका उडाला. काही क्षणांतच स्वयंपाकघरात आगीचे लोळ पसरल्याने भार्गव परिवाराची धावपळ उडाली. प्रसंगावधान राखत सोनू भार्गव यांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून आग विझविल्याने मोठा अनर्थ टळला.

सकाळच्या वेळी घरातील काही मंडळी शेतीच्या कामासाठी बाहेर गेली होती. सोनू भार्गव शेजारील दुकानात बसले असताना मुलीचा आग.. आग.. असा आरडाओरडा ऐकू आला. ते तत्काळ घरातील किचनमध्ये धावले. त्यावेळी आगीने रौद्ररूप धारण केले होते. सुरुवातीला पोते व वाळू टाकून आग विझविण्याचा प्रयत्न करण्यात आला; मात्र आग आटोक्यात येत नव्हती.



अखेर सोनू भार्गव यांनी मोठा पितळी गंज उलटा करून आगीच्या ठिकाणी ठेवला आणि अथक प्रयत्नांनी आग नियंत्रणात आणली. विशेष म्हणजे घटनास्थळी तीन गॅस सिलेंडर असल्याने परिस्थिती अत्यंत धोकादायक होती. आग सिलेंडरपर्यंत पोहोचली असती तर मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता होती.

आग विझविताना सोनू भार्गव यांच्या हाताला व तोंडाला भाजले. त्यांच्यावर डॉ. जे. डी. बाळास्कर यांनी तातडीने उपचार केले. राहुल भाकरे, प्रमोद चरडे व राजेंद्र पाटील यांनीही आग विझविण्यासाठी मदत केली.

भार्गव यांच्या धाडसामुळे संभाव्य मोठी जीवितहानी टळली. घटनेनंतर नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला.

# देणाऱ्याचे हात बनण्याची प्रेरणा; अग्रवाल परिवाराकडून १३३ गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य

**सिंदी रेल्वे जनमाध्यम :** गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लावत समाजाप्रती आपली जबाबदारी जपण्याचा आदर्श अग्रवाल परिवाराने घालून दिला. स्व. प्रमोद मेमोरियल ट्रस्ट, गोंदिया यांच्या प्रेरणेने स्व. गोपालदास अग्रवाल यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आणि स्थानिक श्री गणेश मंदिर ट्रस्टच्या सहकार्याने नगरपरिषदेच्या प्राथमिक शाळांमधील १३३ गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

महालक्ष्मी भवन येथे शुक्रवारी झालेल्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देण्यात आले. तसेच नगरपरिषदेच्या नव्याने सुरू झालेल्या नर्सरीतील ३० विद्यार्थ्यांनाही शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले. देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे घेता-घेता एक दिवस देणाऱ्याचे हात घ्यावेत, या कवी विंदा करंदीकर यांच्या ओळींचा संदर्भ देत ॲड. परीक्षित पेटकर यांनी, आज मिळालेली मदत उद्या इतरांना देण्याची प्रेरणा विद्यार्थ्यांनी घ्यावी, असे आवाहन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगरसेवक शरद तळवेकर होते. शिक्षण सभापती राजश्री बोरीकर, उद्योजक दिलीप अग्रवाल, विनोद अग्रवाल, अर्चना अग्रवाल यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक राजश्री बोरीकर यांनी केले.

# दारू माफियांचा वर्ध्यात 'वॉशआऊट'

## १६२ गुन्हे दाखल; तब्बल १ कोटी ४० लाखांचा मुद्देमाल उद्ध्वस्त

### १६९ आरोपी पोलिसांच्या रडारवर

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा जिल्ह्यात सुरू असलेल्या अवैध दारूच्या धंद्याला पोलिसांनी जोरदार दणका दिला आहे. जिल्हा पोलिसांनी राबविलेल्या 'वॉशआऊट' मोहिमेत अवघ्या दोन दिवसांत १६२ गुन्हे दाखल करून १६९ आरोपींवर कारवाई करण्यात आली. या धडक कारवाईत तब्बल १ कोटी ४० लाख ६६ हजार १९० रुपयांचा दारूसाठा व संबंधित मुद्देमाल जप्त करून नष्ट करण्यात आला.

पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम आखण्यात आली. जिल्ह्यात मोठ्या



प्रमाणावर गावठी दारू गाळून तिचा साठा केला जात असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानंतर शहरालगतचा परिसर, गावाबाहेरील भाग, जंगल शिवार तसेच दुर्गम ठिकाणांवर पाच-सहा दिवसांपासून गुप्त पाळत ठेवण्यात आली.

जिल्ह्यातील विविध ठिकाणी एकाच वेळी छापेमारी करण्यात आली. देशी-विदेशी दारूविक्रीचे ३३, तर गावठी दारूविक्रीचे १२९ गुन्हे दाखल करण्यात आले.

या मोहिमेत अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली चार उपविभागीय पोलीस अधिकारी, ४७ अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखेसह तब्बल ३१५ पोलीस अंमलदार सहभागी झाले.

# पार्वतीदेवी भार्गव यांचे निधन



**पुलगाव:** येथील रहिवासी पार्वतीदेवी जगदीशमोहन भार्गव यांचे वयाच्या ९७ व्या वर्षी निधन झाले त्यांच्या पश्चात तीन मुलं, एक मुलगी, स्नुषा, जावई नातवंडे असा मोठा परिवार आहे, त्या ?ड, अशोककुमार पत्रकार अनुपकुमार अतुलकुमार यांच्या मातोश्री होता, अंत्यसंस्कार आज रविवारी दुपारी तीन वाजता पुलगाव येथील मोक्षधाम येथे होणार आहे.

# कामगारांच्या मागण्यांसाठी सिटूचा रणशिंग; वर्ध्यात जेल भरो आंदोलन

**वर्धा जनमाध्यम :** केंद्र आणि राज्य सरकारच्या कामगार, शेतकरी, शेतमजूर, युवक, महिला व विद्यार्थीविरोधातील धोरणांच्या निषेधार्थ १० ऑगस्ट रोजी वर्ध्यात जेल भरो आंदोलन करण्यात येणार आहे. सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्स अर्थात सिटूच्या आवाहनानुसार होणाऱ्या या आंदोलनात जिल्ह्यातील हजारो कामगार, शेतकरी, महिला, युवक व विद्यार्थी सहभागी होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

१० ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता विठ्ठल मंदिर रोडवरील कॉम्रेड रामचंद्र घंगारे भवन येथील सिटू कार्यालयातून मोर्चाला सुरुवात होईल. बढे चौक, बजाज चौक, इतवारा चौक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक मार्गे मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार आहे.

### १० ऑगस्टला वर्ध्यात जेल भरो आंदोलन सिटूसह विविध संघटनांचा सहभाग

आशा कर्मचारी, अंगणवाडी कर्मचारी, गटप्रवर्तक, शालेय पोषण आहार कर्मचारी, बांधकाम कामगार, शेतमजूर तसेच विविध कर्मचारी संघटना आंदोलनात सहभागी होणार आहेत.

कामगारांना किमान ३० हजार रुपये वेतन द्यावे, प्रोत्साहन भत्ता थकबाकीसह द्यावा, प्रसूती रजा व वैद्यकीय रजा लागू करावी, योजना कामगारांना ईएसआय, ईपीएफ व ग्रॅच्युइटीचा लाभ द्यावा, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

आरोग्य सेवेसह सार्वजनिक क्षेत्राचे खासगीकरण थांबवावे, चारही कामगार संहिता मागे घ्याव्यात तसेच आशा, गटप्रवर्तक, अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना कामगार कायद्याच्या कक्षेत आणावे, अशी मागणी आहे.

आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन सिटूचे राज्य उपाध्यक्ष यशवंत झाडे, जिल्हा सचिव भैय्या देशकर, अध्यक्ष सुनील घिमे यांच्यासह विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# वर्ध्याच्या जंगलात दुर्मिळ पाहुण्याची एन्ट्री

## ठिपकेवाला सातभाईची वनसंशोधन केंद्रात नोंद

### मनेशकुमार सज्जन यांच्या निरीक्षणामुळे पक्षीवैभवात चौथी भर

**वर्धा जनमाध्यम :** वर्ध्याच्या वनसंपदेत लपून राहणाऱ्या दुर्मिळ पक्ष्याने हजेरी लावली आहे. गांधीबाग रोपवाटिका आणि वनसंशोधन केंद्र परिसरात ठिपकेवाला सातभाई म्हणजेच Puff throated Babbler या दुर्मिळ पक्ष्याची नोंद झाली आहे. वनरक्षक तथा वन्यजीव अभ्यासक मनेशकुमार सज्जन यांनी पक्षीनिरीक्षण करताना या पक्ष्याचा शोध घेतला. वर्ध्याच्या पक्षीवैभवात त्यांच्या माध्यमातून झालेली ही चौथी महत्त्वपूर्ण नोंद ठरली आहे.

दि ६ ऑगस्ट रोजी सकाळी पक्षीनिरीक्षण करताना वनसंशोधन केंद्र परिसरातील दाट झुडपे आणि जैवविविधतेने समृद्ध भागात सज्जन यांना ठिपकेवाला सातभाई आढळला. त्यांनी पक्ष्याचे बारकाईने निरीक्षण करून छायाचित्रण आणि आवश्यक नोंदी केल्या. ठिपकेवाला सातभाई हा दाट झुडपे पालापाचोळा आणि जंगलाच्या तळभागात वावरणारा लाजाळू पक्षी आहे. मानवी वावरापासून दूर राहण्याची त्याची प्रवृत्ती असल्याने त्याचे दर्शन दुर्मीळ मानले जाते. या पक्ष्याच्या नोंदीमुळे वनसंशोधन केंद्र परिसरातील समृद्ध जैवविविधता पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.



मनेशकुमार सज्जन यांनी यापूर्वी वनसंशोधन केंद्र परिसरात क्रेस्टेड गोशॉक इंडियन पिट्टा ऑरेंज हेडेड थ्रश एशियन ब्राऊन फ्लायकॅचर टिकेल्स ब्ल्यू फ्लायकॅचर ओरिएंटल हनी बझर्ड एशियन पॅराडाईज फ्लायकॅचर आणि इंडियन स्कॉप्स आउल यांसह ९० हून अधिक पक्षी प्रजातींची नोंद केली आहे. बोर व्याघ्र प्रकल्पातही त्यांनी इंडियन ब्लॅकबर्ड यलो लेग्ड बटणक्वेल आणि चेंजिएबल हॉक ईगल या वर्धा जिल्ह्यासाठी नव्या तीन पक्ष्यांची नोंद केली होती. आता ठिपकेवाला सातभाईच्या नोंदीमुळे वर्ध्याच्या पक्षीवैभवात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. पक्षीनिरीक्षण हा केवळ छंद नसून जैवविविधतेच्या अभ्यासाचे प्रभावी माध्यम आहे. वनसंशोधन केंद्र आणि बोर व्याघ्र प्रकल्पात सातत्याने निरीक्षण केल्यास भविष्यात आणखी दुर्मीळ आणि स्थलांतरित पक्ष्यांच्या नोंदी होण्याची शक्यता असल्याचे मनेशकुमार सज्जन यांनी सांगितले.

# अतिवृष्टीग्रस्तांच्या मदतीसाठी काळेंचा प्रशासनाला दणका

## पंचनामे, मदतवाटप आणि रस्ते पुलांच्या दुरुस्तीला वेग

**वर्धा जनमाध्यम :** अतिवृष्टी आणि पुरामुळे शेतकरी व नागरिकांचे संसार उद्ध्वस्त झाले असताना प्रशासनाने कागदी घोडे नाचवू नयेत, तर प्रत्यक्ष मदत नुकसानग्रस्तांच्या हातात द्यावी, असा स्पष्ट इशारा खासदार अमर काळे यांनी दिला आहे.

काळे यांच्या पत्राची दखल घेत वर्धा आणि अमरावती जिल्हा प्रशासनाने नुकसानग्रस्त भागात तातडीने कार्यवाही सुरू केली आहे.

वर्धा लोकसभा मतदारसंघातील अनेक गावांना अतिवृष्टीचा तडाखा बसला असून शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. पूरस्थितीमुळे रस्ते आणि पूल वाहून गेल्याने अनेक गावांचा संपर्कही बाधित झाला आहे. मंगरूळ, चवाया, धामक, रसूलपूर तासेचा नांदगाव खांडेश्वर तालुक्यातील गावांना मोठा फटका बसला आहे.



खासदार काळे यांच्या पत्रानंतर वर्धा जिल्हाधिकाऱ्यांनी ७ ऑगस्ट रोजी महसूल, सार्वजनिक बांधकाम आणि जिल्हा परिषद बांधकाम विभागाला तातडीने पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत. नुकसानभरपाईचे प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यासह वाहतूक बंद असलेले रस्ते आणि पूल तातडीने दुरुस्त करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

अमरावती जिल्ह्यातील नांदगाव खंडेश्वर तालुक्यातही प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी सुरू केली असून पिकांचे आणि घरांचे पंचनामे केले जात आहेत. मदतवाटपाची प्रक्रियाही सुरू झाली आहे.

नुकसानग्रस्त शेतकरी आणि नागरिकांना प्रत्यक्ष मदत मिळेपर्यंत पाठपुरावा सुरूच ठेवणार असल्याचे खासदार अमर काळे यांनी स्पष्ट केले.

paper www.janmadhyam.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# स्वातंत्र्याच्या 79 वर्षानंतर नक्षलग्रस्त 92 गावांत पहिल्यांदाच फडकणार तिरंगा!



**रायपूर :**गेली अनेक दशके नक्षलवादाच्या दहशतीखाली जगणा-या छत्तीसगडमधील बस्तर भागातील तब्बल ९२ गावांमध्ये स्वातंर्त्यानंतर पहिल्यांदाच १५ ऑगस्ट रोजी तिरंगा ध्वज फडकावला जाणार आहे. पूर्वी, १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारीला, या भागांत नक्षलवादी काळे आणि लाल झेंडे फडकवून बहिष्कार टाकत असत. मात्र आता येथे, भारताचा राष्ट्रध्वज डौलाने फडकताना दिसेल.छत्तीसगडचे उपमुख्यमंत्री विजय शर्मा यांनी यासंदर्भात माहिती दिली. ३१ मार्च रोजी या भागात सशस्त्र नक्षलवाद्यांचा बीमोड केल्यानंतर येणारा हा पहिलाच राष्ट्रीय उत्सव आहे. या ९२ गावांमध्ये बीजापूर जिल्ह्यातील ३३, सुकमा जिल्ह्यातील ५० आणि नारायणपूर जिल्ह्यातील ९ गावांचा समावेश आहे. उपमुख्यमंत्री विजय शर्मा म्हणाले, पूर्वी नक्षली हिंसाचारामुळे 'कुख्यात' झालेले हे भाग आता विकास आणि राष्ट्रीय प्रवाहाशी जोडून 'विख्यात' केले जात आहेत. बस्तरच्या प्रत्येक गावात आता तिरंगा यात्रा काढली जाईल. सिलगेर, टेकालगुडम, रानीबोदली आणि दरभा सारखी दुर्गम भागांतील गावेही तिरंगा यात्रेने जोडली जातील. भारतीय जनता युवा मोर्चा आणि स्थानिक तरुण या मोटरसायकल रॅलीत सहभागी होउन देशभक्तीचा संदेश देतील.


## पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहीरात

शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी-२०२५

मान्य दिनांक : [illegible]
प्रसिध्दी दिनांक : ०५/०८/२०२६

संस्थेचे नाव : (270715SC119) Jawahar Shikshan Sanstha (Secondry/ Higher Secondary) - With Interview

शैक्षणिक स्तर : (Secondry/ Higher Secondary) शाळेचे नाव : [illegible] विद्यालय, देऊरवाडा, ता.चांदूरबाजार, जि. अमरावती

Jawahar Shikshan Sanstha [illegible]

आरक्षण निहाय रिक्त पदांचा तपशील

| अ.क्र. | प्रवर्ग | महिला | माजी सैनिक | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] (खुला) पदे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अनु.जाती | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| २ | वि.जा.(अ) | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| ३ | [illegible] | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | | | | | | | | एकूण | ३ |

शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, विषय व पदनिहाय रिक्त पदांचा तपशील — मान्य दिनांक : [illegible]

| अ.क्र. | माध्यम | पद | वेतनश्रेणी/ मानधन | अनुदान प्रकार | विषय | शिकवण्याचे माध्यम | आवश्यक शैक्षणिक पात्रता | आवश्यक व्यावसायिक पात्रता | TET / CTET | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Marathi | Graduate Teacher std [illegible] | Consolidated Pay [illegible] (18000) | Aided | Language (Marathi) | - | Graduation | Diploma/ Graduation | [illegible] | 1 |
| 2 | Marathi | Graduate Teacher std [illegible] | Consolidated Pay [illegible] (18000) | Aided | Mathematics [illegible] | Marathi | Graduation | Diploma/ Graduation | [illegible] | 1 |
| 3 | Marathi | Graduate Teacher std [illegible] | Consolidated Pay [illegible] (18000) | Aided | Mathematics [illegible] | Marathi | Graduation | Graduation | — | 1 |
| | | | | | | | | | एकूण | ३ |

**सर्वसाधारण सूचना :**

१ अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी-२०२५ (TAIT) प्रविष्ठ झालेल्या उमेदवारांपैकी ज्या उमेदवारांनी पवित्र प्रणाली (https://tait2025.mahateacherrecruitment.org.in) या संकेतस्थळावर वैयक्तिक माहिती नोंदवून स्वप्रमाणित केलेली आहे, असेच उमेदवार जाहिरातीनुसार ऑनलाईन अर्ज करू शकतील.

अध्यक्ष/सचिव
जवाहर शिक्षण संस्था, देऊरवाडा,
ता. चांदूर बाजार, जि. अमरावती



## पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहीरात

शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी-२०२५

मान्य दिनांक : [illegible]
प्रसिध्दी दिनांक :

संस्थेचे नाव : (270715SC042) Dnyandip Karmachari Shikshan Welfare Va Bahuuddeshiy Sanstha (Secondry/ Higher Secondary) - With Interview

शैक्षणिक स्तर : (Secondry/ Higher Secondary) शाळेचे नाव : शिवकृपा हायस्कुल जलाराम नगर, अमरावती

Dnyandip Karmachari Shikshan Welfare Va Bahuuddeshiy Sanstha [illegible]

आरक्षण निहाय रिक्त पदांचा तपशील

| अ.क्र. | प्रवर्ग | महिला | माजी सैनिक | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] पदे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अनु.जाती | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| २ | ई.डब्ल्यू.एस | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| ३ | एकूण | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | २ |

शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, विषय व पदनिहाय रिक्त पदांचा तपशील — मान्य दिनांक :

| अ.क्र. | माध्यम | पद | वेतनश्रेणी/ मानधन | अनुदान प्रकार | विषय | शिकवण्याचे माध्यम | आवश्यक शैक्षणिक पात्रता | आवश्यक व्यावसायिक पात्रता | TET / CTET | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Marathi | Under Graduate Teacher std (1-5) | Consolidated Pay-UGT (16000) | Aided | All Subject | Marathi | HSC (Std. 12th) | Diploma | [illegible] | 1 |
| 2 | Marathi | Graduate Teacher std (6-8) | Consolidated Pay-GT [illegible] (18000) | Aided | Language (English) | --- | Graduation | Diploma/ Graduation | [illegible] | [illegible] |
| 3 | Total | | | | | | | | | 2 |

**सर्वसाधारण सूचना :**

१ अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी-२०२५ (TAIT) प्रविष्ठ झालेल्या उमेदवारांपैकी ज्या उमेदवारांनी पवित्र प्रणाली (https://tait2025.mahateacherrecruitment.org.in) या संकेतस्थळावर वैयक्तिक माहिती नोंदवून स्वप्रमाणित केलेली आहे, असेच उमेदवार जाहिरातीनुसार ऑनलाईन अर्ज करू शकतील.

अध्यक्ष/सचिव
ज्ञानदिप कर्मचारी शिक्षण वेलफेअर व
बहुउद्देशिय संस्था, महादेवनगर, अमरावती



## पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहीरात

शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी-२०२५

मान्य दिनांक : [illegible]
प्रसिध्दी दिनांक : [illegible]

संस्थेचे नाव : (270704SC006) Tapar Education Society Kholapur (Secondry/ Higher Secondary) - With Interview

शैक्षणिक स्तर : (Secondry/ Higher Secondary) शाळेचे नाव : राष्ट्रीय शेतकी विद्यालय, खोलापूर, ता. भातकुली, जि. अमरावती

Tapar Education Society Kholapur [illegible]

आरक्षण निहाय रिक्त पदांचा तपशील

| अ.क्र. | प्रवर्ग | महिला | माजी सैनिक | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] (खुला) पदे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अनु.जाती | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | एकूण | | | | | | | एकूण | १ |

शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, विषय व पदनिहाय रिक्त पदांचा तपशील — मान्य दिनांक : [illegible]

| अ.क्र. | माध्यम | पद | वेतनश्रेणी/ मानधन | अनुदान प्रकार | विषय | शिकवण्याचे माध्यम | आवश्यक शैक्षणिक पात्रता | आवश्यक व्यावसायिक पात्रता | TET / CTET | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Marathi | Graduate Teacher std (6-8) | Consolidated Pay-GT 6-8 (18000) | Aided | Science | Marathi | Graduation | Diploma/ Graduation | [illegible] | 1 |
| | | | | | | | | | [illegible] | 1 |

**सर्वसाधारण सूचना :**

१ अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी-२०२५ (TAIT) प्रविष्ठ झालेल्या उमेदवारांपैकी ज्या उमेदवारांनी पवित्र प्रणाली (https://tait2025.mahateacherrecruitment.org.in) या संकेतस्थळावर वैयक्तिक माहिती नोंदवून स्वप्रमाणित केलेली आहे, असेच उमेदवार जाहिरातीनुसार ऑनलाईन अर्ज करू शकतील.

अध्यक्ष/सचिव
टापर शिक्षण संस्था,
खोलापूर, जि. अमरावती



## पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहिरात

शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी २०२५

**संस्थेचे नाव : नवयुवक शिक्षण संस्था, वरुड, ता. वरुड, जि. अमरावती**
**संस्था कोड:- 270714SC011**
**शाळेचे नाव :- जे.जे. खेरडे प्राथ. व उच्च प्राथ. शाळा, पांढुर्णा चौक, वरुड, ता.वरुड, जि. अमरावती -शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, विषय, पदनिहाय रिक्त पदांचा तपशिल.**

मान्य दि. २५/०६/२०२६ — प्रसिध्दी दि.२४/०७/२०२६

| अ.क्र. | माध्यम | पद | वेतनश्रेणी/ मानधन | अनुदान प्रकार | विषय | शिकवण्याचे माध्यम | आवश्यक शैक्षणिक पात्रता | आवश्यक व्यावसायिक पात्रता | TET / CTET | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Marathi | Under Graduate Teacher std (1-4/5) | Consolidated Pay-UGT (16000) | Aided | All Subjects | Marathi | HSC (Std. 12th) | Diploma/ | TET Paper I / CTET Paper I | 2 |
| | | | | | | | | Total | | 2 |

**आरक्षण निहाय रिक्त पदांचा तपशिल :- इ.मा.व.-०१, इडब्ल्यूएस-०१**

**सर्वसाधारण सुचना :-**

१. वरील सर्व पदासाठी शिक्षक भरती संदर्भात पवित्र पोर्टलवर दिलेल्या अटी व नियम सर्व उमेदवारांसाठी बंधनकारक आहे.

२. अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी-२०२५ (TAIT) प्रविष्ठ झालेल्या उमेदवारांपैकी पवित्र प्रणाली (https://tait2025.mahateacherrecruitment.org.in) या संकेतस्थळावर वैयक्तिक माहिती नोंदवून स्वप्रमाणित केलेली आहे, असेच उमेदवार जाहिरातीनुसार ऑनलाईन अर्ज करु शकतील.

३. इच्छुक व अर्हता धारण करणारे उमेदवारांनी पदभरतीच्या सविस्तर जाहीरातीसाठी पवित्र पोर्टलच्या संकेतस्थळाला भेट द्यावी.

अध्यक्ष/ सचिव
नवयुवक शिक्षण संस्था, वरुड



## पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहीरात

शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी-२०२५

मान्य दिनांक : [illegible]
प्रसिध्दी दिनांक : [illegible]

संस्थेचे नाव : (270701SC005) VIDYAMANDIR SHIKSHAN SANSTHA WADGAON FATTEPUR (Primary)- with Interview

शैक्षणिक स्तर : Primary

VIDYAMANDIR SHIKSHAN SANSTHA WADGAON FATTEPUR या व्यवस्थापनाच्या शाळेमध्ये खाली नमूद केलेल्या पदासाठी आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करीत असलेल्या व पवित्र प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहे.

आरक्षण निहाय रिक्त पदांचा तपशील

| अ.क्र. | प्रवर्ग | महिला | माजी सैनिक | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] (खुला) पदे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वि.जा.(अ) | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | खुला | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | एकूण | | | | | | | एकूण | २ |

शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, विषय व पदनिहाय रिक्त पदांचा तपशील — मान्य दिनांक : [illegible]

| अ.क्र. | माध्यम | पद | वेतनश्रेणी/ मानधन | अनुदान प्रकार | विषय | शिकवण्याचे माध्यम | आवश्यक शैक्षणिक पात्रता | आवश्यक व्यावसायिक पात्रता | TET / CTET | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Marathi | Under Graduate Teacher std (1-5) | Consolidated Pay-UGT (16000) | Aided | All Subjects | Marathi | HSC Std 12th | Diploma | [illegible] | 2 |
| | | | | | | | | | Total | 2 |

**सर्वसाधारण सूचना :**

१ अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी-२०२५ (TAIT) प्रविष्ठ झालेल्या उमेदवारांपैकी ज्या उमेदवारांनी पवित्र प्रणाली (https://tait2025.mahateacherrecruitment.org.in) या संकेतस्थळावर वैयक्तिक माहिती नोंदवून स्वप्रमाणित केलेली आहे, असेच उमेदवार जाहिरातीनुसार ऑनलाईन अर्ज करू शकतील.

सचिव
बी.एस.तोडसाम
विद्यामंदिर वडगाव (फत्तेपूर)
ता.अचलपूर जि.अमरावती

अध्यक्ष
सतिश रा.जामोदकर
विद्यामंदिर वडगाव (फत्तेपूर)
ता.अचलपूर जि.अमरावती



## पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहीरात

शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी-२०२५

[illegible]


## 24 तासांत दोन खून; नांदेड पुन्हा हादरले

**नांदेड/ प्रतिनिधी-** शहर व परिसरात शनिवारी ८ ऑगस्ट रोजी अवघ्या २४ तासांच्या आत २ खुनाच्या घटना उघडकीस आल्याने शहरात खळबळ उडाली आहे. इतवारा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बाफना परिसरातील संगम कार बाजारसमोर सुमारे ३५ वर्षीय व्यक्तीचा मृतदेह आढळून आला, तर ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सिडको परिसरातील दूध डेअरीजवळ चंदनसिंग बावरी या युवकाचा धारदार शस्त्राने हल्ला करून खून झाल्याचे समोर आले. सलग २ खुनांच्या घटनांमुळे शहरात चिंतेचे वातावरण पसरले असून सिडकोतील खुनामुळे पुन्हा गँगवारची चर्चा रंगली आहे.




शनिवारी सकाळी बाफना परिसरातील संगम कार बाजार हे दुकान उघडण्यासाठी आलेल्या व्यापा-यांना दुकानासमोर एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. या घटनेची माहिती परिसरातील नागरिकांनी तत्काळ इतवारा पोलिसांना दिली. त्यानंतर पोलीस उपविभागीय अधिकारी प्रशांत शिंदे यांच्यासह इतवारा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आगलावे व इतर अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. मृत व्यक्तीच्या डोक्यावर गंभीर दुखापत झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले. त्यामुळे दगडाने डोक्यात वार करून त्याचा खून करण्यात आला असावा, असा प्राथमिक संशय व्यक्त करण्यात येत आहे. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेउन शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविला आहे. मृताची ओळख पटविण्याचे काम सुरू होते. रात्रीच्या वेळी नेमके काय घडले, मृत व्यक्ती कोणासोबत होती? त्याच्यावर हल्ला कोणी केला? तसेच खुनामागील कारण काय, याचा तपास इतवारा पोलीस करीत आहेत. घटनास्थळाच्या आसपासचे सीसीटीव्ही कॅमेरे तपासण्यास सुरुवात करण्यात आली आहे.तर बाफना येथील घटनेची चर्चा सुरू असतानाच दुपारच्या सुमारास सिडको परिसरातील दूध डेअरीजवळ एका युवकाचा खून झाल्याची माहिती समोर आली. चंदनसिंग बावरी असे मृत युवकाचे नाव असल्याचे पोलिसांनी सांगितले. काही अज्ञात व्यक्तींनी त्याच्यावर धारदार शस्त्रांनी हल्ला केल्याची प्राथमिक माहिती आहे.घटनेची माहिती मिळताच जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ नीलाभ रोहन, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे यांच्यासह ग्रामीण पोलीस पथक घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी घटनास्थळाची बारकाईने पाहणी केली. घटनास्थळावरून उपलब्ध झालेल्या पुराव्यांच्या आधारे तपास सुरू करण्यात आला असून, हल्लेखोरांचा शोध घेण्यासाठी पोलिसांची विविध पथके सक्रिय करण्यात आल्याची माहिती आहे.

**गँगवॉरची पुन्हा चर्चा; पोलिसांसमोर आव्हान-** एकाच दिवशी शहरातील दोन वेगवेगळ्या पोलीस ठाण्यांच्या हद्दीत खुनाच्या घटना समोर आल्याने नांदेडमध्ये पुन्हा चिंतेचे सावट पसरले आहे. सिडको भागातील दुध डेअरी जवळील खुनाची घटना ही गँगवारशी संबंधित असल्याची चर्चा होत होती.पोलिसांनी दोन्ही घटनांमध्ये सीसीटीव्ही फुटेज, प्रत्यक्षदर्शी, तांत्रिक माहिती आणि घटनास्थळी उपलब्ध पुराव्यांच्या आधारे तपास सुरू केला आहे. संशयितांचा माग काढण्यासाठी पोलिसांची स्वतंत्र पथके कार्यरत करण्यात आली आहेत.

## मेटा कंपनीला दणका, अमेरिकन कोर्टाने ठोठावला 9 हजार कोटींचा दंड

**न्यू मेक्सिको/ वृत्तसंस्था-** अमेरिकेतील न्यू मेक्सिको राज्यातील एका न्यायालयाने इन्स्टाग्राम आणि फेसबुकची मूळ कंपनी असलेल्या मेटावर ९४२ दशलक्ष डालर्स (अंदाजे ९०३० कोटी रुपये) दंड ठोठावला. या प्लॅटफार्ममुळे तरुणांच्या मानसिक आरोग्याला हानी पोहोचली, असे न्यायालयाने म्हटले आहे. या दंडापैकी ४२० दशलक्ष डालर्स (अंदाजे ३९९३ कोटी रुपये) तरुणांच्या उपचारांवर खर्च केले जातील. उर्वरित रक्कम पुढील पाच वर्षांत जनजागृती, प्रतिबंध आणि तपासणी सेवांवर खर्च केली जाईल.

पहिल्या टप्प्यात, न्यायालयाने मेटावर ३७५ दशलक्ष डालर्सचा दिवाणी दंड ठोठावला. कंपनीला प्लॅटफार्मवरील बाल लैंगिक शोषणाबद्दल माहिती असूनही ती माहिती लपवून ठेवली, असे न्यायालयाने म्हटले आहे. दुस-या टप्प्यात न्यायालयाने मेटावर ५६७ दशलक्ष डालर्सचा दंड ठोठावला, ज्यामुळे कंपनीवर ठोठावलेला एकूण दंड ९४२ दशलक्ष डालर्स झाला. खटल्यादरम्यान अभियोक्त्यांनी न्यायाधीशांना मेटासाठी मूलभूत बदल अनिवार्य करण्याची विनंती केली. या बदलांचा उद्देश व्यसन लावणा-या वैशिष्ट्यांवर निर्बंध घालून वय पडताळणी प्रक्रिया सुधारून आणि गोपनीयता सेटिंग्ज अधिक कडक करून व डीफाल्ट गोपनीयता सेटिंग्जवर देखरेख ठेवून बाल लैंगिक शोषण रोखणे हा होता.न्यू मेक्सिकोच्या अॅटर्नी जनरलने खटला दाखल केला. हा खटला न्यू मेक्सिकोचे अॅटर्नी जनरल राउल टारेस यांनी दाखल केला होता. आरोप असा होता की मेटाचे इन्स्टाग्राम आणि फेसबुक प्लॅटफार्म मुलांसाठी असुरक्षित होते आणि कंपनीने जाणीवपूर्वक या धोक्यांकडे दुर्लक्ष केले. तपासात असे उघड झाले की, मेटाच्या प्लॅटफार्मचे अल्गोरिदम मुलांना दीर्घकाळ गुंतवून ठेवण्यासाठी तयार केले होते, ज्यामुळे त्यांच्यामध्ये व्यसन, नैराश्य आणि इतर मानसिक आरोग्य समस्यांचा धोका वाढला. हा खटला केवळ मानसिक आरोग्यापुरता मर्यादित नव्हता. प्लॅटफार्मचा वापर मुलांना जाळ्यात अडकवण्यासाठी आणि त्यांचे लैंगिक शोषण करण्यासाठीही केला जात असल्याचा आरोप करण्यात आला होता आणि याची माहिती असूनही कंपनीने पुरेशी कारवाई केली नाही.




## कच्चा रस्ता तलाव बनला, कंबरेइतक्या पाण्यातून मुलांचा शाळेचा प्रवास

**रायपूर/वृत्तसंस्था :**छत्तीसगडमध्ये आजही पावसाचा जोर कायम राहील. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, राज्याच्या अनेक भागांत हलका ते मध्यम पाउस पडेल. उत्तर छत्तीसगडमध्ये काही ठिकाणी मुसळधार पाउस आणि मेघगर्जनेसह वीज पडण्याची शक्यता आहे. राज्यात आतापर्यंत सामान्यपेक्षा ७% कमी पावसाची नोंद झाली आहे. गेल्या २४ तासांतही राज्याच्या अनेक भागांत हलका ते मध्यम पाउस झाला, तर उत्तर छत्तीसगडमध्ये काही ठिकाणी मुसळधार पावसाची नोंद झाली. दरम्यान, गरियाबंद जिल्ह्यातील मैनपूर विकासखंडातील खासरपारा येथे सततच्या पावसामुळे कच्च्या रस्त्यांचे तलावात रूपांतर झाले आहे. मुलांना कमरेएवढ्या पाण्यातून वाट काढत शाळेत जावे लागत आहे. खासरपारा ते टेकनपारा दरम्यानच्या रस्त्यावर पाणी साचल्याने मुलांना दररोज जीव धोक्यात घालून रस्ता ओलांडावा लागत आहे.



# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## युवककेंद्री विचार

देशाच्या राजकारणात एक महत्त्वाचा बदल घडताना दिसत आहे. राजकीय व्यवस्थेच्या पारंपरिक पद्धती आणि नव्या पिढीच्या अपेक्षांमधील संघर्ष मुख्य पटलावर आला आहे. शिक्षण, बेरोजगारी, गुणवत्तेवर आधारित संधी, सरकारी व्यवस्थेतील पारदर्शकता आणि सर्वात म्हणजे भविष्यातील सुरक्षितता या प्रश्नांवर तरुणांमधील अस्वस्थता समाजमाध्यमांपुरती मर्यादित न राहता रस्त्यावर उतरली. त्यामुळे 'जनरेशन झेड'च्या आंदोलनांकडे राजकीय पक्षांनाही नव्या नजरेने पाहावे लागत आहे. विशेषतः सत्ताधारी पक्षाचा दृष्टिकोन बदलणे अधिक गरजेचे असल्याचे जंतर-मंतरवरील आंदोलनाने स्पष्ट केले. याच पार्श्वभूमीवर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी मुंबईतील एका युवककेंद्री कार्यक्रमात तरुणांच्या आंदोलनाला थेट देशविरोधी ठरवण्याच्या भूमिकेपासून अंतर राखले. आंदोलन हा लोकशाहीतील संवादाचा एक मार्ग आहे.तरुणांच्या तक्रारी खऱ्या आहेत आणि शिक्षणव्यवस्थेत बरेच काही करण्याची गरज आहे. आंदोलनाचा उद्देश व्यक्तीला लक्ष्य करणे नसून व्यवस्थेत सुधारणा घडवणे आणि सहमती निर्माण करणे असावा, असे त्यांनी स्पष्ट केले. ही भूमिका अचानक आलेली नाही. काही दिवस आधीच भागवत यांनी आजची तरुणाई पूर्वीच्या पिढीसारखी केवळ आदेश स्वीकारत नाही. ती प्रश्न विचारते, कारणे मागते. त्यांच्याशी संवाद साधावा लागतो, असे म्हटले होते. याचा राजकीय अर्थ समजून घेणे आवश्यक आहे. दक्षिण आशियात राजकीय, सामाजिक चर्चेच्या केंद्रस्थानी आलेली 'जेन-झी' ही राजकीय पक्षांच्या पारंपरिक संघटनात्मक चौकटीत सहज बसणारी पिढी नाही. तिचे राजकीय आकलन समाजमाध्यमांतून तयार होत असले, तरी ती नेत्यांच्या भाषणापेक्षा त्यांच्या कृतीकडे पाहते. पक्षाच्या घोषणापत्रांपेक्षा प्रत्यक्ष अनुभवाला आणि जमिनीवरील वास्तवाला अधिक महत्त्व देते. परीक्षा रद्द, प्रश्नपत्रिका फुटली, भरतीत विलंब किंवा रोजगार संधी कमी झाली, तर या पिढीला प्रशासकीय स्पष्टीकरणापेक्षा 'आमचे नुकसान का झाले' हा प्रश्न अधिक महत्त्वाचा वाटतो. आंदोलनांमुळे शिक्षणमंत्र्यांना राजीनामा द्यावा लागला. पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही तरुण मतदारांशी समाजमाध्यमांद्वारे थेट संवादाचा प्रयत्न सुरू केला आहे. भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी नितीन नवीन यांची नियुक्ती करण्यामागेही युवाशक्तीला प्रभावित करणे हाच मुख्य हेतू होता. २०२९ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी तरुण मतदारांचा वाढता प्रभाव लक्षात घेता राजकीय पक्षांना हे बदल महत्त्वाचे वाटत आहेत. भागवतांची वक्तव्ये केवळ सामाजिक भाष्य म्हणून पाहणे संयुक्तिक ठरणार नाही. कारण, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही भाजपची मातृसंस्था आहे. सरकार चालवताना भाजपला अनेक व्यावहारिक आणि राजकीय तडजोडी कराव्या लागत असल्या, तरी संघ मात्र दीर्घकालीन सामाजिक परिणाम, संघटनात्मक स्वीकार आणि वैचारिक सातत्य याकडे पाहताना दिसतो. या रचनेमुळे एखाद्या सरकारी निर्णयाबाबत दोघांची भूमिका सारखीच असेल, असे नाही. भागवतांनी गतवर्षी 'संघ आणि भाजप यांच्यात मतभेद असू शकतात; पण मनभेद नाहीत?',असे म्हटले होते. म्हणूनच 'जेन झी'च्या आंदोलनाबाबत भागवतांचे वक्तव्य थेट सरकारविरोधी नसले, तरी सरकारच्या पद्धतीवर अप्रत्यक्ष प्रश्न उपस्थित करणारे आहे. तरुणांना फक्त समजावून सांगण्याऐवजी त्यांचे म्हणणे ऐकावे लागेल. विरोध करणाऱ्यांना देशविरोधी ठरवून प्रश्न सुटणार नाहीत.जेन झीच्या तक्रारी खऱ्या आहेत. ही संघाची भूमिका सत्ताधाऱ्यांसाठी महत्त्वाची सूचना आहे. आंदोलनामागे राजकीय शक्ती आहेत की नाहीत, हा प्रश्न वेगळा; परंतु त्यामागील मूळ समस्या खरी आहे का, हा त्याहून महत्त्वाचा प्रश्न. भागवतांनी हा फरक अधोरेखित केला. यातून एक राजकीय गरजही ध्वनित होते. भाजपचा सर्वात मोठा सामाजिक आधार पारंपरिक मतदारांबरोबरच मध्यमवर्गीय, शिक्षित, आकांक्षी आणि रोजगाराच्या संधी शोधणाऱ्या तरुणांचा आहे. या वर्गात असंतोष दीर्घकाळ टिकला, तर त्याचा प्रतिकूल परिणाम सत्ताधारी पक्षावर होऊ शकतो. त्यामुळे संघाला केवळ वैचारिक निष्ठा पुरेशी वाटत नाही. नव्या पिढीशी भावनिक आणि वैचारिक संवादही आवश्यक वाटतो. हे लक्षात घेता भागवतांची वक्तव्ये संघाच्या बदलत्या संवाद पद्धतीचे संकेत म्हणावी लागतील.पूर्वी संघाची भाषा प्रामुख्याने संस्कार, शिस्त, कर्तव्य, राष्ट्र आणि संघटनाभोवती फिरत असे. आता त्यात प्रश्न विचारणाऱ्या तरुणांना स्वीकारण्याची भाषा स्पष्टपणे दिसते. अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील रालोआ सरकारच्या काळातही संघ परिवारातील स्वदेशी जागरण मंचाने निर्गुतवणूक धोरणावरून भाजप सरकारवर टीका केली होती. भाजप सरकारच्या प्रत्येक निर्णयाला पाठिंबा देणे, ही संघाची परंपरा नाही. मोदींच्या काळात २०१५ मध्ये भूसंपादन विधेयकातील काही तरतुदींना संघप्रेरित संघटनांनी विरोध केला. २०१८ मध्ये किरकोळ व्यापारातील परकीय गुंतवणुकीचे नियम शिथिल करण्याचा निर्णय असेल किंवा २०२० मध्ये कृषी कायदे असतील. त्यांबाबत सामाजिक मत आणि राष्ट्रीय हित यांना प्राधान्य देणारी भूमिका संघाने घेतली होती. २०२४ च्या लोकसभा निवडणुकांमध्ये भाजपच्या जागा घटल्या तेव्हाही भागवतांनी अहंकार टाळण्याचा, विरोधकांकडे शत्रू म्हणून नव्हे, तर वेगळे मत मांडणारा प्रतिपक्ष म्हणून पाहण्याचा आणि संवाद व सहमतीचे महत्त्व मान्य करण्याचा संदेश दिला. आता जेन झी आंदोलनानंतर पुन्हा तीच भाषा पुढे आली आहे. फरक एवढाच की, यावेळी लक्ष्य राजकीय विरोधक नसून तरुण पिढी आहे.यामागे संघाची चिंता स्पष्ट आहे. तरुण पिढीला जर सत्ताधारी आपले प्रश्न ऐकत नाहीत, व्यवस्था पारदर्शक नाही आणि आपले भविष्य सुरक्षित नाही असे वाटू लागले, तर ती राष्ट्रासाठी धोक्याची घंटा ठरेल. त्यामुळे भागवतांचे वक्तव्य भाजपसाठी दोन संदेश घेऊन येते. पहिला संदेश तात्कालिक आहे. तो म्हणजे विद्यार्थी आंदोलनांना केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न मानू नका. त्यांच्या मागण्यांकडे गांभीर्याने पाहा. दुसरा संदेश दीर्घकालीन आहे. तो म्हणजे नव्या पिढीशी संवादाची भाषा बदला. भागवतांनी आंदोलनकर्त्यांना वैधता दिली; पण त्याच वेळी आंदोलनांनी समाजात दुही निर्माण करू नये, असे सांगून आंदोलनाच्या मर्यादाही निश्चित केल्या. सर्वार्थाने युवाकेंद्री बनत चाललेल्या समाजाचे मानसशास्त्रच त्यांनी मांडले आणि त्यावर लोकशाही चौकटीतील उपायही सुचवले. सरकार जनतेपासून दूर जात असेल, तर संवादाचे दरवाजे पुन्हा उघडा, हा भागवतांचा हितोपदेश केंद्र सरकार कृतीतून कसा आचरणात आणते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहेच, त्याहीपेक्षा भाजपला तो किती लवकर आणि किती प्रभावीपणे समजतो, यावर पुढील राजकारणाची दिशा अवलंबून असणार आहे.



# तेल रशियाचे,डोळा अमेरिकेचा!

**जागतिक महायुद्धांचा आणि संघर्षाचा इतिहास पाहिल्यास महासत्तांमधील संघर्षामध्ये छोटी राष्ट्रे नेहमीच भरडली गेल्याचे दिसते. भारतासारख्या अलिप्ततावादाचे धोरण स्वीकारणाऱ्या देशालाही प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणाने याच्या झळा सोसाव्या लागल्या आहेत. अमेरिका आता रशियन कच्च्या तेलाची खरेदी सुरू ठेवणाऱ्या देशांवर शंभर टक्के शुल्क लावण्याच्या विचारात आहे. मागील काळात भारताने आमच्यासाठी राष्ट्रीय हित सर्वतोपरी आहे असे छातीठोकपणाने सांगत ही खरेदी सुरू ठेवली होती, पण त्या वेळी भारत-अमेरिका व्यापार सुरळितपणे सुरू होता. आता ट्रम्प यांच्या कार्यकाळात हे शक्य होईल का?**

रशिया-युक्रेन युद्धानंतर जागतिक ऊर्जा व्यापाराचे समीकरण पूर्णपणे बदलले आहे. युरोपने रशियन तेलावर निर्बंध लादल्यानंतर मॉस्कोला आशियातील नव्या बाजारपेठांचा शोध घ्यावा लागला, तर भारताने या बदलत्या परिस्थितीला आर्थिक संधीमध्ये रूपांतरित केले. जून २०२६मध्ये भारताने तब्बल ५.१४ अब्ज किमतीचे आणि दररोज २.३ दशलक्ष बॅरलपेक्षा अधिक रशियन कच्चे तेल आयात करून पुन्हा एकदा रशियाच्या सर्वात मोठ्या ग्राहकांपैकी एक म्हणून दर्जा कायम ठेवला आहे. अमेरिकेसह पाश्चिमात्य देशांकडून सातत्याने राजनैतिक दबाव असतानाही भारताने ऊर्जा सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिल्याचे स्पष्ट होते.

भारत हा जगातील तिसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक तेल आयात करणारा देश आहे. देशाच्या एकूण कच्च्या तेलाच्या गरजेपैकी सुमारे ८५ टक्के गरज आयातीद्वारे पूर्ण केली जाते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारातील किमतीतील प्रत्येक चढ-उताराचा थेट परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर, महागाईवर आणि सर्वसामान्य ग्राहकांवर होतो. अशा परिस्थितीत कमी किमतीत उपलब्ध होणारे रशियन तेल भारतासाठी आर्थिक लाभाबरोबरच ऊर्जा सुरक्षेचे प्रभावी साधन बनले आहे. रशियन कच्च्या तेलाची सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे त्याची सवलतीच्या दरातील उपलब्धता. युक्रेन युद्धानंतर अनेक पाश्चिमात्य खरेदीदारांनी रशियन तेल टाळण्यास सुरुवात केल्याने ब्लादिमीर पुतीन यांना आपल्या तेलाची विक्री सवलतीच्या दरात करावी लागली. भारतातील सार्वजनिक आणि खासगी रिफायनरी कंपन्यांनी मोठ्या प्रमाणावर खरेदी सुरू केली. स्वस्त कच्चे तेल उपलब्ध झाल्यामुळे उत्पादन खर्च कमी झाला, रिफायनरी कंपन्यांचा नफा वाढला आणि देशांतर्गत इंधनपुरवठाही तुलनेने स्थिर राहिला.

रशियासाठी भारताची वाढती मागणी म्हणजे आर्थिक दिलासा आहे. युरोपियन निर्बंधांमुळे पारंपरिक बाजारपेठ मोठ्या प्रमाणावर गमावल्यानंतर रशियाला आशियातील ग्राहकांवर अवलंबून राहावे लागले. २०२२पूर्वी भारताकडून रशियन तेलाची आयात अत्यल्प होती. मात्र गेल्या चार वर्षांत भारत हा रशियन तेलाचा सर्वात मोठा ग्राहक बनला आहे. त्यामुळे पाश्चिमात्य निर्बंध, जहाजवाहतुकीवरील मर्यादा, विमा सेवा आणि आर्थिक व्यवहारांवरील निर्बंध असूनही रशियाला निर्यात सुरू ठेवता आली आहे.

तथापि या तेलखरेदीमुळे भारतावर अमेरिकेकडून आणि युरोपीय देशांकडून अनेकदा प्रश्न उपस्थित करण्यात आले; पण भारताने सातत्याने स्पष्ट भूमिका मांडली आहे की, तेल खरेदीचा निर्णय हा पूर्णपणे व्यावसायिक आणि राष्ट्रीय हिताच्या निकषांवर आधारित आहे. भारत कोणत्याही एका देशावर अवलंबून राहण्याऐवजी विविध स्रोतांमधून ऊर्जा आयात करतो आणि स्वस्त, उपलब्ध व विश्वासार्ह पुरवठा हा त्याचा मुख्य निकष आहे. त्यामुळे भू-राजकीय दबावापेक्षा ऊर्जा सुरक्षा आणि आर्थिक हितसंबंध यांना भारत अधिक महत्त्व देत आहे.

अमेरिकेने काही काळासाठी रशियन तेलाच्या विशिष्ट व्यवहारांना सवलत दिली होती. ती मुदत संपल्यानंतरही भारताच्या धोरणात कोणताही मूलभूत बदल झाला नाही. भारतीय अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, देशाच्या ऊर्जा गरजा, स्पर्धात्मक किंमत आणि उपलब्धता या तीन घटकांच्या आधारेच खरेदीचे निर्णय घेतले जातील. यामुळे भारताने आपले स्वतंत्र परराष्ट्र धोरण आणि धोरणात्मक स्वायत्तता पुन्हा अधोरेखित केली आहे.

सध्या अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनाकडून भारतावर तसेच इतर काही देशांवर रशियन तेल खरेदी करण्यावरून तीव्र स्वरूपाचे आर्थिक व व्यापारी निर्बंध लादण्याचे प्रयत्न सुरू आहेत. अमेरिकेच्या सिनेटमध्ये नुकताच एक नवीन प्रस्ताव सादर करण्यात आला असून त्यात भारत, चीन, स्लोव्हाकिया, हंगेरी आणि अझरबैजान या पाच देशांमधून अमेरिकेत येणाऱ्या आयातीवर शंभर टक्के जकात अर्थात कर लावण्याची शिफारस करण्यात आली आहे. हा प्रस्ताव मंजूर झाल्यास दोन्ही देशांमधील व्यापारी संबंधांवर आणि पुरवठा साखळीवर मोठा परिणाम होऊ शकतो. या संपूर्ण परिस्थितीवर प्रतिक्रिया देताना भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने आणि व्यापार तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे की, भारताला अमेरिकेच्या अशा धमक्यांना घाबरण्याचे अजिबात कारण नाही. भारताने गेल्या काही वर्षांत आपल्या अर्थव्यवस्थेला अधिक मजबूत करत आयातीचे आणि निर्यातीचे विविधीकरण केले आहे. एकाच देशावर किंवा एकाच बाजारपेठेवर आपली अर्थव्यवस्था अवलंबून राहणार नाही, याची पूर्ण काळजी भारताने घेतली आहे. युरोपियन युनियन आणि इतर प्रमुख देशांसोबत स्वतंत्र व्यापार करार करून भारताने आपल्या निर्यातीसाठी नवीन बाजारपेठा शोधल्या आहेत. जर अमेरिकेने भारतावर शंभर टक्के कराचा बडगा उगारलाच, तर त्याचा उलटा फटका अमेरिकेच्याच अर्थव्यवस्थेला बसेल. अमेरिकेत त्यामुळे महागाई वाढेल, बेरोजगारीचे संकट उभे राहील आणि औषध निर्माण क्षेत्रासह अनेक उद्योगांना मोठा आर्थिक फटका सहन करावा लागेल. त्यामुळे अमेरिकेने अशा प्रकारच्या एकतर्फी कारवाईचा विचार करताना स्वतःच्या देशातील आर्थिक परिणामांचाही विचार करणे आवश्यक आहे.

भारतीय रिफायनरी कंपन्यांसाठी रशियन तेल हे स्वस्त कच्चा माल तर आहेच; पण त्याबरोबरीने जागतिक बाजारपेठेतील किमतीतील अस्थिरतेपासून संरक्षण मिळवून देणारे प्रभावी साधनही बनले आहे. आंतरराष्ट्रीय संघर्षामुळे आखाती देशांतील पुरवठा विस्कळीत झाला, तरी पर्यायी स्रोत उपलब्ध असल्याने भारताला मोठ्या प्रमाणावर इंधनटंचाईचा सामना करावा लागत नाही. यामुळे देशातील इंधनपुरवठा, औद्योगिक उत्पादन आणि महागाई नियंत्रणात ठेवण्यास मदत होते. पुढील काही महिन्यांतही रशियन तेलावरील भारताचे अवलंबित्व कायम राहण्याची शयता आहे. जोपर्यंत रशिया आकर्षक सवलतीच्या दरात तेल पुरवत राहील आणि जागतिक बाजारपेठेत भू-राजकीय अनिश्चितता कायम राहील, तोपर्यंत भारतीय कंपन्या या संधीचा लाभ घेत राहतील.

### अमेरिका रशियन तेलावर निर्बंध का आणते?

युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर रशियाच्या अर्थव्यवस्थेला आणि लष्कराला मिळणारा निधी कमजोर करणे हा अमेरिकेचा मुख्य उद्देश आहे. रशियन तेलाची निर्यात हा मॉस्को सरकारच्या उत्पन्नाचा सर्वात मोठा स्रोत आहे. त्यामुळे तो मार्ग बंद करून रशियावर आर्थिक दबाव वाढवण्याचा प्रयत्न अमेरिकेकडून केला जात आहे. अमेरिका आपल्या धोरणात्मक आणि व्यापारी धोरणांचा वापर करून इतर देशांना स्वतःच्या भू-राजकीय भूमिकेनुसार चालण्यास भाग पाडण्याचा प्रयत्न करते. आंतरराष्ट्रीय स्तरावर रशियाविरोधातील निर्बंधांचे पालन सर्व देशांनी करावे, अशी अमेरिकेची अपेक्षा असते.


अमेरिकेसोबत सुरू असलेल्या द्विपक्षीय व्यापार करारांच्या वाटाघाटींमध्ये आपले वर्चस्व निर्माण करण्यासाठी आणि भारताकडून अधिक सवलती मिळवण्यासाठी अमेरिका अशा दंडात्मक उपायांचा वापर एक दबावतंत्र म्हणून करत असते. याखेरीज डोनाल्ड ट्रम्प यांना आकाशाला भिडलेली व्यापारतूट कमी करण्यासाठी अमेरिकन तेल विविध देशांना विकावयाचे आहे. त्यासाठीही रशियन तेलाचे कार्ड वापरले जाते.

**प्रसाद पाटील**

# AI च्या क्षेत्रातला DeepSeek चा जुगाड!

## चीन कसा बनतोय AI सुपरपॉवर?

**चीनबद्दलचे आपले सर्व पूर्वग्रह बाजूला ठेवून, एक देश तंत्रज्ञानातली सुपरपॉवर बनण्यासाठी काय करू शकतो हे समजून घेण्यासाठी ही लेखमाला..**




**भाग ३**

AI वरती काम करण्याच्या अत्यंत प्रगत चिप्स चीनला देण्याचे अमेरिकेने नाकारले, हे आपण मागच्या भागात बघितले. मग चीनने स्वतःच्याच चिप्स तयार केल्या, हेही आपण बघितले. पण त्या चिप्स अमेरिकन चिप्स इतक्या प्रगत नव्हत्या. या कमी प्रगत चिप्स वापरून AI कसे निर्माण करायचे, ह्यासाठी चीनच्या DeepSeek नावाच्या कंपनीने एक जोरदार जुगाड केला!

कल्पना करा..एक मोठे हॉस्पिटल आहे, जिथे १०० डॉक्टर आहेत. पण प्रत्येक पेशंटसाठी सगळ्या १०० डॉक्टरांना बोलवायची गरज नसते ना? सर्दी-खोकल्यासाठी फक्त एका डॉक्टरची गरज असते, मोठ्या शस्त्रक्रियेसाठी कदाचित ३-४ जणांची.

अमेरिकन कंपन्यांना प्रचंड जास्त साधनं आणि प्रगत चिप्स लागत होत्या, कारण त्या प्रत्येक पेशंटचा प्रत्येक प्रश्न सोडवण्यासाठी (म्हणजे AI च्या प्रत्येक कामासाठी) सगळ्या शंभर डॉक्टरांना बोलवत होत्या.

DeepSeek या चीनी कंपनीने विचार केला, की एका पेशंटसाठी, एका कामासाठी सगळ्या डॉक्टरांना बोलवायची काही गरज नाही. ज्या कामासाठी जो डॉक्टर लागतो (ज्या कामासाठी AI चा जो घटक लागतो) त्यालाच आपण बोलवूया..तेवढाच आपण वापरूया.

मग, त्यांनी त्यांचे AI मॉडेल २५६ छोट्या 'तज्ज्ञ गटांत' (expert groups) विभागले. आणि प्रत्येक प्रश्नासाठी फक्त ८ तज्ज्ञ गट कामाला लावले..म्हणजे हॉस्पिटलमधले बाकीचे डॉक्टर घरीच बसून राहतात, गरज तेव्हाच बोलवले जातात, असे मॉडेल तयार केले.याचा परिणाम काय? खूप कमी वीज, खूप कमी कॉम्प्युटिंग पॉवर वापरून ते AI मध्ये अत्यंत भन्नाट काम करायला लागले.

यांनी अजून एक जादू केली..मॉडेलला जी माहिती 'थोड्या वेळासाठी लक्षात ठेवावी लागते' (जसे आपण संभाषण चालू असताना मागचे वाक्य लक्षात ठेवतो), ती लक्षात ठेवायची पद्धत त्यांनी ९०% पेक्षा जास्त कॉम्पॅक्ट केली. म्हणजे एका मोठ्या वहीऐवजी, एक छोटी टीपण वही पुरेशी झाली.

याचा परिणाम धक्कादायक होता..जिथे अमेरिकन कंपन्या असे मॉडेल बनवायला अब्जावधी डॉलर्स खर्च करतात, तिथे DeepSeek ने एक तगडे मॉडेल फक्त सुमारे ६० लाख डॉलर्समध्ये (जवळपास ५० कोटी रुपये) बनवून दाखवले.

म्हणजे..पैसा नाही, हार्डवेअर नाही, तरी हुशारीने आणि जुगाड करून काम भागवले. हे तांत्रिकदृष्ट्या कोणालाही करता येऊ शकले असते, पण ती गरज आणि प्रेरणा फक्त बंदीमुळेच निर्माण झाली..अमेरिकेने चीनला प्रगत चिप्स देण्याचे नाकारले, त्यामुळेच आहे त्या तंत्रज्ञानात जुगाड करण्याची कल्पना DeepSeek ला सुचली आणि त्यांनी ती प्रत्यक्षात आणली.पण एकट्या DeepSeek चे यश ही काही अख्खा चीन देश AI सुपरपॉवर बनण्याची गोष्ट नाही. Superpower बनण्यासाठी लागते एक संपूर्ण व्यवस्था..जी चीनने वेगळ्याच पद्धतीने उभी केली.

पुढच्या भागात बघूया..चीनने AI साठी लागणारी कॉम्प्युटिंग पॉवर, थेट वीज किंवा पाण्यासारखी एक 'पब्लिक सुविधा' कशी तयार केली आणि कशी उपलब्ध करून दिली.

**-प्रसाद शिरगावकर**

# संवाद

## 'अंधभक्तां'ची ही कोणती मानसिकता?

गुरुपौर्णिमेनिमित्त काँग्रेसनेते आमदार नाना पटोले रत्नागिरीला गेले होते. नांदेड जिल्ह्यातील अनिल चिमेगावकर व माधव पोवळे या दोन काँग्रेस कार्यकर्त्यांनी रत्नागिरीला जाऊन पटोलेंचे 'पाद्यपूजन' केले. यावरूनही राजकीय वर्तुळात चांगलीच टीकेची झोड उठली आहे.या कृत्यावर भाजपने 'काँग्रेसमधील सामंतशाही आणि चुकीची संस्कृती' असा आरोप केला.या आरोपाला उत्तर देताना,'पटोले'यांना आम्ही गुरू मानतो. भाजपने आधी हिंदूत्व समजून घ्यावे. नंतर आम्हाला शिकवावे. आम्ही स्वेच्छेने त्यांचे 'पाद्यपूजन' केले, असे चिमेगावकर व पोवळे या कार्यकर्त्यांनी स्पष्ट केले.कार्यकर्त्यांनी भावना व प्रेमापोटी हे कृत्य केले असावे.पण, नाना पटोलेंनी समाजात चुकीचा संदेश जाऊ नये म्हणून, त्यास स्पष्टपणे नकार देणे अपेक्षित होते. पण, नानांनाच 'पाद्यपूजन' करून घेण्याची हौस होती की काय? असे त्यांच्या त्याप्रसंगीच्या देहबोलीवरून दिसते.

थोडक्यात, एखाद्या व्यक्तीचा किंवा तिच्या प्रतिमेचा 'दुग्धाभिषेक' करणे तसेच,'गुरुपौर्णिमे'ला आपल्या गुरुचे 'पाद्यपूजन' करणे, यात गैर काहीच नाही. पण, ते करताना पूजनीय व्यक्ती त्या ताकदीची, गाढ्या अभ्यासाची, तेवढ्या लायकीची; आणि महत्त्वाचे आहे.पटोलेंवर विधानसभा निवडणुकीवेळी 'बिटकॉईन' घोटाळ्याचा आरोप काही संभाषण फितींतून झाला होता. तसेच 'मोदीला मी मारू शकतो' असे'वादग्रस्त' विधान केले होते. अधिवेशन काळात विधानसभाध्यक्षांच्या अंगावर धावून गेल्यामुळे त्यांचे निलंबनही करण्यात आले होते. एकंदरीत, 'एक वादग्रस्त नेता' अशी नाना पटोलेंची राजकारणात ओळख आहे. एका माणुसकीशून्य माणसाच्या प्रतिमेवर काही लिटर दूध ओतून ते वाया घालवण्यापेक्षा, एखाद्या अनाथाश्रमातील चिमुरड्यांच्या किंवा रुग्णालयातील रुग्णांच्या पोटात गेले असते तर समाधान वाटले असते.

**प्रदीप व्ही. खोलमकर**,नाशिक
मो. ८७६७५९२९८०

## जेव्हा कुंपणच शेत खाते !

नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात महाराष्ट्रातील अनुदानित वसतिगृहांच्या संदर्भात 'कॅग' च्या अहवालात उघड झालेली माहिती अत्यंत गंभीर आणि धक्कादायक आहे. भारताचे नियंत्रक आणि महालेखापाल यांच्यामुळे हा भ्रष्टाचार उघड झाला आहे.महाराष्ट्रातील जालना,लातूर आणि बुलढाणा या जिल्ह्यातील २२ सरकारी अनुदानित वसतिगृहांचे परीक्षण करण्यात आले.यापैकी ६ वसतिगृहे केवळ कागदावर आहेत. म्हणजे २७ टक्के वसतिगृहे बनावट आहेत.महाराष्ट्रात एकूण २३००८ वसतिगृहे आहेत. यावरून या भ्रष्टाचाराची व्याप्ती किती मोठी आहे हे लक्षात येते. २०१८पासून २०२४ पर्यंत हा भ्रष्टाचार चालू होता. या वसतिगृहांच्या कारभाराचे दायित्व जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद, नगरपंचायत, विभागीय आयुक्त अशा विविध स्तरावर असताना भ्रष्टाचार सहा वर्षे चालू राहिला.एकमेकांच्या संगनमताशिवाय हे होणे शक्य नाही.!

**संध्या काटदरे**

## जीएसटीच्या कार्यक्षमतेत..

सतरा केंद्रीय व राज्यकर आणि तेरा उपकरांच्या किचकट प्रणालीची जागा घेऊन जीएसटीसारखा एकसंघ अप्रत्यक्ष कर आराखडा म्हणून लागू झाला. केंद्र आणि राज्यांमधील अनेक वर्षाच्या चर्चा आणि वाटाघाटींनंतर कर प्रणालीतील ही सुधारणा लागू करण्यात आली.करांचे चक्र कमी करणे हा होता. नोंदणीकृत करदात्यांची संख्या सुरुवातीला ६६.५ लाख इतकी होती. ती २०२६ मध्ये जवळपास १.६ कोटींपर्यंत पोहोचली आहे. जे देशाच्या अर्थव्यवस्थेच्या वाढत्या औपचारिकीकरणाचे प्रतिबिंब आहे.सुरुवातीच्या काळात जीएसटी कर प्रणालीमध्ये पासच, बारा, अठरा आणि अठ्ठावीस टक्के असे चर स्तर होते. चैनीच्या आणि घातक वस्तूंवर अठ्ठावीस टक्कयांच्या वर अधिभार लावला जात होता. काळाच्या ओघात महसूल आणि तंत्रज्ञानातील स्थिरतेमुळे धोरणकर्त्यांनी दर सुसुत्रीकरणाचा निर्णय घेतला. त्यानंतर सप्टेंबर २०२५ पासून जीएसटीची दोनस्तरीय रचना लागू करण्यात आली. जीएसटीमुळे देशातील व्यापार उदीमावर प्रतिकूल परिणाम झाल्याचे अर्थतज्ज्ञांचे मत आहे. एकूणच जीएसटी कर प्रणाली दहाव्या वर्षात पदार्पण केले.

**प्रा. मधुकर चुटे**
नागपूर

# बाभूळगाव एकही शेतकरी मदती पासून वंचित राहू नये-पालकमंत्री संजय राठोड

✦जनमाध्यम | प्रतिनिधी





**बाभूळगाव, दि. ८ :** बेंबळा धरणाची सर्वच्या सर्व दारे उघडल्याने शेतीचे मोठे नुकसान झाले शनिवारला मंत्री संजय राठोड यांनी सावंगी मांग हस्तापूर वाट खेड बुद्रुक वाट खेड खुर्द व नांदुरा या गावी पुरामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी केली व एकही नुकसान ग्रस्त शेतकरी मदतीपासून वंचित राहू नये असे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

धरणाची वीस दारे दीड मीटरने उघडण्यात आल्याने बेंबळा नदीला मोठा पूर आला नदीकाठच्या गावातील अडीच हजार हेक्टर जमीन खरडून गेली.

कोणतीही पूर्वसूचना न देता बेंबळा प्रकल्पाचे दरवाजे उघडण्यात आले यामुळे बेंबळा नदीला मोठा पूर आला यात शेतकऱ्यांच्या झटका मशीन, विद्युत मोटारी, स्प्रिंकलर सेट, सोलर पॅनल, झोपड्या पाईप, शेतीची अवजारे आदि चीज वस्तू पुराच्या पाण्यासह वाहून गेले. या नुकसानीची शासनाकडून मदत मिळावी अशी मागणी नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांनी केली. ना.संजय राठोड यांनी सर्वप्रथम बाभुळगाव तालुक्यातील सावंगी मांग गावाला भेट देऊन झालेल्या नुकसानीची पाहणी केली. यानंतर हस्तापूर, वाटखेड बुद्रुक, वाटखेड खुर्द, नांदुरा बुद्रुक येथील शेतकऱ्यांच्या भेटी घेऊन शासना कडून सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. या वेळी त्यांच्यासह तहसीलदार मीरा पागोरे, अधीक्षक अभियंता योगेश सोनोणे, बेंबळा प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता मनोज डोके, गटविकास अधिकारी उज्वला ढोले, तालुका कृषी अधिकारी ऋतिका डेरे, पोलीस निरीक्षक दीपमाला भेंडे, उप अभियंता प्रीती मस्के, पाणी पुरवठ्याचे निखिल मोटे, गजानन डोमाळे, श्रीधर मोहोड, विशाल गणात्रा, जावळेकर, सेनेचे जिल्हा उपप्रमुख सचिन महल्ले, राजू पांडे, प्रमोद कातरकर, आनंद सोळंके, सुधीर कडुकार, दिलीप वाघमारे, वसंत जाधव, चंद्रशेखर अलोने, नइम खान, शेळके, प्रवीण चेंडकापुरे,अजय शिरसाट, युवराज महानूर, सचिन बनकर, शेख आयुब, विनोद महानूर, श्रीकांत घोंगडे अरविंद महानूर प्रामुख्याने हजर होते.

# निविदा प्रक्रियेत भेदभाव कंत्राटदाराचा आरोप

## पुसद सा.बां.विभागाचा भोंगळा कारभार चव्हाट्यावर

✦जनमाध्यम | प्रतिनिधी




**पुसद, दि. ८ :** महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार कोणत्याही कामाचे कंत्राट घेण्यासाठी ऑफलाइन किंवा ऑनलाईन निविदा सादर करून ज्या कंत्राटदाराची निविदा सर्वात कमी दराची अथवा (बिलो)असल्यास त्याला नियमानुसार कामाचा कंत्राट दिला जातो परंतु पुसद येथील सार्वजनिक बांधकाम विभागात भोंगळा कारभार सुरू असून अनियमितता झाल्याबाबत गंभीर प्रकार समोर आला आहे, येथील निविदा प्रक्रियेत नियमबाह्य पद्धतीने कार्यवाही करून शासनाचे आर्थिक नुकसान झाल्याचा आरोप आर.बी.कन्स्ट्रक्शन तसेच वैभव हनुमान बजाज या कंत्राटदारांनी केला आहे.

निविदेच्या अटी-शर्तीनुसार आर.एम. सी.प्लांटसाठी आवश्यक डिमांड ड्राफ्ट सादर करूनही कमी दराची निविदा न उघडता उलट जास्त दराची निविदा उघडण्यात आल्याचा दावा करीत संबंधित कंत्राटदाराने वरिष्ठ कार्यालयात पुसद सा. बां. विभागाच्या निविदा प्रक्रियेवर तक्रार तथा लेखी हरकत नोंदविली आहे. निविदा प्रक्रियेत पहिल्यांदा देण्यात आलेल्या शॉर्टफॉलमधील सर्व त्रुटी विहित मुदतीत आवश्यक कागदपत्रांसह पूर्ण करण्यात आल्या होत्या. त्यानंतरही कोणतेही कारण न देता अंतिम निर्णय न देता दुसऱ्यांदा शॉर्टफॉल देण्यात आला. आर. एम. सी. प्लांट संदर्भातील डिमांड ड्राफ्ट कार्यालयात सादर केल्याचे तसेच त्याबाबत अधीक्षक अभियंत्यांच्या यवतमाळ येथील कार्यालयास लेखी तथा व्हॉट्स ॲपद्वारे माहिती दिल्याचे कंत्राटदाराने पत्रात नमूद केले आहे. दरम्यान पहिल्या शॉर्टफॉलची पूर्तता केल्यानंतर पुन्हा शॉर्टफॉल देण्याची तरतूद कोणत्या नियमात आहे? तसेच निविदा नामंजूर करण्यासाठी कोणता नियम, अट अथवा शासन निर्णय लागू करण्यात आला का? याचे लेखी स्पष्टीकरण व प्रत देण्याची मागणी करण्यात आली आहे. कोणत्याही दरम्यान, प्रतिस्पर्धी कंत्राटदाराने अक्षेप घेतलेला नसतांना तक्रारीच्या आधारे शॉर्ट हॉल देण्यात आला असल्यास त्या तक्रारीची प्रत तारीख आणि त्यावर करण्यात आलेल्या कारवाईची माहिती द्यावी अशी हरकत घेणाऱ्या कंत्राद्वाराने मागणी सुद्धा केली आहे.

# ‘नोकरी’ नव्हे, शिक्षणाचे व्रत जगले,गजानन कासावार आदर्श शिक्षक : हंसराज अहीर

✦जनमाध्यम | प्रतिनिधी




**वणी, दि. ८ :** शिक्षकाने केवळ पुस्तकी ज्ञान न देता विद्यार्थ्यांच्या आयुष्यात ज्ञानाचा दिवा पेटवावा, याचा आदर्श गजानन कासावार यांनी आपल्या ३९ वर्षांच्या सेवेतून निर्माण केला. शिक्षण क्षेत्रातील त्यांचे कार्य अनुकरणीय असून, ते सेवेतून निवृत्त झाले असले तरी विद्यार्थ्यांच्या आणि समाजाच्या मनातून कधीच निवृत्त होणार नाहीत, असे प्रतिपादन माजी केंद्रीय मंत्री तथा मागासवर्गीय आयोगाचे माजी अध्यक्ष हंसराज अहीर यांनी केले.

नगर परिषद शाळा क्रमांक ७ चे उच्च श्रेणी मुख्याध्यापक म्हणून गजानन कासावार यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त आयोजित स्नेहमिलन सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार संजीवरेड्डी बोदकुरवार होते. आमदार संजय देरकर, माजी आमदार वामनराव कासावार, तालुका संघचालक हरिहर भागवत, नगराध्यक्ष विद्या आत्राम, मनसे पक्षनेते राजू उंबरकर, नितीन खर्चे, संजय खाडे, विजय चोरडिया यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. कासावार यांनी अध्यापनाला नोकरी न मानता व्रत म्हणून स्वीकारले. विद्यार्थ्यांतील कलागुणांना वाव देत त्यांनी शाळेत विविध उपक्रम राबविले. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे सिनेट सदस्य म्हणूनही त्यांनी विद्यार्थीहितासाठी उल्लेखनीय काम केले. यावेळी बोदकुरवार यांनी त्यांच्या कार्याचा गौरव करत कासावार यांनी समाजापुढे शिक्षकी पेशाचा नवा आदर्श निर्माण केल्याचे सांगितले. विविध संस्था व मान्यवरांच्या वतीने कासावार दाम्पत्याचा सत्कार करण्यात आला.

# वाहतूक निरीक्षक ज्ञानोबा देवकते यांचा स्कूल व्हॅन, बस चालकांना सज्जड इशारा..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ , दि. ८ :** विद्यार्थ्यांची सुरक्षित वाहतूक ही केवळ शाळेची नव्हे, तर वाहनचालक, पालक आणि प्रशासनाचीही सामूहिक जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांना घेऊन जाणाऱ्या वाहनचालकांनी कोणत्याही प्रकारची हयगय करू नये. व्यसनाच्या अवस्थेत वाहन चालविणे, नियमांचे उल्लंघन करणे अथवा विद्यार्थ्यांच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष करणे गंभीर ठरू शकते, असा स्पष्ट इशारा जिल्हा वाहतूक निरीक्षक ज्ञानोबा देवकते यांनी दिला.

उबुंटू इंग्लिश स्कूलच्या परिसरात शनिवार, ८ ऑगस्ट रोजी परिवहन सुरक्षा समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. अध्यक्षस्थानी ज्ञानोबा देवकते होते. यावेळी शाळेचे अध्यक्ष पांडुरंग खांदवे, उपाध्यक्ष संभाजी राणे, संचालक तथा शिक्षणतज्ज्ञ अनुप यादव, मुख्याध्यापिका शुभांगी बोरखडे यांच्यासह पालक-शिक्षक सभेचे सदस्य, पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. देवकते यांनी POCSO कायदा, बालकांच्या हक्कांचे संरक्षण आणि शालेय परिसरातील सुरक्षितता याबाबत मार्गदर्शन केले. शाळेचा संपूर्ण परिसर सीसीटीव्हीच्या निगराणीखाली असावा, पालकांनी बालकांच्या सुरक्षेबाबत सजग राहावे, अशा सूचना त्यांनी केल्या. स्कूल व्हॅन व बस चालकांसाठीही त्यांनी सुरक्षेचे काटेकोर नियम स्पष्ट केले. चालकाकडे आवश्यक कागदपत्रे असणे, किमान पाच वर्षांचा वाहन चालविण्याचा अनुभव, नियमित चारित्र्य व गुन्हेगारी पार्श्वभूमीची तपासणी, वैद्यकीय पेटी, चाइल्ड सेफ्टी लॉक, GPS व वाहनातील कॅमेरे यांसारख्या सुविधा आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. प्रत्येक वाहनात महिला केअरटेकरची व्यवस्था करण्याची सूचनाही त्यांनी केली. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेत तडजोड नको; नियम हे केवळ कागदावर न राहता प्रत्यक्ष अंमलात आले पाहिजेत, असा स्पष्ट संदेश या बैठकीतून देण्यात आला. बैठकीनंतर देवकते यांच्या हस्ते शाळा परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार मुख्याध्यापिका शुभांगी बोरखडे यांनी मानले.

# थोडक्यात



## आंबोडा येथे शिवराज दिव्यांग संघटनेच्या फलकाचे अनावरण

✦ किरण नरवाडे

**महागाव:** आंबोडा गावातील दिव्यांग बांधवांच्या हक्कांसाठी आणि त्यांच्या विविध समस्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शिवराज दिव्यांग संघटनेची मजबूत संघटनात्मक बांधणी करण्याचा निर्धार आंबोडा येथे करण्यात आला. संघटनेच्या फलकाचे अनावरण जन आंदोलन आधार संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष जगदीश भाऊ नरवाडे यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले. यावेळी बोलताना जगदीश नरवाडे यांनी, दिव्यांग बांधवांवर होणारा अन्याय, अत्याचार तसेच त्यांच्या हक्कांपासून त्यांना वंचित ठेवण्याच्या प्रकारांविरोधात संघटितपणे आवाज उठविण्याची गरज व्यक्त केली. दिव्यांग बांधवांच्या न्याय्य हक्कांसाठी शिवराज दिव्यांग संघटनेच्या माध्यमातून सक्षम आणि मजबूत संघटन उभे करून. शासन-प्रशासनाकडे त्यांच्या मागण्या प्रभावीपणे मांडू, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाला शिवाजीराव देशमुख, विनोदराव पाटील, सरपंच बंडू मुनेश्वर हनवंतराव देशमुख,अमृतराव देशमुख, संघटनेचे अध्यक्ष बापूराव पावडे, उपाध्यक्ष शेख इरफान, काशिनाथ नजरधने, शेख अमीन सुनील पतंगराव जब्बार पठाण शेरखान पठाण नारायण पतंगराव बंडू वाघमारे यांच्यासह गावातील नागरिक दिव्यांग बांधव भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## श्री स्वामी समर्थ केंद्र परिसरात चिमुकल्यांचा प्रेरणादायी वृक्षारोपण उपक्रम

**पुसद :** येथील सप्तगिरीनगर मधील श्री स्वामी समर्थ केंद्र परिसरात पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा प्रेरणादायी वृक्षारोपण उपक्रम उत्साहात पार पडला. मंदिराच्या पदाधिकाऱ्यांच्या प्रेरणेने परिसरातील लहान बालकांनी विविध प्रकारच्या फळझाडे, औषधी व शोभेच्या रोपांचे वृक्षारोपण करून पर्यावरण संरक्षणाची सामाजिक जबाबदारी स्वीकारली. या उपक्रमात चिमुकल्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत वृक्षारोपणाबरोबरच "लावलेले प्रत्येक झाड जगवायचे" असा दृढ संकल्प केला. उपस्थितांनीही वृक्षांचे नियमित संगोपन, संवर्धन व संरक्षण करण्याची जबाबदारी स्वीकारत हा उपक्रम केवळ वृक्षारोपणापुरता मर्यादित न ठेवता पर्यावरण रक्षणाची चळवळ अधिक व्यापक करण्याचा निर्धार व्यक्त केला. मंदिराच्या पदाधिकाऱ्यांनी बालकांचे कौतुक करत, आजची पिढी पर्यावरणाबाबत जागरूक होत असल्याचे हे अत्यंत सकारात्मक व प्रेरणादायी चित्र आहे, असे सांगितले. या उपक्रमातून समाजासमोर पर्यावरण संवर्धनाचा आदर्श निर्माण झाला असून, प्रत्येकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करावे, असा संदेश देण्यात आला.



## शेतकरी योजनांपासून वंचित राहू नयेत..!

### यवतमाळ तालुकास्तरीय शेतकरी सल्लागार समितीच्या अध्यक्षपदी जीवन डंभारे

**यवतमाळ :** शासनाच्या कृषी योजनांचा लाभ तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी शेतकरी गटांची संख्या वाढविण्याची गरज असल्याचे मत आमदार बाळासाहेब मांगुळकर यांनी व्यक्त केले. त्यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी शासकीय विश्रामगृहात यवतमाळ तालुकास्तरीय शेतकरी सल्लागार समिती (आत्मा)ची आढावा बैठक पार पडली. यावेळी जीवन अमृतराव डंभारे यांची समितीच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. “शेतकऱ्यांनी एकत्र येऊन गट तयार करावेत आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा. समितीच्या सदस्यांनी केवळ पदापुरते मर्यादित न राहता योजनांची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावी,” असे आवाहन आमदार मांगुळकर यांनी केले.बैठकीत विविध गावांतील २४ शेतकऱ्यांची अशासकीय सदस्य म्हणून निवड करण्यात आली. यावेळी शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर तसेच कृषी योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीवर चर्चा झाली. नवनियुक्त अध्यक्ष जीवन डंभारे व सदस्यांचे उपस्थितांनी अभिनंदन केले.

# गुरुकुल कॉन्व्हेंट विद्यालयात शालेय निवडणूक उत्साहात संपन्न

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**झरी, दि. ८ :** तालुक्यातील गुरुकुल कॉन्व्हेन्ट विद्यालयात शालेय निवडणूक अतिशय उत्साहपूर्ण आणि लोकशाही पद्धतीने पार पडली . विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण निर्णयक्षमता जबाबदारीची जाणीव तसेच लोकशाही मुल्यांची रुझवणूक व्हावी या उद्देशाने शालेय निवडणूकीचे आयोजन करण्यात आले होते.

निवडणूकीपूर्वी विविध पदासाठी इच्छूक उमेदवारांनी उत्साहात प्रचार केला . विद्यार्थ्यांनी आपल्या उमेदवाराच्या समर्थनार्थ प्रचार करतांना शिस्त ,सभ्यता आणि सकारात्मक विचारांचे दर्शन घडविले . त्यामूळे संपूर्ण विद्यालय परिसरात निवडणूकीचे उत्साहपूर्ण वातावरण तयार झाले होते .

मतदानाच्या दिवशी विद्यार्थीनीं मोठया उत्साहाने सहभाग घेतला .मतदानाची संपूर्ण प्रक्रीया डिजीटल इव्हिएम मशीन शिस्तबध्द पद्धतीने पार पडली . विद्यार्थ्यांना मतदानाचे महत्त्व योग्य प्रतिनिधी निवडण्याची जबाबदारी लोकशाहीतील नागरीकांची भुमिका याबाबत प्रत्यक्ष अनुभव मिळाला . विद्यालयाचे मुख्याध्यापक विलास चिट्टलवार यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून निवडणूक ही केवळ पद मिळविण्याची संधी नसून नेतृत्व जबाबदारी आणि सेवाभाव शिकण्याचे प्रक्रीया आहे असे मार्गदर्शन केले .

शालेय निवडणूकीच्या यशस्वी आयोजनासाठी निजीन सर ,विकास अग्रवाल वैदय मॅम ,पियंका मॅम ,आत्राम सर निब्रड सर व इतरही शिक्षक कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले .

# अवाजवी बॅनर शुल्काने दिग्रसकर त्रस्त,जाहिरात व्यवसायावर संकट!

## ७ दिवसांसाठी ४ रुपये प्रतिचौरस फूट आकारणी, शुल्क आकारण्याची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**दिग्रस , दि. ८ :** शहरात बॅनर लावण्यासाठी आकारण्यात येणाऱ्या अवाजवी परवानगी शुल्कामुळे नागरिक आणि छोटे-मोठे व्यावसायिक त्रस्त झाले आहेत. बॅनर हे केवळ राजकीय वाढदिवस किंवा अभिनंदनापुरते मर्यादित नसून व्यवसाय, दुकाने, विविध कंपन्या व सामाजिक उपक्रमांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे प्रभावी माध्यम आहे. मात्र, दिग्रस नगर परिषदेकडून आकारण्यात येणाऱ्या शुल्कामुळे व्यावसायिक जाहिरातींवर मर्यादा येत असल्याची नागरिकांची तक्रार आहे.

नगर परिषद हद्दीत बॅनर लावण्यासाठी सात दिवसांच्या परवानगीसाठी ४ रुपये प्रति चौरस फूट शुल्क आकारले जाते. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, काही वर्षांपूर्वी बॅनरच्या आकाराचा विचार न करता सात दिवसांसाठी सुमारे ३०० रुपये प्रति बॅनर शुल्क आकारले जात होते. प्रशासकाच्या काळात शुल्क पद्धतीत मोठा बदल करण्यात आल्याची चर्चा असून, या बदलामुळे सामान्य व्यावसायिकांवर आर्थिक भार वाढल्याचे सांगितले जात आहे. अवाजवी शुल्कामुळे अनेक छोटे व्यावसायिक जाहिराती पासून दूर राहत असल्याने बॅनर व्यवसायावर ही त्याचा परिणाम झाला आहे. परिणामी या व्यवसायाशी संबंधित कामगारांच्या रोजगारावर ही संकट निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. शुल्क कमी करून व्यवहार्य दर निश्चित केल्यास व्यावसायिकांना दिलासा मिळेल आणि जाहिरातींची संख्या वाढल्याने नगर परिषदेच्या उत्पन्नातही वाढ होऊ शकते. त्यामुळे दिग्रस नगर परिषदेने शुल्काचा फेरविचार करून योग्य व परवडणारी आकारणी करावी, अशी मागणी नागरिकांतून जोर धरत आहे.

# यवतमाळात ‘मिस अँड मिसेस किड्स विदर्भ’ची रंगणार रंगत,१६ ऑगस्टला ऑडिशन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी




**महागाव, दि. ८ :** महिलांसह लहान मुलांच्या कलागुणांना आणि आत्मविश्वासाला व्यासपीठ देणाऱ्या ‘मिस अँड मिसेस किड्स विदर्भ २०२६’ स्पर्धेचे यवतमाळातील ऑडिशन १६ ऑगस्ट रोजी शिवशक्ती लॉन्स येथे होणार आहे. ओम ट्रस्ट प्रस्तुत या उपक्रमाचे ऑडिशन विदर्भातील ११ जिल्ह्यांत घेण्यात येत असून, निवड झालेल्या स्पर्धकांना पुढील फेरीत प्रवेश मिळणार आहे.

यवतमाळातील ऑडिशन सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत होईल. महिला स्पर्धकांसाठी ब्लू जीन्स व ब्लॅक टी-शर्ट असा ड्रेस कोड आहे. लहान मुलांना त्यांच्या पसंतीचा आकर्षक व योग्य पोशाख परिधान करता येणार आहे. ही स्पर्धा केवळ सौंदर्य प्रदर्शनापुरती मर्यादित न राहता महिलांमध्ये आत्मविश्वास, व्यक्तिमत्त्व विकास आणि कलागुणांना चालना देण्याचा प्रयत्न आहे. मुलांमध्येही स्टेज कॉन्फिडन्स विकसित करण्यावर भर दिला जाणार आहे. ऑक्टोबरमध्ये नागपूर येथे ग्रँड फायनल होणार असल्याची माहिती आयोजक विशाल डहाळे यांनी दिली. इच्छुकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# १० कोटींच्या कथित अवैध वाळूसाठ्याचा बोरेले यांचा दावा..!

## वाळू जप्त करून दोषींवर कठोर कारवाईची मुख्यमंत्र्यांकडे तक्रार

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पांढरकवडा, दि. ८ :** यवतमाळ जिल्ह्यातील कथित अवैध वाळू उत्खनन व साठवणुकीच्या प्रकरणाने आता गंभीर वळण घेतले आहे. प्रसिद्ध व्हिसलब्लोअर तथा जिंदल पुरस्कार विजेते रजनीकांत बोरेले यांनी जिल्हाधिकारी, संबंधित उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांच्याविरुद्ध गंभीर आरोप करत त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे.

यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच राज्याच्या मुख्य सचिवांकडे तक्रार दाखल केली आहे. बोरेले यांच्या तक्रारीनुसार, आर्णी तहसीलमधील मौजा आयता गावाजवळ अंदाजे १,२०० ब्रास, तर झरी-जामनी तहसीलमधील पाटण-बोरी ते पाटण मार्गावर सुमारे ३,००० ब्रास वाळूचा साठा करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. या दोन्ही ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाळू साठवून ठेवण्यात आल्याने तिचे बाजारमूल्य अंदाजे १० कोटी रुपये असल्याचे तक्रारीत नमूद आहे. या कथित वाळूसाठ्याकडे संबंधित महसूल अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले असून, पदाचा व अधिकाराचा गैरवापर करून आर्थिक लाभासाठी वाळू व्यावसायिकांना झुकते माप दिल्याचा गंभीर आरोप बोरेले यांनी केला आहे. कथित अवैध वाळूसाठा तातडीने जप्त करून संबंधितांवर महसूल कायद्यानुसार दंडात्मक कारवाई करावी, शासनाचा महसूल वसूल करून तो सरकारी कोषागारात जमा करावा तसेच दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाई करून सेवेतून बडतर्फ करण्याची मागणीही तक्रारीत करण्यात आली आहे. मात्र या आरोपांची स्वतंत्र अधिकृत पुष्टी अद्याप झालेली नाही.


# राष्ट्रसंतांना 'भारतरत्न'साठी गुरुदेवभक्त तिवस्यातून पेटविणार क्रांतीज्योत!

## आजपासून तिवसा तहसीलवर साखळी अन्नत्याग आंदोलन
### राष्ट्रपती, पंतप्रधान, मुख्यमंत्र्यांसह विभागीय आयुक्त, जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**तिवसा/वार्ताहर**

देशाला अध्यात्म, स्वच्छता आणि राष्ट्रभक्तीचा संदेश देणाऱ्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना अद्यापही भारताचा सर्वोच्च नागरी सन्मान 'भारतरत्न' प्रदान करण्यात आलेला नाही.ही मागणी आता पेटून उठली आहे.गुरुदेवभक्त आज ९ ऑगस्ट रोजी क्रांतीदिनी तिवसा तहसील कार्यालय परिसरात क्रांतीज्योत पेटवून साखळी अन्नत्याग आंदोलनाला सुरवात करण्यात येणार आहे.

राष्ट्रसंतांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी त्यांना भारतरत्न प्रदान करण्याची मागणी गेल्या कित्येक वर्षापासून होत आहे.मात्र केंद्र सरकारकडून याकडे सातत्याने दुर्लक्ष होत आहे.त्यामुळे आता या मागणीसाठी गुरुदेवभक्तांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे.ज्या राष्ट्रसंतांनी सर्वधर्म समभावाची शिकवण दिली, समाजातील अनिष्टरूढी, परंपरेला बगल देत, अंधश्रद्धा दूर केली आणि माणसाला माणूस म्हणून जगायला शिकवले, अशा थोर विभूतीचा सन्मान होणे ही काळाची गरज आहे.आज ९ ऑगस्ट क्रांतिदिनाचे औचित्य साधून तिवसा तहसीलवर साखळी अन्नत्याग आंदोलनाची ज्योत पेटणार असून यामध्ये मुकूंद पूनसे, प्रशांत कांबळे, जयकुमार बोके, रमेशराव बोके, हैबतराव गाडगे, शफीक शाह, नरेंद्र राऊत यांच्यासह शेकडो गुरुदेव भक्तांच्या उपस्थितीत क्रांतीज्योत पेटवून अन्नत्याग आंदोलनासह साखळी उपोषणाला सुरुवात होणार असून जोपर्यंत राष्ट्रसंतांना भारतरत्न देण्याची घोषणा होत नाही तोपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नाही, असा निर्धार आंदोलकांनी व्यक्त केला आहे.या संदर्भातील जिल्हा व तालुका प्रशासनाला माहिती देण्यात आली आहे.



## शहानूर धरण ५६ टक्के भरले; पाणलोट क्षेत्रात समाधानकारक पाऊस

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**



अंजनगाव सुर्जी आणि दर्यापूर तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी जीवनदायिनी ठरलेल्या शहानूर धरण प्रकल्पाच्या पाणी पातळीत वाढ होत असल्याची माहिती प्रकल्पाचे शाखा अभियंता मनोज पावरा यांनी दिली आहे.गेल्या दोन दिवसांपासून पाणलोट क्षेत्रात होत असलेल्या संततधार पावसामुळे धरणात पाण्याची आवक वाढली आहे.

७ ऑगसट सकाळी १० वाजेपर्यंत घेतलेल्या नोंदीनुसार धरणाची सद्यस्थिती अशी आहे शहानूर धरणाची पूर्ण जलाशय पातळी४४९.५० मीटर असून, सध्या पाण्याची पातळी ४४१.५० मीटरवर पोहोचली आहे. धरणात सध्या २५.९५ दशलक्ष घनमीटर जिवंत जलसाठा उपलब्ध असून, हे प्रमाण एकूण क्षमतेच्या ५६.३६ टक्के आहे.धरण क्षेत्रात काल दिवसभरात १७ मि.मी. पावसाची नोंद झाली असून आतापर्यंत एकूण ४७३ मि.मी. पाऊस झाला आहे. पाणलोट क्षेत्रातील गिरगोटी येथे १४ मि.मी. पाऊस झाला आहे. धरणात आजची दैनंदिन आवक ०.३० दशलक्ष घनमीटर इतकी आहे.सध्या धरणाचे सर्व दरवाजे बंद असून कोणताही विसर्ग सुरू नाही, असेही शाखा अभियंता पावरा यांनी सांगितले.पाणलोट क्षेत्रात पाऊस असाच सुरू राहिल्यास पुढील काही दिवसात धरणाच्या साठ्यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अंजनगाव आणि दर्यापूर तालुक्यातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

## भाजपचे राष्ट्रीय सह-संघटन महामंत्री शिवप्रकाशजी यांच्या उपस्थितीत
# पश्चिम विदर्भ विभागीय संघटना समीक्षा बैठक

**अमरावती/का.प्र.**

पश्चिम विदर्भ विभागातील भारतीय जनता पार्टीच्या संघटनात्मक बळकटीसाठी आयोजित विभागीय संघटना समीक्षा बैठक भाजपचे राष्ट्रीय सह-संघटन महामंत्री मा. श्री. शिवप्रकाशजी यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

बैठकीत आगामी कार्ययोजना, संघटनात्मक विस्तार, बूथ सक्षमीकरण, जनसंपर्क अभियान तसेच 'सेवा, संघटन आणि समर्पण' या पक्षाच्या विचारधारेला अधिक प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचविण्यासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. आगामी काळात संघटन अधिक सक्षम, सशक्त आणि गतिमान करण्यासाठी आवश्यक दिशा व नियोजन यावेळी निश्चित करण्यात आले.या बैठकीस



उपेंद्रजी कोठेकर, आमदार संजय कुटे, आमदार प्रवीण पोटे, दिनेश सूर्यवंशी, डॉ. नितीन धांडे (अध्यक्ष, अमरावती शहर जिल्हा) तसेच पश्चिम विदर्भातील सर्व जिल्हाध्यक्ष, जिल्हा महामंत्री आणि जिल्हाप्रभारी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना शिवप्रकाशजी यांनी संघटन विस्तार, बूथ सक्षमीकरण, कार्यकर्त्यांशी सातत्यपूर्ण संवाद आणि जनाधार अधिक मजबूत करण्यावर विशेष भर दिला. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक कार्य अधिक प्रभावीपणे राबविण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.बैठकीच्या आयोजनाची जबाबदारी सोपविल्याबद्दल पक्ष नेतृत्वाचे आभार व्यक्त करण्यात आले. तसेच मिळालेल्या मार्गदर्शनाच्या आधारे पश्चिम विदर्भात भारतीय जनता पक्षाचे संघटन अधिक सक्षम व गतिमान करण्यासाठी समर्पितपणे कार्य करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# सेंट्रल बँक ऑफ इंडिया तर्फे 'एमएसएमई कर्ज वितरण
## शिबरात उद्योजकांना तब्बल ९० कोटींचे कर्ज वितरीत

**अमरावती/का.प्र.**

सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग (एमएसएमई) क्षेत्राला चालना देण्यासाठी तसेच उद्योजकांना सुलभ व जलद कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या वतीने शुक्रवार ७ ऑगस्ट रोजी एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसिएशन हॉल अमरावती येथे आयोजित देशव्यापी एमएसएमई कर्ज वितरण शिबीराला उत्तम प्रतिसाद मिळाला असून या शिबीरात तब्बल ९० कोटींचे कर्ज मंजूर व वितरीत करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक निलेश निकम होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून आशीष सावजी उपस्थित होते. अग्रणी बँकेचे व्यवस्थापक नरेश हेडाऊ, सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे मुख्य व्यवस्थापक प्रदीप जाधव, राजकुमार तरते, निखिल रंजन आदी उपस्थित होते.

एमएसएमई क्षेत्रातील उद्योजकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने आयोजित या शिबीरात विविध उद्योगांना आवश्यक कर्ज सुविधा, बँकेच्या विविध योजना तसेच केंद्र व राज्य शासनाच्या एमएसएमई संबंधित योजनांची माहिती देण्यात आली.या उपक्रमादरम्यान एमएसएमई उद्योजकांना तब्बल ९० कोटी रुपयांच्या कर्जास मंजुरी देण्यात आली. या माध्यमातून स्थानिक उद्योगांना चालना मिळून रोजगारनिर्मिती आणि आर्थिक विकासाला गती मिळणार आहे.

प्रास्ताविक राजकुमार तरते यांनी केले. निलेश वाघमारे यांनी सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या विविध कर्ज योजना व एमएसएमई उद्योजकांसाठी उपलब्ध असलेल्या वित्तीय सुविधांचे सादरीकरण केले. यावेळी उपस्थित उद्योजकांना कर्ज प्रक्रियेबाबत तसेच विविध योजनांच्या लाभाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. सूत्रसंचालन शिवानी ठोकरे यांनी केले तर डॉ. नवनीत इंगळे यांनी आभार मानले.

## 'अभिव्यक्ती' अभिनय तथा नाट्यनिर्मिती प्रशिक्षण कार्यशाळा

**अमरावती/का.प्र.**



स्पंदन परिवार बहुउद्देशीय संस्था संचलित Being Artist Academy of Film & Theatre Arts यांच्या वतीने आयोजित 'अभिव्यक्ती' अभिनय तथा नाट्यनिर्मिती प्रशिक्षण कार्यशाळा उत्साहात पार पडली. मर्यादित प्रवेश असलेल्या या कार्यशाळेत अमरावती जिल्ह्यातील विविध भागांतील प्रशिक्षणार्थींनी सहभाग नोंदविला.

कार्यशाळेत अभिनयाची मूलतत्त्वे, संवादफेक, शरीरभाषा, आवाजावरील नियंत्रण, भावाभिव्यक्ती, रंगमंचावरील वावर, पात्रनिर्मिती, प्रसंग सादरीकरण, नाट्यनिर्मिती प्रक्रिया तसेच कॅमेऱ्यासमोरील अभिनयाची तांत्रिक माहिती यांचे प्रशिक्षण देण्यात आले. प्रात्यक्षिके, नाट्यखेळ, गटचर्चा आणि प्रत्यक्ष एकांकिका निर्मितीच्या माध्यमातून प्रशिक्षणार्थींना अनुभवाधारित शिक्षण देण्यात आले.यावेळी अभिनय व नाटकाची संकल्पना, संहितालेखनापासून मंचनापर्यंतची नाट्यनिर्मिती प्रक्रिया, संवादकौशल्य, लोकशिक्षण, समाजप्रबोधन, व्यक्तिमत्त्व विकास, नाट्यक्षेत्रातील करिअरच्या संधी तसेच शासनाच्या विविध योजना, अर्थसहाय्य आणि अनुदान याविषयीही मार्गदर्शन करण्यात आले.

'नाटक हे केवळ अभिव्यक्ती किंवा लोकरंजनाचे माध्यम नसून व्यक्तीच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रभावी साधन आहे,' असे संस्थेचे अध्यक्ष व कार्यशाळेचे प्रमुख प्रशिक्षक पंकज धंदर यांनी सांगितले.कार्यशाळेच्या आयोजनाची जबाबदारी संस्थेच्या सचिव तथा अकादमीच्या संचालिका स्नेहा वासनिक यांनी सांभाळली. संदेश बायस्कर, पवन वाकोडे, अक्षय बकसरे, साक्षी जिभकाटे, विज्ञप्ती पर्वतकर, योगेश लोन्दे, नवीन गुडधे, आराध्य इसळ, सम्यक खडसे, प्रवीण वानखडे आणि श्रुतिका दंदे यांनी कार्यशाळेत सहभाग घेतला.सहभागी विद्यार्थ्यांनी अशा प्रशिक्षण उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्याची अपेक्षा व्यक्त केली. भविष्यात अधिक व्यापक प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

## धारणी व चिखलदरा तालुक्याचा डेल्टा रँकिंगमध्ये राष्ट्रीय-राज्य पातळीवर गौरव

**अमरावती/का.प्र.**

आकांक्षित तालुका कार्यक्रमांतर्गत निती आयोगाने जाहीर केलेल्या डेल्टा रँकिंग जानेवारी–मार्च २०२६ मध्ये धारणी आणि चिखलदरा तालुक्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत राज्य, झोन व राष्ट्रीय स्तरावर महत्वाचे स्थान प्राप्त केले आहे. राज्यस्तरावर या तालुक्यांनी अनुक्रमे पहिला व दुसरा, तीन राज्यांच्या झोन स्तरावर अनुक्रमे तिसरा व चौथा तर राष्ट्रीय स्तरावर अनुक्रमे ३३ व ३६वा क्रमांक पटकाविला आहे.

डेल्टा रँकिंगनुसार या उभय तालुक्यांनी गावांमध्ये आरोग्य आणि पोषण सेवा मजबुत करणे, शैक्षणिक सुधारणा, शेतकरी सहाय्य व कृषी उपक्रम, सामाजिक विकास उपक्रम तसेच पायाभूत सुविधांच्या उन्नतीसाठी प्रभावीपणे कार्य केले आहे. डेल्टा रँकिंग नुसार राज्यातील एकूण २७ तालुक्यांमध्ये उत्तम कामगिरी करत धारणी तालुका पहिल्या क्रमांकावर राहिला असून चिखलदरा तालुका दुसऱ्या स्थानावर आहे.देशपातळीवर आकांक्षित तालुक्याचे विविध झोन तयार करण्यात आले आहेत. यामधील चौथ्या झोनमध्ये महाराष्ट्र, गुजरात आणि राजस्थान राज्यातील ६९ तालुक्यांचा समावेश आहे. झोन स्तरावरही उत्तम कामगिरी करत धारणी तालुका तिसऱ्या क्रमांकावर राहिला असून चिखलदरा तालुका चौथ्या स्थानावर आहे.

देशभरातील एकूण ५१३ तालुक्यांचा आकांक्षित तालुके कार्यक्रमात समावेश करण्यात आला आहे. राष्ट्रीय स्तरावरही या तालुक्यांची कामगिरी उंचावली असून धारणी तालुका ३३ व्या क्रमांकावर तर चिखलदरा तालुका ३७ व्या स्थानावर आहे.जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषद अमरावती, धारणी व चिखलदरा पंचायत समित्या आणि आरोग्य, पोषण, शिक्षण, कृषी, सामाजिक विकास व मूलभूत सुविधा या संबंधित विभागांतील अधिकारी, कर्मचारी व क्षेत्रीय यंत्रणांच्या समन्वित प्रयत्नाने ही उत्तम कामगिरी पार पडली आहे.जिल्हा प्रशासनाने व जिल्हा परिषद अमरावतीने सर्व संबंधित अधिकारी, कर्मचारी, ग्रामस्तरीय यंत्रणा व कार्यक्रमासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व घटकांचे अभिनंदन केले.

# राजकमल, गांधी चौक, अंबागेट, जवाहर गेट मार्ग डेकोरेटिव्ह विद्युत खांबांच्या लख्ख प्रकाशाने उजळणार

## आ.सुलभा खोडके यांच्या हस्ते १.५० कोटींच्या विकास कामांचा कार्यारंभ

**अमरावती/का.प्र.**



शहराच्या मध्यवर्ती व अतिवर्दळीच्या राजकमल चौक ते अंबागेट व गांधी चौक ते जवाहर गेट परिसराची आमदार सुलभा खोडके यांनी प्रत्यक्ष पाहणी करून सद्याची परिस्थिती व विकासात्मक उपाययोजनांबाबत आढावा घेतला. परिसरातील व लगतच्या भागात डेकोरेटिव्ह विद्युत पोल बसविणे तसेच रस्ता काँक्रीटीकरण व नाली बांधकाम, अशा एकंदरीत १.५० कोटींच्या विकास कामांचा कार्यारंभ सुद्धा यावेळी करण्यात आला. आकर्षक व दर्जेदार विद्युतीकरणामुळे या परिसराच्या सौंदर्यात भर पडणार असून नागरिकांना अधिक सुरक्षित व आधुनिक सुविधा उपलब्ध होणार आहेत.

शहरातील राजकमल चौक, गांधी चौक, अंबागेट, जवाहर गेट चा परिसर हा शहराच्या मध्यभागी असून रहिवासी भाग व व्यापारी मार्केट भागाला जोडल्या गेला आहे. त्यामुळे या भागात नेहमीची नागरिकांची मोठी वर्दळ दिसून येते. सदर भागात तात्पुरत्या सुविधा निर्माण न करता दीर्घकालीन उपाययोजना व गुणात्मक कामे करण्याची बाब आ.सुलभा खोडके यांच्या मुख्य अजेंड्यावर असल्याने आमदारांनी जिल्हा नियोजन समिती मार्फत उपलब्ध करून दिलेल्या निधीतून सदर भागात पायाभूत सुविधांची पूर्तता करण्यात येत आहे.या अंतर्गत पवार फोटो स्टुडिओ समोरील गांधी चौक नमूना गल्ली पोच रस्त्याचे कांक्रीटीकरण करणे किंमत२५ लक्ष, राजकमल चौक ते अंबागेट व गांधी चौक ते जवाहर गेट पर्यंत डेकोरेटिव्ह विद्युत पोल बसविणे किंमत ५० लक्ष, प्रभाग क्रमांक१४ बुधवारा अंतर्गत टायगर चौक ते कैची धार गल्ली मध्ये रस्ता काँक्रीटीकरण व नालीचे बांधकाम करणे किंमत २५ लक्ष, जवाहर गेट ते बर्तन बाजार ते बुधवारा परिसरात डेकोरेटिव्ह पोल व एलईडी लाईट बसविणे किंमत ५० लक्ष अशा एकूण १.५० कोटींच्या विकास कामांचा समावेश आहे.

पाहणी दौऱ्याप्रसंगी आ.सुलभा खोडके यांच्या समवेत शोध प्रतिष्ठानचे अध्यक्ष यश खोडके, कर्नलसिंह राहल, नगरसेविका लविना हर्षे, स्वाती कुलकर्णी .मनपा उपअभियंता विवेक देशमुख, कनिष्ठ अभियंता लक्ष्मण पावडे, विद्युत विभाग अधीक्षक शरद तिनखेडे, महेंद्रभाई भूतडा, वसंतभाई कलंत्री, दिनेश, सुरेश, राजू अग्रवाल, राजूभाई चुडीवाले, रामेश्वर उपाध्याय, नरेश शिंदतसेच स्थानिक जवाहर गेट ,साबनपुरा, बुधवरा, अबागेट भागातील नागरिक व सर्व सहकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

## संक्षिप्त

### विविध योजनेच्या लाभार्थ्यांसाठी डिजिटल लाइफ सर्टिफिकेट सक्तीचे

**अमरावती**-संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ योजनेतील सर्व लाभार्थ्यांसाठी डिजिटल लाइफ सर्टिफिकेट अर्थात हयात प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य करण्यात आले आहे. लाभार्थ्यांनी तातडीने हयात प्रमाणपत्र काढावे, अन्यथा त्यांचा मासिक लाभ बंद होऊ शकतो, असे तहसिलदार, संजय गांधी योजना शहर विभाग अमरावतीच्या तहसिलदार डॉ. प्रियंका मिसाळ यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.लाभार्थी मोबाईलवर संबंधित ॲप डाउनलोड करून स्वतः डिजिटल लाइफ सर्टिफिकेट तयार करू शकतात किंवा जवळच्या सेतू केंद्रात जाऊन डिजिटल लाइफ सर्टिफिकेट काढून घेऊ शकतात तसेच तहसील कार्यालयातूनही ही प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे.

### जिल्ह्यातील मागासवर्गीय शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रिया सुरू

**अमरावती**-सामाजिक न्याय विभागाअंतर्गत कार्यरत असलेल्या जिल्ह्यातील मागासवर्गीय मुला-मुलींच्या शासकीय वसतिगृहामध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. जिल्ह्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी १५ सप्टेंबर २०२६ पर्यंत https://hmasnew.mahait.org संकेतस्थळावर अर्ज करता येणार आहे.व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर त्याची प्रत आवश्यक कागदपत्रांसह संबंधित वसतिगृहात ऑफलाईन स्वरूपात १५ सप्टेंबर पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. मुलांसाठी अमरावती शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह (युनिट क्र. १, २, ३ - निंभोरा), भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह (निंभोरा), संत गाडगे महाराज मुलांचे शासकीय वसतिगृह (निंभोरा) येथे तर मुलींनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृह (कॅम्प अमरावती), क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृह (कॅम्प अमरावती - जुने नावः गुणवंत) , क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृह (युनिट क्र. ४ - जेल रोड) आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृह (जुने नावः १२५ जयंती) येथे अर्ज सादर करता येणार आहे.याशिवाय जिल्ह्यातील तालुका स्तरावरील मुला-मुलींच्या शासकीय वसतिगृहांमध्येही व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी अर्ज स्वीकारले जात आहेत. पात्र व गरजू विद्यार्थ्यांनी मुदतीत आपले अर्ज संबंधित वसतिगृहाकडे सादर करावेत, असे आवाहन समाज कल्याण, अमरावतीचे सहाय्यक आयुक्त राजेंद्र जाधवर यांनी केले आहे. संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक ७२१-२६६१२६१ वर संपर्क साधता येणार आहे.

### विद्यार्थ्यांनी दिली बुलढाणा अर्बन बँकेला भेट



**नांदगाव खंडेश्वर**-इयत्ता दुसरीच्या पाठ्यपुस्तकातील गणित या विषयांमध्ये विद्यार्थ्यांना नंबरस अँड नंबरस या पाठ्य घटकांमध्ये डिपॉझिट स्लिप हा उपघटक दिला आहे.विद्यार्थ्यांनी डिपॉझिट स्लिप कशी भरावी हे वर्गामध्ये शिकवण्यात आले.परंतु विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष बँक मध्ये व्यवहार कशा पद्धतीने होतात हे दाखविण्यत आले.त्यांना बँक व्यवहाराविषयी माहिती देण्यात आली.बुलढाणा बँकेचे व्यवस्थापक वैभव लोखंडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.तसेच डिपॉझिट स्लिप विड्रॉल स्लिप बँक पासबुक काउंटिंग मशीन बँक व्यवहाराविषयी माहिती हर्षाली नरसडे यांनी दिली. तसेच बँकेमधील कर्मचारी नितीन कोकाटे, सुरज राठोड, गणेश भारस्कर, सेजल पळसकर, प्रवीण शेंद्रे यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना माहिती दिली. बँकेकडून सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला. भेटीमुळे विद्यार्थ्यांना बचतीची सवय पैशाचे योग्य नियोजन आणि बँकिंग व्यवहाराचे महत्व समजले. यावेळी मुख्याध्यापक विलास मारोटकर, व्यवस्थापक अनुप काकडे, सहाय्यक शिक्षिका गुंजन नेवारे, सिद्धीका सोनुलकर, प्रकाश लोहांडे, ईश्वर जाधव, जनार्दन शेलारे, किरण गुल्हाने, प्रियंका मेश्राम, गुंफा उके, पल्लवी गाडेकर, वैशाली मोरे, अपर्णा चव्हाण, नीलिमा देवघरे, सविता सुने, रेखा पंचगडे, अश्विनी शिरभाते यांचे सहकार्य लाभले.

### 'ऑपरेशन कवच' अंतर्गत विद्यार्थ्यांना सुरक्षिततेचे धड



**अमरावती**-महाराष्ट्र पोलिसांच्या 'ऑपरेशन कवच' उपक्रमांतर्गत तिवसा पोलीस स्टेशनच्या वतीने जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक इंद्रधनुष्य शाळा, गुरुदेवनगर येथे विद्यार्थ्यांसाठी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षिततेची जाणीव निर्माण करणे, सायबर गुन्ह्यांपासून बचाव, गुन्हे प्रतिबंधक उपाययोजना तसेच कायद्याबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.कार्यक्रमात पोलीस निरीक्षक गोपाल उपाध्याय, पोउपनि विद्या कळसे, मोझरी बीट चौकी प्रमुख पोहवा रवींद्र लांजेवार, मदतनीस पोहवा प्रकाश सोनवणे तसेच पोहवा रमेश चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.तसेच सायबर फसवणूक, सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर, महिला व बालकांची सुरक्षा, आपत्कालीन प्रसंगी घ्यावयाची काळजी आदी विषयांवर सविस्तर माहिती देण्यात आली.यावेळी सहाय्यक शिक्षिका स्नेहल दिवाण, प्रमिला आखरे, स्वाती सुनील बोकाडे, संगीता संतोष साव, प्रियंका देशमुख-काळे, अर्चना दंडाळे तसेच शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# ऑगस्ट क्रांती चळवळीची सेवाग्राम-वर्धा वैचारिक भूमी

**भा**रतीय स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासात ९ ऑगस्ट १९४२ ला झालेली ऑगस्ट क्रांती ही जगातील ब्रिटिशांच्या विरोधात उभारली स्वातंत्र्य चळवळीची सर्वात मोठी घटना होती. इतिहासाच्या लोकप्रिय कथनात ९ ऑगस्ट आणि मुंबईतील गवलिया टॅंक मैदान म्हणजेच आजचे ऑगस्ट क्रांती मैदान यांचा उल्लेख प्रामुख्याने आढळतो. परंतु संशोधनात्मक दृष्टीने पाहिले असता या आंदोलनाची वैचारिक निर्मिती, संघटनात्मक तयारी आणि नैतिक अधिष्ठान सेवाग्राम-वर्धा येथे घडले होते. त्यामुळे सेवाग्राम-वर्धा ही ऑगस्ट क्रांतीची वैचारिक भूमी होय.

महात्मा गांधींनी अहमदाबाद येथील साबरमती आश्रम सोडल्यानंतर ते सेवाग्राम येथे १९३६ ला आले व सेवाग्राम आश्रम उभारून आपल्या आश्रमास स्वातंत्र्य चळवळीचे केंद्र बनविले.१९३६ ते १९४२ या दरम्यान सेवाग्राम-वर्धा ही भारतीय स्वातंत्र्य चळवळीची राजधानी बनली. सप्टेंबर १९३९ मध्ये दुसरे महायुद्ध सुरू झाले आणि जुलमी ब्रिटिशांनी भारतीयांना व त्यांच्या नेत्यांना विश्वासात न घेता ब्रिटिश व मित्र राष्ट्राकडून भारताला युद्धामध्ये सामील केले. यावर संपूर्ण भारतात विचार मंथन सुरू झाले आणि महात्मा गांधी यांनी आपल्या स्वातंत्र्य चळवळीतील सहकाऱ्यांशी संवाद साधून ब्रिटिशांच्या या निर्णयाला विरोध करण्याचे ठरवले. यानुसार १४ जुलै १९४२ ला सेवाग्राम-वर्धा येथे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या कार्यकारिणीची ऐतिहासिक बैठक झाली. ही बैठक स्वातंत्र्यलढ्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची ठरली. या बैठकीत पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, मौलाना अबुल कलाम आझाद, डॉ राजेंद्र प्रसाद, आचार्य कृपलानी यांच्यासह स्वातंत्र्य लढ्यातील



दिग्गज नेते सहभागी झाले. महात्मा गांधी यांनी ब्रिटिशांनी तात्काळ भारत सोडावा असा प्रस्ताव मांडला व त्यास सर्व सदस्यांनी एकमताने पाठिंबा दिला. हाच प्रस्ताव 'भारत छोडो आंदोलन' म्हणून इतिहासात प्रसिद्ध आहे. म्हणजेच चले जाव चळवळीची वैचारिक भूमी सेवाग्राम वर्धा होय.

या ऐतिहासिक ठरावानंतर दिवस ठरला ९ ऑगस्ट १९४२ अनं स्थळ ठरले गवालिया टॅंक मैदान. यानुसार ७ ऑगस्ट व ८ ऑगस्ट रोजी मुंबई येथे गवालिया टॅंक मैदानावर 'चले जाव चळवळी'ची अंतिम रूपरेषा ठरली.९ ऑगस्ट १९४२ ला सकाळी ठीक ९.०० वाजता गवालिया टॅंक मैदानावर असलेला इंग्रजांचा ध्वज खाली उतरवून भारताचा तिरंगा फडकवण्याचा मानस ठरला. तिरंगा फडकवल्यानंतर लगेच चले जाव चळवळीचा शुभारंभ करण्याचे ठरले. परंतु ब्रिटिशांनी महात्मा गांधींसह काँग्रेसच्या दिग्गज नेत्यांना ९ ऑगस्ट ला पहाटेच पकडून भूमिगत केले. ठरल्याप्रमाणे फार मोठा जमाव गवालिया टॅंक मैदानावर जमा झाला. सर्वांचे लक्ष तिरंगा कोण फडकवणार यावर केंद्रित झाले होते. अशातच बातमी मिळाली महात्मा गांधींसह सर्व नेत्यांना तुरुंगात डांबलेले आहे.'आता कोण दिशा दाखवणार?', यावर सर्वांचे लक्ष केंद्रित झाले होते. जमलेल्या जमावाला नियंत्रित करण्याकरिता ब्रिटिशांच्या पोलिसांचा भव्य ताफा होता व पुरुष कार्यकर्त्यांवर त्यांची नजर होती. अशावेळी एक उंच, सडपातळ व अत्यंत साध्या साडीमध्ये असलेली तरुणी गवलिया टॅंक मैदानाच्या ध्वज पोलवर चढली व तिने ब्रिटिशांचा ध्वज उतरवून त्यावर भारताचा तिरंगा फडकवला व मोठ्या आवाजामध्ये घोषणा दिली की 'महात्मा गांधीजींनी सांगितलेल्या दिशेप्रमाणे आपण ही क्रांती सुरू करू या. अनं तरुणीने महात्मा गांधीजींचा मूलमंत्र जाहीर केला की, 'ब्रिटीशांनो भारत सोडा', भारतीयांनो 'करा अथवा मरा'. महात्मा गांधींजी तुरुंगात असले तरी आपण त्यांचा हा मूलमंत्र संपूर्ण देशात देऊ या आणि ब्रिटिशांना भारतातून हाकलून लावू या.अन् याच क्षणापासून 'चले जाव' चळवळ संपूर्ण देशात सक्रिय झाली. भारताचा ध्वज व मूलमंत्र देणारी ती तरुण कार्यकर्ती होती अरुणा असफ अली.

अशाप्रकारे ९ ऑगस्ट १९४२ ची चळवळ जवळ जवळ एक वर्ष पर्यंत भारतात सक्रिय झाली आणि ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडले. या चळवळीची ब्रिटिशांनी एवढी धास्ती घेतली की भारताला स्वातंत्र्य देण्याकरिता त्यांनी विचारमंथन सुरू केले. म्हणूनच या ऑगस्ट महिन्यात सुरू झालेल्या 'चले जाव' चळवळीला ऑगस्ट क्रांती चळवळ असे संबोधले जाते आणि या चळवळीचा थेट संबंध सेवाग्राम-वर्धा या वैचारिक भूमीशी जोडला जातो.या चळवळीत अनेकांना तुरुंगात जावे लागले, अनेकांना लाठी हल्ल्याचे बळी पडावे लागले तर अनेकांना देशाकरिता वीर मरण स्वीकारावे लागले. या चळवळीला सक्रिय करणाऱ्या अनंत स्वातंत्र्य योद्धांना व शहिदांना शतशः नमन. जय हिंद!

**कॅप्टन मोहन गुजरकर**
इतिहास संशोधक, वर्धा
मो.९४२२१४२५०७

# ऑगस्ट क्रांती दिन! १८५७ नंतरचा सर्वात मोठा स्वातंत्र्यसंग्राम


**दे**शभरात आज ऑगस्ट क्रांती दिन साजरा होत आहे. इंग्रजांनी भारताला स्वतंत्र करण्यासाठी दिलेला शब्द न पाळल्यामुळे या आंदोलनाला सुरुवात झाली होती. ८ ऑगस्ट १९४२ रोजी भारताला स्वातंत्र करणार असल्याचे इंग्रजांनी म्हटले होते. मात्र, ऐनवेळी इंग्रजांनी भारताला स्वातंत्र देणार नसल्याचे सांगितले. त्यामुळे महात्मा गांधींनी देशभर ऑगस्ट क्रांती आंदोलनाची घोषणा केली. या आंदोलनाला 'भारत छोडो' असे नाव देण्यात आले होते. 'करो या मरो' अशी या आंदोलनाची घोषणा होती.



८ ऑगस्ट हा दिवस भारतीय स्वातंत्र्याच्या लढाईतील शेवटचा दिवस म्हणून स्मरण केला जातो. महात्मा गांधींच्या नेतृत्वात भारत छोडो आंदोलनाला या दिवशी सुरुवात झाली होती. त्यानंतर, ९ ऑगस्ट रोजी गांधींसह ज्येष्ठ नेत्यांना अटक करण्यात आली होती. त्यामुळे संपूर्ण भारत इंग्रजांविरुद्ध एकवटला होता. देशावासियांच्या या एकजुटीने इंग्रज सरकारला गुडघे टेकायला भाग पाडले. त्यामुळे भारताच्या स्वातंत्र्यानंतर ९ ऑगस्ट हा दिन क्रांती दिन म्हणून साजरा केला जाऊ लागला. मुंबईतील ज्या मैदानावर झेंडा फडकावत या आंदोलनाला सुरुवात झाली होती. त्या मैदानाला क्रांती मैदान हे नाव देण्यात आले आहे. भारतीयांना पुकारलेला १८५७ नंतरचा हा सर्वात मोठा स्वातंत्र्य लढा होता.

दुसऱ्या महायुद्धात भारताने इंग्रजांना मदत केली. त्यावेळी, इंग्रजांनी भारत सोडून जाण्याचे वचन दिले होते. मात्र, ऐनवेळी दिलेला शब्द न पाळता इंग्रजांनी भारताला स्वातंत्र्य देण्यास नकार दिला. त्यामुळे, ८ ऑगस्ट १९४२ रोजी भारतीय काँग्रेस कमिटीच्या मुंबईतील अधिवेशनात भारत छोडो आंदोलनाचा प्रस्ताव संमत करण्यात आला. त्यानंतर, इंग्रजांनी गांधींजींना पुण्यातील आगा खाँ तुरुंगात कैद केले. तसेच, स्वातंत्र्य चळवळीतील इतर नेत्यांनाही अटक करण्यात आली. त्यावेळी, तरुण कार्यकर्ता अरुणा असिफ अली यांनी ९ ऑगस्ट रोजी मुंबईतील ग्वालिया टॅंक मैदानात तिरंगा फडकावत भारत छोडो आंदोलनाचा शंखनाद केला. मात्र, गांधीजींनी हेही आंदोलन अहिंसक मार्गानेच करावे, असे आवाहन देशवासियांना केले होते. तरीही, देशातील अनेक भागात हिंसा आणि तोडफोड करण्यात आली होती. दुसऱ्या महायुद्धामुळे ब्रिटीश सरकार अगोदरच खिळखिळे बनले होते. तर, या आंदोलनामुळे ब्रिटीशांची उरली-सुरली ताकदही लोप पावत गेली. त्यानंतर देशवासियांनी इंग्रजांना हाकलून लावेपर्यंत हे आंदोलन सुरुच ठेवले. भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. या आंदोलनात आपले बलिदान देणाऱ्या नागरिकांना श्रद्धांजली म्हणून ऑगस्ट क्रांती दिन साजरा केला जातो.

**विजय पांडे**



# गुरुवर्य लक्ष्मणराव जोशी

एकदा लक्ष्मणराव एका विषयावर लेख पाठव म्हणाले.मी तो पाठवला. वाचून झाल्यावर फोन आला अरे आपल्याला लेख हवा होता तू चक्क अग्रलेखच पाठवला. मी क्षणभर घाबरलो. ते लगेच म्हणाले हरकत नाही. दुपार पर्यंत लेख पाठव. नेमके काय हवे आहे ते समजावून सांगितले. मी कामाला लागलो. वेळेत मजकूर पोहचला.लगेच फोन आला उत्तम.त्यानंतर तीन दिवसांनी तो अग्रलेखही आला. काही विचारण्याआधीच फोन आला.अग्रलेखही आला बरं का! तोही उत्तम होता, हवाही होता. झालं म्हणून घेतला. तुझें अभिनंदन.सांगा आता किती हा मनाचा मोठेपणा. असे होते आपले लक्ष्मणराव. एका आप्तस्वकीय घरी जायचे आहे. चल लवकर. अपघात झालाय मदत करू या. मी गेलो. अत्यंत वेदनादायी प्रसंग होता. त्यानंतर काही महिन्यात त्याच घरात एक आनंदी वातावरण अपघातात गेलेल्या पुरुषाची पत्नी आणि तत्पूर्वी गेलेल्या त्याच घरातील पुरुष यांचा विवाह लक्ष्मणराव यांनी पुढाकार घेत घडवून आणला. जोडपे तरुण होते.एक घरच त्यांनी नव्याने उभे केले.हे अत्यंत अवघड काम त्यांनी करून समाजासमोर नवा आदर्श उभा केला.

अशी अनेकांना हळुवार दिलासा देण्यासाठीची काम त्यांनी आयुष्यभर केलीत आणि संघाचा कुटुंब प्रबोधन हा विषय कृतीतून समाजाच्या पुढ्यात ठेवला.विकासात्मक पत्रकारिता हा विषय लक्ष्मणरावांनी स्वतःपासूनच सुरू केला आणि आमच्या असंख्य पत्रकार कार्यकर्त्या कडून करवून घेतला हे विशेष योगदान आहे महाराष्ट्र हे कधीच विसरू शकत नाही.लक्ष्मणरावांनी तेल्हारा सारख्या छोट्या गावातून अकोला गाठले.भिकमचंद खंडेलवाल विद्यालयात शिक्षक म्हणुन कार्य सुरू केले.पहिल्या पाच शिक्षकांपैकी ते एक होते या सोबतच त्यांनी मातृभूमी दैनिकात वार्ताहर म्हणून काम सुरू केले.शांताराम उपाख्य अण्णा सरदेशपांडे हे त्यांचे पत्रकारितेतील पहिले गुरू. मुळात हाडाचा शिक्षक असल्याने पत्रकारितेच्या क्षेत्रात त्यांना मोठेच यश मिळाले.संघाच्या अधिकाऱ्यांनी त्यांना नागपुरात येण्यास सांगितले. संघ रक्तात भिनलेला असल्याने त्यांनी अकोला सोडून नागपूर गाठले. संघाची विविध दायित्वही अत्यंत जबाबदारीने सांभाळीत सेवा कार्यात मोठे योगदानही दिले.मा.गो.वैद्य, मामासाहेब घुमरे अशा विद्वान पत्रकारांच्या सानिध्यात एक उत्तम पत्रकार म्हणून लक्ष्मणरावांनी मोठी भरारी घेतली. वार्ताहर ते मुख्य संपादक अशी मोठी भरारी घेत ते पत्रमहर्षी म्हणून उभ्या महाराष्ट्रात परिचित झाले. पत्रकार, पत्रकारिता म्हणजे नेमके काय याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे लक्ष्मणराव. अत्यंत कडक शिस्त, संयमी, मितभाषी, कर्तव्य कठोर, प्रत्येकाला न्याय मिळावा, कुणीही दुखावणार नाही याची काळजी, कर्मचाऱ्यांना हळुवार हाताळण्यासाठीचे कसब ही गुणवैशिष्ट्ये यामुळे लक्ष्मणराव अतिशय लोकप्रिय संपादक म्हणून लौकिक पात्र झाले.'शुद्ध सात्विक प्रेम अपने कार्य का आधार है'हा संघ मंत्र त्यांनी कृतीतून सिद्ध केला.

महाराष्ट्र शासनाचा पहिला लोकमान्य टिळक पुरस्काराचेते मानकरी ठरले. तत्पूर्वी अत्यंत प्रतिष्ठेचा 'पांचजन्य' पुरस्काराने त्यांना अटलजींच्या हस्ते समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला.मात्र त्यांनी हे सारे कमावल्याचा आव कधी आणला नाही.कमालीचा साधेपणा त्यांनी शेवटपर्यंत जपला.गोव्यासह विविध वृत्तपत्रात मुख्यसंपादक पद भूषविले.

वयाच्या ८० व्या वर्षापर्यंत पूर्णवेळ काम करणे सोपे नाही पण त्यांनी हे करवून दाखविले. ८९ व्या वर्षातही ते संगणकावर स्वतः टंकमुद्रण करीत फेसबुकवर अग्रेसर होते.असे होते आपले लक्ष्मणराव.माझे गुरुवर्य।विनम्र अभिवादन।

**महेंद्र कवीश्वर,**
अकोला
मो.७०४५३४९४२४

# शिक्षण आणि समाजकारणाचा आधारवड - डॉ. डी. वाय. पाटील (दादा)

**म**हाराष्ट्राच्या शैक्षणिक आणि सामाजिक नकाशावर आपले नाव सुवर्णाक्षरांनी कोरणारे थोर शिक्षणमहर्षी, माजी राज्यपाल आणि पद्मश्री पुरस्कार विजेते डॉ. ज्ञानदेव यशवंतराव पाटील अर्थातच डॉ.डी.वाय. पाटील यांनी कोल्हापुर येथे वयाच्या ९० व्या वर्षी अखरेचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने शिक्षण आणि समाजकारणातील एक महामेरु हरपला आहे, पण त्यांनी उभारलेली उत्तुंग कार्ये त्यांची आठवण करुन देत राहतील.

कोल्हापूर जिल्ह्यातील अंबाप या छोट्याशा शेतीप्रधान गावात २२ ऑक्टोंबर १९३५ रोजी एका साध्या बहुजन शेतकरी



कुटुंबात डॉ. डी. वाय. पाटील यांचा जन्म झाला. दादा हे केवळ शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रासाठी योगदान देणारे तपस्वी नव्हते तर त्यांच्या ठायी अनेक सद्गुणांची संपत्ती होती. एकविसाव्या क्षेत्रात विज्ञान-तंत्रज्ञानाची कास धरणारे दादा तितकेच आध्यात्मिक होते. शेगावचे परमपुज्य श्रीसंत गजानन महाराज, नृसिंहवाडीचे परमपुज्य श्री म्हादबा पाटील महाराज, यमकतमडीचे श्री काका महाराज ही त्यांची श्रध्दास्थाने होती. आध्यात्मिक वृत्तीमुळे दादांच्या बुद्धीला करुणेचा स्वर्ग लाभल्यामुळे ते अधिक मानवतावादी बनले व आपल्या संस्थेमध्ये नितीला प्राध्यान्य देऊन हजारो गरजु मुलांना मोफत शिक्षणाची संधी दिली. तेच विद्यार्थी आज देश-परदेशात त्यांच्या विचाराचा वसा आणि वारसा जपत आहेत. शांताबाई यांच्यासारख्या संयमी, धैर्यवान आणि सद्गुणी धर्मपत्नीचा भक्कम आधारवड त्यांना लाभला. त्यामुळे दादांनी हे प्रचंड कार्य शेवटपर्यंत जोमाने नेले.

नवी मुंबईतील नेरुळ येथे असलेले जागतिक दर्जाचे 'डॉ. डी. वाय. पाटील स्टेडियम' हे त्यांच्या दुरदृष्टीचे उत्तम उदाहरण मानले जाते. त्यांच्या क्रीडा अकादमीच्या या भव्य स्टेडियममध्ये अनेक आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामने, आयपीएल सामने, फुटबॉल स्पर्धा आणि राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावरील मोठे कार्यक्रम आयोजीत केले गेले आहेत. अनेक चॅरीटेबल हॉस्पिटल्स तसेच वैद्यकीय संशोधन केंद्रे सुरु करुन त्यांनी आरोग्य सेवा तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवली. कोल्हापूर जिल्ह्यांत त्यांनी पहीले कृषी विज्ञान केंद्राची स्थापना केली.

दादांनी परदेशातही विद्यापीठ स्थापन करुन तेथील वंचित मुलांना शिक्षणाची कवाडे खुली करुन दिली.

त्यांच्या या योगदानाची दखल घेऊन शिवाजी विद्यापीठाने त्यांना सन २०१५ मध्ये डी.लीट. ही सर्वोच्च पदवी देऊन गौरविले होते. सन २०२२ मध्ये विद्यापीठाचा प्रा. रा.कृ. कणवटकर पुरस्कारानेही त्यांना गौरविण्यात आले होते. १९९१ मध्ये त्यांना पद्मश्री या सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. त्यांच्या सर्व समाजाभिमुख कार्याची दखल घेऊन अमेरिकेतील ख्यातनाम ॲरिसोना विद्यापीठाने व वर्ल्ड युनिर्व्हसिटीने त्यांना १९९५ मध्ये डि.लीट. पदवी दिली. ब्रिटनच्या नॉटिंगहॅम ट्रेट युनिर्व्हसिटीने १९९६ ला त्यांना मानाची डॉक्टरेट पदवी प्रदान केली. साधेपणा, सत्य, प्रामाणिकपणा व ध्येयपुर्तीची जिद्द या गुणांमुळे दादा हे समाजात विश्वासाने आणि उच्च जीवनमुल्यांचे प्रतीक होते. अशा ध्येयवादी शिक्षणतपस्वीचे निधन म्हणजे शिक्षण क्षेत्राची मोठी हानी आहे. त्यांच्या विचाराने हे कार्य पुढे नेणे हीच शिक्षणप्रेमींची त्यांच्याप्रती आदरांजली.

**डॉ. विजय बाबर,** वर्धा
मो.९४२३११८८०६


## त-ड-का

### मॅरेज ॲनिर्व्हसरी

ॲनिर्व्हसरी सेलीब्रेशनच्या
निमीत्ताने प्रश्न येतो मनात
खरचं का हे सुखी आहेत
आपल्या वैवाहीक
जीवनात ..

केवळ लोकोपचार
म्हणून तर नाही ना ?
साजरी करताहेत
मॅरेज ॲनिर्व्हसरी ..

चिंतन करा प्रेम जिव्हाळा
आहे का परस्पर अंतरी
विश्वास समर्पण तडजोडीने
सुखाची अनुभूती
येते संसारी ..



**प्रा.अशोक सारडा,**
मेहकर
मो.९४२१३९४३३

# पुस्तकांपासून वंचित विद्यार्थी आणि विचारांपासून वंचित राष्ट्र : शालेय ग्रंथालयांचा पुनर्विचार

**ज्या** राष्ट्रात मुलांच्या पोटाची भूक भागविण्यासाठी मध्यान्ह भोजनाची व्यवस्था आहे, त्या राष्ट्राने मुलांच्या विचारांची भूक भागविण्यासाठी समृद्ध शालेय ग्रंथालयांचीही तितकीच काळजी घेतली पाहिजे. कारण भाकरी शरीर जगवते; पण पुस्तक माणूस घडवते.आज भारतातील प्रत्येक शाळेत मध्यान्ह भोजनाची व्यवस्था आहे. ही व्यवस्था मुलांच्या आरोग्यासाठी आणि शिक्षणातील सातत्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. परंतु या व्यवस्थेकडे पाहताना एक प्रश्न मनाला सतत अस्वस्थ करतो. मुलांच्या पोटाची भूक भागविण्यासाठी आपण इतके संवेदनशील आहोत, मग त्यांच्या विचारांची भूक भागविण्यासाठी आपण तितकेच संवेदनशील आहोत का?

राष्ट्राची खरी संपत्ती ही नैसर्गिक साधनसंपत्ती नसते; ती विचार करणारी माणसे असतात. विचार करणारी माणसे एका दिवसात तयार होत नाहीत. त्यासाठी जिज्ञासा लागते, प्रश्न विचारण्याची हिंमत लागते, वाचनाची सवय लागते आणि विविध विचारांशी संवाद साधण्याची संधी लागते. ही संधी विद्यार्थ्यांना सर्वाधिक प्रभावीपणे देणारी संस्था म्हणजे शालेय ग्रंथालय.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० वाचन संस्कृती, स्व-अध्ययन, चिकित्सक विचार, सर्जनशीलता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांवर भर देते. भारतीय राज्यघटनेच्या कलम ५१अ(ह) मध्ये प्रत्येक नागरिकाने वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवतावाद तसेच ज्ञानार्जन आणि सुधारणेची वृत्ती विकसित करणे हे मूलभूत कर्तव्य मानले आहे. ही मूल्ये केवळ पाठांतरातून विकसित होत नाहीत; ती वाचनातून, चिंतनातून आणि मुक्त विचारातून विकसित होतात.वर्गखोली विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम शिकवते; परंतु ग्रंथालय विद्यार्थ्यांच्या विचारांना पंख देते. पाठ्यपुस्तक परीक्षेची तयारी करून देते; पण ग्रंथालय आयुष्याची तयारी करून देते. शिक्षक विद्यार्थ्याला उत्तर सांगू शकतो; परंतु ग्रंथालय त्याला स्वतः उत्तर शोधायला शिकवते. म्हणूनच ग्रंथालय हे शाळेचे केवळ एक दालन नसून तिचा आत्मा आहे.

प्रत्येक मूल जन्मतः जिज्ञासू असते. त्याच्या मनात शेकडो प्रश्न असतात. आकाश निळे का दिसते? पक्षी उडतात कसे? शिवाजी महाराजांनी स्वराज्य कसे उभे केले? संगणक कसा विचार करतो? समुद्र खारट का असतो? या प्रश्नांची उत्तरे पाठ्यपुस्तकात मर्यादित असतात; परंतु ग्रंथालयात त्या प्रश्नांना नवे आयाम मिळतात. प्रत्येक पुस्तक हे एका नव्या विचारविश्वाचे दार असते.परंतु आजची वस्तुस्थिती या आदर्शापासून दूर जाताना दिसते. अनेक शाळांमध्ये ग्रंथालये आहेत; पण ती जिवंत नाहीत. पुस्तकांची कपाटे आहेत; पण नवीन पुस्तके नाहीत. वाचनासाठी जागा आहे; पण वाचन संस्कृती नाही. सर्वात मोठी शोकांतिका म्हणजे अनेक शाळांमध्ये स्वतंत्र ग्रंथपालच नाही.

पटसंख्येच्या निकषांमुळे अनेक शाळांना ग्रंथपाल पद मंजूर होत नाही किंवा पदे रिक्त राहतात. परिणामी ग्रंथालयाची जबाबदारी ग्रंथालयशास्त्राचे प्रशिक्षण नसलेल्या शिक्षकांकडे दिली



जाते. त्यांच्या प्रयत्नांवर प्रश्नचिन्ह नाही; परंतु ग्रंथालय विज्ञान हे स्वतंत्र ज्ञानशाखा आहे. जसे विज्ञान प्रयोगशाळेसाठी प्रशिक्षित शिक्षक आवश्यक असतो, तसेच ग्रंथालयासाठी प्रशिक्षित ग्रंथपालही आवश्यक असतो.याहूनही चिंताजनक बाब म्हणजे शालेय ग्रंथालयासाठी स्वतंत्र आणि नियमित निधीचा अभाव. अनेक शाळांना दरवर्षी नवीन पुस्तके खरेदी करता येत नाहीत. बालसाहित्य, विज्ञान, तंत्रज्ञान, संदर्भग्रंथ, विश्वकोश, स्थानिक इतिहास, चरित्रे आणि विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार साहित्य उपलब्ध होत नाही. अनेक शाळा पुस्तकांसाठी लोकसहभाग आणि देणगीदारांवर अवलंबून असतात. समाजाचा सहभाग स्वागतार्ह असला तरी विद्यार्थ्यांचा ज्ञानाचा अधिकार हा देणगीवर अवलंबून राहता कामा नये.

आज आपण मुलांना पोषण आहार देतो; परंतु विचारांचे पोषण देणारी पुस्तके देण्यात आपण कमी पडत आहोत. ज्ञानाची भूक ही भाकरीच्या भुकेइतकीच खरी असते. रिकामे पोट शरीराला अशक्त करते; पण रिकामे ग्रंथालय विद्यार्थ्यांच्या विचारांना अशक्त करते. ज्या मुलाला त्याच्या आवडीच्या विषयावर अधिक वाचण्याची संधी मिळत नाही, त्याची जिज्ञासा हळूहळू कमी होत जाते. जिज्ञासा हरवली की संशोधन हरवते; संशोधन हरवले की नवसर्जन हरवते; आणि नवसर्जन हरवले की राष्ट्राची प्रगती थांबते.

जगातील फिनलंड, जपान, सिंगापूर, कॅनडा आणि इतर अनेक प्रगत देशांनी शालेय ग्रंथालयाला शिक्षणाच्या केंद्रस्थानी स्थान दिले आहे. प्रशिक्षित ग्रंथपाल, समृद्ध पुस्तकसंग्रह, नियमित ग्रंथालय तास आणि वाचनाला प्रोत्साहन देणारे उपक्रम ही त्यांच्या शिक्षण व्यवस्थेची वैशिष्ट्ये आहेत. त्यांना माहीत आहे की आजचा वाचकच उद्याचा संशोधक, वैज्ञानिक, लेखक, उद्योजक आणि जबाबदार नागरिक असतो.भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ .एस. आर . रंगनाथन यांनी मांडलेले पंचसूत्र आजही मार्गदर्शक आहेत.

'प्रत्येक वाचकाला त्याचे पुस्तक आणि 'प्रत्येक पुस्तकाला त्याचा वाचक' हे तत्त्व केवळ ग्रंथालयाचे नाही; ते लोकशाही शिक्षणाचे तत्त्वज्ञान आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची उद्दिष्टे प्रत्यक्षात आणायची असतील, तर शालेय ग्रंथालयाला शिक्षणाच्या केंद्रस्थानी आणावे लागेल. प्रत्येक शाळेसाठी स्वतंत्र ग्रंथालय निधी, प्रशिक्षित ग्रंथपालांची नियुक्ती, नियमित पुस्तक खरेदी, ग्रंथालय तास अनिवार्य करणे, डिजिटल वाचनसाधने उपलब्ध करणे आणि वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देणारे उपक्रम राबविणे ही आता काळाची गरज आहे. ग्रंथालय हा खर्च नाही; ती राष्ट्राच्या भविष्यातील गुंतवणूक आहे.

आज प्रश्न एवढाच नाही की शाळेत ग्रंथालय आहे का. खरा प्रश्न असा आहे की त्या ग्रंथालयामुळे विद्यार्थ्यांच्या विचारांना पंख मिळतात का? त्यांच्या जिज्ञासेला दिशा मिळते का? त्यांच्या विवेकबुद्धीला आकार मिळतो का?कारण पुस्तकांपासून वंचित विद्यार्थी म्हणजे केवळ वाचनापासून वंचित विद्यार्थी नव्हे; तो स्वतः विचार करण्याच्या संधीपासून वंचित राहण्याचा धोका असलेला विद्यार्थी आहे. आणि विचारांपासून वंचित पिढी कोणत्याही राष्ट्राच्या प्रगतीसाठी सर्वात मोठे संकट ठरते.

शाळा उभारणे ही विकासाची सुरुवात आहे; पण समृद्ध ग्रंथालय उभारणे म्हणजे भविष्य घडविण्याची तयारी आहे. वर्गखोली विद्यार्थ्यांना धडे शिकवते; परंतु ग्रंथालय त्यांच्या विचारांना पंख देते. आणि ज्या राष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या विचारांना पंख असतात, त्या राष्ट्राच्या प्रगतीलाही आकाशाची मर्यादा राहत नाही.

**मयुर चौधरी**
अमरावती
मो.७७९८०६०५००

# अवैध धंद्यांचे 'हब' बनलेल्या आलेगावकडे स्थानिक गुन्हे शाखेचे दुर्लक्ष?

## कारवाई होते, गुन्हे दाखल होतात; मग पुन्हा त्याच ठिकाणी धंदे सुरू कसे?

■ प्रतिनिधी | पातूर ■

पातूर तालुक्यातील आलेगाव परिसरात गावठी दारू, मटका-जुगारासह विविध अवैध व्यवसाय सुरू असल्याच्या तक्रारींमुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. अधूनमधून पोलिसांकडून कारवाया होतात, गुन्हे दाखल केले जातात; मात्र काही दिवस उलटताच त्याच परिसरात पुन्हा अवैध व्यवसाय सुरू होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. त्यामुळे पोलीस कारवाईचा धाक नेमका कुठे आहे? असा थेट सवाल उपस्थित होत आहे.

अवैध धंद्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलीस यंत्रणा कार्यरत असतानाही एखाद्या परिसरात वारंवार त्याच प्रकारचे व्यवसाय सुरू राहत असतील, तर कारवाईच्या पद्धतीचे मूल्यमापन होणे आवश्यक ठरते. केवळ छापे टाकून काही जणांवर गुन्हे दाखल करणे पुरेसे आहे का, की या धंद्यांच्या मुळापर्यंत जाऊन संपूर्ण साखळी उद्ध्वस्त करण्याची गरज आहे, हा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे.

**'लोकल नेटवर्क' नेमके कोणाचे?**

अवैध व्यवसाय एखाद्या ठिकाणी सातत्याने सुरू राहत असतील तर त्यामागे केवळ किरकोळ विक्रेते नसून पुरवठा, वाहतूक, आर्थिक व्यवहार आणि ग्राहकांचे जाळे असण्याची शक्यता तपासणे आवश्यक आहे. दारूचा माल कुठून येतो? पैसा कोणाकडून पुरविला जातो? विक्रीचे जाळे किती गावांपर्यंत पसरले आहे? वारंवार व्यवसाय करणाऱ्यांवर कोणाची छत्रछाया आहे का? या सर्व बाबींचा तपास होणे गरजेचे आहे. छापेमारीच्या पुढे जाऊन 'नेटवर्क'वर कारवाई करण्याचे धाडस पोलीस दाखवणार का? हा खरा प्रश्न आहे.

**कारवाई होते... मग धंदे पुन्हा सुरू कसे?**

आलेगाव परिसरात अवैध दारूधंदे सुरू असल्याच्या तक्रारी सातत्याने होत असतील आणि त्यावर पोलिसांकडून कारवाईही होत असेल, तर त्यानंतर पुन्हा तेच व्यवसाय सुरू होण्यामागचे कारण काय? कारवाईनंतर पोलिसांचे फॉलोअप कुठे थांबते? संबंधित ठिकाणांवर नियमित नजर ठेवली जाते का? कारवाई झालेल्या व्यक्तींकडून पुन्हा व्यवसाय सुरू केला जात नाही ना, याची खातरजमा केली जाते का? असे प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत. एखाद्या अवैध धंद्यावर कारवाई केल्यानंतर तो कायमचा बंद होणे अपेक्षित असताना तो पुन्हा सुरू होत असेल, तर केवळ गुन्ह्यांची संख्या वाढविण्यापेक्षा अवैध धंद्यांचे मूळ नेटवर्क शोधणे अधिक महत्त्वाचे ठरत नाही का, असा सवालही केला जात आहे.

**'आलेगाव' पोलिसांसाठी आव्हान?**

### पोलिसांच्या कार्यपद्धतीवर नागरिकांचे सवाल




अवैध धंद्यांच्या तक्रारी खऱ्या असतील तर आलेगाव परिसरातील परिस्थिती पोलिसांसाठी एकप्रकारे आव्हानच ठरली आहे. अधूनमधून कारवाई करून प्रसिद्धी मिळविण्यापेक्षा अवैध व्यवसायांची मुळे उखडून टाकणे महत्त्वाचे आहे. कारवाईनंतरही धंदे सुरू होत असतील, तर कारवाईचा परिणाम नेमका किती? हा प्रश्न नागरिकांच्या मनात आहे.

**वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष घालण्याची मागणी**

आलेगाव परिसरातील कथित अवैध व्यवसायांबाबत वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी स्वतंत्रपणे माहिती घेऊन वस्तुस्थिती तपासावी, अशी मागणी होत आहे. कारवाई झालेल्या ठिकाणांचा फेरआढावा, संबंधितांवर पुन्हा गुन्हे दाखल झाले आहेत का, अवैध व्यवसायांची पुनरावृत्ती का होते आणि त्यामागील मुख्य सूत्रधार कोण आहेत, याची चौकशी करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. आलेगाव अवैध धंद्यांचे 'हब' बनत असल्याच्या तक्रारी जर चुकीच्या असतील तर पोलिसांनी ती वस्तुस्थिती स्पष्ट करावी; आणि तक्रारींमध्ये तथ्य असेल तर अवैध धंदे चालविणाऱ्यांचे संपूर्ण जाळे उध्वस्त करून दाखवावे, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत. आता प्रश्न केवळ एखाद्या छाप्याचा किंवा एखाद्या गुन्ह्याचा राहिलेला नाही. आलेगाव परिसरातील अवैध व्यवसायांना कायमचा आळा बसणार कधी? कारवाईनंतरही धंदे पुन्हा सुरू होण्यामागे नेमके कारण काय? आणि या संपूर्ण यंत्रणेची जबाबदारी निश्चित होणार कधी? याचे उत्तर पोलीस प्रशासनाने देण्याची वेळ आली आहे.

**गावठी दारूतील कथित 'विषारी द्रवा'चा मुद्दा गंभीर**

गावठी दारूमध्ये आरोग्यास घातक अथवा विषारी द्रव मिसळला जात असल्याच्या चर्चेने या प्रकरणाचे गांभीर्य आणखी वाढले आहे. मात्र, या आरोपांची सत्यता अधिकृत तपासणीनंतरच स्पष्ट होऊ शकते. त्यामुळे संबंधित ठिकाणांवरून दारूचे नमुने जप्त करून त्यांची रासायनिक आणि प्रयोगशाळा तपासणी करण्यात आली आहे का? असा सवाल नागरिकांकडून केला जात आहे. जर अशा प्रकारच्या पदार्थांचा वापर होत असल्याचे तपासणीत निष्पन्न झाले, तर हा केवळ अवैध दारू विक्रीचा विषय राहणार नाही; तर नागरिकांच्या आरोग्याशी थेट संबंधित गंभीर प्रश्न ठरेल. त्यामुळे प्रशासनाने अफवांवर अवलंबून न राहता वैज्ञानिक तपासणी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी होत आहे.

.......

**स्थानिक गुन्हे शाखेच्या माहिती यंत्रणेवर प्रश्नचिन्ह**

आलेगावमध्ये अवैध व्यवसाय सुरू असल्याची माहिती नागरिकांना मिळते, तक्रारी होतात आणि त्यानंतर कारवाई होते; मग पोलिसांच्या माहिती यंत्रणेला याची माहिती आधी का मिळत नाही? किंवा माहिती मिळूनही कारवाई होण्यास विलंब का होतो? कारवाईनंतर पुन्हा व्यवसाय सुरू झाल्याचे आढळत असेल तर त्याची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचते का? या प्रश्नांची उत्तरे मिळणे आवश्यक आहे. विशेष म्हणजे, स्थानिक गुन्हे शाखा आणि संबंधित पोलीस ठाणे यांच्यातील समन्वय कितपत प्रभावी आहे? याचेही वरिष्ठ स्तरावर परीक्षण होण्याची गरज आहे.

---

# पहाडसिंगीतील दुर्गंधीयुक्त साचलेल्या पाण्याची अखेर विल्हेवाट

## सामाजिक कार्यकर्ते राहुल गवई यांच्या पाठपुराव्याला यश


पहाडसिंगीत मूलभूत सुविधांचा बोजवारा; डेंग्यूसदृश स्थितीची भीती

IMPACT जनमाध्यम IMPACT

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील अतिदुर्गम पहाडसिंगी गावात अनेक दिवसांपासून साचलेल्या दुर्गंधीयुक्त सांडपाण्यामुळे ग्रामस्थांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला होता. याबाबत दैनिक 'जनमाध्यम'ने ३ ऑगस्टच्या अंकात वृत्त प्रकाशित करून प्रशासनाचे लक्ष वेधले. या वृत्ताची दखल घेत स्थानिक प्रशासनाने साचलेल्या दुर्गंधीयुक्त पाण्याची विल्हेवाट लावण्याच्या कामाला सुरुवात केली आहे. त्यामुळे ग्रामस्थांना काहीसा दिलासा मिळाला असून, सामाजिक कार्यकर्ते राहुल गवई यांच्या पाठपुराव्यालाही यश आले आहे.

पहाडसिंगी गावात मूलभूत सुविधांचा अभाव असल्याने ग्रामस्थांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. गावातील विविध ठिकाणी सांडपाणी साचल्याने परिसरात दुर्गंधी पसरली होती. त्यातच पिण्याच्या पाण्याची अपुरी सुविधा आणि अस्वच्छतेमुळे डेंग्यूसदृश तसेच अन्य संसर्गजन्य आजारांचा धोका निर्माण झाल्याचा आरोप करण्यात आला होता. या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते राहुल गवई यांनी जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच पातूर पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांकडे तक्रार करून सातत्याने पाठपुरावा केला होता. मात्र, प्रश्नाकडे गांभीर्याने पाहिले जात नसल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत होती. दरम्यान, दैनिक 'जनमाध्यम'ने ३ ऑगस्ट रोजी 'पहाडसिंगीतील मूलभूत सुविधांचा अभाव; दुर्गंधीयुक्त सांडपाण्यामुळे ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात' या आशयाचे वृत्त प्रकाशित केले. वृत्त प्रसिद्ध होताच प्रशासनाची यंत्रणा सक्रिय झाली. साचलेल्या दुर्गंधीयुक्त पाण्याची विल्हेवाट लावण्याचे काम नुकतेच सुरू करण्यात आले. प्रशासनाने केलेल्या या कार्यवाहीमुळे पहाडसिंगीतील ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे. मात्र, केवळ साचलेले पाणी काढण्यापुरतीच कारवाई न करता सांडपाणी व्यवस्थापन, पिण्याच्या पाण्याची सुविधा आणि स्वच्छतेचा प्रश्न सोडवावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. 'जनमाध्यम'च्या वृत्तामुळे प्रशासनाला जाग आली आणि राहुल गवई यांच्या पाठपुराव्याला यश मिळाले, अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

---

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या लाभ वितरणास प्रारंभ



■ प्रतिनिधी | अकोला ■

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेत पहिल्या टप्प्यात अकोला जिल्ह्यातील १९ हजार ९१० शेतकऱ्यांना एकूण १६९ कोटी ३६ लक्ष रु. कर्जमुक्ती रकमेचा लाभ वितरीत करण्यात आला आहे. जिल्ह्यातील प्रत्येक पात्र शेतकऱ्याला कर्जमुक्ती योजनेचा लाभ मिळणार आहे. एकही पात्र शेतकरी या योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही, अशी ग्वाही राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ?ड. आकाश फुंडकर यांनी दिली आहे.

मुंबई येथे सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते कर्जमुक्ती योजनेच्या ऑनलाईन लाभ वितरणास प्रारंभ करण्यात आला. शेतकरी सक्षम, शेती समृद्ध आणि महाराष्ट्र अधिक प्रगत करण्याच्या उद्देशाने ही योजना शासनाने हाती घेतली आहे.

शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या दिशेने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.अमरावती विभागात १ लाख ५८ हजार १४६ शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात १,३७२.१७ कोटींचा लाभ, तसेच राज्यात पहिल्या टप्प्यात आधार प्रमाणीकरण पूर्ण झालेल्या ६.२२ लाख शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांमध्ये ५,०२८ कोटींची रक्कम थेट जमा करण्यात आली आहे. शासनाने सर्व बँकांना कर्जमुक्तीचा लाभ मिळालेल्या पात्र शेतकऱ्यांना तातडीने खरीप पीक कर्ज उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, जेणेकरून शेतकऱ्यांना नव्याने शेतीसाठी आवश्यक आर्थिक बळ मिळेल.

---

# घरफोड्यांनी हादरलेल्या मूर्तिजापूरला दिलासा!

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

**पोलिसांचा जबरदस्त फटका; दोन सराईत चोरटे जेरबंद**



**तब्बल ७ घरफोड्यांचा उलगडा, सोन्याचे दागिने, रोकडसह लाखोंचा मुद्देमाल हस्तगत; तपास पथकाला २५ जारांचे बक्षीस**

गेल्या काही महिन्यांपासून घरफोड्यांच्या मालिकेमुळे त्रस्त झालेल्या मूर्तिजापूरकरांना अखेर दिलासा मिळाला आहे. मूर्तिजापूर शहर पोलिसांनी अत्यंत कौशल्यपूर्ण तपास करत दोन सराईत चोरट्यांना अटक केली असून, त्यांच्या चौकशीतून शहरातील तब्बल सात घरफोडीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. या धडाकेबाज कारवाईमुळे पोलिसांच्या कार्यक्षमतेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे.

सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपींपर्यंत पोहोचत त्यांना जेरबंद केले. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये सागर जनार्धन गोगटे (वय ३७) व पंकज राजू गोंडाणे (वय २९) यांचा समावेश आहे. दोघेही सराईत स्वरूपाचे आरोपी असल्याची माहिती तपासात समोर आली आहे.

आदर्श कॉलनी, डागा ले-आउट, तिडके नगर, वडरपुरा, गोयंनका नगर, समता नगर आणि सारडा ले-आउट या परिसरांमध्ये घडलेल्या घरफोड्यांमध्ये आरोपींचा सहभाग निष्पन्न झाला आहे. या प्रकरणी मूर्तिजापूर शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेअंतर्गत सात गुन्हे दाखल आहेत. पोलिसांनी आरोपींकडून ९३.६०० ग्रॅम सोन्याचे दागिने, ४ लाख १४ हजार ७५० रुपयांची रोकड आणि दोन मोबाईल फोन असा मोठा मुद्देमाल जप्त केला आहे.

आरोपींकडून आणखी काही गुन्ह्यांची उकल होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने तपासाची व्याप्ती वाढविण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. पोलीस निरीक्षक धर्मेंद्र जोशी यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक कैलास चौधरी व त्यांच्या पथकाने अथक परिश्रम घेत हा गुन्हेगारीचा गुंता सोडविला. अकोला सायबर पोलिसांनीही तांत्रिक तपासात महत्त्वपूर्ण योगदान दिले.

दरम्यान, या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत पोलीस अधीक्षकांनी तपास पथकाला २५ हजार रुपयांचे रोख बक्षीस जाहीर केले आहे. या कारवाईमुळे मूर्तिजापूरातील घरफोड्यांच्या मालिकेला मोठा आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

---

# डॉ. अभय पाटील यांच्या कोअर कमिटीची नियोजन बैठक संपन्न

■ प्रतिनिधी | अकोला ■

डॉ. अभय पाटील यांच्या संभाव्य पक्षप्रवेशाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या कोअर कमिटीची महत्त्वपूर्ण नियोजन बैठक काल हॉटेल आर.जी. येथे संपन्न झाली. गेल्या चार-पाच दिवसांपासून डॉ. अभय पाटील हे एकनाथराव शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश करणार असल्याच्या चर्चांना राजकीय वर्तुळात वेग आला आहे.या पार्श्वभूमीवर डॉ. पाटील यांनी आपल्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी चर्चा करूनच पुढील निर्णय घेण्याची भूमिका घेतली आहे. त्यानुसार काल झालेल्या कोअर कमिटीच्या बैठकीत आगामी राजकीय वाटचाल, कार्यकर्त्यांची भूमिका तसेच पुढील नियोजना बाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीत कोअर कमिटीतील अनेक सदस्यांनी आपली मते व मनोगते व्यक्त केली.दरम्यान १५ ऑगस्टनंतर लोकसभा क्षेत्रातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठी बैठक आयोजित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या बैठकीच्या अनुषंगाने कोअर कमिटीतील सदस्यांना विविध जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत. डॉ. अभय पाटील यांच्या पक्षप्रवेशाबाबतचा अंतिम निर्णय १५ ऑगस्टनंतर होणाऱ्या व्यापक बैठकीत पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी चर्चा केल्यानंतरच घेण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यामुळे डॉ. पाटील यांच्या पुढील राजकीय भूमिकेकडे अकोला लोकसभा क्षेत्रासह जिल्ह्यातील राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

---

### जिल्हाधिकारी कार्यालयात विभाग प्रमुख आढावा बैठक

**अकोला :** नागरिकांचे जीवनमान अधिक सुलभ, आणि गुणवत्तापूर्ण करण्यासाठी प्रत्येक शासकीय कर्मचाऱ्याने लोकाभिमुख दृष्टीकोनातून कार्य करावे. प्रशासनात आधुनिक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता डिजिटल कार्यपद्धती आणि गतिमान प्रशासनाचा प्रभावी वापर करून शासकीय सेवा अधिक जलद व परिणामकारक करण्यावर भर द्यावा, असे निर्देश राज्याचे महसूल अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी आज इथे दिले.

---

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २४०**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

---

# कोचिंगच्या बाजारात गुणवत्तेची बोली?


## डॉक्टर, इंजिनिअर, अधिकारी होण्याच्या स्वप्नांसमोर आर्थिक अडथळा

## शिक्षण व्यवस्थेच्या व्यापारीकरणावर प्रश्नचिन्ह

■ प्रतिनिधी | अकोला ■

'मेहनत करा आणि यश मिळवा' हा संदेश विद्यार्थ्यांना दिला जातो; मात्र आजच्या स्पर्धात्मक शिक्षण व्यवस्थेत मेहनतीसोबत आर्थिक ताकदही तितकीच महत्त्वाची ठरत असल्याचे चित्र आहे. वैद्यकीय, अभियांत्रिकी आणि विविध स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी खासगी कोचिंग क्लासेसच्या लाखो रुपयांच्या फीमुळे गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या स्वप्नांसमोर मोठा आर्थिक अडथळा निर्माण झाला आहे. त्यामुळे 'ज्ञानाचे मंदिर की पैशांचा बाजार?' हा प्रश्न आता अधिक तीव्रतेने उपस्थित होत आहे.

महाविद्यालयीन शिक्षणासाठी काही हजार रुपयांची फी भरावी लागते; मात्र त्याच विद्यार्थ्याला प्रवेश परीक्षेत यश मिळविण्यासाठी खासगी कोचिंग, टेस्ट सिरीज, अभ्यास साहित्य, डिजिटल सुविधा आणि वैयक्तिक मार्गदर्शनासाठी लाखो रुपये खर्च करावे लागतात. पैसा उपलब्ध असलेल्या कुटुंबातील विद्यार्थ्यांना या सुविधा सहज मिळतात. दुसरीकडे शेतकरी, शेतमजूर, कामगार आणि छोट्या व्यावसायिकांच्या मुलांना 'मेहनत हीच भांडवल' मानून पुढे जावे लागते.



गरीब घरात जन्माला आलेल्या विद्यार्थ्याने डॉक्टर, इंजिनिअर किंवा अधिकारी होण्याचे स्वप्न पाहणे ही चूक आहे का? या प्रश्नाचे उत्तर केवळ पालकांनी किंवा विद्यार्थ्यांनी नव्हे, तर शासन आणि संपूर्ण शिक्षण व्यवस्थेने द्यायला हवे. कारण शिक्षण जर पैशांच्या ताकदीवर अवलंबून राहिले, तर गुणवत्तेची खरी परीक्षा विद्यार्थ्याची नव्हे, तर त्याच्या पालकांच्या खिशाची ठरेल!

**अपेक्षांच्या ओझ्याखाली विद्यार्थ्यांचा संघर्ष :** प्रवेश परीक्षेतील अपयश, प्रचंड स्पर्धा, पालकांच्या अपेक्षा आणि कोचिंगवर झालेली मोठी आर्थिक गुंतवणूक यामुळे विद्यार्थ्यांवरील मानसिक दबावही वाढतो. यश मिळाले नाही तर स्वतःला अपयशी समजण्याची भावना विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होऊ शकते. एका परीक्षेतील अपयश म्हणजे आयुष्याचा शेवट नाही, हा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासोबतच त्यांना समुपदेशन आणि मानसिक आधार देण्याचीही गरज आहे.

**शासनाने 'कोचिंग'ला पर्याय उभा करावा :** आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि गुणवंत विद्यार्थ्यांसाठी शासनाने तालुकास्तरावर दर्जेदार मोफत अथवा अत्यल्प शुल्कातील मार्गदर्शन केंद्रे सुरू करणे गरजेचे आहे.

येथे तज्ज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन, डिजिटल अभ्यासक्रम, अद्ययावत अभ्यास साहित्य, नियमित टेस्ट सिरीज, अभ्यासिका आणि समुपदेशनाची सुविधा उपलब्ध करून दिल्यास अनेक विद्यार्थ्यांना खासगी कोचिंगवरील अवलंबित्व कमी करता येईल. शिक्षणाच्या संधी समान असतील तरच सामाजिक समानतेला खरा अर्थ प्राप्त होईल. पैशांअभावी एखाद्या विद्यार्थ्याचे स्वप्न अर्धवट राहणे ही केवळ त्या विद्यार्थ्याची हानी नसून समाजाच्या भविष्यातील एका गुणवंत शक्तीचे नुकसान आहे.

**गरीब विद्यार्थ्यांच्या स्वप्नांची किंमत किती?**

मुलगा डॉक्टर व्हावा, मुलगी इंजिनिअर व्हावी किंवा घरातील कोणी अधिकारी व्हावे, हे स्वप्न पाहण्यासाठी कोणताही पालक श्रीमंत असण्याची गरज नाही. मात्र या स्वप्नाला आकार देण्यासाठी लागणारा खर्च लाखोंमध्ये पोहोचला तर आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांनी करायचे काय?

अनेक पालक मुलांच्या शिक्षणासाठी कर्ज काढतात, बचत मोडतात, शेतीतील उत्पन्न खर्च करतात किंवा दैनंदिन गरजांवर मर्यादा आणतात. कोचिंगची फी भरल्यानंतर पुस्तके, परीक्षा शुल्क, प्रवास, निवास आणि इतर शैक्षणिक खर्चाचा भार वेगळाच. परिणामी, एका विद्यार्थ्याच्या शिक्षणाचा खर्च संपूर्ण कुटुंबाच्या आर्थिक गणितावर परिणाम करतो.

**गुणवत्ता की पैशांची ताकद?**

प्रवेश परीक्षांची स्पर्धा दिवसेंदिवस तीव्र होत आहे. अशा परिस्थितीत दर्जेदार मार्गदर्शन मिळणे महत्त्वाचे ठरते. मात्र हे मार्गदर्शन महागड्या कोचिंगशिवाय मिळत नसेल, तर आर्थिकदृष्ट्या सक्षम विद्यार्थ्यांना अनुकूल वातावरण आणि गरीब विद्यार्थ्यांना मर्यादित साधने अशी विषमता निर्माण होण्याची शक्यता आहे. विद्यार्थ्याच्या बुद्धिमत्तेला आणि मेहनतीला संधी मिळणार की त्याच्या पालकांच्या आर्थिक क्षमतेला? हा प्रश्न शिक्षण व्यवस्थेसमोर उभा ठाकला आहे.

# मोकाट कुत्र्यांच्या हल्ल्यात चितळ ठार

### चारा-पाण्याच्या शोधात मानवी वस्तीत आलेल्या वन्यजीवाचा दुर्दैवी अंत; वनविभागाकडून शासकीय नियमानुसार अंत्यसंस्कार

**आष्टी शहीद/जनमाध्यम**

चारा-पाण्याच्या शोधात जंगलातून मानवी वस्तीकडे आलेल्या एका निष्पाप चितळाचा मोकाट कुत्र्यांच्या हल्ल्यात दुर्दैवी मृत्यू झाला.आष्टी शहरातील इंदिरानगरलगतच्या शेतशिवारात शनिवारी पहाटे ही हृदयद्रावक घटना घडली. कुत्र्यांनी चितळाचा पाठलाग करून त्याच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या चितळाचा अखेर मृत्यू झाला. या घटनेमुळे वन्यजीवांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार,जंगल परिसरातून चारा व पाण्याच्या शोधात चितळ इंदिरानगरलगतच्या शेतशिवारात आले होते. मात्र, परिसरातील मोकाट कुत्र्यांनी त्याचा पाठलाग सुरू केला. कुत्र्यांनी चितळाला घेरून त्याच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात चितळाच्या शरीरावर



गंभीर जखमा झाल्या. मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाल्याने त्याचा मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच वनपरीक्षेत्र अधिकारी पूनम ब्राम्हणे यांनी तातडीने दखल घेतली. बिट गार्ड स्वाती कडू, राम गायकवाड यांच्यासह वनकर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली.मृत चितळाचा पंचनामा करून त्याचा मृतदेह वाहनातून वनविभागाच्या कार्यालयात आणण्यात आला.त्यानंतर कर्तव्यावर असलेले पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.एस.एम.पाटील यांनी पंचांच्या उपस्थितीत मृत चितळाची उत्तरीय तपासणी केली.

आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर शासकीय नियम व वनविभागाच्या नियमानुसार मृत चितळावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

वनविभागाच्या कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत चितळाला अग्नी देण्यात आला. यावेळी पत्रकार संरक्षण समितीचे अध्यक्ष शिवाजी चंदीवाले उपस्थित होते. वनपरीक्षेत्र अधिकारी पूनम ब्राम्हणे, वनपाल मडवे, वनपाल डी. एम. धुर्वे (माणिकवाडा), बिट गार्ड स्वाती कडू,राम गायकवाड,भोसले,डाकोरे (मोई) तसेच आर.आर.टी.चे सदस्य उपस्थित होते.

# चार दिवसांत महावितरण कार्यालयाला कुलूप ठोकणार

### स्मार्ट मीटरच्या वाढीव बिलांनी ग्राहक हैराण; अधिकारी गायब, तक्रारींचे करायचे तरी काय

**हिंगणघाट/जनमाध्यम**

स्मार्ट मीटरच्या नावाखाली वाढीव वीजबिले येत असल्याचा आरोप करत टेंबा येथील ग्राहकांचा संताप आता उफाळून आला आहे. तक्रारी घेऊन गेल्या आठ दिवसांपासून वडनेर येथील महावितरण कार्यालयाच्या चकरा मारूनही संबंधित अधिकारी भेटत नसल्याने ग्राहकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. चार दिवसांत मागण्या मान्य न झाल्यास महावितरण कार्यालयाला लोकशाही मार्गाने कुलूप ठोकण्याचा इशारा संतप्त नागरिकांनी दिला आहे.

टेंबा येथील वृषभ तडस यांच्यासह ८ ते १० ग्राहकांनी वाढीव वीजबिलांच्या तक्रारी घेऊन वडनेर येथील महावितरण कार्यालय गाठले. मात्र संबंधित अधिकारी कार्यालयात उपलब्ध नसल्याने ग्राहकांना रिकाम्या हाताने परतावे लागले. आमच्या समस्या मांडायच्या तरी कुणाकडे असा प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला.



स्मार्ट मीटर बसविल्यानंतर वीजबिलात अनाकलनीय वाढ होत असल्याचा दावा ग्राहकांनी केला आहे. त्यामुळे घरातील स्मार्ट मीटर काढून त्याऐवजी इलेक्ट्रॉनिक सामान्य मीटर बसविण्यात यावा,अशी मागणी करण्यात आली. ग्राहकांना स्मार्ट मीटरबाबत पर्याय उपलब्ध करून देण्याची मागणीही नागरिकांनी केली आहे.

दरम्यान,वडनेर महावितरण कार्यालयातील कारभाराची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने दखल घ्यावी. संबंधित अधिकारी नियमित कार्यालयात उपस्थित राहतील आणि ग्राहकांच्या तक्रारींचे वेळेत निराकरण करतील, याची व्यवस्था करावी, अशी मागणी करण्यात आली.

चार दिवसांचा अल्टिमेटम देत नागरिकांनी आंदोलनाचा इशारा दिल्याने महावितरण प्रशासनापुढे आता मोठे आव्हान उभे ठाकले आहे.यावेळी ऋषभ तडस, प्रणय तडस, आकाश कलवडे, चेतन पवार, प्रमोद ससाणे, चंद्रकांत हुलके, रविंद्र पेटकर, मोहन गावंडे यांच्यासह गावकरी उपस्थित होते.

# भारतीय ज्ञान परंपरेवर केंद्रीत प्रदर्शनाला शिक्षक, विद्यार्थ्यांनी दिली भेट

**वर्धा/जनमाध्यम**

महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयाच्या स्वामी सहजानंद सरस्वती संग्रहालयात राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० ला सहा वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आयोजित 'अखिल भारतीय शिक्षण समागम २०२६' अंतर्गत भारतीय ज्ञानपरंपरेवरील त्रिदिवसीय प्रदर्शनाच्या दुसऱ्या दिवशी वर्धा येथील रमाबाई देशमुख पब्लिक स्कूलच्या अध्यापिका आरती महाजन, रीना अंबुलकर, संदीप दरने यांच्यासह ४७ विद्यार्थिनी व ६८ विद्यार्थ्यांनी प्रदर्शनाला भेट देऊन अवलोकन केले. राष्ट्रभाषा प्रचार समिती, वर्धा येथील पूजा लोहिया, नाहिद शेख, निरूता कोसम, रेमी, पेले, एसे तसेच हिंदी विश्वविद्यालयातील डॉ. अंजनी राय,डॉ.सीमा बर्गट,पूनम कुमारी, शिक्षा यादव, विद्यानंद कुमार, बलवंत कुमार, राहुल, अतुल अवथरे यांनी या प्रदर्शनाला भेट दिली.

वर्ध्यातील विविध शाळा, महाविद्यालये तसेच विश्वविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी प्रदर्शनाला भेट देऊन भारतीय ज्ञान परंपरेतील समृद्ध वारसा जाणून घेतला. स्वामी सहजानंद सरस्वती संग्रहालयाचे प्रभारी डॉ. अमित विश्वास यांनी संग्रहालयात जतन करण्यात आलेल्या हजारो दुर्मीळ हस्तलिखिते,ग्रंथ आणि अन्य ऐतिहासिक साहित्याची माहिती दिली. संग्रहालयात १९व्या शतकापासून आजपर्यंतच्या ऐतिहासिक महत्त्वाच्या नियतकालिकांसह अनेक दुर्मीळ हस्तलिखिते सुरक्षित ठेवण्यात आली आहेत. या साहित्यकृतींचे दर्शन आणि वाचन करताना साहित्याच्या इतिहासाचा जिवंत अनुभव मिळतो.संग्रहालयात गोस्वामी तुलसीदास विरचित हनुमान बाहुक, विजय दोहावली, विनयपत्रिका (सटीक), षोडश रामायण, कुंडलिया रामायण आदी महत्त्वपूर्ण हस्तलिखितांचे जतन करण्यात आले आहे. हिंदी साहित्याच्या या अमूल्य वारशाच्या माध्यमातून भारतीय ज्ञानपरंपरेचा प्रसार आणि संवर्धन करण्याच्या उद्देशाने संग्रहालयातील उपलब्ध साहित्याचे हे विशेष प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.



प्रदर्शनाच्या आयोजनात सहायक प्रोफेसर डॉ. अनिर्बाण घोष,जनसंपर्क अधिकारी बी.एस.मिरगे,हर्ष आनंद,शिया,प्रियांशु,नयन आडे यांनी सहकार्य केले.

# शेतकऱ्यांना पीक स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन

**वर्धा/जनमाध्यम**

राज्यामध्ये पीक उत्पादकता वाढविण्यासाठी शेतकरी विविध प्रयोग करीत असतात. अशा प्रयोगशील शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने पीक स्पर्धा घेतली जाते. या स्पर्धेची प्रक्रिया ऑफलाइन पद्धतीने व्हायची. मात्र प्रक्रियेत पारदर्शकता व गतिमानता येण्याच्या उद्देशाने ऑनलाइन प्रणाली तयार करण्यात आली. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी पिक स्पर्धेत सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

अन्नधान्य, कडधान्य, व गळीतधान्यासाठी राज्यस्तरावर पीक स्पर्धा जाहीर करण्यात आल्या आहेत. सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी तालुकास्तरावरील पीक स्पर्धेत सहभागी होऊन शेतकऱ्यांची आलेली उत्पादकता आधारभूत धरून राज्य, जिल्हा व तालुकास्तरावरील स्पर्धेसाठी विजेत्या शेतकऱ्यांची निवड करण्यात येणार आहे. खरीप हंगामातील ११ पिकांसाठी स्पर्धा घेतली जाणार असून जिल्ह्यात तूर व सोयाबिन या पिकाचा समावेश करण्यात आला आहे. तालुका, जिल्हा व राज्य अशा तीन स्तरावर विजेत्यांची निवड करण्यात येईल. या पिकांसाठी ३१ ऑगस्ट पर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करावे.

स्पर्धेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्यांकडे स्वतःच्या नावाने जमीन असावी व ती जमीन तो स्वतः कसत असावा. एकावेळी अनेक पिकांच्या स्पर्धेत भाग घेता येईल. ज्या पिकाच्या स्पर्धेत भाग घेतला आहे, त्या पिकाची स्वतःच्या शेतात किमान ४० आर क्षेत्रावर सलग लागवड केलेली असावी. अर्जासोबत फार्मर आयडी, ठरवून दिलेले प्रवेश शुल्क भरल्याची पावती, आदिवासी असल्यास जात प्रमाणपत्र, बँक पासबूक यांचा तपशील जोडणे आवश्यक आहे

तालुका स्तरावर सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी पहिजे बक्षिस ५ हजार रुपये, दुसरे ३ हजार व तिसरे बक्षिस २ हजार रुपये, जिल्हास्तरावर पहिले १० हजार रुपये, दुसरे ७ हजार रुपये व तिसरे ५ हजार रुपये, राज्यस्तरावर पहिले ५० हजार रुपये, दुसरे ४० हजार रुपये व तिसरे ३० हजार रुपये बक्षिस देण्यात येणार आहे. जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी स्पर्धेत सहभागी होण्याकरिता कृषी विभागाच्या http://krishi.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर पीक स्पर्धा टॅबवर जाऊन ऑनलाइन अर्ज करावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे.

# प्रशासनाची कुंभकर्णी झोप बोरगाव-साहूर मार्गावर अपघातांचा धोका

**साहूर/जनमाध्यम**

बोरगाव (टूमनी) ते साहूर या चार किलोमीटर रस्त्याची गेल्या चार वर्षांपासून दुरवस्था झाली असून, सध्या हा मार्ग अक्षरशः मृत्यूचा सापळा बनला आहे. रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ता, अशी परिस्थिती निर्माण झाली असून पावसाचे पाणी खड्ड्यांत साचल्याने वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही दुरुस्ती होत नसल्याने संतप्त बोरगाव येथील युवकांनी अखेर स्वतः श्रमदान करून आणि स्वखर्चाने मुरूम टाकून खड्डे बुजविले.

या रस्त्याची आठ दिवसांत दुरुस्ती सुरू न झाल्यास चक्काजाम आंदोलन छेडण्याचा इशारा युवा संघटनेच्या कार्यकर्त्यांनी दिला आहे. याबाबत तहसीलदार तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडे लेखी निवेदनही देण्यात आले आहे.

बोरगाव-साहूर मार्गावर मोठमोठे खड्डे पडले असून त्यामध्ये पावसाचे पाणी साचल्याने रस्त्याला तळ्याचे स्वरूप आले आहे. पाण्याखालील खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने वाहनचालकांचे नियंत्रण सुटून अनेकदा अपघात झाले असून नागरिक जखमी झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.विशेषतः या मार्गावरून



**चार किलोमीटरच्या मार्गावर खड्ड्यांचे साम्राज्य; विद्यार्थ्यांसह नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर**

शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात ये-जा असते. पर्यायी मार्ग नसल्याने कॉन्व्हेंटच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनाही याच रस्त्यावरून प्रवास करावा लागतो. खड्ड्यांतून वाहन गेल्यानंतर चिखलाचे पाणी विद्यार्थ्यांच्या अंगावर उडत असल्याने अनेक विद्यार्थ्यांना अतिरिक्त गणवेश सोबत न्यावा लागत असल्याचे पालकांनी सांगितले.

गिट्टीचे ढिगारेही ठरताहेत धोकादायक

दोन वर्षांपासून रस्त्याच्या कडेला गिट्टीचे ढिगारे टाकून ठेवण्यात आले आहेत. आता या ढिगाऱ्यांवर गवत उगवले असून रात्रीच्या वेळी ते वाहनचालकांच्या लक्षात येत नसल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. रस्ता खडीकरण करून काम अर्धवट सोडण्यात आल्याने वाढत्या वाहतुकीचा ताण रस्त्याला सहन न झाल्याने त्याची आणखी चाळण झाल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधी आणि अधिकारी या मार्गावरून प्रवास करत असतानाही रस्त्याची दुरवस्था त्यांच्या निदर्शनास येत नाही का, असा प्रश्न युवकांनी उपस्थित केला आहे. वारंवार निवेदने देऊनही केवळ आश्वासनांची खैरात मिळत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र रोष निर्माण झाला आहे.आठ दिवसांत काम सुरू करा अन्यथा रस्त्यावर उतरू, असा इशारा युवा संघटनेने दिला असून, आता प्रशासनाची कुंभकर्णी झोप कधी मोडणार, असा प्रश्न ग्रामस्थांकडून उपस्थित होत आहे.

### महिलांनाही आंदोलनात उतरावे लागेल

बोरगाव ते साहूर रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय आणि जीवघेणी झाली आहे. आम्हा महिलांनाही दररोज याच मार्गावरून ये-जा करावी लागते. पावसाळ्यात खड्ड्यांमध्ये पाणी साचल्याने जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो. अनेकदा पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून केवळ टोलवाटोलवी होत आहे. त्यामुळे आता आम्हा महिलांनाही आंदोलनात सहभागी व्हावे लागेल.

**संतप्त महिला, बोरगाव (टूमनी)**

# धर्माचा खरा मार्ग आत्मशुद्धीतून मोक्षाकडे मुनिश्री कंचनतिलक विजयजी म.सा. यांचे मार्गदर्शन

**हिंगणघाट/जनमाध्यम**

धर्म म्हणजे केवळ सुख-संपत्ती मिळविण्याचे साधन नसून आत्म्याची शुद्धी करून मोक्षाच्या दिशेने वाटचाल करण्याचा पवित्र मार्ग आहे, असे भावस्पर्शी प्रतिपादन मुनिश्री कंचनतिलक विजयजी म.सा.यांनी केले. श्री जैन श्वेतांबर पार्श्वनाथ मंदिर ट्रस्टच्या वतीने आयोजित चातुर्मास महोत्सवात ते बोलत होते. त्यांच्या ओजस्वी आणि मार्मिक प्रवचनाने उपस्थित श्रावक-श्राविकांचे मन अंतर्मुख झाले.

धर्म आचरणामागील भावना शुद्ध असेल तर जीवनाला खरा अर्थ प्राप्त होतो.धनाची इच्छा असणाऱ्याला धन,भोगाची अपेक्षा असणाऱ्याला सुख मिळू शकते; मात्र मोक्षाची आकांक्षा मनात ठेवून धर्माचरण करणाऱ्याला आत्मशुद्धीचा मार्ग सापडतो,असे मुनिश्रींनी सांगितले.शेतकरी धान्य पिकवितो,गवत नव्हे. मात्र धान्यासोबत गवत आपोआप उगवते. त्याचप्रमाणे मनुष्याने धर्माचा उद्देश मोक्षरूपी धान्य मिळविणे हा ठेवावा; लौकिक सुखे त्यासोबत आपोआप प्राप्त होतील, असा सुंदर दृष्टांत त्यांनी दिला.यावेळी सर्व जीवांप्रती मैत्री, दुःखी जीवांप्रती करुणा आणि गुणीजनांविषयी आदर हीच धर्माची खरी मुळे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.प्रवचनानंतर नवनिर्मित भोजनशाळेचे उद्घाटन करण्यात आले. तसेच ४५ दिवसीय आगम तप एकासनास प्रारंभ झाला. यावेळी मोठ्या संख्येने श्रावक-श्राविका उपस्थित होते.

# संक्षिप्त

### मालवाहूतून हजारांच्या रोखसह मोबाईल पळविले

**वर्धा -** तुळजापूर महामार्गावरील सालोड शिवारातील पेट्रोलपंप परिसरात उभ्या असलेल्या मालवाहू वाहनातून अज्ञात चोरट्यांनी रोख रक्कम व दोन मोबाईल असा एकूण ३९ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी सावंगी पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.करण जाधव (२१), रा. पारनेर, जि. जालना व त्याचा मित्र मिरची विक्रीसाठी रायपूर येथे गेले होते. परतीच्या प्रवासात त्यांनी सालोड शिवारातील पेट्रोलपंपावर वाहनात इंधन भरले. रात्रीची वेळ झाल्याने दोघांनी आपापली वाहने पेट्रोलपंप परिसरात उभी केली आणि वाहनाच्या केबिनमध्येच झोपले. हीच संधी साधून अज्ञात चोरट्यांनी वाहनाच्या केबिनमधून दोन मोबाईल व १७ हजार रुपये रोख असा ऐवज लंपास केला. तक्रारीवरून सावंगी पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

### शेतकऱ्यांची ९१ लाखांनी फसवणूक

**सेलू -** हिंगणी येथील सर्वज्ञ जिनिंग-प्रेसिंग युनिटमध्ये कापूस विक्री केलेल्या शेतकऱ्यांना मोबदला न देता तब्बल ९१ लाख २१ हजार ४९८ रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी सेलू पोलिसांनी प्रवीण भास्कर बोरकुटे,रा. लक्ष्मीनगर, नागपूर याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.वासुदेव आंबुलकर (६१), रा. कान्होलीबारा यांच्यासह काही शेतकऱ्यांनी मार्च महिन्यात सर्वज्ञ जिनिंग-प्रेसिंग युनिटमध्ये ११०३.७० किलो कापूस विकला होता. कापूस खरेदी केल्यानंतर शेतकऱ्यांना पावत्या तसेच धनादेश देण्यात आले. मात्र, संबंधित धनादेश वटले नाहीत. शेतकऱ्यांनी बोरकुटे याच्याकडे वारंवार पैशाची मागणी केली. मात्र, त्यांच्याकडून समाधानकारक प्रतिसाद मिळाला नाही. अखेर शेतकऱ्यांनी सेलू पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. पोलिसांनी प्रकरणाचा तपास सुरू केला आहे,

### हरिओम ले-आउटमधील दोन घरे फोडली

**वर्धा -** कुटुंबीय घरात नसल्याची संधी साधून अज्ञात चोरट्यांनी आलोडी परिसरातील हरिओम ले-आउटमधील दोन घरे फोडून रोख रक्कम व मौल्यवान वस्तू असा एकूण ५५ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. याप्रकरणी सेवाग्राम पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.अविनाश झाडे (३९) यांच्या घरातून २० हजार रुपये रोख व सोन्याचे दागिने, तर जितेंद्र तिमांडे यांच्या घरातून १५ हजार रुपये रोख व तीन तोळे चांदी असा ऐवज चोरीस गेला. एकाच परिसरातील दोन घरे फोडल्याने नागरिकांमध्ये खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच सेवाग्राम पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. चोरट्यांचा माग काढण्यासाठी श्वान पथक व ठसे तज्ज्ञांना पाचारण करण्यात आले. पोलिसांनी परिसरातील माहिती घेत तपास सुरू केला आहे.

### भरधाव ऑटोची दुचाकीला धडक

**वर्धा -** भरधाव ऑटोने दुचाकीला धडक दिल्याने महिला दुचाकीस्वार जखमी झाल्याची घटना रेल्वे स्टेशन मार्गावर घडली. भावना जाधव (२८), रा. बोरगाव (मेघे) असे जखमी महिलेचे नाव आहे. याप्रकरणी शहर पोलिसांनी अज्ञात ऑटोचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.भावना जाधव या त्यांच्या एमएच ३० बीएच ९५२७ क्रमांकाच्या दुचाकीने रेल्वे स्टेशनच्या दिशेने जात होत्या. त्यावेळी मागून आलेल्या भरधाव ऑटोने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात त्या रस्त्यावर पडून जखमी झाल्या. घटनेनंतर ऑटोचालक घटनास्थळावरून निघून गेल्याचे सांगण्यात आले. जखमी महिलेने दिलेल्या तक्रारीवरून शहर पोलिसांनी अज्ञात ऑटोचालकाविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. पोलिसांकडून अपघाताचा पुढील तपास सुरू आहे,

### गोठ्यातील शेळ्या चोरट्यांनी लांबविल्या

**कारंजा (घा.) -** शेतातील गोठ्यात बांधून ठेवलेल्या तब्बल १८ शेळ्या अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना काकडा ते परसोडी मार्गावर उघडकीस आली. या शेळ्यांची किंमत सुमारे ७० हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.प्रज्वल कामडी (२४), रा. काकडा यांची परसोडी मार्गावर शेती आहे. त्यांनी शेतातील गोठ्यात शेळ्या व इतर जनावरे बांधून ठेवली होती. दरम्यान, अज्ञात व्यक्तींनी गोठ्यातील १८ शेळ्या लंपास केल्या. सकाळी ही बाब लक्षात आल्यानंतर कामडी यांनी पोलिसांकडे तक्रार दाखल केली. तक्रारीनुसार पोलिसांनी चोरीचा गुन्हा नोंदविला आहे. या प्रकरणात अमोल बारंगे, रा. वाघेडा याच्यावर संशय व्यक्त करण्यात आला असून पोलिसांकडून त्याची चौकशी व चोरीच्या शेळ्यांचा शोध घेण्याचे काम सुरू आहे.

### मासेमारीसाठी गेलेल्या युवकाचा मृत्यू

**कारंजा (घा.) -** मासे पकडण्यासाठी नदीपात्रात गेलेल्या युवकाचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना नारा येथील खडका नदीपात्रात घडली. प्रफुल्ल बोरवार (३२), रा. नारा असे मृत युवकाचे नाव आहे. याप्रकरणी कारंजा पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.प्रफुल्ल बोरवार हे मासेमारी करण्यासाठी खडका नदीपात्रात गेले होते. दरम्यान, नदीच्या पाण्यात ते बुडाले. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांचा शोध घेण्यात आला.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**

(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष** - १४ **अंक** - २५३
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल**-atimadhyam@gmail.com, abhiramdeshpande@gmail.com

## सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती

२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

### चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 481/22/2026
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **सुर्यवंशी बारी समाज मंडळ, कु-हा ता.तिवसा, जि.अमरावती, एफ -२४८१**
बाबत अर्जदार - **राजेंद्र नामदेव दारोकार**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३ अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?

(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**(अ) जंगम मिळकत - निरंक**

**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) - प्लॉटचे वर्णन** - नोंदणी पोट तुकडी अमरावती नोंदणी पोट तुकडी चांदूर रेल्वे, जि.प.अमरावती, ग्रा.प. कार्यालय कु-हा, कक्षेतील मौजा कु-हा, गाव नंबर ४९, प्र. कु-हा, ता.तिवसा, जि.अमरावती येथील

| शेत/गट नं. | हे. आर. | आकार रुपये | भो.वर्ग |
|---|---|---|---|
| २७७/१ | १.३६ | ३.६० | १ यातील |

० हे ०७ आर जमीन ८० x ९० ७२०० चौरस फुट (६६९.१४ चौ.मीटर) जागा

याची चर्तुसिमा :-

- पुर्वेस :- सुनिलकुमार जयस्वाल यांचे शेत
- पश्चिमेस :- सुनिलकुमार जयस्वाल यांचे शेत
- उत्तरेस :- सुनिलकुमार रामप्रसाद जयस्वाल यांचे शेत
- दक्षिणेस :- चांदूर रेल्वे ते तिवसा रोड

त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०९.०८.२०२६ रोजी दिली.

शिक्का

**(वाय.एस.शेख)**
**अधीक्षक, न्याय शाखा**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती**

---

**महाराष्ट्र शासन**

## तहसिलदार, चांदुर बाजार यांचे कार्यालय

**(जन्म मृत्यू प्रमाणपत्र शाखा)**

**Email-tah.chandurbz@gmail.com**

क्र./स.म.अ./कावी ४५९/२०२६ — दिनांक ०४/०८/२०२६

### जाहीरनामा

**अर्जदार :- शशिकला रामचंद्र वानखडे, रा.विरुळपुर्णा, ता. चांदूर बाजार, जि.अमरावती**

**-विरुध्द -**

**गैरअर्जदार :- निबंधक जन्म मृत्यू नोदणी तथा ग्रामपंचायत विरुळपुर्णा, ता.चांदूर बाजार, जि. अमरावती**

याव्दारे गावातील सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, **शशिकला रामचंद्र वानखडे, रा.विरुळपुर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती यांनी स्वतःचे जन्म दिनांक २७.१०.१९६०** त्यांचा राहत्या घरी झाला. परंतु त्यांचे जन्माची कार्यालय ग्रामपंचायत विरुळपुर्णा, ता.चांदूर बाजार जि.अमरावती येथे नोद करण्यात आली नाही.जन्माची नोंद जन्म मृत्यू कार्यालय ग्रामपंचायत विरुळपुर्णा यांचा प्रस्ताव या कार्यालयात दाखल केलेला आहे. पंचायत समिती चांदूर बाजार जि.अमरावती हददीमध्ये झालेला असल्यामुळे जन्म नोदणी करण्याबाबतचा अर्ज व ग्रामपंचायत विरुळपुर्णा यांचा प्रस्ताव या कार्यालयात दाखल केलेला आहे.

वरील जन्माची नोंद करुन देण्यास कोणत्याही व्यक्तीस अगर संस्थेस कोणाला काही आक्षेप अथवा हरकती असतील तर त्यांनी जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसाच्या आंत आपला आक्षेप अथवा हरकती लेख स्वरुपात या कार्यालयामध्ये दाखल कराव्यात. मुदतीनंतर प्राप्त झालेला आक्षेप अथवा हरकती ग्राहय धरण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. सदर जाहीरनामा आज दिनांक ०४.०८.२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी प्रसिध्दी करण्यात येत आहे.

शिक्का

**सही /-**
**तहसिलदार,**
**तथा तालुका दंडाधिकारी, चांदूर बाजार**

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.३५०/२०२६ — ने.ता.११.०९.२०२६

अर्जदार :
१. **उज्वला गंगाधरराव कु-हाडे**, वय ५६ वर्षे, व्यवसाय- घरकाम
२. **रामेश्वर गंगाधरराव कु-हाडे**, वय ४० वर्षे, व्यवसाय- शेती
३. **रुपेश गंगाधर कु-हाडे**, वय ३८ वर्षे, व्यवसाय- शेती
४. **आशिष गंगाधर कु-हाडे**, वय ३४ वर्षे, व्यवसाय- शेती
५. **योगिता गंगाधर कु-हाडे**, वय ३६ वर्षे, व्यवसाय- घरकाम,
सर्व रा.घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठिकाणी राहतात. **मृतक गंगाधर महादेव कु-हाडे** यांचा **मृत्यू दि.०८/०६/२०२६** रोजी रा.घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे. त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदार मयतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.३५०/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.०६.०८.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,चांदूर बाजार

---

**सीताबाई संगई एज्युकेशन सोसायटी, अंजनगाव सुर्जी**
**(जैन धार्मिक अल्पसंख्याक संस्था) द्वारा संचालित**
**सीताबाई संगई हायस्कूल / कनिष्ठ महाविद्यालय**
**(१००% अनुदानित) अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती**

**पाहिजेत**

| अ. क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक पात्रता | विषय | पदाची संख्या | गुगल फॉर्म लिंक |
|---|---|---|---|---|---|
| 1 | शिक्षण सेवक (वर्ग 6 वी ते 8 वी करिता) | B.A., B.Ed. T.E.T. / C.T.E.T अनिवार्य | इंग्रजी | 2 पद | |
| 2 | शिक्षण सेवक (वर्ग 6 वी ते 8 वी करिता) | B.Sc, B.Ed. T.E.T. / C.T.E.T अनिवार्य | गणित | 1 पद | |

1) वरील अनु.क्र. 1 व 2 चे पदाकरिता दि. 19/08/2026 बुधवार रोजी सकाळी 10.00 वाजता मुलाखतीस संस्थेच्या कार्यालयात उपस्थित राहावे. 2) वरील पदांसाठी पात्र उमेदवारांनी दिलेला QR Code स्कॅन करून आपला स्वहस्तलिखित विनंती अर्ज, मूळ कागदपत्रे, पासपोर्ट फोटो व आवश्यक प्रमाणपत्रे गुगल फॉर्ममध्ये भरून सादर करावे. 3) उमेदवाराने मुलाखतीस स्वखर्चाने, स्वलिखित अर्ज, मूळ कागदपत्रे व त्यांच्या छायांकित प्रतीसह संस्थेच्या कार्यालयात वेळेवर उपस्थित राहावे. 4) सेवानिवृत्ती / पदोन्नती मुळे रिक्त झालेल्या पदावर सदर नियुक्ती करण्यात येणार आहे. तसेच संस्था जैन धार्मिक अल्पसंख्याक असल्याने आरक्षण / बिंदूनामावली लागू नाही. 5) वयोमर्यादा व मानधन हे शासकीय नियमाप्रमाणे ग्राह्य असेल याची नोंद घ्यावी. 6) GCC-TBC / MSCIT / ICT व इतर संगणकीय विषयाचे ज्ञान असणाऱ्या उमेदवारास विशेष प्राधान्य देण्यात येईल.

**अध्यक्ष**
सीताबाई संगई एज्युकेशन सोसायटी
अंजनगाव सुर्जी

**सचिव**
शाळा समिती तथा
सी. सं. हायस्कूल/कमवि, अंजनगाव

---

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ३३२**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८

**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

---

# अमरावतीत अनेक पोलिस निरीक्षकांच्या बदल्या

# सायबर सेलच्या पीआयसह शहर व ग्रामीण अधिकाऱ्यांना नव्या पदस्थापना

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र पोलिस मुख्यालयाने २०२६ सालातील पोलिस निरीक्षकांच्या व्यापक बदल्यांचे आदेश जारी केले असून, राज्यभरातील शेकडो अधिकाऱ्यांसह अमरावती शहर व ग्रामीण पोलिस दलातील अनेक पोलिस निरीक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. या आदेशानुसार संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ कार्यमुक्त होऊन नव्या पदस्थापनेवर रुजू होण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

बदली आदेशानुसार पोलीस निरीक्षक जनार्दन सुभाष साळुंखे यांची अमरावती शहरातून पुणे ग्रामीण येथे बदली करण्यात आली आहे. सहेंद्र सुखदेव अंभोरे यांची अमरावती शहरातून पालघर येथे, तर गजानन यांची अमरावती शहरातून नागपूर शहर येथे नियुक्ती करण्यात आली आहे. अमरावती ग्रामीण पोलिस दलातील अशोक तुकाराम जाधव यांची नांदेड येथे, सुरेश रामेश्वर म्हस्के यांची नवी मुंबई येथे, तर अजित तोताराम राठोड यांची मुंबई शहर येथे बदली करण्यात आली आहे. दुसरीकडे, अमरावती पोलिस दलातही काही अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सतीश ओंकारराव पाटील यांची अमरावती ग्रामीणमधून अमरावती शहरात बदली झाली असून त्यांच्यावर नवीन जबाबदारी सोपविण्यात आली आहे. गुलाबराव पाटेकर यांची मुंबई शहरातून अमरावती ग्रामीण येथे नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच मंगेश पद्माकर मोहोड यांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागातून (एसीबी) अमरावती ग्रामीण पोलिस दलात बदली करण्यात आली आहे.

या बदल्यांमध्ये अमरावती शहरातील सायबर सेलच्या पोलिस निरीक्षकांचाही समावेश असल्याने सायबर गुन्ह्यांच्या तपास यंत्रणेतही बदल होणार आहेत. नव्याने रुजू होणाऱ्या अधिकाऱ्यांमुळे विविध पोलीस ठाणे व शाखांच्या कामकाजात काही प्रमाणात फेरबदल अपेक्षित आहेत. महाराष्ट्र पोलिस मुख्यालयाने सर्व संबंधित युनिट प्रमुखांना बदली झालेल्या अधिकाऱ्यांना कोणताही विलंब न करता तात्काळ कार्यमुक्त करण्याचे आदेश दिले आहेत. राज्यभर राबविण्यात आलेल्या या व्यापक प्रशासकीय फेरबदलामुळे अमरावती शहर व ग्रामीण पोलिस दलाच्या कार्यपद्धतीत तसेच जबाबदाऱ्यांच्या वाटपात लक्षणीय बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.




---

## फ्लॅट विकणे आहे

टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल आणि एक रूम असा फ्लॅट आहे.

**संपर्कः**
**९४२२८५७१६९, ९४२२९१८५६९**

---

## पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहीरात

**शिक्षक अभियोग्यता व बुध्दिमत्ता चाचणी-२०२५**

**संस्थेचे नांव- नवयुवक शिक्षण संस्था, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती संस्था कोड** (270714SC011)

**शाळेचे नांव - एन.टी.रडके हायस्कूल व शंकरराव बंदे कला, विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, वरुड, जायंट्स चौक, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती-४४४९०६**

**शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, विषय व पदनिहाय रिक्त पदांचा तपशिल**

**(मान्य दिनांक २०.०७.२०२६)**
**(प्रसिध्दी दिनांक २४.०७.२०२६)**

| अ. क्र. | माध्यम | पद | वेतनश्रेणी/ मानधन | अनुदान प्रकार | विषय | शिकविण्याचे माध्यम | आवश्यक शैक्षणिक पात्रता | आवश्यक व्यावसायिक पात्रता | TET/CTET | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Marathi | Graduate Teacher Std (6-8) | Consolidated Pay - GT 6-8 (16000) | Aided | Special Teacher (Arts) | Marathi | Graduation | Diploma/ Graduation | -- | 1 |
| 2. | Marathi | Graduate Teacher Std. (6-8) | Consolidated Pay GT 6-8 (16000) | Aided | Mathematics Science | Marathi | Graduation | Diploma Graduation | TET Paper 2/ (Maths-Science)/ CTET Paper-2 (Maths-Science) | 1 |
| 3. | Marathi | Graduate Teacher Std. (6-8) | Consolidated Pay GT 6-8 (16000) | Aided | Mathematics | Marathi | Graduation | Diploma/ Graduation | TET Paper 2/ (Maths-Science)/ CTET Paper-2 (Maths-Science) | 1 |
| 4. | Marathi | Graduate Teacher Std.9-10 | Consolidated Pay - GT 9-10 (18000) | Aided | Mathematics-Science | Marathi | Graduation | Graduation | -- | 1 |
| 5. | Marathi | Graduate Teacher Std.9-10 | Consolidatd Pay - GT 9-10 (18000) | Aided | Language English | -- | Graduation | Graduation | -- | 1 |
| 6. | Marathi | Graduate Teacher Std.9-10 | S-14 38600-122800 | Partially Aided 40% | Physical Education | Marathi | Graduation | Graduation | -- | 1 |
| | | | | | | | | Total | | 6 |

**आरक्षण निहाय रिक्त पदांचा तपशिल**

**अनु.जमाती-०१, भ.ज.(ड)-०१, विमाप्र-०१, इडब्ल्यूएस-०१, एसईबीसी-०१, खुला-०३ पैकी समांतर आरक्षण महिला-०१,**

**सर्वसाधारण सूचना -**

१. वरील सर्व पदांसाठी शिक्षक भरती संदर्भात पवित्र पोर्टलवर दिलेल्या अटी व नियम सर्व उमेदवारांसाठी बंधनकारक आहे.
२. अभियोग्यता व बुध्दीमत्ता चांचणी-२०२५ (TAIT) प्रविष्ठ झालेल्या उमेदवारांपैकी पवित्र प्रणाली (https://tait2025 mahateacherrecriuitment.org.in) या संकेतस्थळावर वैयक्तिक माहिती नोंदवून स्वप्रमाणित केलेली आहे, असेच उमेदवार जाहिरातीनुसार ऑनलाईन अर्ज करु शकतील.
३. इच्छुक व अर्हता धारण करणारे उमेदवारांनी पदभरतीच्या सविस्तर जाहीरातीसाठी पवित्र पोर्टलच्या संकेतस्थळाला भेट द्यावी.

**अध्यक्ष / सचिव,**
**नवयुवक शिक्षण संस्था, वरुड जि.अमरावती**

---

## पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहीरात

**शिक्षक अभियोग्यता व बुध्दिमत्ता चाचणी-२०२५** **(मान्य दिनांक २०.०७.२०२६)** **(प्रसिध्दी दिनांक ०६.०८.२०२६)**

**संस्थेचे नांव-** (270701SC002) Shri Haribaba Shikshan Prasarak Sanstha, Borgaon Peth (Secondary/Higher Secondary) - With Interview **शैक्षणिक स्तर** - Secondary/Higher Secondary

Shri Haribaba Shikshan Prasarak Sanstha, Borgaon Peth या व्यवस्थापनाच्या शाळेमध्ये खाली नमुद केलेल्या पदांसाठी आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करीत असलेल्या व पवित्र प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**आरक्षण निहाय रिक्त पदांचा तपशील**

| अ. क्र. | प्रवर्ग | महिला | माजी सैनिक | अंश-कालीन | प्रकल्प-ग्रस्त | भुकंप-ग्रस्त | खेळाडू | समांतर आरक्षण व्यतिरिक्त (उर्वरित) पदे | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अनु.जाती | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २. | अनु. जमाती | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३. | अनु.जमाती(pesa) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४. | वि. जा.(अ) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५. | भ. ज. (ब) | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| ६. | भ. ज. (क) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७. | भ. ज. (ड) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ८. | इ. मा. व | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| ९. | वि. मा. प्र | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १०. | ई. डब्लू. एस. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ११. | एसईबीसी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १२. | खुला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |

**दिव्यांग (४ टक्के)**

| अस्थिव्यंग (१ टक्का) | कर्णबधिर (१ टक्का) | अंध/अल्पदृष्टी (१ टक्का) | Intellectual Disability and Multiple Disability (1%) ID | MD | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| ० | ० | ० | 0 | 0 | ० |

**अनाथ (१ टक्के)**

| अनाथ संस्थात्मक | अनाथ संस्थाबाह्य |
|---|---|
| ० | ० |

| | | महिला | माजी सैनिक | अंश-कालीन | प्रकल्प-ग्रस्त | भुकंप-ग्रस्त | खेळाडू | समांतर आरक्षण व्यतिरिक्त (उर्वरित) पदे | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३. | **एकुण** | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | २ |

**शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, विषय व पदनिहाय रिक्त पदांचा तपशिल (प्रसिध्दी दिनांक ०६.०८.२०२६)**

| अ. क्र. | माध्यम | पद | वेतनश्रेणी/ मानधन | अनुदान प्रकार | विषय | शिकविण्याचे माध्यम | आवश्यक शैक्षणिक पात्रता | आवश्यक व्यावसायिक पात्रता | TET/CTET | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Marathi | Graduate Teacher Std.(9-10) | Consolidated Pay - GT 9-10 (18000) | Aided | Mathematics Science | Marathi | Graduation | Graduation | -- | 1 |
| 2. | Marathi | Graduate Teacher Std.(9-10) | Consolidated Pay-GT 9-10 (18000) | Aided | Language English | -- | Graduation | Graduation | | 1 |
| | | | | | | | | **Total** | - | **2** |

**सर्वसाधारण सुचना -**

१) अभियोग्यता व बुध्दिमत्ता चांचणी २०२५ (TAIT) प्रविष्ट झालेल्या उमेदवारापैकी ज्या उमेदवारांनी पवित्र प्रणाली (https://tait2025mahateacherrecruitment.org.in) या संकेतस्थळावर वैयक्तिक माहिती नोंदवून स्वप्रमाणित केलेली आहे असे उमेदवार जाहिरातीनुसार ऑनलाईन अर्ज करु शकतील.
२) ईच्छुक व अर्हता प्राप्त करणारे उमेदवार ऑनलाईन जाहिरातीच्या अनुषंगाने पात्र असलेल्या पदासाठी पसंती क्रमांक नमुद करुन पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करतील.
३) इ.१ ली ते इ.५ वी व इ.६ वी ते इ.८ वी या गटातील पदांसाठी अभियोग्यता व बुध्दिमत्ता चांचणी-२०२२ (TAIT) परीक्षेपुर्वी शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) उत्तीर्ण असणारे उमेदवारच अर्ज करु शकतील. डिसेंबर २०२२ मध्ये CTET करीता प्रविष्ट उमेदवारांचा निकाल मात्र TAIT परीक्षेनंतर लागलेला असल तरी असे उमेदवार अर्ज करण्यास पात्र ठरतील.
४) इ.६ वी ते इ.८ वी या गटातील इतिहास/भूगोल/सामाजिक शास्त्र या विषयांसाठी उमेदवार शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) सामाजिकशास्त्र विषय घेऊन TET-Paper-2/CTET-Paper-2 उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
५) इ.६ वी ते इ.८ वी या गटातील विज्ञान/गणित-विज्ञान या विषयांसाठी उमेदवार शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) गणित-विज्ञान विषय घेऊन TET-Paper-2/CTET-Paper2 उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
६) इ.६ वी ते इ.८ वी या गटातील भाषा या विषयांसाठी उमेदवार शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) गणित-विज्ञान किंवा सामाजिक शास्त्र यापैकी कोणताही विषय घेऊन TET-Paper2/CTET-Paper-2 उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
७) इ.१ ली ते ८ वी/इ.९ वी ते १२ वी/अध्यापक विद्यालय, या गटातील पदांसाठी अर्ज करणारा उमेदवार अभियोग्यता व बुध्दिमत्ता चांचणी-२०२५ ((TAIT)) या चाचणीस प्रविष्ट असणे आवश्यक आहे.
८ शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता व अध्यापनाचे विषय, वयोमर्यादा, आरक्षण, अन्य पात्रता व आवश्यक कागदपत्रे इत्यादीसाठी सर्वसाधारण सुचना सविस्तर तपशिलासह https://tait2022.mahateacherrecruitment.org.in या संकेतस्थळावर पवित्र प्रणालीमध्ये **उमेदवारांसाठी सर्वसाधारण सूचना** या शिर्षाखाली उपलब्ध आहेत. सदर सुचना व सुचनामध्ये नमुद आवश्यक शासन आवश्यक शासन निर्णय यांचे अवलोकन करुन स्वतःची खात्री करुनच ऑनलाईन अर्ज करावेत.
९) व्यवस्थापनाने जाहिरातीत दर्शविलेल्या एकुण पदांमध्ये दिव्यांग आरक्षणाच्या पदांचा समावेश आहे.
१०) व्यवस्थापनाने जाहिरातीत दर्शविलेल्या एकुण पदांमध्ये अनाथ आरक्षणाच्या पदांचा समावेश आहे.
११) व्यवस्थापनाच्या जाहिरातीत दर्शविलेल्या आरक्षणामध्ये व पदसंख्येमध्ये बदल होण्याची शक्यता आहे.
१२) उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालयांच्या अध्यापनाच्या दोन विषयांसाठी एक पूर्णकालीन पदाची जाहिरात असल्यास, या पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांची शैक्षणिक अर्हता दोन्ही विषयांमध्ये पदव्युत्तर पदवी (किमान द्वितीय श्रेणीमध्ये) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
१३) जिल्हा परिषद शाळांमध्ये नव्याने नियुक्त होणाऱ्या शिक्षकांना शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग दिनांक २१.०६.२०२३ मधील तरतुदीनुसार जिल्हा बदलीचा हक्क असणार नाही, याचीउमेदवारांनी नोंद घ्यावी.
१४) महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षण अधिनियम दि.२६.०२.२०२४ अनुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता

**अध्यक्ष / सचिव,**
**श्री.हरिबाबा शिक्षण प्रसारक संस्था,**
**बोरगांव पेठ, ता.अचलपूर, जि.अमरावती**

**मुख्याध्यापक,**
**श्री.हरिबाबा विद्यालय**
**बोरगांव पेठ, ता.अचलपूर, जि.अमरावती**

---

## पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहीरात

**शिक्षक अभियोग्यता व बुध्दिमत्ता चाचणी-२०२५** **(मान्य दिनांक २३.०७.२०२६)** **(प्रसिध्दी दिनांक ०६.०८.२०२६)**

**संस्थेचे नांव-** (270715SC044) **बाल शिक्षण मंडळ, खापर्डे बगीचा, अमरावती**
शैक्षणिक स्तर - प्रायमरी

**बाल शिक्षण मंडळ, खापर्डे बगीचा, अमरावती** या व्यवस्थापनाच्या शाळेमध्ये खाली नमुद केलेल्या पदांसाठी आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करीत असलेल्या व पवित्र प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**आरक्षण निहाय रिक्त पदांचा तपशील**

| अ. क्र. | प्रवर्ग | महिला | माजी सैनिक | अंश-कालीन | प्रकल्प-ग्रस्त | भुकंप-ग्रस्त | खेळाडू | समांतर आरक्षण व्यतिरिक्त (उर्वरित) पदे | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अनु.जाती | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| २. | अनु. जमाती | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३. | अनु.जमाती(pesa) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४. | वि. जा.(अ) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५. | भ. ज. (ब) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६. | भ. ज. (क) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७. | भ. ज. (ड) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ८. | इ. मा. व | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ९. | वि. मा. प्र | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १०. | ई. डब्लू. एस. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ११. | एसईबीसी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १२. | खुला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |

**दिव्यांग (४ टक्के)**

| अस्थिव्यंग (१ टक्का) | कर्णबधिर (१ टक्का) | अंध/अल्पदृष्टी (१ टक्का) | Intellectual Disability and Multiple Disability (1%) ID | MD | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| ० | ० | ० | 0 | 0 | ० |

**अनाथ (१ टक्के)**

| अनाथ संस्थात्मक | अनाथ संस्थाबाह्य |
|---|---|
| ० | ० |

| | | महिला | माजी सैनिक | अंश-कालीन | प्रकल्प-ग्रस्त | भुकंप-ग्रस्त | खेळाडू | समांतर आरक्षण व्यतिरिक्त (उर्वरित) पदे | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३. | **एकुण** | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |

**शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, विषय व पदनिहाय रिक्त पदांचा तपशिल (मान्य दिनांक २३.०७.२०२६)**

| अ. क्र. | माध्यम | पद | वेतनश्रेणी/ मानधन | अनुदान प्रकार | विषय | शिकविण्याचे माध्यम | आवश्यक शैक्षणिक पात्रता | आवश्यक व्यावसायिक पात्रता | TET/CTET | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Marathi | Under Graduate Teacher Std.(1-4/5) | Consolidated Pay - UGT (16000) | Aided | All Subjects | Marathi | HSC (Std. 12th) | Diploma | TET Paper 1/CTET Paper-1 | 1 |
| | | | | | | | | **Total** | - | **1** |

**सर्वसाधारण सुचना -** १)अभियोग्यता व बुध्दिमत्ता चांचणी २०२५ (TAIT) प्रविष्ट झालेल्या उमेदवारापैकी ज्या उमेदवारांनी पवित्र प्रणाली (https://tait2025mahateacherrecruitment.org.in) या संकेतस्थळावर वैयक्तिक माहिती नोंदवून स्वप्रमाणित केलेली आहे असे उमेदवार जाहिरातीनुसार ऑनलाईन अर्ज करु शकतील. २)ईच्छुक व अर्हता प्राप्त करणारे उमेदवार ऑनलाईन जाहिरातीच्या अनुषंगाने पात्र असलेल्या पदासाठी पसंती क्रमांक नमुद करुन पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करतील. ३) इ.१ ली ते इ.५ वी व इ.६ वी ते इ.८ वी या गटातील पदांसाठी अभियोग्यता व बुध्दिमत्ता चांचणी-२०२२ (TAIT) परीक्षेपुर्वी शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) उत्तीर्ण असणारे उमेदवारच अर्ज करु शकतील. डिसेंबर २०२२ मध्ये CTET करीता प्रविष्ट उमेदवारांचा निकाल मात्र TAIT परीक्षेनंतर लागलेला असल तरी असे उमेदवार अर्ज करण्यास पात्र ठरतील. ४) इ.६ वी ते इ.८ वी या गटातील इतिहास/भूगोल/सामाजिक शास्त्र या विषयांसाठी उमेदवार शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) सामाजिकशास्त्र विषय घेऊन TET-Paper-2/CTET-Paper-2 उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. ५)इ.६ वी ते इ.८ वी या गटातील विज्ञान/गणित-विज्ञान या विषयांसाठी उमेदवार शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) गणित-विज्ञान विषय घेऊन TET-Paper-2/CTET-Paper2 उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. ६)इ.६ वी ते इ.८ वी या गटातील भाषा या विषयांसाठी उमेदवार शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) गणित-विज्ञान किंवा सामाजिक शास्त्र यापैकी कोणताही विषय घेऊन TET-Paper2/CTET-Paper-2 उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. ७)इ.१ ली ते ८ वी/इ.९ वी ते १२ वी/ अध्यापक विद्यालय, या गटातील पदांसाठी अर्ज करणारा उमेदवार अभियोग्यता व बुध्दिमत्ता चांचणी-२०२२ ((TAIT)) या चाचणीस प्रविष्ट असणे आवश्यक आहे. ८) शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता व अध्यापनाचे विषय, वयोमर्यादा, आरक्षण, अन्य पात्रता व आवश्यक कागदपत्रे इत्यादीसाठी सर्वसाधारण सुचना सविस्तर तपशिलासह https://tait2022.mahateacherrecruitment.org.in या संकेतस्थळावर पवित्र प्रणालीमध्ये **उमेदवारांसाठी सर्वसाधारण सूचना** या शिर्षाखाली उपलब्ध आहेत. सदर सुचना व सुचनामध्ये नमुद आवश्यक शासन आवश्यक शासन निर्णय यांचे अवलोकन करुन स्वतःची खात्री करुनच ऑनलाईन अर्ज करावेत. ९)व्यवस्थापनाने जाहिरातीत दर्शविलेल्या एकुण पदांमध्ये दिव्यांग आरक्षणाच्या पदांचा समावेश आहे. १०)व्यवस्थापनाने जाहिरातीत दर्शविलेल्या एकुण पदांमध्ये अनाथ आरक्षणाच्या पदांचा समावेश आहे. ११) व्यवस्थापनाच्या जाहिरातीत दर्शविलेल्या आरक्षणामध्ये व पदसंख्येमध्ये बदल होण्याची शक्यता आहे. १२)उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालयांच्या अध्यापनाच्या दोन विषयांसाठी एक पूर्णकालीन पदाची जाहिरात असल्यास, या पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांची शैक्षणिक अर्हता दोन्ही विषयांमध्ये पदव्युत्तर पदवी (किमान द्वितीय श्रेणीमध्ये) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. १३) जिल्हा परिषद शाळांमध्ये नव्याने नियुक्त होणाऱ्या शिक्षकांना शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग दिनांक २१.०६.२०२३ मधील तरतुदीनुसार जिल्हा बदलीचा हक्क असणार नाही, याचीउमेदवारांनी नोंद घ्यावी. १४)महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षण अधिनियम दि.२६.०२.२०२४ अनुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षणाची तरतूद विहितकरण्यात आली आहे. या आरक्षणाची कार्यपध्दती सदर आरक्षणाच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल याचिका क.३४६८/२०२४ तसेच त्या अनुषंगिक इतर याचिकांवरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहील.

**अध्यक्ष**
**बाल शिक्षण मंडळ, खापर्डे बगीचा,**
**जि.अमरावती**

**सचिव,**
**बाल शिक्षण मंडळ, खापर्डे बगीचा,**
**जि.अमरावती**

---

## पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहीरात

**शिक्षक अभियोग्यता व बुध्दिमत्ता चाचणी-२०२५** **(मान्य दिनांक २३.०७.२०२६)** **(प्रसिध्दी दिनांक ०६.०८.२०२६)**

**संस्थेचे नांव-** (270715SC056) PRAGATI BALAK MANDIR, AMRAVATI TQ.DIST.AMRAVATI (Primary) -With Interview

PRAGATI BALAK MANDIR, AMRAVATI TQ.DIST.AMRAVATI या व्यवस्थापनाच्या शाळेमध्ये खाली नमुद केलेल्या पदांसाठी आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करीत असलेल्या व पवित्र प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**आरक्षण निहाय रिक्त पदांचा तपशील**

| अ. क्र. | प्रवर्ग | महिला | माजी सैनिक | अंश-कालीन | प्रकल्प-ग्रस्त | भुकंप-ग्रस्त | खेळाडू | समांतर आरक्षण व्यतिरिक्त (उर्वरित) पदे | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अनु.जाती | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| २. | अनु. जमाती | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३. | अनु.जमाती(pesa) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४. | वि. जा.(अ) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५. | भ. ज. (ब) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६. | भ. ज. (क) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७. | भ. ज. (ड) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ८. | इ. मा. व | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ९. | वि. मा. प्र | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १०. | ई. डब्लू. एस. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ११. | एसईबीसी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १२. | खुला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |

**दिव्यांग (४ टक्के)**

| अस्थिव्यंग (१ टक्का) | कर्णबधिर (१ टक्का) | अंध/अल्पदृष्टी (१ टक्का) | Intellectual Disability and Multiple Disability (1%) ID | MD | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| ० | ० | ० | 0 | 0 | ० |

**अनाथ (१ टक्के)**

| अनाथ संस्थात्मक | अनाथ संस्थाबाह्य |
|---|---|
| ० | ० |

| | | महिला | माजी सैनिक | अंश-कालीन | प्रकल्प-ग्रस्त | भुकंप-ग्रस्त | खेळाडू | समांतर आरक्षण व्यतिरिक्त (उर्वरित) पदे | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३. | **एकुण** | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |

**शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, विषय व पदनिहाय रिक्त पदांचा तपशिल (मान्य दिनांक २३.०७.२०२६)**

| अ. क्र. | माध्यम | पद | वेतनश्रेणी/ मानधन | अनुदान प्रकार | विषय | शिकविण्याचे माध्यम | आवश्यक शैक्षणिक पात्रता | आवश्यक व्यावसायिक पात्रता | TET/CTET | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Marathi | Under Graduate Teacher Std. (1-4/5) | Consolidated Pay - UGT (16000) | Aided | All Subjects | Marathi | HSC (Std. 12th) | Diploma | TET Paper 1/ CTET Paper 1 | 1 |
| | | | | | | | | **Total** | - | **1** |

**सर्वसाधारण सुचना -** १)अभियोग्यता व बुध्दिमत्ता चांचणी २०२५ (TAIT) प्रविष्ट झालेल्या उमेदवारापैकी ज्या उमेदवारांनी पवित्र प्रणाली (https://tait2025mahateacherrecruitment.org.in) या संकेतस्थळावर वैयक्तिक माहिती नोंदवून स्वप्रमाणित केलेली आहे असे उमेदवार जाहिरातीनुसार ऑनलाईन अर्ज करु शकतील. २)ईच्छुक व अर्हता प्राप्त करणारे उमेदवार ऑनलाईन जाहिरातीच्या अनुषंगाने पात्र असलेल्या पदासाठी पसंती क्रमांक नमुद करुन पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करतील. ३)इ.१ ली ते इ.५ वी व इ.६ वी ते इ.८ वी या गटातील पदांसाठी अभियोग्यता व बुध्दिमत्ता चांचणी-२०२५ (TAIT) परीक्षेपुर्वी शिक्षक पात्रता परीक्षा (TET/CTET) उत्तीर्ण असणारे उमेदवारच अर्ज करु शकतील. ४) शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता व अध्यापनाचे विषय, वयोमर्यादा, आरक्षण, अन्य पात्रता व आवश्यक कागदपत्रे इत्यादीसाठी सर्वसाधारण सुचना सविस्तर तपशिलासह https://tait2025.mahateacherrecruitment.org.in या संकेतस्थळावर पवित्र प्रणालीमध्ये **उमेदवारांसाठी सर्वसाधारण सूचना** या शिर्षाखाली उपलब्ध आहेत. सदर सुचना व सुचनामध्ये नमुद आवश्यक शासन आवश्यक शासन निर्णय यांचे अवलोकन करुन स्वतःची खात्री करुनच ऑनलाईन अर्ज करावेत. ५)व्यवस्थापनाने जाहिरातीत दर्शविलेल्या एकुण पदांमध्ये दिव्यांग आरक्षणाच्या पदांचा समावेश आहे. ६)व्यवस्थापनाने जाहिरातीत दर्शविलेल्या एकुण पदांमध्ये दिव्यांग आरक्षणाच्या पदांचा समावेश आहे. ७) व्यवस्थापनाच्या जाहिरातीत दर्शविलेल्या एकुण पदांमध्ये अनाथ आरक्षणाच्या पदांचा समावेश आहे. ८) उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालयांच्या अध्यापनाच्या दोन विषयांसाठी एक पूर्णकालीन पदाची जाहिरात असल्यास, या पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांची शैक्षणिक अर्हता दोन्ही विषयांमध्ये पदव्युत्तर पदवी (किमान द्वितीय श्रेणीमध्ये) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. ९)जिल्हा परिषद शाळांमध्ये नव्याने नियुक्त होणाऱ्या शिक्षकांना शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग दिनांक २१.०६.२०२३ मधील तरतुदीनुसार जिल्हा बदलीचा हक्क असणार नाही, याचीउमेदवारांनी नोंद घ्यावी. १०)महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षण अधिनियम दि.२६.०२.२०२४ अनुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षणाची तरतूद विहित करण्यात आली आहे. या आरक्षणाची कार्यपध्दती सदर आरक्षणाच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल याचिका क.३४६८/२०२४ तसेच त्या अनुषंगिक इतर याचिकांवरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहील.

**अध्यक्ष**
**प्रगती बालक मंदिर, अमरावती**
**ता.जि.अमरावती**

**सचिव,**
**प्रगती बालक मंदिर, अमरावती**
**ता.जि.अमरावती**

## संक्षिप्त



### मिलिंद विद्यालयात गणवेश वाटप

**खल्लार-** नजिकच्या गौरखेडा (चांदई )येथिल मिलिंद विद्यालयात विद्यार्थ्यांना गणवेश वितरणाचा कार्यक्रम पार पडला.अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक अमितकुमार वानखडे हे होते. प्रमुख उपस्थिती विनोद इंगळे,सचिन इंगळे,कैलास घुरडे,पुनम सांगोले,जयश्री घुरडे,संगीता घुरडे,जितेंद्र तायडे,सुरेखा सोळके, मेघा चव्हाण ,संदिप सोळंके,सोपान सांगोले,गुलमाने विचार उपस्थित होते.डॉ.बाबासाहेब आंबेडकर व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेच्या पूजन करुन कार्यक्रम सुरु करण्यात आला.पाहुण्यांच्या हस्ते विद्यालयातील विद्यार्थ्यांना गणवेश वितरित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे क्रिडा शिक्षक दिपक कावरे यांनी केले.तर आभार प्रशांत वानखडे व संचालन अमोल बोबडे यांनी केले. कार्यक्रमाला विद्यालयातील शिक्षक प्रशांत वानखडे,दिपक कावरे,वासुदेव भांडे,मनिषा गावंडे,पूजा काळे,रोशना इंगळे, अमोल बोबडे,दिपक रहाटे,संजय आठवल, आनंद खंडारे, मुमताज पठाण व विद्यार्थी उपस्थित होते.

### रामदास पाटील यांची शेगाव येथे बदली

**अचलपूर-** अचलपूर सहाय्यक दुय्यम निबंधक रामदास पाटील यांची शेगाव येथे प्रशासकीय बदली झाली असून सहाय्यक दुय्यम निबंधक रामदास पाटील यांनी अचलपूर तालुक्यात कर्तव्यदक्ष, प्रामाणिक अधिकारी म्हणून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली होती. २०२४ वर्षी ५ फेब्रुवारी रोजी अचलपूर सहाय्यक दुय्यम निबंधक म्हणून रामदास पाटील यांनी पदभार स्वीकारून कामाला सुरवात केली होती.



एकीकडे सहायक दुय्यम निबंधक हे पद एक महत्त्वाचे व जबाबदारीचे पद मानले जाते.अचलपूर तालुक्याच्या कार्यालयात रोज नागरिकांची प्लॉट, शेती, घर,दुकाने खरेदी विक्री व इतर कामांकरिता नेहमी गर्दी असते.विशेष म्हणजे उन्हाळ्याचे दिवस असताना कार्यालयाच्या बाहेर नागरिकांना उन्हात बसावे लागत होते.याची तत्काळ दखल घेत त्यांनी त्या ठिकाणी टेन्ट टाकून सावली कशी निर्माण होईल याकडे लक्ष देऊन नागरिकांची बसण्याकरिता उत्तम सोय करून दिली. कमी कालावधीतीच आपल्या कर्तव्यदक्ष शैलीमुळे त्यांनी वेगळी ओळख निर्माण केली आहे.कार्यालयात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीशी संवाद साधत त्यांनी तक्रारी,समस्या मांडणाऱ्या नागरिकांच्या चेहऱ्यावर कार्यालयातून परत जाताना निर्माण केलेला चेहऱ्यावरचा समाधानच त्यांच्या कार्यशैलीची मोठी पावती आहे. अचलपूर दुय्यम निबंधक म्हणून रामदास पाटील यांच्या कार्यालयात तालुक्यातील विविध क्षेत्रातील नागरिकांनी गर्दी करून त्यांना पुढील वाटचाली करीता शुभेच्छा दिल्या.

### मंदिरातील १५० ग्रॅम चांदीची छत्री चोरी

येवदा - येथील ऋषीवाडी परिसरातील महादेव-विठ्ठल-रुक्माई मंदिरातून देवमूर्तीवरील १५० ग्रॅम वजनाची चांदीची छत्री चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. याबाबत नाजुकराव आत्माराम गावंडे (वय ६८, रा. ऋषीवाडी, येवदा) यांनी पोलिसांत तक्रार दिली. तक्रारीनुसार,६ ते ५ ऑगस्ट रोजी सकाळी ६ या कालावधीत अज्ञात व्यक्तीने मंदिरातील महादेव, विठ्ठल-रुक्माई व गजानन महाराज यांच्या मूर्तीवरील सुमारे १५० ग्रॅम वजनाची, अंदाजे २५ हजार किमतीची जुनी चांदीची छत्री चोरून नेली.पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला असून आरोपीचा शोध सुरू आहे.

# ‘काउचपफी’तर्फे स्वातंत्र्यदिनानिमित्त अमरावतीकरांसाठी सर्वात मोठी भेट!

## १५ व १६ ऑगस्ट रोजी अमरावतीत फर्निचर खरेदीची सर्वात मोठी संधी!

**५०,०००रू किंवा त्याहून अधिक खरेदीवर मिळवा लकी ड्रॉ कूपन**

**१७ ऑगस्ट रोजी फेसबुक व इंस्टाग्राम वर लाईव्ह लकी ड्रॉ**








आपण सर्वांनी कुटुंबासह काउचपफी फर्निचर्स येथे भेट देऊन या भव्य मेगा सेलचा लाभ घ्यावा, ही नम्र विनंती.
काउचपफी फर्निचर्स
१ लाख चौ.फूट प्रीमियम फर्निचर आणि गिफ्ट मॉल
ड्रीम्सलँड बिझनेस पार्क, राहटगाव रोड, नागपूर रोड, अमरावती
स्वातंत्र्यदिनाच्या हार्दिक शुभेच्छा!
श्री अनिलकुमार अग्रवाल आणि अमित अग्रवाल

**जिंका एकूण १५ आकर्षक बक्षिसे**
**प्रथम बक्षीस** - १ प्रीमियम रिक्लायनर (किंमत रू ३०,०००)
**द्वितीय व तृतीय बक्षीस** - २ स्टायलिश टी-टेबल
**चतुर्थ व पंचम बक्षीस** - २ प्रीमियम ऑफिस चेअर
**सातव बक्षिसे** - १० आकर्षक होम डेकोर हॅम्पर्स





**अमरावती/का.प्र.**

स्वातंत्र्यदिनानिमित्त काउचपफी फर्निचर्स घेऊन आले आहे भव्य Independence Mega Sale, जिथे मिळणार आकर्षक ऑफर्स, मोठी बचत आणि १५ आकर्षक बक्षिसे जिंकण्याची सुवर्णसंधी.१५ व १६ ऑगस्ट रोजी रू.५०,००० किंवा त्याहून अधिक खरेदीवर प्रत्येक ग्राहकाला लकी ड्रॉ कुपन मिळेल. सर्व विजेत्यांची घोषणा १७ ऑगस्ट रोजी फेसबुक व इंस्टाग्राम वर लाईव्ह केली जाईल.

**धमाकेदार ऑफर्स वर निवडक फर्निचरवर Flat 50% OFF**

१०० होम्स - १०० बेडरूम सेट मेगा ऑफर बेडरूम सेट फक्त १४९,९०० पासून यामध्ये समाविष्ट : किंग साईझ बेड, आलमारी, २ साईड टेबल, ड्रेसिंग टेबल १०० + प्रीमियम बेडरूम सेट्स डिस्प्लेमध्ये उपलब्ध होम डेकोर वर १ घ्या आणि १ फ्री मिळवा नवीन ऑफिस फर्निचर. शोरूमच्या उद्घाटनानिमित्त विशेष ऑफर २०,००० चौ. फूट भव्य ऑफिस फर्निचर शोरूम

**व्हिजीटर चेअर वर १ घ्या आणि १ फ्री मिळवा (मर्यादित कालावधीसाठी)**

बजाज फायनान्स द्वारे सोपी ई एम आय सुविधा उपलब्ध १ लाख चौ. फूट प्रीमियम फर्निचर व गिफ्ट मॉल घर, ऑफिस आणि होम डेकोरसाठी विदर्भातील सर्वात मोठी रेंज.नवीन २०,००० चौ. फूट ऑफिस फर्निचर मॉल ऑफिस सोफा, एक्झिक्युटिव्ह टेबल्स, व्हिजीटर चेअर, कॉन्फरन्स टेबल्स, रिसेप्शन टेबल्स, बुक केस, गेमिंग चेअर, वर्कस्टेशन तसेच आधुनिक ऑफिस फर्निचरची विशाल रेंज

**होम डेकोरची आकर्षक दुनिया**

डिझाईनर घड्याळ, पितळी कलाकृतींचा संग्रह, लाकडी सजावटीच्या वस्तू, डिझाईनर कुंड्या, सजावटीचे पुतळे, घरातील फाऊन्टन, प्रेरणादायी व्यक्तिमत्वे, देवांच्या सुंदर मूर्ती तसेच शेकडो नवीन सजावटीच्या वस्तू.

**एकाच छताखाली विदर्भातील सर्वात मोठी रेंज**

५०० पेक्षा जास्त डिझाइनर सोफा, २०० पेक्षा जास्त डायनिंग टेबल, १०० पेक्षा जास्त प्रीमियम बेडरूम सेट, रिक्लायनर चेअर्स, मसाज चेअर्स, सोफा कम बेड, मॅट्रेस, ऑफिस फर्निचर, आउट डोअर फर्निचर व गिफ्ट गॅलरी फक्त १५ व १६ ऑगस्ट खरेदी करा, बचत करा, लकीड्रॉमध्ये सहभागी व्हा, आकर्षक बक्षिसे जिंका.

### प्रा. नरेंद्र राऊत यांच्या हस्ते कुलगुरू डॉ.आवलगावकर यांना ‘ग्रामगीता’ भेट

**तिवसा-** पहिल्या मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूर येथे अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी झाली. या कार्यक्रम प्रसंगी प्रा. नरेंद्र राऊत एम ए २ (अभिजात भाषा व मराठी वाड्मय) यांनी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ अविनाश आवलगावकर यांना वंदनीय राष्ट्रसंत रचित युग ग्रंथ ग्रामगीता हा ग्रंथ सप्रेम भेट म्हणून दिला व सोबतच या विद्यापीठात संबंधित विविध विषयांमध्ये राष्ट्रसंतांच्या साहित्याचा समावेश करावा, प्रामुख्याने एम.ए. भाग एक व दोन (अभिजात भाषा व मराठी वाड्मय) तसेच बी.ए. च्या वर्गामध्ये त्यांच्या साहित्याचा समावेश करण्यात यावा या विषयीचे विद्यार्थ्यांच्या सह्यांचे



निवेदन देखील सादर करण्यात आले. तर प्रमुख वक्ते म्हणून प्रा. मनोज मुनेश्वर व प्रा. शुभम बुटले यांनी या दोन्ही महामानवांच्या जीवनावर प्रकाश टाकला व उपस्थितांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन प्रा.श्रेयस कोल्हेकर यांनी केले तर आभार प्रा.अमृता मोरे यांनी केले. कार्यक्रमाला विद्यापीठाचे प्राध्यापक, विद्यार्थी तथा कर्मचारी वृंद उपस्थित होते.

### विद्यापीठातील गृहविज्ञान विभागात स्तनपान जनजागृती सप्ताह

**अमरावती/का.प्र.**

विद्यार्थी हे उद्याचे पालक, कुटुंबाचे सदस्य, जागरूक नागरिक असून, आहार आणि आरोग्य याबाबत सर्वाप्रती सजग असायला हवे, यादृष्टीने जागतिक स्तनपान सप्ताह निमित्ताने ‘ब्रेस्टफिडिंग फॉर सस्टेनेबल स्टार्टिंग लाईफ : स्ट्रेंग्थन ब्हॉट वर्क्स’ या थीम वर संत गाडगेबाबा विद्यापीठातील गृह विज्ञान विभागाच्या फुड सायन्स अँन्ड न्युट्रिशन या पदव्युत्तर पदवीच्या विद्यार्थ्यांनी सप्ताहदरम्यान विविध पैलूंवर आधारित पोस्टर्सद्वारे स्तनपानविषयी जनजागृती केली. विद्यार्थ्यांनी स्तनपानाच्या अनुषंगाने पोस्टर्सच्या माध्यमातून स्तनपान जनजागृतीचा संदेश प्रभावीपणे मांडला. तयार केलेल्या



पोस्टर्समध्ये सुंदर हस्ताक्षर, आकर्षक चित्रे,प्रभावी घोषवाक्ये आणि माहितीपूर्ण संदेश यांचा कल्पकतेने वापर करण्यात आला. सदर पोस्टर्सच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी स्तनपानाचे महत्त्व,आईच्या पहिल्या दुधाचे महत्त्व, दुध वाढविणारे पदार्थ, स्तनपान करण्याच्या पध्दती, फॉर्मुला मिल्क, मिल्क बँक, नवमातांनी स्तनपान करताना कोणत्या चुका टाळाव्यात, स्तनपानाबाबतचे गैरसमज दूर करणे, बॉटल फीडिंग, स्तनपान व मुदतपूर्व बाळ, वर्किंगमदर्स, मातांना कुटुंबाकडून मिळणारे सहकार्य आणि स्तनपानासाठी अनुकुल वातावरण यांसारख्या विषय बाबींवदरे जनजागृती करण्यात आली. याबेळी गृहविज्ञान विभागप्रमुख डॉ. वैशाली धनविजय यांनी उपस्थितांना स्तनपानाबाबत मार्गदर्शन करताना स्तनपानाचे बालकाच्या शारीरिक व मानसिक विकासातील महत्त्व, आई आणि बाळाच्या आरोग्यास होणारे फायदे, स्तनपानाबाबत योग्य माहिती, समाजातील गैरसमज दूर करणे याविषयी सविस्तर माहिती दिली. उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुमित गेडाम यांच्या मार्गदर्शनाखाली सत्र १ च्या विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. उपक्रमाच्या माध्यमातून जागरुक माता, निरोगी बालक, सुदृढ कुटुंब, निरोगी समाज असा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यात आला. कार्यक्रमाला विभागातील रविशा आंबेकर, दिपाली भैसे, शिल्पा इंगोले, आयतल कामदार, अनुश्री आडे, शिक्षकेतर कर्मचारी अशोक हिरे, वसंत इंगळे, चरणदास जामठे, विद्यार्थी उपस्थित होते.

### १२ व १३ ऑगस्टला आयटीआयमध्ये उर्वरित जागांसाठी थेट प्रवेश

**‘शेवटची संधी’!**

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (आयटीआय) प्रवेश घेण्यास इच्छुक, मात्र अद्याप प्रवेशापासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांसाठी दिलासादायक बातमी आहे. राज्यातील आयटीआयमधील रिक्त जागा भरण्यासाठी १२ व १३ ऑगस्ट रोजी संस्थास्तरीय समुपदेशन फेरी आयोजित करण्यात आली आहे.



समुपदेशनाचे वेळापत्रक जाहीर केले जाईल. १२ व १३ ऑगस्ट रोजी प्रत्यक्ष समुपदेशनाद्वारे गुणवत्ता, पात्रता आणि उपलब्ध जागांच्या आधारे प्रवेश निश्चित करण्यात येणार आहेत.

यापूर्वीच्या चार प्रवेश फेऱ्यांमध्ये प्रवेश न मिळालेल्या तसेच नव्याने अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांसाठी ही अंतिम व अत्यंत महत्त्वाची संधी मानली जात आहे. प्रवेश प्रक्रियेनुसार ८ ऑगस्ट रोजी संस्थास्तरीय समुपदेशनासाठी एकत्रित गुणवत्ता यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. पात्र विद्यार्थ्यांनी ९ व १० ऑगस्टदरम्यान आपल्या लॉगिनद्वारे इच्छित आयटीआयसाठी ऑनलाइन नोंदणी करणे आवश्यक आहे. त्यानंतर ११ ऑगस्ट रोजी संस्थानिहाय गुणवत्ता यादी आणि

दरम्यान, राज्यात तृतीय तर अमरावती विभागात प्रथम क्रमांक पटकावलेल्या एकनाथराव रानडे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय),नांदगाव खंडेश्वर येथे विविध ट्रेडमध्ये संस्थास्तरीय समुपदेशन फेरीअंतर्गत प्रवेशासाठी जागा उपलब्ध आहेत.त्यामुळे नांदगाव खंडेश्वर व परिसरातील विद्यार्थ्यांना कौशल्याधारित शिक्षणाची सुवर्णसंधी उपलब्ध झाली असून, प्रवेशापासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांनी या अंतिम फेरीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

#### आयटीआयमध्ये ११० जागा उपलब्ध

संस्थास्तरीय समुपदेशन फेरीसाठी एकनाथराव रानडे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नांदगाव खंडेश्वर येथे विविध व्यवसाय अभ्यासक्रमांसाठी एकूण ११० जागा उपलब्ध आहेत. इच्छुक विद्यार्थ्यांनी ऑनलाइन नोंदणी पूर्ण करून १२ ऑगस्ट रोजी आवश्यक मूळ कागदपत्रांसह संस्थेत उपस्थित राहून प्रवेश प्रक्रियेत सहभागी व्हावे.

- **यु. एन. परिहार,** प्राचार्य, आयटीआय नांदगाव खंडेश्वर

### डॉ.रवींद्र वाघमारे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान

**टाकरखेडा संभू/वार्ताहर**

वाढदिवसाच्या आनंदाला समाजसेवेची जोड देण्याची प्रेरणादायी परंपरा जपत आदरणीय डॉ. रवींद्र वाघमारे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराला बढ़ुरा ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. गेल्या १६ वर्षांपासून सुरू असलेल्या या समाजोपयोगी उपक्रमाचे यंदा १७वे वर्ष असून, यावेळी तब्बल ५७ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण केला.

आयुर्वेदिक महाविद्यालयाचे माजी निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. रवींद्र वाघमारे यांनी आपल्या वैद्यकीय सेवेसोबतच सामाजिक बांधिलकी जपत समाजातील गरजू घटकांसाठी सातत्याने योगदान दिले आहे. रुग्णसेवेला मानवसेवेचे स्वरूप देत त्यांनी अनेकांच्या आयुष्यात आशेचा किरण निर्माण केला आहे. त्यांच्या याच सेवाभावी कार्यातून प्रेरणा घेत गावकऱ्यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी उपक्रमांची ही परंपरा सातत्याने



पुढे नेली आहे. याच सेवाभावी परंपरेचा एक भाग म्हणून आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात ५७ रक्तदात्यांनी रक्तदान करून गरजू रुग्णांसाठी जीवनदायी योगदान दिले. युवकांसह विविध वयोगटातील बढ़ुरावासीयांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. यावेळी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष बबलू देशमुख हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून नरेंद्र रोंघे व वसंत धंदर होते. रक्तदान शिबिराच्या यशस्वी ते करिता जय माताजी ग्रुप, श्री गजानन महाराज ग्रुप व गुणवंत महाराज ग्रुप तसेच गावकऱ्यांनी परिश्रम करून शिबीर यशस्वी केले.

### आज अंजनगाव बारी मार्गावर चार तास वाहतूक बंद

#### सायकल स्पर्धेनिमित्त पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे आवाहन

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

अमली पदार्थ विरोधी जनजागृती अभियानांतर्गत अमरावती सायकलिंग असोसिएशनच्या वतीने रविवार, ९ ऑगस्ट रोजी शालेय विद्यार्थ्यांची सायकल स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा सकाळी ६.३० ते १०.३० या वेळेत प्रा. राम मेघे कॉलेज, अंजनगाव बारी ते उद्खेड-पार्डी (देवी) रेल्वे गेट क्र. ६८ या सुमारे ८.५ किलोमीटर मार्गावर होणार आहे. स्पर्धेत मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी होणार असल्याने त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने स्पर्धा मार्गावरील सर्व प्रकारच्या जड व हलक्या वाहनांसह बस वाहतुकीस तात्पुरती बंदी घालण्यात आली आहे.

याबाबत अमरावती शहरचे पोलीस उपायुक्त (मुख्यालय) यांच्या निर्देशानुसार अधिसूचना जारी करण्यात आली आहे. या कालावधीत अंजनगाव बारी येथील नागरिकांनी कोंडेश्वर मंदिर-कोंडेश्वर टी-पॉईंट या पर्यायी मार्गाचा वापर करावा, तर उद्खेड-पार्डीकडून येणाऱ्या नागरिकांनी

पार्डी-मालखेड-लालखेड-मोगरा -भानखेड-दस्तूर नगर या पर्यायी मार्गाने प्रवास करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

सदर आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर मोटार वाहन कायदा १९८८ व महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा वाहतूक विभागाने दिला आहे.

तसेच नागरिकांनी वाहतूक निर्बंधांचे काटेकोर पालन करून पोलीस प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन सहायक पोलीस आयुक्त (वाहतूक) संजय खताळे यांनी केले आहे.

### २५० हेक्टर पिकांचे मोठे नुकसान; पंचनामे सुरू

#### महसूल व कृषी विभागाकडून पाहणी; शेतकऱ्यांना तातडीच्या मदतीची अपेक्षा

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

मुसळधार पावसामुळे अंजनगाव बारी परिसरातील २२ गावांतील सुमारे २५० हेक्टर क्षेत्रावरील सोयाबीन, कपाशी व इतर खरीप पिकांसह मोठ्या प्रमाणात सुपीक माती वाहून गेली आहे. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवले असून आर्थिक अडचणी अधिक तीव्र झाल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर महसूल विभागाचे तलाठी व कृषी विभागाचे कृषी सहाय्यक यांनी नुकसानग्रस्त शेतांची प्रत्यक्ष पाहणी सुरू केली असून पंचनामे करून अहवाल शासनाकडे पाठविण्याची प्रक्रिया सुरू आहे. अनेक शेतकऱ्यांकडे दुबार पेरणीसाठी आवश्यक भांडवल नसल्याने शासनाने तातडीने



‘नुकसानग्रस्त शेतांची प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामे करण्यात येत आहेत. अहवाल वरिष्ठ कार्यालयाकडे सादर केला जाईल. शासनाच्या नियमानुसार पात्र शेतकऱ्यांना मदत मिळण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.’

-**प्रियंका पाटबाजे,** कृषी सहाय्यक,

‘अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतजमिनींचे पंचनामे महसूल विभागामार्फत सुरू असून सर्व अहवाल मंडळ अधिकारी यांच्या माध्यमातून तहसील कार्यालयाकडे सादर करण्यात येत आहेत. शासनाच्या नियमानुसार पात्र शेतकऱ्यांना मदत मिळण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.’

-**विजय देशमुख,** तलाठी, अंजनगाव बारी

‘मुसळधार पावसामुळे माझ्या शेतातील पिके व सुपीक माती वाहून गेली. शासनाने तातडीने पंचनामा करून नुकसानभरपाई व दुबार पेरणीसाठी आर्थिक मदत द्यावी.’

-**विजय गुलालकरी,** शेतकरी

‘अतिवृष्टीमुळे माझ्या शेतीचे मोठे नुकसान झाले. नाल्याचे व रस्त्याचे पाणी शेतात घुसल्याने बंधारे फुटले व सुपीक माती वाहून गेली. प्रशासनाने योग्य नुकसानभरपाई द्यावी.’

-**सागर इंघाने,** शेतकरी

नुकसानभरपाई, विशेष आर्थिक मदत व दुबार पेरणीसाठी अनुदान मंजूर करावे, अशी मागणी शेतकरी करीत आहेत.

### जि.प.शाळेच्या चार विद्यार्थिनी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र

**लेहेगाव-** जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा, धामणगाव (पंचायत समिती मोर्शी) येथील चार विद्यार्थिनींनी शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन करून शाळेच्या नावलौकिकात भर घातली आहे. शिष्यवृत्ती परीक्षेत स्वरा अजय निंभेकर, पूर्वा रवींद्र तायडे,राधिका गजानन खरसे आणि आनंदी पवन दळवी या विद्यार्थिनी पात्र ठरल्या आहेत.त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शाळा,गाव तसेच परिसरातून त्यांचे कौतुक होत आहे.विद्यार्थिनींच्या यशामागे त्यांची जिद्द,पालकांचे सहकार्य आणि शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन लाभले. त्यांना समूह साधन केंद्र सावरखेड पिंगळाईचे केंद्र समन्वयक सुनील बोकाडे,मुख्याध्यापक राजेंद्र बाघ तसेच शिक्षिका वृषाली ढाकुलकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.



विद्यार्थिनींच्या या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन समिती,पालक,ग्रामस्थ तसेच शिक्षणप्रेमींनी त्यांचे आणि मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले असून,भविष्यातही शाळेची यशाची परंपरा कायम राहील,असा विश्वास व्यक्त केला आहे.

# महायुती धर्माविरुद्ध सत्तारूढ सरकारचीच भूमिका


## कर्जमाफीचा गळफास बच्चू कडूंच्या गळयात, नेतृत्व संपविण्याचा घाट

**अमरावती (प्रतिनिधी) दि.८ : शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करणार, या आश्वासनाची आठवण करून देत कर्जमाफीच्या मुद्यावरून सरकारला वेठीस धरणाऱ्या विधान परिषद आमदार बच्चू कडू यांचे पंख छाटण्याचा कार्यक्रम आता भाजपकडूनच राबविला जात आहे. महायुतीचा धर्म पाळा, असे सहकारी पक्षांना सांगणाऱ्या भाजप नेतृत्वाने महायुतीतील घटक पक्षाविरुद्ध भूमिका घेतल्याचे दिसते.**







अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सत्तेवरून बच्चू कडू यांना पायउतार करण्यासाठी चक्क महायुतीलाच नख लावण्याच्या प्रकारातून ही बाब समोर आलेली आहे.

शेतकऱ्यांची बँक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत शेतकरी आणि वैयक्तिक असे सभासदाचे दोन प्रकार आहेत. परंतु बँकेचे संचालक होण्यासाठी कुणीही उठसूठ दहा हजार रुपयांचे शेअर घेऊन बँकेचे सभासद होत होते. यातून तब्बल सहा हजार अर्ज बँकेकडे दाखल झालेले होते. आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वातील बँकेची सत्ता उलथवून लावण्याचा डाव त्यामागे होता. शिवाय बँकेच्या शेतकरी धोरणाला बाधा पोहोचण्याची शक्यता होती. ही बाब लक्षात घेऊन बँकेच्या संचालक मंडळाने उपविधीमध्ये कायदेशीर दुरूस्ती करून वैयक्तीक सभासद ही तरतूद संपुष्टात आणली आणि सभासदत्वासाठी आलेले सहा हजार अर्ज फेटाळून लावले. हा घटनाक्रम सप्टेंबर २०२३ दरम्यानचा आहे.

ज्याचे सभासदत्व अर्ज बँकेने फेटाळून लावले, त्यापैकी सुमारे १२०० अर्जदारांनी सहकार विभागाच्या सहसंचालकाकडे अपिल केले. सहसंचालकांनी सुद्धा ते अपिल फेटाळून लावले. त्याचवेळी बच्चू कडू यांच्या एका राजकीय विरोधकासह त्याच्या कुटुंबातील अन्य दोघांचे अपिल मान्य केले. म्हणजेच एकाच प्रकारासह सहसंचालकांनी दोन वेगवेगळे निर्णय दिले. त्या स्थितीत ज्या तिन अर्जदारांचे अपिल सहसंचालकांनी मान्य केले, त्या निर्णयाविरुद्ध बँकेने रिविजन अर्ज सहकार मंत्र्यांकडे दाखल केला. मंत्र्यांनी बँकेचे अपिल मान्य करत तिघांच्या संदर्भातील सहसंचालकांचा निर्णय रद्दबातल ठरविला.

मात्र खरी राजकीय खेळी त्यानंतर सुरू झाली. सहसंचालकांनी जे इतर ११६३ अर्ज फेटाळून लावले होते ते सर्वच्या सर्व सहकारमंत्र्यांनी पात्र ठरवून त्यांना अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सभासदत्व बहाल करण्याचा निर्णय दिला.

अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत अध्यक्ष बच्चू कडू यांच्यासह आमदार राजेश वानखडे, आमदार प्रतापदादा अडसड, आमदार प्रवीण पोटे, सहकार नेते सुधाकर भारसाकळे, माजी आमदार नरेशचंद्र ठाकरे, आमदार संजय खोडके, आमदार सुलभाताई खोडके, राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सुरेखाताई ठाकरे यांची सत्ता आहे. हे सर्वच महायुतीच्या घटक पक्षाचे नेते आहेत. दुसरीकडे सहकार मंत्र्यांनी ज्या ११६३ अर्जदारांना बँकेचे सभासद करून देण्याचा निर्णय घेतला आहे, ते सर्वच अर्जदार काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष व बँकेचे माजी अध्यक्ष बबलू देशमुख, माजी मंत्री यशोमती ठाकूर, खासदार बळवंत वानखडे, माजी आमदार प्रा. वीरेंद्र जगताप, बाळासाहेब अलोणे, हरिभाऊ मोहोड यांच्या गटातील आहे. सहकार मंत्री बाळासाहेब पाटील यांच्या एका निर्णयाने अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील महायुतीची सत्ता उलथवून टाकण्याचा प्रयत्न असल्याची चर्चा आहे.

# राजकीय पदाधिकारी व पत्रकारांच्या बनावट सह्या आणि नावांचा गैरवापर

## -कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सचिवाची केली तक्रार

### -उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल, दर्यापूर खळबळ

**खल्लार/प्रतिनिधीः-** कृषी उत्पन्न बाजार समिती, दर्यापूरच्या सचिवांच्या कारभाराबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे राजकीय पदाधिकारी व पत्रकार यांच्या बनावट सह्या व नावाचा गैरवापर करुन तक्रार दाखल करण्यात



आल्याचे प्रकरण समोर आल्याने दर्यापूरात खळबळ उडाली आहे.

■ दर्यापूर बाजार समितीच्या सचिवासंदर्भात आम्ही कुठलीही तक्रार केली नाही ज्या व्यक्तीने ही तक्रार केली असेल त्या व्यक्तीची तात्काळ चौकशी करावी आणि आमच्या खोट्या नावाचा आणि सह्यांचा वापर केला त्या व्यक्तीवर तात्काळ कार्यवाही करावी. **-अंकुश पाटील कावडकर** -युवासेना, जिल्हाप्रमुख अमरावती

सादर करण्यात आलेल्या तक्रार अर्जात आठ नावे व सह्या त्यांच्या संमतीशिवाय वापरण्यात आल्या असून संबंधित व्यक्तींनी सदर तक्रारीशी आपला कोणताही संबंध नसल्याचे स्पष्ट केले आहे. याबाबत उपविभागीय पोलीस ☞(पान २ वर)

# स्कूल बसच्या धडकेत चिमुकलीचा दुर्दैवी मृत्यू

## -रिद्धपूर येथील घटना, चालक अटकेत -आजोबांच्या डोळयांसमोर घडला अपघात





**मोर्शी/प्रतिनिधीः-** स्कूल बसमधून उतरून घरी जात असताना त्याच बसच्या धडकेने एका चिमुकल्या विद्यार्थिनीचा घटनास्थळीच अत्यंत दुर्दैवी मृत्यू झाला. ही हृदयद्रावक घटना मोर्शी तालुक्यातील रिद्धपूर येथील बाजार चौकात शनिवारी (दि.८) दुपारी १२ वाजताच्या सुमारास घडली. ईश्वरी रवींद्र ठाकरे असे मृत चिमुकलीचे नाव आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात तीव्र संताप व हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ईश्वरी ही चांदूर बाजार येथील 'आनंद प्रायमरी स्कूल'मध्ये केजी-१ मध्ये शिकत होती. शनिवारी ☞(पान २ वर)

# दर्यापूर आगारात पाच नव्या बसेस दाखल

### खासदार वानखडे, आमदार लवटे यांच्या हस्ते लोकार्पण

### -प्रवाशांना दिलासा, दहा बस लवकरच मिळणार

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर आगाराच्या ताफ्यात पाच नविन बसेस दाखल झाल्या असून, या बसेसचे लोकार्पण खासदार बळवंत वानखडे व आमदार गजानन लवटे यांच्या



हस्ते करण्यात आले.

नविन बसेस प्रवाशांच्या सेवेत दाखल झाल्याने दर्यापूर आगारातील वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे. ☞(पान २ वर)

# दर्यापूरातील दरोडा प्रकरणात एका आरोपीला गुजरातमधून अटक

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर येथिल शिक्षक कॉलनीमधिल माहोरे ज्वेलर्स येथे ३१ ऑगस्टला रात्री आठ वाजताच्या सुमारास पाच अज्ञात दरोडेखोरांनी बंदूकीचा धाक दाखवून ज्वेलर्स दुकानातून ५०० ग्रॅम सोने व १३ किलो चांदी लंपास करुन पलायन केले होते. याप्रकरणी दर्यापूर पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुध्द गुन्हा दाखल करुन तपासाच्या दिशेने पथके तयार केली होती. यात शुभम संतोष चांदुरकर या आरोपीला गुजरातमधून



पकडण्यात पोलिसांना यश आले आहे. उर्वरित आरोपीला लवकरच अटक करण्यात येईल असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला. अटक केलेल्या आरोपीला पोलिस पथकाने बाहेर जिल्ह्यात नेले असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. याप्रकरणात आणखी धक्कादायक माहिती समोर येण्याची दाट शक्यता आहे.

# वेदिका कांबळे शिष्यवृत्ती परीक्षेत तालुक्यात प्रथम




**चांदूररेल्वे/प्रतिनिधी :-** जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा, सोनोरा बुद्रुक येथील वेदिका सिद्धार्थ कांबळे हिने इयत्ता चौथी शिष्यवृत्ती परीक्षेत ३०० पैकी २५० गुण मिळवत चांदूररेल्वे तालुक्यात सर्वाधिक गुणांनी पात्र ठरण्याचा मान मिळविला आहे. तिची शिष्यवृत्तीसाठी निवड झाली असून या यशामुळे शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. तसेच इयत्ता पाचवीतील श्रावस्ती सचिन लेंडे ही विद्यार्थिनी देखील शिष्यवृत्ती मिळविण्या☞(पान २ वर)

# महापालिकेकडे तक्रार केल्याने दिली धमकी

### ५७ वर्षीय व्यक्तीला शिवीगाळ; दोघांवर गुन्हा

**अमरावती/प्रतिनिधीः-** प्रधानमंत्री आवास योजनेतील फ्लॅट भाड्याने दिल्याच्या प्रकरणाची महापालिकेकडे चौकशीची मागणी केल्याच्या कारणावरून ५७ वर्षीय व्यक्तीला फोनवरून तसेच सार्वजनिक ठिकाणी अश्लील शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी बडनेरा पोलिसांनी एका पुरुषासह महिलेविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांकडील माहितीनुसार, बाळाधन दादाराव गावंडे (वय ५७) यांनी निंभोरा परिसरातील यमुना निवासी बृहद्देशीय संस्थेअंतर्गत प्रधानमंत्री आवास योजनेतील लाभार्थ्यांना मिळालेले फ्लॅट भाड्याने दिल्याच्या प्रकाराची चौकशी करण्याची मागणी केली होती. याबाबत त्यांनी अमरावती महापालिका आयुक्तांकडे लेखी अर्जही केला होता. या ☞(पान २ वर)

# तारखेड्यात पोलिसांची अवैध दारू विक्रेत्यांवर कारवाई

## ३ फ्रीजसह दुचाकी व देशी,गावठी दारू जप्त

### ३ महिलांसह दोघांवर गुन्हे दाखल.

**तिवसा/प्रतिनिधीः-** अवैध दारूविक्री विरुद्ध तिवसा पोलिसांनी चांगलीच कंबर कसली असून तारखेडा गावात ४ राहत्या घरातून देशी व गावठी दारुसंह त्यासाठी वापरण्यात येणारे ३ फ्रीज,दुचाकी असा एकूण ८५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून ५ जणांवर गुन्हे दाखल केले आहे.



रमेश बोरवार, गजानन बोरवार यासह विमल मेश्राम,सिमा मेश्राम व मंगला डायरे (रा.सर्व तारखेडा) असे कारवाई करण्यात आलेल्या पाच जणांची नावे आहेत. तिवसा पोलिसांनी दारूबंदी कायद्यांवये गुन्हा दाखल केला आहे.गेल्या काही दिवसांपासून तिवसा पोलीस स्टेशन हद्दीत येणाऱ्या तारखेडा या गावात अवैध दारूविक्री होत असल्याबद्दल☞(पान २ वर)

# हरवलेले ५९ मोबाईल मुळ मालकांच्या हाती

### गाडगेनगर पोलिसांची कामगिरी

**अमरावती/प्रतिनिधीः-** गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या डी.बी. पथकाने हरविलेल्या मोबाईलचा शोध घेण्यासाठी राबविलेल्या विशेष मोहिमेत उल्लेखनीय यश मिळविले आहे. सीईआयआर पोर्टलच्या माध्यमातून मे, जून आणि जुलै महिन्यात हरविलेले एकूण ५९ मोबाईल फोन, ज्यांची एकूण किंमत ११ लाख ८० हजार रुपये आहे, त्यांचा शोध घेऊन संबंधित तक्रारदारांना सुरक्षितपणे परत करण्यात आले.



गाडगेनगर पोलीस ठाण्यात मोबाईल हरवल्याच्या विविध तक्रारी प्राप्त झाल्यानंतर डी.बी. पथकाने ☞(पान २ वर)

# लिलाबाई पाटील यांचे निधन

**टाकरखेडा शंभू/प्रतिनिधीः-** येथील रहिवासी असलेल्या लिलाबाई



देवरावजी पाटील उर्फ तपस्विनी लखुबाई सा लोणारकर यांचे ८ ऑगस्ट २०२६ शनिवारला सकाळी ११.३० वाजता वृद्धापकाळमुळे निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुली व पाच मुले विवाहित, सुना, नातवंड असा आप्त परिवार आहे. त्यांच्यावर टाकरखेडा शंभू येथील हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# बेपत्ता तीन अल्पवयीन मुली परतवाड्यात सुखरूप सापडल्या

### -राजापेठ पोलिसांची तत्पर कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** घरातून बेपत्ता झालेल्या तीन अल्पवयीन मुलींचा राजापेठ पोलिसांनी तातडीने शोध घेत त्यांना परतवाडा बसस्थानकावरून सुखरूप शोधून काढले. तांत्रिक माहितीच्या आधारे पोलिसांनी केलेल्या जलद तपासामुळे मुली सुरक्षित मिळाल्याने त्यांच्या कुटुंबीयांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

राजापेठ पोलीस ठाण्यात शनिवारी (८ ऑगस्ट) एका महिलेने त्यांच्या तीन मुली बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली. त्यावरून राजापेठ पोलिसांनी गुन्हा क्रमांक ७३२/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम १३७(२) अंतर्गत अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला. तक्रार मिळताच राजापेठ पोलिसांनी वेळ न दवडता शोधमोहीम हाती घेतली. सी.आर. मोबाईल पथक, पोलीस कर्मचारी आणि तांत्रिक तपासाच्या माध्यमातून मुलींचा ठावठिकाणा शोधण्यास सुरुवात करण्यात आली. विविध ठिकाणी शोध घेत असताना तांत्रिक पुराव्यांच्या आधारे मुली परतवाडा बसस्थानक परिसरात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. माहितीची खातरजमा केल्यानंतर पोलिसांच्या पथकाने तातडीने परतवाडा गाठले आणि तिन्ही मुलींना सुखरूप ताब्यात☞(पान २ वर)

# धामोरी फाट्यावरील तरुणाच्या खुनाचा छडा

## -५५० मोबाईल क्रमांक, ६१ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले

### दोन मुख्य आरोपी जेरबंद

**अमरावती/प्रतिनिधीः-** धामोरी फाट्याजवळ तरुणाचा चाकूने वार करून खून केल्यानंतर पसार झालेल्या आरोपींचा अखेर खोलापूर पोलिसांनी छडा लावला. तांत्रिक तपास, मोबाईल क्रमांकांचे विश्लेषण आणि तब्बल ६१ ठिकाणांवरील सीसीटीव्ही फुटेजची पडताळणी केल्यानंतर पोलिसांनी या प्रकरणातील दोन मुख्य आरोपींना अटक केली आहे. अन्य फरार आरोपींचा शोध सुरू आहे. खोलापूर पोलीस ठाण्याच्या



हद्दीत २९ जुलै रोजी ही घटना घडली होती. राहुल ☞(पान २ वर)

# सारांश

रविवार, ९ ऑगस्ट २०२६ E-paper-www.janmadhyam.com जनमाध्यम एक प्रतिष्ठित सवय




# सलमान खानवर कोट्यवधींच्या फसवणुकीचा आरोप

बॉलिवूडचा सुपरस्टार सलमान खान पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. यावेळी कारण आहे 'बीइंग ह्युमन' ज्वेलरी शोरूमशी संबंधित कथित फसवणूक प्रकरण. चंदीगड येथील जिल्हा न्यायालयाने या प्रकरणात सलमान खान, त्याची बहीण अलविरा खान अग्निहोत्री तसेच 'स्टाईल अँड कंटेंट ज्वेलरी प्रायव्हेट लिमिटेड'च्या संचालकांना समन्स बजावले आहेत.

**काय आहे संपूर्ण प्रकरण?**


मिळालेल्या माहितीनुसार, हे प्रकरण २०२१ मध्ये दाखल करण्यात आलेल्या तक्रारीशी संबंधित आहे. तक्रारदार अरुण गुप्ता यांच्या म्हणण्यानुसार, त्यांची काही वर्षांपूर्वी 'बिग बॉस'च्या सेटवर सलमान खानशी भेट झाली होती. त्यावेळी सलमानने त्यांना 'बीइंग ह्युमन' ज्वेलरीचे शोरूम सुरू करण्याचा सल्ला दिला आणि उद्घाटनाला उपस्थित राहण्याचे आश्वासन दिले होते.

सलमानवर विश्वास ठेवून अरुण गुप्ता यांनी 'बीइंग ह्युमन ज्वेलरी'ची प्रफँचायझी घेतली आणि शोरूम उभारण्यासाठी सुमारे ३ कोटी रुपयांची गुंतवणूक केली. यातील जवळपास १ कोटी रुपये शोरूमच्या उभारणीवर खर्च झाल्याचा दावा त्यांनी केला आहे. यासाठी त्यांनी 'स्टाईल अँड कंटेंट ज्वेलरी प्रायव्हेट लिमिटेड' या कंपनीसोबत करार केला होता. ही कंपनी 'बीइंग ह्युमन' ज्वेलरी ब्रँडच्या मार्केटिंग आणि परवान्याशी संबंधित असल्याचे सांगण्यात आले आहे.

शोरूम बंद झाल्याचा आरोप :

अरुण गुप्ता यांनी आरोप केला आहे की, त्यांनी करारातील सर्व अटी पूर्ण केल्या होत्या. मात्र शोरूम सुरू झाल्यानंतर कंपनीकडून अपेक्षित व्यावसायिक सहकार्य मिळाले नाही. त्यानंतर अचानक शोरूम बंद करण्यात आले. त्यांच्या म्हणण्यानुसार, फेब्रुवारी २०२० पासून शोरूम बंद असल्याने मालाच्या साठ्याशी संबंधित अडचणी निर्माण झाल्या आणि व्यवसायाचे मोठे नुकसान झाले. तक्रारीत असा आरोप करण्यात आला आहे की, मणिमाजरा येथे 'बीइंग ह्युमन' ज्वेलरी शोरूम सुरु करण्यासाठी त्यांना आकर्षित करण्यात आले. कंपनीशी संबंधित काही व्यक्तींनी व्यवसायाच्या संधीबाबत चुकीची माहिती देऊन गुंतवणूक करण्यास प्रवृत्त केल्याचा दावा त्यांनी केला आहे.

# "रामायणला ऑस्कर मिळाला नाही तर..."



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नितेश तिवारी दिग्दर्शित आणि रणबीर कपूरची मुख्य भूमिका असलेल्या 'रामायण' चित्रपटाबाबत मोठं वक्तव्य केलं आहे. 'रामायण' चित्रपटाला ऑस्कर मिळाला नाही तर माझी निराशा होईल, असं ते म्हणाले.

रामायण चित्रपटाला ऑस्कर मिळाला नाही तर निराशा होईल, असं मुख्यमंत्री म्हणाले.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नितेश तिवारी यांच्या बहुप्रतिक्षित 'रामायण' चित्रपटाबद्दल मोठं वक्तव्य केलं आहे. आतुरतेने 'रामायण' चित्रपट रिलीज होण्याची वाट पाहत असल्याचं त्यांनी म्हटलंय. इतकंच नाही तर या चित्रपटामध्ये भारताला ऑस्कर मिळवून देण्याची क्षमता असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. मुंबईत निर्माते नमित मल्होत्रा यांच्या नवीन 'प्राइम वन' स्टुडिओच्या उद्घाटनादरम्यान मुख्यमंत्री म्हणाले की, जर या चित्रपटाला ऑस्कर मिळाला नाही तर त्यांची निराशा होईल.

गुरुवारी मुंबईतील फिल्मसिटीमध्ये 'प्राइम फोकस स्टुडिओ'च्या विस्ताराचा पहिला टप्पा असलेल्या 'प्राइम वन'च्या उद्घाटनाला मुख्यमंत्री फडणवीस उपस्थित होते. आपल्या भाषणात त्यांनी नमित मल्होत्रा यांच्या संकल्पनेचं कौतुक केले आणि रणबीर कपूर, साई पल्लवी व यश यांच्या मुख्य भूमिका असलेल्या 'रामायण' चित्रपटाबद्दल प्रतिक्रिया दिली.

'जर रामायण चित्रपटाला अकॅडमी अवॉर्ड मिळाला नाही, तर माझी निराशा होईल,' असं मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. हिंदुस्थान टाइम्सने हे वृत्त दिलंय.

'रामायण हा जगातला एक अतिशय आधुनिक सिनेमा येणार आहे. ज्याच्या ट्रेलरलाच बिलियनपेक्षा जास्त हिट मिळाले आहेत.

त्याचंही जवळपास सगळं काम त्यांनी याठिकाणी केलं आहे. त्यामुळे क्रिएटर्स इकॉनॉमीमुळे या फॅसिलिटीत एक मोठी भर पडली आहे,' असंही फडणवीसांनी नमूद केलं.

रामायण चित्रपटातील कलाकार

नितेश तिवारी दिग्दर्शित 'रामायण' हा दोन भागांचा सिनेमा आहे. यामध्ये रणबीर कपूर प्रभू श्री रामांच्या भूमिकेत, साई पल्लवी सीतेच्या भूमिकेत आणि यश रावणाच्या भूमिकेत आहेत.

# जेन झी आमची ताकद



जेन-झी'बद्दल केलेल्या वक्तव्यांमुळे निर्माण झालेल्या राजकीय वादळानंतर, भारतीय जनता पक्षाच्या खासदार आणि बॉलिवूड अभिनेत्री कंगना रणौतनं आपली भूमिका बदलली आहे. शुक्रवारी संसदेबाहेर माध्यमांसोबत साधलेल्या संवादात कंगना म्हणाली की, ही पिढीच आपली खरी ताकद आहे.

माध्यमांशी बोलताना, कंगना रणौतनं 'जेन-झी' बाबत सुरू असलेल्या चर्चेवर आपलं मत व्यक्त केलं. त्याचबरोबर विरोधी पक्षावरही टीका केली. आरएसएस प्रमुख मोहन भागवत यांनी गुरुवारी मुंबईत 'जेन-झी' आणि 'जेन-अल्फा' यांच्याशी तासभर संवाद साधला. 'आपण त्यांचं ऐकावं असं तुम्हाला वाटतं का?' यावर कंगना म्हणाली की, 'जेन-झी सरकारचाच एक भाग आहे. त्यांच्यामुळेच आम्ही इतकी वर्ष सत्तेत आहोत.'

'केवळ १०-१५ जेन झी आंदोलनादरम्यान शिवीगाळ करत नाहीत.', असंही कंगना म्हणाली. त्याचबरोबर झारखंडचं उदाहरण देत अभिनेत्री म्हणाली की, 'झारखंडमध्ये आंदोलन करणारे खूप आरामात बसले आहेत. अनेक तरुणांनी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत पदकं मिळवली. त्यांनी ती देशाला आणि पंतप्रधानांना समर्पित केली.' फक्त काही निवडक लोक जेन झींच नाव खराब करत आहेत. जेन झी ही आमची सर्वात मोठी ताकद आहेत आणि आम्हाला आमच्या जेन झींचा अभिमान आहे.

विरोधी पक्षांवर निशाणा साधत कंगना रणौत म्हणाली, 'विरोधी पक्षाने किती गोंधळ घातला आहे आणि त्यामुळे जनतेला किती त्रास सहन करावा लागत आहे, हे तुम्ही पाहू शकता. सरकारचं सर्व कामकाज थांबलं आहे. जी विधेयके मांडली जाणार होती, त्यावरही ते सहमत नाहीत. जेव्हा ते हरतात, तेव्हा ते रडतात.'

# ५१ व्या वर्षी निम्म्या वयाची मुले डेटसाठी...



मु बॉलिवूड इंडस्ट्रीत अशा अनेक लोकप्रिय अभिनेत्री आहेत, ज्यांनी वयाची ५० ओलांडली आहे अनब त्या सिंगल आयुष्य आनंदाने जगत आहेत. त्यापैकी एक आहे अभिनेत्री अमीषा पटेल . अमीषा ही तिच्या चित्रपटांपेक्षा वैयक्तिक आयुष्यामुळं जास्त चर्चेत असते.

५१ व्या वर्षीही अविवाहित असलेल्या अमीषानं आता लग्नाबाबत लग्न आणि रिलेशनशीपवर भाष्य केलंय. आपण कधीच लग्न करणार नसल्याचं सांगत अमीषानं यामागील कारणही स्पष्ट केलं आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'द' (ट्विटर) वर चाहत्यांशी एका सेशनदरम्यान संवाद साधताना एका चाहत्यानं तिला लग्न कधी करणार असा प्रश्न विचारला होता. यावर तिनं दिलेलं उत्तर चर्चेत आहे.

लग्न कधी करणार? चाहत्याच्या या प्रश्नाला उत्तर देताना अमीषा म्हणाली की, कधीच नाही!

सिंगल राहून मी खूप आनंदी आहे. माझ्यावर मनापासून प्रेम करणारे माझे १०० जवळचे कुटुंबीय आणि मित्र-मैत्रिणी आहेत. आणि आता हे मलाच नको की, एखादा पुरुष आयुष्यात येईल अनब तो हे सगळं बदलून टाकेन. छान सुरू असलेलं आयुष्य कुणी तरी येऊन बदलून टाकेन, हे मला पटंच नाहीये, असंही ती म्हणाली.

अमीषा पटेलनं यापूर्वी दिलेल्या मुलाखतींमध्ये आपल्या भूतकाळातील नातेसंबंधांवर भाष्य केलं होतं. तिनं सांगितलं की, चित्रपटसृष्टीत पाऊल ठेवण्यापूर्वी ती दक्षिण मुंबईतील एका प्रसिद्ध उद्योगपती कुटुंबातील मुलासोबत रिलेशनशिपमध्ये होती.

# शाहरुखचा 'किंग' मधील जबरदस्त लूक



शाहरुख खानचा 'किंग' हा बहुप्रतीक्षित चित्रपट मानला जात आहे. डिसेंबरला येणा-या या चित्रपटामध्ये शाहरुख खान व्यतिरिक्त, या चित्रपटात सुहाना खान, दीपिका पदुकोण, अभिषेक बच्चन, अनिल कपूर, राघव जुयाल आणि इतर अनेक कलाकार आहेत. सिद्धार्थ आनंद या चित्रपटाचे दिग्दर्शन करत आहेत.


अलीकडेच असे वृत्त आले आहे की, निर्माते सध्या अंतिम शेड्यूलसाठी लोकेशनच्या शोधात आहेत. शाहरुख खानला अशा ठिकाणी शूटिंग करायचे आहे जिथे त्याने यापूर्वी कधीही शूटिंग केलेले नाही. शाहरुख खान २०२३ नंतर या चित्रपटाद्वारे पुनरागमन करत आहे, त्यामुळे त्याच्या चाहत्यांसाठी ही एक मोठी संधी आहे. या सगळ्यात, शाहरुख खानचा एक लूक इंटरनेटवर व्हायरल होत आहे, जो कथितरित्या 'किंग'च्या सेटवरील आहे.

वृत्तानुसार काही काळापूर्वी 'किंग'च्या सेटवरील शाहरुख खानचा लूक आणि अनेक व्हिडिओ देखील व्हायरल झाले होते. तो दीपिका पदुकोणसोबत रोमँटिक सीन शूट करताना दिसला होता. आता हे स्पष्ट झाले आहे की, शाहरुख आणि दीपिका चित्रपटात एका रोमँटिक सीनमध्ये दिसणार आहेत. सुहाना खानचे अ‍ॅक्शन सीन अद्याप प्रदर्शित झालेले नाहीत, कारण हा तिचा पहिलाच थिएटरमध्ये प्रदर्शित होणारा चित्रपट आहे, त्यामुळे शाहरुख खान आपले सर्व प्रयत्न करत आहे.

# राजपाल यादवच्या शेतजमिनीचा लिलाव

अभिनेता राजपाल यादवने बँकेकडून घेतलेले १६.६१ कोटी रुपयांचे कर्ज न फेडल्यामुळे आता त्याच्या उत्तर प्रदेशातील घर आणि शेतजमिनीचा येत्या ९ सप्टेंबरला लिलाव होणार आहे. ठरलेल्या मुदतीत जर राजपालने थकबाकी भरली नाही, तर या दोन्ही मालमत्ता नव्या खरेदीदारांना विकल्या जाणार आहेत.

सेंट्रल बँक ऑफ इंडियाने राजपाल यादवच्या दोन मालमत्तांवर जप्तीची नोटीस लावली आहे.




राजपालने 'अता पता लापता' या चित्रपटाच्या निर्मितीसाठी सेंट्रल बँक ऑफ इंडियाकडून १६ कोटी ६१ लाख रुपयांचे कर्ज घेतले होते.

या कर्जासाठी त्याने उत्तर प्रदेशातील काही मालमत्ता बँकेकडे गहाण ठेवल्या होत्या, परंतु सिनेमा बॉक्स ऑफिसवर अपयशी ठरल्याने त्याला मोठा आर्थिक फटका बसल्याने त्याने कर्जाची रक्कम परतफेड केली नाही.

राजपालच्या शाहजहांपूर जिल्ह्यातील एक निवासी घर आणि एक शेतीची जमीन याचा बँकेकडून लिलाव होणार आहे.

ही मालमत्ता ३.९९ कोटी रुपयांची असल्याची माहिती आहे. बँकेने जारी केलेल्या नोटिसीनुसार, ९ सप्टेंबर रोजी हा लिलाव ऑनलाइन होणार आहे.

# स्पर्धकांशी गप्पा मारताना सांगितले अनेक अनुभव



अमिताभ बच्चन यांनी 'कौन बनेगा करोडपती' या क्विझ रिॲलिटी शोचा शुभारंभ केला आहे. एका एपिसोडमध्ये, त्यांनी एका स्पर्धकाशी गप्पा मारताना भोजपुरी सिनेमातील आपला अनुभव सांगितला. चॅनल ने तो एपिसोड आपल्या सोशल मीडियावर शेअर केला आहे, ज्यामध्ये स्पर्धकाने म्हटले की बिहारचे लोक अमिताभ बच्चन यांचा आदर करतात आणि त्यांना मान देतात.

इतकेच नाही तर, स्पर्धकाने त्यांना अधिक भोजपुरी चित्रपटांमध्ये काम करण्याची विनंती केली. स्पर्धकाच्या विनंतीचा आदर करत अमिताभ बच्चन म्हणाले, 'सर, आमच्या मेकअप मॅनचे नाव दीपक आहे. मी जेव्हा भोजपुरी चित्रपट केले, तेव्हा तो आमच्यासोबत होता. तुम्ही त्याला अजून पाहिले नाही का?' त्यावर स्पर्धकाने उत्तर दिले, 'हो, तुमचा चित्रपट 'गंगा' आहे, पण तुम्ही ओटीटीवर येऊन भोजपुरीमध्ये काम करायला हवे.'

एका व्हिडिओमध्ये, अमिताभ शोच्या मंचावर उशिरा पोहोचल्याबद्दल प्रेक्षकांची माफी मागताना दिसत आहेत. ते म्हणतात, 'सर्वप्रथम, हात जोडून मी उशिरा आल्याबद्दल माफी मागतो. कारण आज या नव्या पर्वाचे पहिले रेकॉर्डिंग आहे. त्यामुळे छोट्या-छोट्या गोष्टी जुळवून आणायला थोडा वेळ लागतो.

त्यानानंतर त्यांनी एक प्रसंग सांगितला : प्रेक्षक – तुमचा चष्मा चुकला आहे.मी म्हणालो – काय चुकलंय? मी तोच चष्मा २५ वर्षांपासून वापरतोय.प्रेक्षक म्हणाले – नाही सर, तो पिवळा दिसतोय.मी म्हणालो – हो, मी त्याला थोडी टिंट लावली आहे. म्हातारपणी एखाद्या वृद्ध व्यक्तीचे वय कसे कळते, ते त्याच्या डोळ्यांवरून कळते. तर, माझे डोळे आता म्हातारे झाले आहेत. म्हणून, ते लपवण्यासाठी मी त्यांना थोडी टिंट लावली आहे. म्हणून, मी माफी मागतो.

अमिताभ बच्चन थोडे गोंधळले आणि त्यांच्या खास शैलीत म्हणाले, 'अरे, तो तर भोजपुरी चित्रपट होता.' स्पर्धकाने पुढे सांगितले की, त्यांचा मुलगा मेगास्टार अमिताभ बच्चन यांना 'केबीसी अंकल' म्हणून ओळखतो, हे ऐकून त्यांना खळखळून हसू आले.

कौन बनेगा करोडपती सीझन १८ चा प्रीमियर १० ऑगस्ट रोजी होणार आहे.


हा लोकप्रिय शो सोनी एंटरटेनमेंट टेलिव्हिजन आणि सोनीलिव्हवर दर सोमवार ते शुक्रवार रात्री ९:०० वाजता प्रसारित होईल. या शोचे सूत्रसंचालन पुन्हा एकदा महानायक अमिताभ बच्चन करणार आहेत.

# 'माझा आवडता प्राणी- माझे बाबा' - गश्मीर महाजनी

लोकप्रिय अभिनेता गश्मीर महाजनी लवकरच एका शोमधून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. '१०८ बेस हॉस्पिटल उरी' असे या शोचे नाव आहे. या मालिकेतील गश्मीरचा लूक, त्याचा वेगळा अंदाज प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत आहे. मालिकेच्या प्रोमोवर प्रेक्षक भरभरून कौतुक करत आहेत.

गश्मीर महाजनी पोस्ट शेअर करत म्हणाला–आता या सगळ्यात गश्मीर महाजनी एका वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आला आहे. गश्मीरने नुकतीच एक पोस्ट शेअर केली आहे. यामध्ये त्याचा फोटो पाहायला मिळत आहे. तो पाठमोरा उभा आहे. आजूबाजूला अंधार दिसत आहे. त्यावर 'माझा आवडता प्राणी– माझे बाबा', असे लिहिले आहे. हा फोटो शेअर करताना त्याने शूटिंग सुरू झाल्याची इमोजी शेअर केली आहे.

आता गश्मीरचा हा नवीन प्रोजेक्ट आहे का? तो कोणत्या भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे, तो कोणत्या सिनेमातून किंवा वेब सीरिजमधून भेटीला येणार आहे, याबद्दल काहीही खुलासा केला नाही. त्यामुळे प्रेक्षकांची उत्सुकता वाढली आहे. गश्मीरच्या या फोटोमागे काय रहस्य आहे, याबद्दल जाणून घेण्यासाठी चाहते आतुर आहेत. नेटक-यांनी अनेक कमेंट्स करत त्याचे कौतुक केले आहे.



**धर्मस्वातंत्र्य कायदा समाजासमोर अनेक मूलभूत प्रश्न उपस्थित करणारा दस्तऐवज आहे. धर्मस्वातंत्र्य म्हणजे काय? राज्याने व्यक्तीच्या श्रद्धेपर्यंत किती हस्तक्षेप करावा? सामाजिकदृष्ट्या वंचित समुदायांचे संरक्षण आणि वैयक्तिक स्वातंत्र्य यामध्ये समतोल कसा साधायचा? या प्रश्नांची उत्तरे न्यायालयात किंवा विधिमंडळात मिळणार नाहीत; ती समाजाच्या परिपक्व संवादातून, शिक्षणातून आणि संविधानिक मूल्यांच्या आचरणातूनच मिळतील.**

# धार्मिक की सामाजिक?

संदीप बोरसे



महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य कायद्याच्या समर्थकांच्या मते हा कायदा व्यक्तीच्या धर्मस्वातंत्र्याचे संरक्षण करणारा आहे. विरोधकांच्या मते मात्र तो वैयक्तिक स्वातंत्र्यावर आणि घटनात्मक अधिकारांवर मर्यादा आणू शकतो. त्यामुळे हा प्रश्न केवळ कायद्याचा नसून समाजशास्त्रीय, घटनात्मक आणि मानवी हक्कांच्या दृष्टिकोनातून समजून घेणे आवश्यक ठरते. भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २५ नुसार प्रत्येक नागरिकाला विवेकस्वातंत्र्य तसेच धर्म स्वीकारण्याचा, आचरण करण्याचा आणि प्रचार करण्याचा अधिकार आहे. मात्र, हा अधिकार सार्वजनिक सुव्यवस्था, नैतिकता आणि आरोग्य यांच्या अधीन आहे. त्यामुळे बळजबरीने किंवा फसवणुकीने धर्मांतर करणे हे संविधानाने दिलेल्या धर्मस्वातंत्र्याचा भाग ठरत नाही.

सर्वोच्च न्यायालयानेही विविध निर्णयांमध्ये स्वेच्छेचे धर्मांतर आणि बळजबरीचे धर्मांतर यांच्यात स्पष्ट भेद केला आहे. धर्म हा समाजातील ऐक्य आणि सामूहिक नैतिकतेचा आधार असतो. धर्माच्या माध्यमातून समाजातील मूल्यव्यवस्था टिकून राहते. या दृष्टीने पाहता फसवणूक किंवा दबाव टाकून धर्मांतर घडवून आणले जात असेल तर त्यातून सामाजिक विश्वास आणि सामाजिक एकात्मतेला धक्का बसू शकतो. त्यामुळे अशा घटनांना प्रतिबंध करण्यासाठी कायद्याची गरज असल्याचे समर्थकांचे म्हणणे समजून घेता येते.

दुसरीकडे व्यक्तीच्या विवेकस्वातंत्र्याला आणि अर्थपूर्ण निवडीला महत्त्व दिले आहे. व्यक्तीने कोणता धर्म स्वीकारावा हा तिच्या वैयक्तिक श्रद्धेचा आणि नैतिक निर्णयाचा विषय आहे. जर एखादी व्यक्ती कोणत्याही दबावाशिवाय, पूर्ण माहितीच्या आधारे आणि स्वेच्छेने धर्मांतर करत असेल, तर राज्याने त्या निर्णयात कमीतकमी हस्तक्षेप करावा, अशी उदारमतवादी भूमिका सुसंगत वाटते. त्यामुळे कायद्याची अंमलबजावणी करताना 'स्वेच्छा' आणि 'बळजबरी' यांच्यातील सीमारेषा अत्यंत काळजीपूर्वक निश्चित करावी लागेल.

धर्म हा समाजातील आर्थिक आणि सामाजिक विषमतेशी जोडलेला आहे. अनेकदा आर्थिकदृष्ट्या दुर्बल, शिक्षणापासून वंचित किंवा सामाजिकदृष्ट्या उपेक्षित समूहांना शिक्षण, आरोग्य, रोजगार किंवा सामाजिक प्रतिष्ठेच्या आशेने धर्मांतराचा पर्याय आकर्षक वाटू शकतो. अशा परिस्थितीत केवळ धर्मांतर रोखणारा कायदा पुरेसा ठरत नाही. जर गरिबी, बेरोजगारी, जातीय भेदभाव आणि सामाजिक बहिष्कार कायम राहिला, तर धर्मांतराची कारणेही कायम राहतील. त्यामुळे मूळ सामाजिक आर्थिक विषमता दूर करणे हे तितकेच महत्त्वाचे आहे. समाजातील काही समुदायांकडे शिक्षण, माहिती, सामाजिक जाळे आणि सांस्कृतिक संसाधने कमी असतात. त्यामुळे ते सहजपणे प्रभावाखाली येऊ शकतात.

विशेषतः आदिवासी समाजात शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि मूलभूत सुविधा उपलब्ध नसतील तर बाह्य संस्थांचे आकर्षण वाढू शकते. त्यामुळे कायद्याबरोबरच राज्याने विकासाच्या संधी समानपणे उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.आदिवासी समाजाचा प्रश्न या चर्चेत विशेष महत्त्वाचा आहे. इतिहासात अनेक आदिवासी भागांमध्ये शासकीय यंत्रणा पोहोचण्याआधी शिक्षण आणि आरोग्याच्या सेवा विविध धार्मिक संस्थांनी उपलब्ध करून दिल्या होत्या. त्याचबरोबर काही ठिकाणी प्रलोभन किंवा अवलंबित्व निर्माण झाल्याच्या तक्रारीही समोर आल्या आहेत. त्यामुळे संपूर्ण आदिवासी समाजाला संशयाच्या नजरेने पाहणे योग्य नाही, तसेच त्यांच्या असुरक्षिततेकडे दुर्लक्ष करणेही योग्य ठरणार नाही. त्यांना दर्जेदार शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि सामाजिक सुरक्षा उपलब्ध करून देणे हेच दीर्घकालीन समाधान आहे.

या कायद्यात महिलांचे संरक्षण, अनुसूचित जाती-जमाती, अल्पवयीन आणि मानसिकदृष्ट्या दुर्बल व्यक्तींसाठी विशेष संरक्षणाच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत.

या तरतुदींचा उद्देश असुरक्षित घटकांना फसवणूक आणि दबावापासून संरक्षण देणे हा आहे. मात्र त्यांची अंमलबजावणी करताना संबंधित व्यक्तींच्या स्वायत्ततेचा आणि निर्णयक्षमतेचाही आदर राखणे आवश्यक आहे.

कायद्यात धर्मांतरासाठी ६० दिवसांची पूर्वसूचना देण्याची अट घालण्यात आली आहे. समर्थकांच्या मते त्यामुळे प्रशासनाला धर्मांतर स्वेच्छेने होत आहे की नाही, याची खात्री करता येईल; परंतु काही घटनातज्ज्ञांच्या मते, ही अट व्यक्तीच्या गोपनीयतेच्या आणि वैयक्तिक स्वातंत्र्याच्या अधिकाराशी संबंधित प्रश्न निर्माण करू शकते. विशेषतः सामाजिक किंवा कौटुंबिक दबाव असलेल्या परिस्थितीत अशी माहिती सार्वजनिक यंत्रणेकडे आधीच देणे संबंधित व्यक्तीसाठी धोकादायक ठरू शकते. त्यामुळे या तरतुदींची अंमलबजावणी अत्यंत संवेदनशीलतेने व्हावी लागेल.

या कायद्यात आणखी एक चर्चेचा विषय म्हणजे दोन भिन्न धर्मांच्या व्यक्तींमध्ये विवाह झाल्यास अपत्याला आईचा विवाहपूर्व धर्म लागू होईल, अशी तरतूद. या तरतुदीमागे धर्मांतराच्या माध्यमातून होर्णा?या वादांना आळा घालण्याचा उद्देश असला तरी भविष्यात अशा तरतुदींची घटनात्मक वैधता आणि व्यावहारिक परिणाम यावर न्यायालयीन चर्चा होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

समाजात विविध गटांमध्ये सत्ता, संसाधने आणि सांस्कृतिक वर्चस्व यासाठी संघर्ष चालू असतो. धर्मांतराचा प्रश्नही अनेकदा केवळ श्रद्धेचा नसून सामाजिक ओळख, राजकीय प्रतिनिधित्व, सांस्कृतिक अस्मिता आणि सत्तासंबंध यांच्याशी जोडलेला असतो. त्यामुळे या विषयाचे केवळ धार्मिक किंवा राजकीय ध्रुवीकरण न करता त्यामागील सामाजिक वास्तव समजून घेणे आवश्यक आहे.

भारतीय लोकशाहीचे सामर्थ्य तिच्या विविधतेत आहे. विविध धर्म, भाषा, संस्कृती आणि परंपरा यांचा आदर राखणे हे आपल्या संविधानाचे वैशिष्ट्य आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारचे बळजबरीचे, फसवणुकीचे किंवा प्रलोभनावर आधारित धर्मांतर स्वीकारता येणार नाही; त्याचवेळी व्यक्तीला तिच्या विवेकानुसार धर्म स्वीकारण्याचे किंवा बदलण्याचे घटनात्मक स्वातंत्र्यही तितकेच महत्त्वाचे आहे. या दोन मूल्यांमध्ये समतोल राखणे हीच राज्याची खरी कसोटी आहे. अखेरीस, कोणताही कायदा त्याच्या शब्दांपेक्षा त्याच्या अंमलबजावणीवर अधिक अवलंबून असतो.

जर या कायद्याचा वापर केवळ फसवणूक, बळजबरी आणि शोषण रोखण्यासाठी झाला, तर तो समाजातील दुर्बल घटकांच्या संरक्षणासाठी महत्त्वाचे साधन ठरू शकतो.

# आत्मपरीक्षणाचा कौल

***"विजयाचा अहंकार आणि पराभवाचा झटका दोन्ही सोबतच चालत असतात. स्थिती बदलण्यास फार वेळ लागत नाही. काही पराभव असे असतात जे केवळ एखाद्या पक्षाचे गणित बिघडवत नाहीत, तर त्यांच्या अहंकारालाच सुरूंग लावतात. तीन राज्यांतील तीन विधानसभा जागांच्या पोटनिवडणुकीचे निकाल नेमके हेच सांगणारे आहेत. भाजपसाठी मांजलपूरचा (गुजरात) विजय ही अगदी कोरडी मलमपट्टी ठरली आहे, कारण बांकीपूर आणि दतिया (मध्य प्रदेश) येथील पराभवाने दिल्लीपासून पाटण्यापर्यंतच्या सत्ताकेंद्रांना चांगलाच हादरा दिला."***

विजयाचा अहंकार आणि पराभवाचा झटका दोन्ही सोबतच चालत असतात. स्थिती बदलण्यास फार वेळ लागत नाही. काही पराभव असे असतात जे केवळ एखाद्या पक्षाचे गणित बिघडवत नाहीत, तर त्यांच्या अहंकारालाच सुरूंग लावतात. तीन राज्यांतील तीन विधानसभा जागांच्या पोटनिवडणुकीचे निकाल नेमके हेच सांगणारे आहेत. भाजपसाठी मांजलपूरचा (गुजरात) विजय ही अगदी कोरडी मलमपट्टी ठरली आहे, कारण बांकीपूर आणि दतिया (मध्य प्रदेश) येथील पराभवाने दिल्लीपासून पाटण्यापर्यंतच्या सत्ताकेंद्रांना चांगलाच हादरा दिला. विशेषतः बिहारमधील बांकीपूरचा निकाल हा केवळ एका मतदारसंघाचा निकाल म्हणून पाहता येणार नाही. १९९५ पासून म्हणजेच तब्बल तीन दशके हा मतदारसंघ भारतीय जनता पार्टीचा अभेद्य गड मानला जात होता. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांचा हा पारंपरिक मतदारसंघ. नितीन नवीन राज्यसभेवर गेल्याने ही जागा मोकळी झाली आणि भाजपने ही पोटनिवडणूक अत्यंत प्रतिष्ठेची केली. तरीही, बिहारमध्ये भाजपचाच मुख्यमंत्री असताना या जागेवर जन सुराज पक्षाचे प्रशांत किशोर यांनी मिळवलेला स्पष्ट विजय भाजपास जबर चपराक लगावणारा ठरला आहे. पक्षाला आत्मपरीक्षण करायला लावणारा आहे आणि त्याचसोबत विरोधी पक्षांनाही आत्मबळ देणारा आहे. या निकालाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य सांगायचे झाल्यास यातून निवडणूक रणनीतिज्ज्ञ प्रशांत किशोर यांचा झालेला यशस्वी राजकीय उदय. केवळ एका राज्यातच नाही, तर देशभरात पोहोचलेले आणि विचारात घेतले जाणारे आणखी एक नाव देशाच्या राजकीय पटलावर आता समोर आले आहे.



आजवर पडद्यामागून निवडणुकांचे नियोजन करणारे, रणनीती आखणारे प्रशांत किशोर जेव्हा स्वतः मैदानात उतरले, तेव्हा त्यांनी पहिल्याच प्रयत्नात इतिहास रचला. त्यांनी केवळ भाजपचाच पराभव केला नाही, तर प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या लालूप्रसादांच्या राष्ट्रीय जनता दलालाही तिर्स?या क्रमांकावर फेकून दिले. 'जय बिहार'च्या घोषणा देत प्रशांत किशोर यांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या बिहार धोरणावर प्रश्नचिन्ह उभे केले. 'गुजरातला बुलेट ट्रेन मिळणार आणि बिहारला मात्र पॅसेंजर ट्रेनवरच समाधान मानावे लागणार का?' हा त्यांचा सवाल थेट सामान्य मतदाराच्या मनाला भिडला. 'बिहारच्या नेतृत्वाची धुरा गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीकडे जाऊ नये अशी राज्यातील जनतेची इच्छा असल्याचे' जे वक्तव्य प्रशांत किशोर यांनी केले आहे ते विचारात घेण्यासारखे आहे.

हा विजय केवळ प्रशांत किशोर यांच्या राजकीय कौशल्याचा आहे का? असा प्रश्न जर उपस्थित होत असेल तर तसे ते नक्कीच नाही. हा कौल म्हणजे सर्वसामान्य जनता, विशेषतः तरुण वर्गामध्ये खदखदर्णा?या असंतोषाचा परिपाक आहे असे म्हणता येऊ शकते. नीट पेपरफुटीचे प्रकरण असो, यूजीसीचे वादग्रस्त नियम असोत किंवा भरत तिवारी एन्काउंटरसारखी स्थानिक प्रकरणे असोत तरुणांच्या रागाला भाजपने सातत्याने दुर्लक्षित केले.

सततचे विजय आणि सगळीकडे हाती असलेली सत्ता यामुळे हवेत तरंगर्णा?या भाजप नेतृत्वाने स्थानिक पातळीवर उमेदवार बदलण्याचा घोळ घातला आणि त्याचा फटका थेट मतपेटीत बसला. मध्य प्रदेशातील दतिया मतदारसंघाची कथाही वेगळी नाही.

# व्यसनमुक्तीचे आवाहन



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतीच नशामुक्त युवा संकल्प अभियानाची घोषणा केली. तरुणाईला संबोधित करताना त्यांनी अत्यंत मार्मिक आणि रोखठोक इशारा दिला. 'अंमली पदार्थ तुम्हाला काही काळासाठी नशा देऊ शकतात, परंतु ते तुमचे संपूर्ण आयुष्य आणि करिअर खालच्या पातळीवर नेतात' असे ते म्हणाले. पंतप्रधानांचे हे उद्गार देशातील सध्याच्या अत्यंत दाहक आणि चिंताजनक परिस्थितीवर ठेवलेले बोट आहे. भारत जेव्हा २०४७ पर्यंत एक विकसित राष्ट्र बनण्याचे स्वप्न पाहात आहे, तेव्हा देशाची सर्वात मोठी ताकद असलेली तरुणाई अंमली पदार्थांच्या दलदलीत अडकणे ही राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने धोक्याची घंटा आहे. म्हणूनच, व्यसनाधीनतेच्या या भस्मासुराविरुद्ध पुकारलेले हे युद्ध ही आजच्या काळाची सर्वात मोठी आणि तातडीची गरज आहे.

या अभियानाला जनभागीदारी म्हणजेच लोकचळवळीचे स्वरूप देण्यात आले असून, पुढील १०० आठवड्यांमध्ये दर रविवारी कला, क्रीडा, संस्कृती, योग आणि ध्यानाच्या माध्यमातून तरुणाईला जोडण्याचा संकल्प आखण्यात आला आहे. परंतु, या अभियानाचा मूळ गाभा आणि त्यामागचे भीषण वास्तव समजून घेणे गरजेचे आहे.

# पेपरफुटीचे प्रकार टाळण्यासाठी




प्रवेश परीक्षांचे किंवा वेगवेगळ्या विद्यापीठांचे पेपर लीक होणे हे आजचे प्रकरण नाही. वर्षानुवर्षे हे वेगवेगळ्या पातळीवर घडते आहे, पण अजूनही त्यावर ठोस उपाय सापडलेला दिसत नाही. एक पर्याय पुढीलप्रमाणे आहे. तो फुलप्रुफ असेल असा दावा करीत नाहीत. कारण प्रत्येक उपायात फायदे-तोटे दोन्ही दिसून येतात. निर्णय घेताना जास्तीत जास्त फायदे अनब कमीत कमी त्रुटी याकडे बघायचे असते.

नीटचे पेपरफुटी प्रकरण गांभीर्याने घेत शासनाने काही निर्णय घेतले आहेत. सरकारच्या चुका निश्चित झाल्या आहेत. काही बाबतीत उशीरदेखील झाला आहे. हे सर्व मान्य करत पुढील भविष्यात असे काही घडू नये म्हणून सरकारने उचललेली पावले योग्य दिशेची म्हणता येतील. राज्य सरकारनेदेखील अशा घटना घडू नयेत म्हणून केंद्र सरकारच्या पावलावर पाऊल ठेवायला हरकत नाही. प्रसिद्ध तज्ञ नंदन नीलेकणी यांच्या अध्यक्षतेखाली हा टास्क फोर्स स्थापन करण्यात आला आहे.त्यातील सभासददेखील त्याच तोलामोलाचे आहेत हे विशेष. नीलेकणी यांनीच आधारकार्डची अभूतपूर्व योजना अमलात आणली, राबवली.

प्रवेश परीक्षांचे किंवा वेगवेगळ्या विद्यापीठांचे पेपर लीक होणे हे आजचे प्रकरण नाही.

वर्षानुवर्षे हे वेगवेगळ्या पातळीवर घडते आहे, पण अजूनही त्यावर ठोस उपाय सापडलेला दिसत नाही. एक पर्याय पुढीलप्रमाणे आहे. तो फुलप्रुफ असेल असा दावा करीत नाहीत. कारण प्रत्येक उपायात फायदे-तोटे दोन्ही दिसून येतात. निर्णय घेताना जास्तीत जास्त फायदे अनब कमीत कमी त्रुटी याकडे बघायचे असते. प्रवेश परीक्षेसाठी संपूर्ण देशातून, विविध राज्यांतून विविध विषयांचे (फिजिक्स, केमेस्ट्री, बायोलॉजी, गणित) साधारण दोनशे तज्ञ निवडावेत. यात उच्च शिक्षण संस्थांतील अनुभवी प्राध्यापक असावेत. इतर देशांत काम करणारे मूळ भारतीय प्राध्यापकदेखील निवडता येतील. या प्रत्येकाकडून भरपूर वेळ देऊन, यथायोग्य मानधन देऊन शंभर प्रश्नांची मालिका तयार करून घ्यावी. त्यांना त्याची उत्तरे ( की) देखील तयार करायला सांगावीत. हे प्रश्न तयार करताना, त्यातून अंतिम निवड करताना सर्व प्रश्नांची काठिण्य पातळी सर्वसाधारण सारखी राहील याची दक्षता घेण्यात यावी. हे प्रश्न (उचित उत्तरासह) केंद्र परीक्षण समितीकडे जातील. या प्रश्नांची योग्य तपासणी व्हावी. ते अभ्यासक्रमाबाहेरचे नसावेत. त्यात चुका नसाव्यात.समजण्यात गोंधळ (कन्फ्युजन) नसावा. आता केंद्राकडे इतक्या मोठय़ा संख्येने प्रश्नांची बँक तयार झाली, तीही अचूक उत्तरासह. ही प्रश्न बँक उत्तरासह केंद्रीय संगणकामध्ये फीड करावी.

आता विद्यार्थ्याला परीक्षा देण्यासाठी विविध शहरांतील विद्यापीठ केंद्रात, शासकीय महाविद्यालयात किंवा सरकारमान्य संगणक सुविधा उपलब्ध असलेल्या केंद्रात संगणक प्रयोगशाळेत सुविधा निर्माण करावी. (जी तिथे असतेच. नव्याने काही करायची गरज नाही.) हे संगणक परीक्षेच्या वेळीच केंद्रातील प्रश्नसंचिका असलेल्या संचाशी तेवढय़ा वेळेपुरते जोडले जातील. विशिष्ट महिन्यात, आठवडय़ात साधारण तीन वेळा या परीक्षा घेण्यात येतील. ज्यामुळे विद्यार्थी व पालक यांची सोय, संगणकाची मर्यादित संख्या अनब इतर आवश्यक लॉजिस्टिक (सुविधा) याची एकत्र काळजी घेण्यात येईल.

विद्यार्थ्याने त्याच्या सोयीची तारीख, वेळ, जवळचे केंद्र निवड याची माहिती केंद्रीय यंत्रणेला फॉर्म भरतानाच द्यावी. त्याप्रमाणे केंद्रीय यंत्रणा त्याला परीक्षा केंद्र अनब वेळ कळवेल. त्याप्रमाणे विद्यार्थ्याने त्या केंद्रावर जाऊन संगणकाद्वारे परीक्षा द्यायची आहे.

# स्वावलंबी तंत्र सामर्थ्यासाठीचे 'सेमीकॉन'

डॉ .रवींद्र उटगीकर

कल्पना करा, तुमचा स्मार्टफोन आणि चारचाकी गाडी अचानक बंद पडली आहे; तुमच्या घरीच नव्हे, तर बाहेर बँकांचे कामकाज आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्थाही पूर्णतः विस्कळित झाली आहे; एवढेच काय, देशाची संरक्षण यंत्रणाही ठप्प होण्याचा धोका उद्भवला आहे... एकापाठोपाठ एक समस्यांचे असे डोंगर कधी उभे राहू शकतील? शक्यच नाही, अशी कोणाचीही पहिली प्रतिक्रिया असेल. एखाद्या काल्पनिक भयपटाचाच हा घटनाक्रम असू शकतो, असेही वाटेल. परंतु सहज नजरेलाही पडणार नाही, एवढ्या आकाराची एक वस्तू (खरे तर तिचा अभाव) हा सर्व हाहाकार माजवू शकते. त्यामुळेच या वस्तूचे उत्पादन आणि पुरवठा हा जागतिक वर्चस्ववादाचा मुद्दा होऊ लागला आहे.

आधुनिक जग होत्याचे नव्हते करण्याची क्षमता असर्णा?या या वस्तूचे नाव आहे सेमीकंडक्टर. सर्वपरिचित भाषेत त्यांना 'चिप' म्हटले जाते. आजकालच्या प्रत्येक इलेक्ट्रॉनिक उपकरणाचा 'मेंदू' म्हणून हे सेमीकंडक्टर्स कार्यरत असतात. त्यामुळे, त्यांची उपलब्धता हा केवळ तंत्रप्रगती किंवा तंत्रसरशीपुरता मर्यादित विषय राहिलेला नाही, तर एकूण देशविकास आणि जागतिक स्तरावरील देशाचे स्थान यांच्याशी जोडला गेला आहे.

सध्या या सेमीकंडक्टर्सच्या उत्पादनावर तैवान, चीन आणि कोरिया या देशांचे वर्चस्व आहे. त्यातून भविष्यात संकट उभे राहण्याची शक्यता लक्षात घेऊन अमेरिकेपासून युरोपपर्यंत प्रत्येक देश सावध झाला आहे. भारतानेही आता ' सेमीकॉन २.०' हा कार्यक्रम हाती घेतला आहे. त्यासाठी १.२७ सहस्राब्ज रुपयांचा (सुमारे १३.२० अब्ज डॉलर) आराखडा तयार केला आहे. सध्याच्या जागतिक अस्थिरतेच्या वातावरणात भारताने टाकलेले हे पाऊल समजून घेणे गरजेचे आहे.



सेमीकॉन १.० आणि २.०

भारताने २०२१मध्ये 'इंडियन सेमीकंडक्टर मिशन १.०'ची घोषणा केली होती. त्यासाठी ७६ हजार कोटी रुपयांची (सुमारे ७.८८ अब्ज डॉलर्स) तरतूद केली होती. व्यापारी तत्त्वावर सेमीकंडक्टर्स जुळणी आणि चाचणीची उद्योगकेंद्रे देशात स्थापन व्हावीत, हा त्यामागील उद्देश होता. त्याअंतर्गत अशा १२ प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली, त्यांपैकी तीन ठिकाणी प्रत्यक्ष उत्पादन सुरू झाले आणि चिप्स डिझाइनच्या क्षेत्रातील देशांतर्गत गुणवत्ता हेरणारी परिसंस्थाही विकसित झाली. एकुणात, हा पहिला टप्पा भरघोस यशस्वी ठरला. त्यामागे मान्यताप्राप्त प्रकल्पांच्या भांडवली खर्चातील निम्मा भार पेलण्यातील सरकारचा पुढाकार महत्त्वाचा होता. त्यासाठी या १२ प्रकल्पांत सुमारे १.६४ सहस्राब्ज रुपयांची गुंतवणूक सुनिश्चित झाली. यांपैकी तीन प्रकल्प गुजरातेत साणंदमध्ये आणि त्याच राज्यातील ढोलेरामध्ये आणखी दोन प्रकल्प आहेत साणंदमधील सर्व प्रकल्प कार्यान्वितही झाले आहेत, तर ढोलेरातील एकाचे बांधकाम सुरू आहे आणि दुस-याला नुकतीच मंजुरी मिळाली आहे. सुरतमध्येही एक प्रकल्प उभा राहणार आहे. आसाममधील जागिरोड या ठिकाणी एका प्रकल्पाचे बांधकाम सुरू आहे. त्यातून ईशान्य भारतासाठी संधींचे नवे दालन खुले होणार आहे. याखेरीज, मोहाली (पंजाब), जेवर (उत्तर प्रदेश), भुवनेश्वर (ओडिशा) आणि विशाखापट्टण (आंध्र प्रदेश) येथे अन्य प्रकल्प मंजूर झाले आहेत.

# कोरफडीचा रस प्या... सलग ३० दिवस



आजकाल अनेक जण दिवसाची सुरुवात अत्दा नीर अर्थात कोरफडीच्या रसाने करतात. वजन कमी करणे, पचन सुधारणे, त्वचेला नैसर्गिक चमक यावी आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढवणे अशा अनेक फायद्यांसाठी कोरफडीचा रस लोकप्रिय आहे. मात्र, सलग ३० दिवस रोज कोरफडीचा रस प्यायल्याने खरंच शरीरात मोठे बदल होतात का? याबाबत आयुर्वेद तज्ज्ञांनी काही महत्त्वाच्या गोष्टी सांगितल्या आहेत.

आयुर्वेदतज्ज्ञ डॉ. राजेश बयारी यांनी सांगितले की, आयुर्वेदात कोरफडीला 'कुमारी' असे म्हटले जाते. हार्मोन्सचे संतुलन राखण्यापासून ते शरीरासाठी अनेक मार्गांनी कोरफडीचे अनेक उपयोग सांगितले गेले आहेत. मात्र, याचा वापर योग्य प्रमाणात आणि योग्य प्रकारे करणे तितकेच महत्त्वाचे आहे.

कोरफडीच्या रसात भरपूर प्रमाणात पाणी, पॉलीफेनॉल्स, अँटिऑक्सिडंट्स, व्हिटॅमिन ए, सी, ई आणि काही बी-समूहातील जीवनसत्त्वे तसेच कॅल्शियम, मॅग्नेशियम, पोटॅशियम आणि झिंकसारखी खनिजे आढळतात. याशिवाय पॉलीसॅकेराइड्स शरीरातील ऑक्सिडेटिव्ह स्ट्रेस कमी करण्यास मदत करू शकतात. बाजारात मिळर्णा ?या कोरफडीच्या रसाची गुणवत्ता एकसारखी नसते. शुद्ध, डिकलराइज्ड आणि अत्दग्ह-मुक्त उत्पादने तुलनेने अधिक सुरक्षित मानली जातात.

मर्यादित प्रमाणात आणि संतुलित आहारासोबत कोरफडीचा रस घेतल्यास पुढील फायदे जाणवू शकतात.

पचनक्रिया सुधारण्यास मदत शरीरातील पाण्याची कमतरता कमी होणे सौम्य अँटिऑक्सिडंट संरक्षण काहींना बद्धकोष्ठतेत आराम पोट हलके वाटणे ऊर्जा किंचित वाढल्याची जाणीव. मात्र, प्रत्येक व्यक्तीमध्ये परिणाम वेगवेगळे असू शकतात.

कोरफडीचा रस पचन सुधारण्यासाठी उत्तम असल्याचे मानले जाते. काही संशोधनांमध्ये तो बद्धकोष्ठता किंवा इरिटेबल बॉवेल सिंड्रोम च्या काही लक्षणांमध्ये मदत करू शकतो असे दिसून आले आहे. आयुर्वेदानुसार त्याचे दीपन आणि पाचन गुण भूक वाढवण्यास आणि अन्नपचन सुधारण्यास मदत करतात. मात्र प्रत्येकाला समान फायदा होईलच असे नाही.

कोरफडमधील अँटिऑक्सिडंट्स आणि पॉलीसॅकेराइड्स शरीरातील ऑक्सिडेटिव्ह स्ट्रेस कमी करण्यास मदत करू शकतात. पुरेसे पाणी, संतुलित आहार आणि निरोगी जीवनशैलीसोबत कोरफड घेतल्यास त्वचेच्या आरोग्याला अप्रत्यक्ष फायदा होऊ शकतो.

आयुर्वेदानुसार, त्याचे रक्तशुद्धीकरण आणि त्वचेला पोषण देणारे गुण त्वचेसाठी उपयुक्त मानले जातात. मात्र, त्वचा उजळणे किंवा मुरुम पूर्णपणे कमी होणे याबाबत अद्याप ठोस पुरावे मर्यादित आहेत.

कोरफडीचा रसाबाबत वजन कमी करण्याचे अनेक दावे केले जातात. मात्र, केवळ कोरफडीचा रस पिऊन वजन कमी होत नाही. जर संतुलित आहार, नियमित व्यायाम, पुरेशी झोप आणि कॅलरी नियंत्रणासोबत कोरफडीचा रस घेतला, तर वजन कमी करण्याच्या प्रयत्नांना काही प्रमाणात मदत होऊ शकते.

तज्ज्ञांच्या मते, सकाळी रिकाम्या पोटी १५ ते २० मिली कोरफडीचा रस तेवढ्याच प्रमाणात कोमट पाण्यात मिसळून घेणे योग्य ठरू शकते.






# तुमची उशी तुम्ही किती दिवसांनी बदलता?

दररोज वापरली जाणारी उशी वेळेवर न बदलल्यास ॲलर्जी, दमा आणि मानदुखीसारख्या आरोग्याच्या समस्या उद्भवू शकतात, असा इशारा वैद्यकीय तज्ज्ञांनी दिला आहे.

**ॲलर्जीचा धोका वाढतो**

उशीतील धुळीचे कण श्वासावाटे शरीरात गेल्यास वर्षभर ॲलर्जीचा त्रास होऊ शकतो. सतत नाक बंद राहणे शिंकांचा त्रास खोकला डोळे लाल होणे किंवा खाज येणे. दम्याच्या रुग्णांसाठी अधिक धोकादायके. जुन्या उशीतील धुळीचे कण दम्याचा झटका येण्याचे प्रमुख कारण ठरू शकतात. शिवाय इतरही त्रास वाढू शकतात.छातीत जडपणा. श्वास घेताना घरघर. रात्री दम्याचे झटके. मुलांमध्ये भविष्यात दमा होण्याचा धोकाही वाढू शकतो. त्वचेच्या समस्या वाढू शकतात. घाम, तेल आणि जीवाणू उशीमध्ये साचल्याने त्वचेवरील छिद्रे बंद होतात. यामुळे- वारंवार मुरुम येणे त्वचेवर पुरळ एक्झिमा वाढणे.नाक बंद होणे, डोळ्यांची खाज आणि श्वास घेण्यास होणारा त्रास यामुळे रात्री वारंवार जाग येते. परिणामी गाढ झोप होत नाही आणि दुस-या दिवशी थकवा जाणवतो.उशी कालांतराने चपटी होते. त्यामुळे डोके आणि मानेला योग्य आधार मिळत नाही. यामुळे- मान आखडणे. खांद्यामध्ये वेदना. सकाळी उठल्यावर कडकपणा जाणवणे उशीचे कव्हर दर आठवड्याला धुवा. उशी दर ३ ते ६ महिन्यांनी स्वच्छ करा (उशीच्या प्रकारानुसार). प्रत्येक १ ते २ वर्षांनी उशी बदलणे योग्य ठरते. उशीचा आकार बदलला असेल किंवा ती चपटी झाली असेल, तर नवीन उशी घेण्यास विलंब करू नका.


# तुमची हाडे मजबूत आहेत का?



योगा, वॉक आणि हलका व्यायाम केल्याने शरीर तंदुरुस्त दिसते, मात्र काहींची हाडे आतून कमकुवत असू शकतात. अनेकदा ठिसूळ हाडांची कोणतीही लक्षणे जाणवत नाहीत.

कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डी युक्त संतुलित आहार घ्या. नियमित वजन उचलण्याचे व्यायाम करा.


धूम्रपान आणि मद्यपान टाळा. सूर्यप्रकाशात काही वेळ घालवा. डॉक्टरांच्या सल्ल्याने आवश्यक सप्लिमेंट्स किंवा ँदहा अहेॢबब ऊॊ करून घ्या. या चाचणीच्या मदतीने हाडांच्या गंभीर समस्येचा धोका ओळखता येतो आणि वेळेत उपचार घेता येतात.



# चेह-यावरील सुरकुत्या कमी होण्यासाठी ...

वाढते वय, प्रदूषण, तणाव आणि अयोग्य आहार यांचा परिणाम सर्वप्रथम त्वचेवर दिसून येतो. त्यामुळे चेह-यावर सुरकुत्या, बारीक रेषा आणि त्वचेचा सैलपणा जाणवू लागतो. अशा वेळी अनेकजण महागड्या अँटी-एजिंग क्रीम्स किंवा ब्युटी ट्रीटमेंट्सचा पर्याय निवडतात. मात्र काही नैसर्गिक घटकांचा वापर करून घरीही त्वचेसाठी पौष्टिक फेस क्रीम तयार करता येऊ शकते. तांदळाचे पीठ, जवस, कोरफडीचा गर, कच्चे दूध आणि व्हिटॅमिन ई या घटकांच्या साहाय्याने तयार होणारे हे घरगुती मिश्रण त्वचेला आर्द्रता देण्यास, मऊ ठेवण्यास आणि तजेलदार दिसण्यास मदत करू शकते.

# वारंवार होणा-या ॲसिडिटीकडे दुर्लक्ष करताय?



अनेकांना वारंवार ॲसिडिटीची समस्या भेडसावते. यामध्ये छातीत जळजळ होणे, आंबट ढेकर येणे, घशात जळजळ होणे किंवा पोटात जडपणा जाणवणे यांसारखे त्रास होऊ शकतात. अनेकदा लोक या समस्येला सामान्य समजून दुर्लक्ष करतात. पण हा त्रास वारंवार होत असेल तर त्यामागे चुकीचे खाणे-पिणे आणि जीवनशैली हे मोठे कारण असू शकते. अशा वेळी याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. जेणेकरून त्रास वाढण्यापूर्वी ॲसिडिटीवर नियंत्रण मिळवता येईल.

काही पदार्थ असे असतात जे ॲसिडिटीची समस्या वाढवू शकतात. मात्र, योग्य आहार आणि खाण्यापिण्याच्या चांगल्या सवयींमुळे या समस्येतून मोठा दिलासा मिळू शकतो. ॲसिडिटी दीर्घकाळ राहिल्यास इतर आरोग्य समस्या होण्याची शक्यता वाढते. जाणून घेऊया ॲसिडिटी वाढवणारे पदार्थ कोणते आहेत? या त्रासात काय खाणे योग्य मानले जाते आणि कोणत्या सवयी टाळल्या पाहिजेत.

काही पदार्थ ॲसिडिटीची समस्या वाढवू शकतात, तरीही प्रत्येक व्यक्तीवर याचा परिणाम वेगळा असू शकतो. तळलेले व जास्त चरबीयुक्त पदार्थ टाळले पाहिजे हे पदार्थ पचायला जास्त वेळ लागतो. त्यामुळे ॲसिडिटी वाढू शकते. मसालेदार जेवण, टोमॅटो, संत्री आणि लिंबासारखी आंबट फळे, चॉकलेट, पुदिना, कॉफी, चहा, कॅफिन असलेले ड्रिंक्स आणि कार्बोनेटेड ड्रिंक्स (सोडा/कोल्ड ड्रिंक्स) यांसारखे पदार्थांमुळे ॲसिडिटीचा त्रास होतो.

ॲसिडिटी झाल्यास ओट्स, केळी, हिरव्या पालेभाज्या, धान्ये, दही, डाळी आणि इतर फायबरयुक्त पदार्थ हे चांगले पर्याय ठरू शकतात. थोड्या-थोड्या प्रमाणात खाणे आणि पुरेसे पाणी पिणे हे देखील फायदेशीर ठरते. तुम्हाला जर एखाद्या विशिष्ट पदार्थाने ॲसिडिटी वाढत असेल तर, तो खाणे टाळा.

# मायग्रेन रूग्णांनी कटाक्षाने टाळा 'या' चुका...



बहुतक जण मायग्रेनला केवळ तीव्र डोकेदुखी समजतात. मात्र प्रत्यक्षात मायग्रेन हा मेंदूशी संबंधित एक गुंतागुंतीचा न्यूरोलॉजिकल विकार आहे. यामुळे फक्त डोकेदुखीच नाही तर मळमळ, उलट्या, प्रकाश आणि आवाजाची संवेदनशीलता, चक्कर येणे, लक्ष केंद्रित करण्यात अडचण अशा अनेक समस्या निर्माण होऊ शकतात. औषधे मायग्रेनचा त्रास कमी करण्यास मदत करतात, पण दैनंदिन जीवनातील काही चुकीच्या सवयींमुळे हा त्रास अधिक वाढू शकतो.

न्यूरोलॉजिस्ट डॉ. राहुल चावला यांनी मायग्रेन असलेल्या व्यक्तींनी टाळाव्यात अशा पाच महत्त्वाच्या चुका सांगितल्या आहेत. याशिवाय मेंदू आणि मणक्याच्या आजारांवरील उपचारांसाठी प्रसिद्ध डॉ. जगदीश चट्टनल्ली यांनीही या सल्ल्याला वैद्यकीय आधार देत काही महत्त्वाच्या गोष्टी स्पष्ट केल्या आहेत.

**१. मायग्रेनचे औषध उशिरा घेणे**

मायग्रेन सुरू झाल्यानंतर अनेक जण वेदना वाढेपर्यंत औषध घेत नाहीत. मात्र हीच सर्वात मोठी चूक ठरू शकते. डॉ. चावला यांच्या मते, मायग्रेनची सुरुवातीची लक्षणे दिसताच औषध घेतल्यास ते जास्त प्रभावी ठरते. वेदना तीव्र झाल्यानंतर औषधाचा परिणाम कमी होतो आणि डोकेदुखी दोन-तीन दिवस टिकून राहू शकते. डॉ. जगदीश चट्टनल्ली यांनी दिलेल्या माहितीनुसार, सुरुवातीलाच उपचार घेतल्यास वेदनांचे सिग्नल मेंदूमध्ये अधिक तीव्र होण्यापासून रोखता येतात आणि अटॅक लवकर नियंत्रणात येतो.

**२. सतत पेनकिलर घेणे**

डोकेदुखी झाली की वारंवार पेनकिलर घेण्याची सवय अनेकांना असते. मात्र यामुळे उलट परिस्थिती बिघडू शकते. तज्ज्ञांच्या मते, पेनकिलरचा अतिवापर केल्यास औषधांमुळेच डोकेदुखी होण्याचा धोका वाढतो. दीर्घकाळ असे औषध घेत राहिल्यास पोटातील अल्सर, किडनीचे नुकसान यासारख्या गंभीर समस्या देखील उद्भवू शकतात.

जर वारंवार मायग्रेनचा त्रास होत असेल तर केवळ वेदनाशामक औषधांवर अवलंबून न राहता न्यूरोलॉजिस्टचा सल्ला घेऊन प्रतिबंधात्मक उपचार सुरू करणे आवश्यक आहे.

**३. झोपेचे वेळापत्रक बिघडवणे**


मायग्रेन आणि झोप यांचा अतिशय जवळचा संबंध आहे. फक्त कमी झोप नव्हे तर उशिरापर्यंत जागरण, सहा तासांपेक्षा कमी झोप किंवा आठवड्याच्या शेवटी खूप जास्त झोप घेणेही मायग्रेन अटॅकला कारणीभूत ठरू शकते. तज्ज्ञांच्या मते, दररोज ठराविक वेळी झोपणे आणि उठणे ही सवय मायग्रेन नियंत्रणात ठेवण्यासाठी महत्त्वाची ठरते.

**४. ट्रिगर पॉइंटकडे दुर्लक्ष करणे**

प्रत्येक व्यक्तीचे मायग्रेन ट्रिगर्स वेगवेगळे असू शकतात. काही लोकांमध्ये नाश्ता टाळणे, शरीरात पाण्याची कमतरता, हवामानातील बदल, तीव्र परफ्यूम, चॉकलेट किंवा काही विशिष्ट खाद्यपदार्थ मायग्रेनला कारणीभूत ठरतात. तज्ज्ञ सांगतात की, कोणते ट्रिगर पॉइंट तुमच्यासाठी धोकादायक आहेत हे ओळखण्यासाठी हेडेक डायरी ठेवणे उपयुक्त ठरू शकते. त्यामध्ये डोकेदुखीची वेळ, झोप, आहार, ताणतणाव, मासिक पाळी, पाण्याचे सेवन आणि इतर कारणांची नोंद ठेवल्यास मायग्रेनचे पॅटर्न समजण्यास मदत होते.

**५. मायग्रेनला साधी डोकेदुखी समजणे**-मायग्रेन म्हणजे फक्त डोकेदुखी हा सर्वात मोठा गैरसमज आहे. मायग्रेनमध्ये मळमळ, उलट्या, प्रकाश व आवाजाची संवेदनशीलता, धूसर विचार, चक्कर, तोल जाणे, दृष्टीतील बदल अशा अनेक लक्षणांचा समावेश असू शकतो. काही दुर्मिळ प्रकरणांमध्ये तात्पुरता पॅरलिसिस सुद्धा होऊ शकतो. तज्ज्ञांच्या मते, अचानक आयुष्यातील सर्वात तीव्र डोकेदुखी होणे, बोलण्यात अडचण येणे, हात-पायात कमजोरी जाणवणे, झटके येणे, शुद्ध हरपणे किंवा नेहमीच्या मायग्रेनपेक्षा पूर्णपणे वेगळा त्रास जाणवत असल्यास त्वरित वैद्यकीय मदत घ्यावी.

# लहान मुलांनाही थायरॉईडचा धोका!



थायरॉईड ही अशी समस्या आहे ज्यामुळे शरीराचे वजन एकतर झपाट्याने कमी होते किंवा वाढते. ही आपल्या गळ्यात असलेली एक ग्रंथी असते. आपण जे काही खातो त्याचे ऊर्जेमध्ये रूपांतर करण्याचे काम ही ग्रंथी करते. थायरॉईडचे मुख्यत्वे दोन प्रकार असतात ते म्हणजे हायपोथायरॉईडीझम आणि हायपरथायरॉईडीझम.

तज्ज्ञांच्या मते, अनेकांना वाटते की थायरॉईड फक्त मोठ्या वयाच्या लोकांनाच होतो. पण लहान मुलांमध्येही थायरॉईडची समस्या उद्भवू शकते, विशेषतः हायपोथायरॉईडीझम.

याचा अर्थ असा की, थायरॉईड ग्रंथी शरीराच्या गरजेनुसार पुरेसे थायरॉईड संप्रेरक तयार करत नाही. मुलांची योग्य शारीरिक वाढ, मेंदूचा विकास आणि शरीरात ऊर्जा टिकवून ठेवण्यासाठी हे संप्रेरक अत्यंत आवश्यक असतात. मुलांमध्ये थायरॉईडची कोणती लक्षणे दिसल्यास डॉक्टरांचा सल्ला घेतला पाहिजे, याबद्दल तज्ज्ञांनी दिलेली माहिती जाणून घेऊया.

**पालकांनी मुलांच्या कोणत्या लक्षणांकडे लक्ष द्यावे?**

शारीरिक वाढ मंदावणे: जर तुमच्या मुलाची उंची किंवा शारीरिक वाढ त्याच्या वयानुसार मंदावली असेल तर डॉक्टरांचा सल्ला नक्की घ्या.

सतत थकवा जाणवणे: पुरेशी झोप झाल्यानंतरही जर मुलं नेहमी थकलेली दिसत असतील तर, त्याला फक्त आळस समजून दुर्लक्ष करू नका.

अभ्यासात मन न लागणे: मुलाला अभ्यासात लक्ष केंद्रीत करण्यास अडचण येत असेल, गोष्टी लक्षात ठेवण्यात त्रास होत असेल तर, त्यामागे थायरॉईड हे कारण असू शकते.

वजन वाढणे आणि बद्धकोष्ठता: कोणतेही स्पष्ट कारण नसताना वजन वाढत असेल आणि सोबतच बद्धकोष्ठतेचा त्रास होत असेल, तर हे हायपोथायरॉईडीझमचे लक्षण असू शकते. कारण थायरॉईड कमी काम करू लागल्यास शरीराचे मेटाबॉलिझम (चयापचय) आणि पचनसंस्था दोन्ही मंदावतात.

थंडी वाजणे आणि त्वचा कोरडी पडणे: जर तुमच्या मुलाला इतरांच्या तुलनेत जास्त थंडी वाजत असेल. तसेच त्याची त्वचा खूप कोरडी पडत असेल किंवा मानेच्या पुढील भागात सूज दिसत असेल, तर या लक्षणांकडे अजिबात दुर्लक्ष करू नका. त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्या.

थायरॉईडवर योग्य उपचार उपलब्ध आहेत. त्यामुळे जर मुलामध्ये ही लक्षणे एकत्र दिसत असतील, तर बालरोगतज्ज्ञांना नक्की दाखवा. एका सोप्या रक्तचाचणीने याचे निदान होते. वेळेवर उपचार सुरू झाल्यास मुलाची शारीरिक व मानसिक वाढ पूर्ववत आणि सामान्यपणे होऊ शकते.

# चवीच्या मोहात आरोग्याचा विसर



आजकाल घराबाहेर पडले, की प्रत्येक चौकात खाद्यपदार्थांचा वास जिभेला भुरळ पाडतो. मग ते तळलेले वडापाव, चटकदार पाणीपुरी, रंगीबेरंगी ज्यूस, आकर्षक मिठाया, चमचमीत बिर्याणी, मसालेदार चायनीज असो की गरमागरम समोसे... चव जिभेवर रेंगाळते आणि आपण क्षणाचाही विचार न करता ते पदार्थ खायला जातो. सोशल मीडियावर व्हायरल होर्णा ?या फूड व्हिडीओंनी तर या सवयीला अधिक खतपाणी घातले आहे. पण या चमचमीत पदार्थांच्या मागे लपलेले वास्तव मात्र अंगावर काटा आणणारे आहे. आज महाराष्ट्रात अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सुरू केलेल्या धडक कारवायांमुळे हा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. राज्यभरात बनावट तूप, कृत्रिम पनीर, भेसळयुक्त मसाले, निकृष्ट तेल, कालबाह्य अन्नपदार्थ, दूषित मिठाई आणि दूध यावर सातत्याने धाडी टाकल्या जात आहेत. अनेक कारखाने सील करण्यात आले, परवाने रद्द झाले, गुन्हे दाखल झाले. या कारवायांनी एक गोष्ट स्पष्ट केली, आपल्या ताटापर्यंत पोहोचणा-या अन्नाचा प्रवास जितका मोठा, तितकाच त्यात भेसळीचा धोका अधिक.

याच पार्श्वभूमीवर अभिनेता श्रेयस तळपडे यांची 'द इंडिया स्टोरी' या चित्रपटाच्या निमित्ताने दिलेली मुलाखत अत्यंत बोलकी आहे. त्यांनी या मुलाखतीत एक प्रश्न विचारला, तुमच्या थाळीतील अन्न खरोखरच सुरक्षित आहे का? हा प्रश्न केवळ चित्रपटाचा प्रचार नाही, तर समाजाला जागे करणारा इशारा आहे. श्रेयस तळपदे सांगतो की, या चित्रपटाची पटकथा वाचल्यानंतर थोडा धक्काच बसला. अन्नभेसळीमुळे लोकांचे जीव जाऊ शकतात, कर्करोगासारखे गंभीर आजार होऊ शकतात, हे समजल्यावर त्यांनी हा चित्रपट करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी स्पष्टपणे म्हटले की, आज घरचे अन्न खा, असे आपण म्हणतो; पण घरात येणारे तांदूळ, डाळी, तेल, दूध आणि मसालेच भेसळयुक्त असतील, तर घरचे अन्नही किती सुरक्षित आहे? हा प्रश्न प्रत्येक कुटुंबाने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे. श्रेयस तळपदे यांनी आणखी एक मुद्दा मांडला तो म्हणजे, आज ऑर्गॅनिक किंवा सेंद्रिय अन्नाच्या नावाखाली महागडी उत्पादने विकली जात आहेत. पण ती सामान्य माणसाच्या आवाक्यात आहेत का? जर सुरक्षित अन्न खाण्यासाठी जास्त पैसे मोजावे लागत असतील, तर गरीब आणि मध्यमवर्गीयांनी काय करावे? सुरक्षित अन्न हा श्रीमंतांचा विशेषाधिकार नसून प्रत्येक नागरिकाचा मूलभूत हक्क आहे. आज परिस्थिती अशी आहे की, बाजारात मिळर्णा ?या प्रत्येक वस्तूकडे संशयाने पाहावे लागते. दूध भेसळयुक्त तर नाही ना? तूप शुद्ध आहे का? मिठाईतील रंग आरोग्यास अपायकारक तर नाहीत? फळे कृत्रिमरीत्या पिकवली आहेत का? भाज्यांवर धोकादायक रसायनांचा मारा झाला आहे का? या प्रश्नांची उत्तरे सामान्य ग्राहकाकडे नसतात. अलीकडे आपल्या वाचनात अन्नभेसळ केलेल्या अनेक बातम्या समोर येत आहेत. प्रसिद्ध हॉटेलांमधील अन्नात अळ्या किंवा पाली आढळणे, ताकात माशी, मिठायांमध्ये किडे दिसणे, फ्रीजमध्ये कुजलेले मांस सापडणे, भाजीपाला डबक्यात धुणे, रस्त्यावरील खाद्यपदार्थांसाठी अत्यंत अस्वच्छ पाण्याचा वापर होत असल्याचे उघड झाले. यामध्ये केवळ विक्रेत्यांची चूक नाही.

तर ग्राहक म्हणून आपणही अनेकदा निष्काळजीपणा करतो. स्वस्तात मिळते, चविष्ट वाटते म्हणून किंवा सोशल मीडियावर प्रसिद्ध आहे म्हणून आपण कोणत्याही ठिकाणी खायला जातो. स्वच्छता, परवाना, अन्नाचा दर्जा, वापरलेले तेल, साठवणूक याचा विचार फार कमी लोक करतात.

दरम्यान, उत्तर प्रदेशच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल यांनी केलेले एक विधानही विचार करायला लावणारे आहे.

# तमिळ सोने वाटपामागे आकड्यांचे पितळ!

**मतांसाठी लोकप्रिय घोषणांचा सपाटा लावल्यावर आर्थिक शिस्त कशी बिघडते याचे आणखी एक उदाहरण तमिळनाडूचे देता येईल. देशात महाराष्ट्र आणि तमिळनाडू ही विकासात आघाडीवरील दोन राज्ये. असे असले तरी सध्या या दोन्ही राज्यांची आर्थिक घडी पार विस्कटली आहे. या दोन्ही राज्यांवरील कर्जाचा बोजा सुमारे ११ लाख कोटी झाला आहे. महाराष्ट्रावरील कर्जाचा बोजा हा स्थूल राज्य उत्पन्नाच्या तुलनेत २०.३९ टक्के राहण्याची शक्यता असली तरी तमिळनाडूत हे प्रमाण किमान २७ टक्के होण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.**




मतांसाठी लोकप्रिय घोषणांचा सपाटा लावल्यावर आर्थिक शिस्त कशी बिघडते याचे आणखी एक उदाहरण तमिळनाडूचे देता येईल. देशात महाराष्ट्र आणि तमिळनाडू ही विकासात आघाडीवरील दोन राज्ये. असे असले तरी सध्या या दोन्ही राज्यांची आर्थिक घडी पार विस्कटली आहे. या दोन्ही राज्यांवरील कर्जाचा बोजा सुमारे ११ लाख कोटी झाला आहे. महाराष्ट्रावरील कर्जाचा बोजा हा स्थूल राज्य उत्पन्नाच्या तुलनेत २०.३९ टक्के राहण्याची शक्यता असली तरी तमिळनाडूत हे प्रमाण किमान २७ टक्के होण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. कर्जाचे हे प्रमाण २५ टक्क्यांपेक्षा कमी असावे, हा निकषही तमिळनाडूने ओलांडला. त्या राज्यातील जोसेफ विजय यांच्या सरकारच्या पहिल्यावहिल्या अर्थसंकल्पात हे प्रमाण 'आम्हीच २७.३ वरून २७.१ टक्क्यांवर आणले' अशी बढाई असली तरी आकड्यांच्या या खेळाचे पितळ पुढल्या अर्थसंकल्पात उघडे पडू शकते. निवडणुकीपूर्वी विजय यांच्या टीव्हीके पक्षाने भरभरून आश्वासने दिली; सत्तेत आल्यावर आधीच्या सरकारच्या चुका लोकांसमोर आणण्यासाठी श्वेतपत्रिका जाहीर करण्याची नवीन प्रथाच अलीकडे रूढ झाली आहे, तीही विजय यांनी पाळली, इथवर ठीक. पण तमिळानाडूचे अर्थमंत्री विल्सन गेल्याच महिन्यात श्वेतपत्रिका प्रसिद्ध करताना आधीच्या द्रमुक सरकारवर आर्थिक शिस्त बिघडल्याचे सारे खापर फोडतात आणि अर्थसंकल्प मांडताना स्वत:देखील त्याच चुकांची पुनरावृत्ती करतात! यातून उलट राज्य अधिक गाळात जाईल की काय, अशी भीती व्यक्त होणे रास्तच.

मुळात मतदारांना मोफत रेवड्यांची निवडणुकोत्तर लाच सरकारी पैशाने देण्याचे राजकारण तमिळनाडूत २० वर्षांपूर्वी दिसले होते. त्या वेळी करुणानिधींच्या 'द्रमुक'ने गरीब कुटुंबांना मोफत रंगीत टीव्ही देण्याचे आमिष दाखवले. मग २०११ मध्ये जयललितांनी मिक्सर, लॅपटॉप मोफत देऊ केले, आता विजय थेट सोन्याची नाणी व अंगठ्या वाटणार आहेत! नववधूला लग्नाच्या वेळी आठ ग्रॅमचे सोन्याचे नाणे आणि सिल्कची साडी सरकारी खर्चाने देण्यासाठी राज्य अर्थसंकल्पात ८१२ कोटींची तरतूद आहे. शिवाय, सरकारी रुग्णालयांत-जन्माला येणाया प्रत्येक बालकाला एक ग्रॅमची सोन्याची अंगठी दिली जाईल. याकरिता ५६० कोटींची तरतूद करण्यात आली. नववधूला सोने वा नवजात बालकांना अंगठी देणे हे काही सरकारचे काम नाही. तरीही १३ अब्ज (१,३७२ कोटी) रुपयांचा सरकारी खर्च या सोनेवाटपावर होणार, कारण टीव्हीके पक्षाने जाहीरनाम्यात दिलेले आश्वासन! लोककल्याणा च्या योजना राबवून अधिक विकास करणे हे खरे तर सरकारचे कर्तव्य. सोन्याची नाणी आणि अंगठ्यांवर ही उधळपट्टीच. या योजनेच्या दुरुपयोगाची- बोगस नववधूंची प्रकरणे निघणार नाहीत कशावरून? त्याच वेळी महिला बचत गटांना कर्जासाठी ३८ हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांसाठी २०० वसतिगृहे बांधणे, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना लॅपटॉपचे वाटप, सायकलींचे वाटप, कृत्रिम बुद्धिमत्ता शहर वसविणे, क्रीडा प्रशिक्षणासाठी केंद्रे अशा विविध घोषणा करण्यात आल्या.

महाराष्ट्र, तमिळनाडू, कर्नाटक, मध्य प्रदेश वा पंजाब अशा कोणत्याही राज्यांमध्ये कर्ज काढून खर्च भागवण्याची चुकीची प्रथा पडली आहे. कर्जावरील फक्त व्याज फेडण्यासाठीच महाराष्ट्राला यंदा ७० हजार कोटी तर तमिळनाडूला ५१ हजार कोटी खर्च करावे लागणार आहेत. वस्तू आणि सेवा कर प्रणाली लागू झाल्यापासून राज्ये विकलांग झाली आहेत. तमिळनाडूत गेल्या पाच वर्षांत कर्जाचा बोजा दुप्पट झाला. विकास कामे किंवा नवीन मालमत्ता निर्माण होण्याच्या दृष्टीने कर्जाचा वापर व्हावा, अशी अपेक्षा असते. पण सध्या कोणतीच राज्ये याला अपवाद ठरलेली नाहीत. दैनंदिन खर्च व कर्मर्चा ?यांच्या वेतनावरच कर्जाची रक्कम खर्च होते. त्यावर 'कॅग'ने वेळोवेळी आक्षेप नोंदवूनही फरक पडलेला नाही.

'आर्थिक आघाडीवर सुधारणांना सुरुवात झाली आहे. विस्कळीत झालेली आर्थिक घडी पुन्हा रुळावर येण्यासाठी दोन वर्षे तरी लागतील,' असा विश्वास अर्थमंत्र्यांनी व्यक्त केला असला तरी सोन्याची नाणी व अंगठ्या वाटून आर्थिक परिस्थिती सुधारणार नाही.

# सुरक्षित कृत्रिम बुद्धिमत्ता



कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच एआय पूर्वी फक्त प्रश्नांची उत्तरे देत असे; पण आता तो संगणकावर विविध कामे करणारा एआय एजंट बनत आहे. मात्र अशा सक्षम तंत्रज्ञानामुळे नवीन प्रकारची सुरक्षा आव्हानेही समोर येऊ लागली आहेत. अलीकडे ध्जहअघब च्या सुरक्षा चाचण्यांमुळे याचीच प्रचीती आली.

या चाचण्यांबाबत अनेक ठिकाणी 'एआयने आदेश पाळले नाहीत', 'एआयने स्वतःचा बचाव केला', 'यंत्रे माणसाच्या नियंत्रणाबाहेर जात आहेत' अशा सनसनाटी बातम्या प्रसिद्ध झाल्या. प्रत्यक्षात मात्र हा प्रकार वेगळाच होता. ध्जहअघब संशोधकांनी नियंत्रित वातावरणात एआय एजंटला काही ठरावीक उद्दिष्टे दिली होती. त्या उद्दिष्टांपर्यंत पोहोचण्यासाठी त्याला विविध डिजीटल साधने वापरण्याची परवानगी होती. या प्रयोगांमध्ये काही प्रसंगी एआय एजंटने अपेक्षेपेक्षा वेगळे मार्ग स्वीकारले. उद्दिष्टगाठण्यासाठी त्याने उपलब्ध मर्यादांचा वेगळ्या पद्धतीने वापर करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे सुरक्षाव्यवस्थेतील संभाव्य त्रुटी संशोधकांच्या लक्षात आल्या. याचा अर्थ एआयला स्वतची इच्छा, भावना किंवा महत्त्वाकांक्षा निर्माण झाली असा अजिबात होत नाही. तो केवळ दिलेले उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी उपलब्ध पर्यायांचा शोध घेत असतो. संगणकशास्त्रात याला गोल-सीकिंग बिहेव्हियर असे म्हटले जाते. म्हणजेच, दिलेले काम पूर्ण कर हा आदेशच त्याच्यासाठी सर्वांत महत्त्वाचा ठरतो. यामधील महत्त्वाची संकल्पना म्हणजे रिवॉर्ड हॅकिंग. एखाद्या एआयला योग्य परिणामासाठी गुण किंवा बक्षीस देण्याची पद्धत वापरली जाते. परंतु कधी कधी तो अपेक्षित मार्गाने न जाता, नियमांतील पळवाटा शोधून तेच बक्षीस मिळवण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे बाहेरून पाहताना तो नियम मोडत असल्यासारखा वाटतो. प्रत्यक्षात तो स्वत विचार करून बंड करत नसतो; तर चुकीच्या प्रोत्साहन रचनेचा परिणाम दिसत असतो. म्हणूनच अशा चाचण्या अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जातात.

आघाडीच्या कंपन्या आता एआयची क्षमता वाढवण्याइतकेच त्याच्या सुरक्षेलाही प्राधान्य देत आहेत. स्वतंत्र सुरक्षा चाचण्या, बाह्य तज्ज्ञांकडून मूल्यांकन, नियंत्रित वातावरणातील प्रयोग, सतत निरीक्षण आणि संभाव्य धोक्यांचा आधीच अभ्यास अशा अनेक उपाययोजना केल्या जात आहेत. कारण भविष्यात एआय एजंट बँकिंग, आरोग्य, उद्योग, संशोधन, शासकीय सेवा आणि दैनंदिन जीवनात मोठ्या प्रमाणावर वापरले जाणार आहेत.

आज जगभरात एजेंटिक एआय विकसित करण्याची स्पर्धा सुरू आहे. भविष्यात हे एआय एजंट आपल्या वतीने तिकीट आरक्षित करतील, आर्थिक व्यवहार सांभाळतील, कार्यालयीन कामे पूर्ण करतील, संशोधन करतील आणि वैद्यकीय क्षेत्रातही मदत करतील. त्यामुळे त्यांची क्षमता जितकी वाढेल, तितकी त्यांच्यावरील नियंत्रणाची यंत्रणाही सक्षम असावी

# शर्यत अजून संपलेली नाही

**आज महिलांनी शिक्षण, उद्योग, प्रशासन आणि विज्ञान अशा प्रत्येक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाची छाप उमटवली. तरीही सर्वोच्च नेतृत्वाच्या पदांपर्यंत पोहोचताना अद्यापही अनेक अदृश्य अडथळे उभे राहतात. संधीची समानता, गुणवत्तेचा सन्मान आणि निर्णय घेणा-यांची मानसिकता या तीन गोष्टींची खरी परीक्षा याच टप्प्यावर होते. माजी पेप्सीको अध्यक्षा इंद्रा नूयी यांच्या अलीकडील वक्तव्याने हा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आणला. महिलांना संधी मिळवण्यासाठी अजूनही लढावंच लागतं? या प्रश्नाचं उत्तर शोधताना सुधा मूर्ती यांच्या आयुष्यातील एक प्रसंग आपल्याला सांगून जातो की, शर्यत महिलांच्या क्षमतेची नसून त्यांना समान संधी देणा-या समाजाच्या मानसिकतेची आहे आणि ती शर्यत अजून संपलेली नाही.**




माजी पेप्सीको अध्यक्षा इंद्रा नूयी यांनी अमेरिकेतील एका कार्यक्रमात माजी अमेरिकन परराष्ट्रमंत्री कॉन्डोलीझ्झा रईस यांच्याशी संवाद साधताना असे वक्तव्य केले की, 'मी अमेरिकेबाहेरील कोणत्याही देशात, भारतातसुद्धा, सीईओ होऊ शकले नसते. कारण अमेरिकेची व्यवस्था गुणवत्तेला प्राधान्य देते. येथे मार्गदर्शक तुम्ही पुरुष आहात की महिला, तुमची जात, वंश किंवा पार्श्वभूमी काय आहे, यापेक्षा तुमच्यातील गुणवत्ता आणि क्षमता महत्त्वाची मानतात.' या वक्तव्यानंतर भारतात मोठी चर्चा रंगली. काहींनी नूयी यांच्या मताशी सहमती दर्शवत भारतात अजूनही महिलांना सर्वोच्च नेतृत्वापर्यंत पोहोचताना अनेक संरचनात्मक अडथळ्यांना सामोरं जावं लागतं, असे म्हटले, तर अनेकांनी त्यांच्या विधानावर टीका करत भारतातील कॉर्पोरेट क्षेत्रात महिलांसाठी वाढलेल्या संधींकडे त्यांनी दुर्लक्ष केल्याचे मत व्यक्त केले. दुसरी गोष्ट भारतात जिथे महिला काम करतात तिथले वरिष्ठ महिलांविषयी काय विचार करतात किंवा त्यांचं मत काय असू शकतं हे देखील महत्त्वाचे आहे. या एकूणच पार्श्वभूमीवर मला एक किस्सा आठवतो.

महिलांना समान संधी मिळायला हव्यात, याचे सर्वात प्रभावी उदाहरण म्हणजे सुधा मूर्ती यांचा टेल्को अर्थात टाटामधील प्रवेश. हा प्रसंग आजही खासगी कंपनीतील महिलांच्या सक्षमीकरणाचा महत्त्वाचा टप्पा मानला जातो. सुधा मूर्ती यांनी एका मुलाखतीत सांगितलेला हा किस्सा. टेल्कोने अभियंत्यांच्या भरतीसाठी जाहिरात प्रसिद्ध केली होती. मात्र, त्या जाहिरातीच्या शेवटी 'महिला उमेदवारांनी अर्ज करू नये' अशी अट नमूद करण्यात आली होती. ही जाहिरात पाहिल्यानंतर सुधा मूर्ती यांनी थेट टाटा समूहाचे तत्कालीन अध्यक्ष जे. आर. डी. टाटा यांना पत्र लिहिलं. त्या पत्रात त्यांनी स्पष्टपणे नमूद केलं की, 'देशातील जवळपास ५० टक्के लोकसंख्या महिलांची असताना, केवळ लिंगाच्या आधारावर त्यांना नोकरीपासून दूर ठेवणे योग्य नाही.' हे पत्र वाचल्यानंतर जे. आर. डी. टाटा यांनी त्यांना मुलाखतीसाठी बोलावलं. मुलाखतीदरम्यान त्यांनी सांगितलं की, ही नियुक्ती जमशेदपूर येथे होती. त्या काळी तेथे बहुतांश कर्मचारी पुरुष होते आणि महिलांसाठी आवश्यक निवास व इतर सुविधा पुरेशा उपलब्ध नव्हत्या, त्यामुळेच ही अट जाहिरातीत टाकण्यात आली होती. मात्र, सुधा मूर्ती यांनी कोणतीही भीती न बाळगता ही नोकरी स्वीकारण्याची तयारी दर्शवली. त्या वेळी त्यांना अमेरिकेत पीएच.डी.साठी जाण्याची संधीही होती. तरीही त्यांनी टेल्कोमध्ये रुजू होण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या या निर्णयामुळे टेल्कोमध्ये महिला अभियंत्यांसाठी दारे खुली झाली आणि पुढील अनेक महिलांना अभियांत्रिकी क्षेत्रात संधी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला.

अमेरिकेनं मला जी संधी दिली ती मला भारतातही मिळाली नसती यावर नूयी यांच्याशी कोणी सहमत आहे, तर कोणी सहमत नाही. पण ज्यावेळी एखादी महिला मग ती त्या पदास लायक असेल, तर तिला त्या पदावर सन्मानानं विराजमान करणारी मानसिकता तिथे जिवंत असणंही तितकंच महत्त्वाचं आहे. सूधा मूर्ती या आपल्या कंपनीत रुजू होण्यास सक्षम आहेत मात्र त्यांच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने टाटा यांनी अधिक विचार केला. ही वैचारिक पातळी आज किती कंपन्यांमधील वरिष्ठांमध्ये असेल. महिला सक्षमच आहेत पण त्याची जाणीव प्रत्येक क्षेत्रातील पुरुषालाही असायला हवी. अर्थात आज नूयी यांनी मांडलेला मुद्दा चुकीचा नाही. महिलांचे नेतृत्व, शिक्षण आणि करिअरविषयी आणि त्यांच्या पदाविषयी बोलायचे तर टॉप-५०० कंपन्यांमध्ये केवळ ०.४ टक्के महिला सीईओ असल्याचे समोर आलंय. या पार्श्वभूमीवर सुधा मूर्ती यांची भूमिका अधिक महत्त्वाची ठरते. त्यांच्या मते, महिलांना शिक्षण, कौशल्यविकास आणि करिअरमध्ये पुरुषांप्रमाणे समान संधी मिळाल्या पाहिजेत. मात्र, केवळ महिला असल्यामुळे कोणालाही पद मिळू नये हे मान्य नाही. नेतृत्वाच्या संधी पात्रता, मेहनत आणि गुणवत्तेच्या आधारावर मिळायला हव्यात. आर्थिक स्वातंत्र्यामुळे आज महिलांचा आत्मविश्वास वाढला आणि नेतृत्वाच्या संधीही विस्तारत आहेत. पण हे देखील इतकच खरं की कुटुंबातील जबाबर्दा ?या, सामाजिक अपेक्षा आणि कार्यस्थळावरील अडचणी यामुळे अनेक महिला करिअरच्या मधल्या टप्प्यात मागे पडतात, याकडेही आपण लक्ष वेधायला हवं. कंपन्यांनी महिलांना टिकून राहता येईल, प्रगती करता येईल आणि नेतृत्वाच्या भूमिका स्वीकारता येतील, असे सकारात्मक आणि समावेशक कार्यपरिसर निर्माण करणे गरजेचे आहे. नूयी यांच्या वक्तव्यानंतर भारतीय कॉर्पोरेट क्षेत्रात लिंगवैविध्य आणि महिलांच्या नेतृत्वाचा मुद्दा केंद्रस्थानी आला.

बोर्डरूममध्ये महिलांचे प्रतिनिधित्व वाढल्याचे चित्र दिसत असले, तरी सर्वोच्च निर्णयक्षम पदांवर महिलांची उपस्थिती अत्यंत कमी असल्याचे समोर आले. ही परिस्थिती दर्शवते की महिलांना बोर्डमध्ये स्थान मिळत असले, तरी सर्वोच्च नेतृत्वापर्यंत पोहोचण्याचा त्यांचा प्रवास अजूनही कठीण आहे.

# कृत्रिम प्रज्ञा; नैसर्गिक प्रश्न!



एआय' तंत्रज्ञान मानवी प्रज्ञेची जागा घेईल किंवा काय, अशा मुद्द्यांची चर्चा बड्या देशांवर सोडून विकसनशील देशांनी 'एआय'चा वापर सुरू करावा असे जागतिक बँकेचे म्हणणे. जी भीती आतापर्यंत कडेकडेने व्यक्त केली जात होती ती जागतिक बँकेचा मंगळवारी प्रसिद्ध झालेला 'विकास अहवाल २०२६' खरी ठरवतो. जागतिक बँक असा अहवाल दरवर्षी प्रकाशित करते. ही प्रथा १९७८ पासून सुरू आहे. हे अहवाल त्या त्या काळातील वर्तमानाचे उत्तम संदर्भ असतात आणि त्याचे शास्त्रशुद्ध दस्तावेजीकरण त्यात असते. जागतिक अर्थकारण, हवामान बदल, वैश्विक राजकीय मतभेदांचा विकासावर परिणाम, शस्त्रस्पर्धा इत्यादी अनेक मुद्द्यांवर या अहवालांनी सविस्तर विवेचन केलेले आढळेल. जागतिक बँकेचा कर्मचारी वर्ग, त्यांच्या ताफ्यात असलेले अभ्यासक, विदा-विश्लेषणाची क्षमता, त्यांचा शास्त्रीय दृष्टिकोन आदी अनेक कारणांमुळे हे विकास अहवाल अनेकांसाठी पथदर्शक असतात. यंदाचा अहवालही बँकेच्या याच परंपरेत अभ्यासकांसाठी लक्षवेधी असेल. कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच आर्टिफिशियल इंटलिजन्स अर्थात एआय आणि या तंत्राच्या विकासाचे होणारे परिणाम यावर या ताज्या अहवालात भर देण्यात आलेला आहे. भारतासारख्या विकसनशील देशांसाठी हा अहवाल महत्त्वाचा ठरतो. त्यामुळे त्यावर भाष्य करणे गरजेचे.

यात लगेचच लक्षात येईल अशी बाब म्हणजे या अहवालात भारताची फिलिपिन्स या आशियाई देशाशी झालेली बरोबरी. आपल्या अवाढव्यतेच्या तुलनेत फिलिपिन्स अगदीच किरकोळ. लोकसंख्या जेमतेम ११.५ कोटींच्या आसपास. पण आर्थिक निकषांच्या मुद्द्यांवर या अहवालात भारताची बरोबरी फिलिपिन्स या देशाशी करण्यात आलेली आहे. म्हणजे काही विशिष्ट तंत्रज्ञानाच्या परिणामांवर भाष्य करताना ''भारत आणि फिलिपिन्स यांसारख्या देशांसष्ठ'' असा उल्लेख या अहवालात सर्रास आढळतो. याची योग्य ती दखल संबंधितांनी घ्यावी. ही अपेक्षा व्यक्त करताना 'योग्य ती' ही अट महत्त्वाची. याचे कारण एका अज्ञ वर्गास लगेच यात आपला अपमान वगैरे जाणवण्याचा धोका संभवतो. विश्वसत्ता होऊ पाहर्णा ?या एका देशाची बरोबरी अमेरिका, चीन आदींशी न करता फिलिपिनोंशी करणे अनेकांस कमीपणाचे वाटू शकते. तथापि देशांच्या तुलनेत त्या त्या प्रदेशातील नागरिकांचे दरडोई उत्पन्न हा घटक अत्यंत महत्त्वाचा; एकूण अर्थव्यवस्थेचा आकार अजिबात नव्हे. त्यामुळे आपली अर्थव्यवस्था उद्याच्या उद्या वा आजच्या आज जरी पाच लाख कोटी डॉलर्सची झाली तरी आपल्या नागरिकांचे दरडोई उत्पन्न हे सर्वसामान्य इंडोनेशियन वा फिलिपिनो याच्याइतकेच असण्याची शक्यता अधिक. त्यामुळे आर्थिक दृष्टिकोनांतून जगाकडे पाहणा-यांस या तुलनेत तितके काही गैर आढळणार नाही. या स्पष्टीकरणानंतर आता या अहवालाविषयी.

ज्या कंपन्या, आस्थापना जागतिक पातळीवर, जागतिक बाजारात कार्यरत आहेत, विविध देशांत त्यांच्या वस्तू वा सेवा पुरवल्या जात आहेत त्यांच्याकडून 'एआय'चा वापर अधिक व्यापकपणे केला जाईल आणि त्यांच्या तुलनेत केवळ स्थानिक बाजारपेठेपुरत्याच मर्यादित असलेल्या कंपन्या, आस्थापना यांस झळ बसू शकेल, असे हा अहवाल सांगतो. ही झळ म्हणजे अर्थातच अनेक प्रकारच्या कामांसाठी कर्मचारी नेमण्याची गरज कमी कमी होत जाणे. भारतासारख्या देशांतील तरुण प्रचंड प्रमाणावर या जागतिक आस्थापनांच्या 'बॅक ऑफिस' व्यवस्थापनात चाकरी करतात. म्हणजे या कंपन्या भले जगाच्या पाठीवर कोठेही असतील. पण त्यांच्या कर्मर्चा ?यांचे वेतन/भत्ते देण्याची प्रक्रिया, नोंदी हे आपल्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील अनेक कंपन्यांकडून हाताळले जाते. नव्याने उदयास आलेले आणि भारतीय अर्थव्यवस्थेच्या भरभराटीस हातभार लावणारे 'सेवा क्षेत्र' (स्विहस इंडस्ट्री) म्हणतात ते हेच.

'एआय'च्या वाढत्या प्रभावाचा फटका याच क्षेत्रास मोठ्या प्रमाणावर बसेल, असे हा अहवाल सांगतो. याबाबतच्या प्राथमिक आकडेवार ीनुसार वैश्विक आस्थापनांतील आऊटसोर्सिंग वा बिझनेस प्रोसेसिंग क्षेत्रात मग्न कंपन्यांतील नोकरभरती दक्षिण आशियाई देशांत १.६ टक्क्यांनी घटल्याचे आढळते. ही घट एकट्या 'चॅट जीपीटी'मुळे नोंदवली गेली. त्यानंतर 'चॅट जीपीटी' प्राथमिक इयत्तेतील वाटेल असे अनेक पंडिती 'एआय' बाजारात आले.